नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.**

**सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.**

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ

ऑक्टोबर–नोव्हेंबर १९७५

आश्विन–कार्तिक शके १८९६

दिवाळी अंक

संपादक : डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर

कार्यकारी संपादक : वसंत खेडेकर

मूल्य पाच रुपये

वर्ष ३१ अंक ७–८

श्री. ना. व

णि त्यानंतर आपापल्या परीने रंगभूमी
.रे वासुदेव शास्त्री खरे, वीर वामनराव
ांधकर, शां. गो. गुप्ते इत्यादी वीररसाचे वाण
टककार हेच केवळ प्रभाव गाजवीत होते असे



# संपादकीय

मंगल प्रेरणा आणि प्रवृत्ती जोपासाव्यात ही सनातन मानवी इच्छा आहे. त्यासाठी मानवानं अनेक साधनं तपश्चर्येनं मिळविली. धर्म शोधला; कर्मकांड रचलं; अर्थकारण व राजकारण घडविलं; – आणखी एक केलं– साहित्य विद्या मिळविली. शतकानुशतकं हे चाललय्. धर्म, कर्म, अर्थ, राज्य आणि साहित्य वेगवेगळी वळणं घेत आहेत; यांचे आकार रंग, रूप व पोत बदलतय् पण प्रेरणा आणि प्रवृत्ती मात्र सनातन आहेत. मानवतेचा मागोवा आणि सद्भावनेची संवृद्धि– निदान साहित्य तरी अजून साधते आहे.

युगवाणीचा हा दीपावली विशेषांक आहे. जुन्या व नव्या तशाच वैदर्भीय आणि सर्वच महाराष्ट्रीय लेखकांचा युगवाणीवर, हेवा वाटावा असा लोभ आहे. कुठल्याहि मानधनाची अपेक्षा न बाळगता सगळ्यांनी आपापले लेख पाठविलेले आहेत. नव्हे त्यांचीच आहे ही 'युगवाणी' म्हणून जिव्हाळ्यानं लिहीलय् त्यांनी की नसेल या अंकात जागा– तर पुढं पहा केव्हाहि... हेच वैशिष्टय आहे युगवाणीचं.– म्हणूनच तर 'विशेषांक' म्हणता मी... आणि मग तसं पाहिलं तर सगळेच विशेषांक असतात युगवाणीचे. लेखक अपरिचित असतील पण ते केवळ त्यांच्या नावांनीच. पक्व विचारांनी व समृद्ध भाषाशैलींनी तर खूप परिचित वाटतात. हे तुम्हाला– मी या सगळ्या लेखकांचा–युगवाणीवर प्रेम करणाऱ्या लेखकांचा ऋणी आहे. त्यांना, तुम्हाला, सगळ्यांना ही दीपावली सुखमय व समृद्धिकारक जावो हीच प्रभुचरणी प्रार्थना.

– संपादक

अनुक्रमणिका

प्रा. सुरेश म. डोळके, प्रा. श्रीधर शनवारे, प्रा. म. शं. वावगावकर
ोहर.

---

निवड–उपसमित्यांचे सदस्य

मनोहर, प्रा. या. मु. पाठक, प्रा. सौ. उषा लिमये, श्री. मनोहर
प्रा. म. शं. वावगावकर, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. श्री. मा. कुळकर्णी,
ा. बा. प्रभुदेसाई, प्रा. सुरेश म. डोळके, डॉ. ना. कृ. शनवारे,
ललित लेखन : प्रा. यशवंत मनोहर, प्रा. सौ. शकुंतला खोत,

---

# अनुक्रमणिका



---

मुखपृष्ठ : प्रकाश कावळे

# नाट्याचा प्रभाव आणि नाट्यावर प्रभाव

श्री. ना. बनहट्टी

पंचवीस वर्षांपूर्वी रंगभूमी हे ओसाड माळरान वाटत होते. मधून मधून क्वचित् रानझुडपे दिसावीत त्याप्रमाणे काही शहरातून हौशी नाट्यसंस्थांची खुरटलेली धडपड आणि ओहोळाच्या काठी तग धरून राहिलेल्या एकट्या दुकट्या वृक्षाप्रमाणे एखाद दुसरी व्यावसायिक नाटक मंडळी असा प्रकार त्यावेळी नजरेस येत होता. अशा ओसाडीमध्ये कंबर बांधून रंगभूमीला पुन्हा प्रफुल्लित करण्यासाठी जे लोक जीवाचा आटापिटा करीत होते त्यात दत्तात्रय राजाराम गोमकाळे हे प्रमुख होते. त्यांचे नाट्यवेड जन्मजात होते, अलौकिक होते. त्यांच्या आमच्या मैत्रीला अनेक पैलू होते; त्यातला मुख्य पैलू नाट्यप्रेम हा होता.

ज्याकाळाचा वर उल्लेख केला तो ओसाडीचा काळ संपला आहे–अर्थात त्या काळातल्या धडपडींच्या आठवणी मागे ठेवून. आता रंगभूमी भरारली आहे. पुष्प भाराने बहरली आहे. मुंबई, पुणे, नागपूर या तीन मुख्य मराठी शहरामध्ये नाट्यप्रयोगांचा धौशा चालू आहे. निराळ्या तऱ्हेने नाट्यप्रयोगांना व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले आहे. इतर शहरामध्ये बहुत करून नाटकाचे प्रयोगांना उभे राहण्यास नाटकगृहे नाहीत. म्हणून तेथे रंगभूमी अवतीर्ण होऊ शकत नाही. जेथे शक्य असेल तेथे तिचा अवतार होतोच. नाटकाची जागा सिनेमा कधीही घेऊ शकणार नाही हा जो सिद्धांत वनवासी अवस्थेमध्ये आम्ही न कचरता सांगत होतो त्याचा आता प्रत्यय आला आहे. नाटक आणि सिनेमा दोन्ही आपापल्या जागी सुखाने नांदत आहेत.

आजकाल जी नाटके होत आहेत त्यांच्यामध्ये जनमानसावर प्रभाव पाडण्याचे सामर्थ्य कितीसे आहे? रंगभूमीचा पूर्वीचा इतिहास पाहिला तर तिच्यामध्ये हे सामर्थ्य सदोदित होते असे दिसते. १९०४–५ पासून पुढे रंगभूमीवर आलेल्या 'कांचनगडची मोहना' इत्यादी नाटकांचे कर्ते, देशभक्त कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर आणि त्यानंतर आपापल्या परीने रंगभूमी गाजविणारे वासुदेव शास्त्री खरे, वीर वामनराव जोशी, औंधकर, शां. गो. गुप्ते इत्यादी वीररसाचे बाण घेतलेले नाटककार हेच केवळ प्रभाव गाजवीत होते असे नाही. किर्लोस्करांनी संगीत नाटकांचा अद्भुत नूतन प्रकार सुरू केला, तेव्हापासून जरी पाहिले तरी मोठमोठ्या नाटककारांच्या नाटकांनी त्या त्या वेळी जनमानसावर प्रभुत्व गाजविले, असेच दिसून येते. किर्लोस्करांच्या शाकुंतल, सौभद्र आणि अर्धे रामराज्य वियोग या अडीच नाटकांनी लोकांमध्ये एक प्रकारची नवी रसिकता निर्माण केली; नाट्याचा आणि संगीताचा मधुर आस्वाद घेण्याची प्रवणता मराठी प्रेक्षकामध्ये त्यांनी उत्पन्न केली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारख्या महासमर्थ विचारवंताची साक्ष या बाबतीत नमूद झाली आहे. त्यानंतर एकोणिसाव्या शतकाचे शेवटचे दशक म्हणजे उत्कट देशाभिमानाने भारलेला काळ या भावनेचे पोषण करणारी राणा भीमदेव प्रभृति नाटके त्या काळात गाजत होती. शत्रूचा नि:पात करणारे वीर रसात्मक प्रसंग आणि त्यांना शोभेशी कडोविकडीची भाषणे यांनी प्रेक्षकांची मने हेलावत होती.

तेव्हा साधारणपणे मराठी रंगभूमीच्या गतकाळाकडे पाहिले असता ती प्रभाव गाजविणारी, चैतन्याने स्फुरणारी अशी दिसते. ती करमणुकीचे साधन तर होतीच पण तिच्यात आणखीही काही तरी होते, ज्याबद्दल अभिमान बाळगावा असे काही तरी होते.

आता मधल्या वनवासानंतर रंगभूमी पुन्हा भरभराटली आहे. यांत्रिक आणि भौतिक प्रगतीमुळे पुण्या मुंबईची नाटकगृहे वास्तव आणि अद्भुत देखावे निर्माण करण्याच्या सामग्रीने सज्ज आहेत. आजकालचे नेपथ्यकार वाटेल तसले रम्य आणि अद्भुत दृष्य नजरेसमोर उभे करण्याच्या करामतीमध्ये तरबेज आहेत. नयनेन्द्रियाचे सुख ओसंडून वाहत आहे. नाटकांची कथानके

कल्पकतापूर्ण, संवाद खमंग आणि चटकदार हे सर्व काही चांगले आहे. नाटकपात्रे सुंदर, त्यांची वेशभूषा औचित्यपूर्ण आणि त्यांचा अभिनय ठाकठीक असतो. तेव्हा नाटक पाहायला जाणारा प्रेक्षक चांगली करमणूक पदरात घेऊन नाटक संपले म्हणजे सुखावलेल्या मनाने परत फिरतो, यात शंका नाही. पण या पलीकडे काय? कित्येक उच्च दर्जाचे नाटककार सध्या रंगभूमीवर नांदताहेत हे सत्य आहे. शिवाजी, संभाजी, बाजीराव यांच्यासारख्या इतिहास पुरुषांच्या मनोभूमिकेचा ठाव घेण्याचा प्रयत्न मोठ्या योग्यतेच्या नाटकाराकडून होत आहे, हे ही खरे. तथापि नाटकाला गेलेला प्रेक्षक नाटक पाहिल्यानंतर काही तेज, काही स्फूर्ति किंवा भावनिक वेड घेऊन परततो काय, असा प्रश्न मनात येतो. आपल्या रंगभूमीची परंपरा तशी आहे म्हणून असा प्रश्न उद्‌भवणे सहाजिक आहे.

केवळ कलेकरिता कला हे तत्व आपल्या रंगभूमीने फारसे मानले आहे किंवा तिला मानवले आहे असे दिसत नाही. जे उदात्त, भव्य, उत्कट असेल त्याचा ध्यास घेणे आणि जनमानसावर त्याचा छाप उमटविणे हे कार्य रंगभूमीने आजवर केलेले दिसते. निवळ कलाविलासात दंग होऊन राहणारे काल्पनिक सौंदर्य पूजक असे जे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारखे नाटककार ते मराठी रंगभूमीला फारसे मानवले नाहीत असे इतिहास सांगतो. या इतिहासाच्या संदर्भात सध्याच्या स्थितीकडे पाहिले तर आपणाला जे दृष्य दिसेल ते पूर्वपरंपरेशी कितपत सुसंगत आहे असा प्रश्न उद्‌भवणे क्रमप्राप्त आहे, असे म्हणावे लागेल. जनमानसावर प्रभाव गाजविणारी नाटके आपल्या कलापूर्णतेने लोकांना नुसती गुंग करीत नाहीत; काही उदात्त, उत्कट ध्येयाची ओढ मनाला लावतात. अशी आपली परंपरा आहे म्हणून अशा प्रकारची अपेक्षा मनात उद्‌भवते. शेक्सपियरने काय केले ? इब्सेनने काय केले ? अशा तऱ्हेचे प्रश्न उपस्थित करून परकीयांच्या साम्य कल्पनेने विचारांना धावडण्यात फारसा अर्थ नाही. आजच्या रंगभूमीची जी परिस्थिती दिसते ती आपल्या परंपरेचा वारसा धारण करणारी आणि आपल्या समाजस्थितीवर आधारलेली आहे, या वस्तुस्थितीला धरून आपणाला विचार केला पाहिजे. सध्या रंगभूमीवर आपल्या समाजाच्या सनातन भावनांना आवाहन करणारी भक्तीप्रधान नाटके एकाबाजूने तर अवखळ, उत्तान विनोदाची, सामाजिकतेचे विरळ वस्त्र पांघरणारी अशी नाटके दुसऱ्या बाजूने भरघोस गल्ला ओढीत आहेत. याला अपवाद मनोविश्लेषणी आणि समस्याप्रधान नाटकांचा असेल, तो अगदी अल्प प्रमाणात असावा. ध्येयवादी प्रभावशाली नाट्य अभावानेच जाणवते आहे. अशा नाटकांनी आपला भावनाप्रांत भारून जाऊन आपण वेडे कधी होऊ याची मराठी प्रेक्षक वाट पहात आहेत.

ज्या काळाचा वर उल्लेख केला त्या काळातले लेखक काय किंवा प्रेक्षक काय वेडे होऊ शकत असत. कोणत्यातरी भावनेच्या, विचाराच्या किंवा ध्येयाच्या मागे लागून भान विसरून जाण्याची शक्ति त्यावेळच्या लेखकामध्ये होती आणि तशीच ती वाचकांमध्ये, प्रेक्षकांमध्येही होती. देशाभिमानाच्या, स्वातंत्र्याच्या भावनेने वेडे होणारे नाटककार त्यावेळी होते किंवहुना 'दुष्ट सुधारकां'चा निःपात करण्याच्या त्वेषाने भरलेले असेही नाटककार त्या काळात झाले. प्रेक्षकांच्या मनावर त्यांनी प्रभाव गाजविला; त्यांच्या मनातील सुप्त भावनांनी प्रगट भावनांची साथ केली.

आज जे आपल्याला दिसत आहे ते या पूर्वीच्या प्रभावशाली परंपरेशी फारसे जुळणारे आहे असे दिसत नाही. आजच्या प्रेक्षकांच्या पदरात काय पडते याचा उल्लेख थोडासा वर केला आहे. बराचसा अवखळ विनोद आणि थोडीशी तोंडी लावण्याप्रमाणे सामाजिक टीका किंवा कौटुंबिक पाचपेच यांचे वितरण आजकालच्या नाटकातून होते. रुचिपालट म्हणून ज्याला 'मेलो ड्रामा' म्हणतात तसला नाट्याचा प्रकार मधून मधून चालतो. प्रेक्षकांच्या रसिकतेची कुवत तेथपर्यंत जाऊ शकते. एकंदरीत प्रेक्षकांच्या अभिरुचीची तऱ्हा आणि तिची कुवत या नाट्यसृष्टीच्या मार्गदर्शक बनल्या आहेत, असे दिसते. प्रभावशाली नाटककार समाजाची अभिरुचि खेचून नेतो, तिला सखोल, उन्नत किंवा विशाल बनविती. तसे काही सध्याच्या नाट्यक्षेत्रात आहे की नाही याचा विचार नाट्यचिंतकांनी करावयास हवा.

अलीकडील इंग्रजी नाटकांचे एक पुस्तक पाहत असता त्याच्या प्रस्तावनेत एक गमतीदार साम्य आढळले, त्याचा येथे उल्लेख करावासा वाटतो. Penguin Plays या मालीकेमधील New American Drama या नावाच्या पुस्तकात आधुनिक अमेरिकन नाटककारांची

(पुढील मजकूर पान १५१ वर)

# रामदासकृत अस्मानी सुलतानी : काही विचार

मधु जामकर

प्राचीन मराठी वाङ्मयात रामदास हे एक वादळी व्यक्तिमत्व आहे. त्यांनी स्थापन केलेला संप्रदाय आणि त्यांच्या साहित्याचे मूल्यापन अनेक टीककारांनी आप-आपल्यापरी उलटसुलट तपासून पाहिलेले आहे. 'संत' या पदास ते पात्र की अपात्र या विषयीचे वाद चर्चेस घेऊन कांहीना त्यांच्यातील राष्ट्रीय प्रवृत्तीचा भाग संतपणा पलिकडे नेणारा वाटला तर कांहींना त्यांची अभूतपूर्व कामगिरी उध्वस्त समाज उभा करण्यास संजीवनी देणारी वाटली. रामदासांचे वाङमय रुक्ष, ओवडधोवड आहे इथपासून ते श्रेष्ठ प्रतीचे गद्यकाव्य आहे इथपर्यंत त्यावर साधक बाधक चर्चा व्हावी यात त्यांचा मोठेपणा आहे. आपण 'शब्दसृष्टीचे ईश्वर' आहोत याची जाण त्यांच्या विविध साहित्यातून प्रत्ययास येते हा वाद बाजूला ठेवूनही त्यांची समग्र कविता आज नको तेवढी विचारार्ह वाटणारी आहे. समर्थांचा दासबोधासारखा विशालग्रंथ बहिर्मुख असला तरी त्यांची स्फुटकाव्ये अंतर्मुख पावलेली आहेत. त्यात सूक्ष्म आत्मचिंतन आत्मपरीक्षण असल्याने त्याचे समाज मनाशी रक्ताचे नाते निर्माण झालेले आहे. समर्थांची ही स्फुटकाव्ये 'स्व'शी प्रामाणिक राहूनही स्थल काल व व्यक्तीच्या मर्यादा ओलांडणारी आहेत. 'अस्मानी सुलतानी' हे स्फुटकाव्य आजच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुनः पुनः प्रेरणा देणारे मार्गदर्शनपर वाटले ते यामुळेच.

अस्मानी सुलतानी किंबहुना समग्र समर्थ कवितेचा विचार केवळ काव्य म्हणून करता येणे कटीण आहे. रामदासांचे चरित्र आणि त्यांचे काव्य यातील एकरुपता कमालीची अभेद्य आहे. विवेक हा या अद्वैताचा स्थायी भाव असून प्रचंड उद्योग, दुबळेपणाचा तिटकारा, समाजोन्मुखता, लोकोद्धाराची तळमळ आणि पारंपारिक वैभवास तुच्छ मानण्याची वृत्ती ही वैशिष्ट्ये या व्यक्तिमत्वास लाभलेली आहेत. आपला रोकडा अनुभव शब्दाच्या माध्यमातून व्यक्त करिताना त्यांच्या लेखणीचे वळण कधी सरळ तर कधी नागमोड्या मार्गाने आजूबाजूस समृद्ध करताना दिसते केवळ शब्दाचा कोरडेपणा या लेखणीस मानवणारा नाही. त्यांचे लिहणे प्रतीतीचे असल्याने त्यात आंधळेपणा मुळीच नाही. पळपुट्या दैववादावर विसंबून राहण्यापेक्षा विवेकयुक्त वैराग्याच्या पातळीवर सतत नांदत राहणे याची रामदासांना हौस असल्याने त्यांच्या परमार्थातील कर्मयोग वेळोवेळी चौफेर व डोळस झालेला दिसतो. यामुळे बुद्धीवादी प्रमाणता त्यात आहे. प्रयत्नवादाची त्याला धार आहे व सावधान वृत्तीच्या इशाऱ्यातून त्याला अपूर्व जागृती आलेली आहे. निवृत्तीपेक्षा प्रवृत्तीचा सतत ध्यास असलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्वास आजूबाजूच्या परिस्थितीने जागृत केले. नासिक–पंचवटी येथे बारा वर्षे पुरश्चरण करुन त्यांनी साऱ्या देशातून भ्रमंती करण्यास प्रारंभ केला. या समग्र भ्रमंतीत ते आत्मपरीक्षणाबरोबर समाज चिंतन करु लागले. आपल्या भोवती असलेली धार्मिक, सामाजिक व आर्थिक वाताहत पाहून त्यांचे संवेदनाक्षम मन अंतर्मुखतेकडून बहिर्मुखतेकडे धाव घेऊ लागले. अस्मानी सुलतानी संकटांची परंपरा व तिचे हिंदु समाजावर झालेले घोर परिणाम जे त्यांनी डोळयांनी पाहिले त्यामुळे त्यांचे वैचारिक मन पिळवटून गेले. लहानपणी आपल्या आईस 'चिंता करितो विश्वाची' असे उत्तर देणारी त्यांची वृत्ती यातून परिपक्व झालेली दिसते. रामदासांचा हा विशाल प्रवास निवृत्ती प्रवृत्तीचा आलटून पालटून एकातून दुसऱ्याकडे जाणारा आहे.

'अस्मानी सुलतानी' या काव्याचे महत्वाचे वैशिष्ठ्य हे की त्यात रामदासांनी समाजस्थितीचे अत्यंत धवधवीत चित्र काढले आहे. आपल्या भटकन्तीत मुसलमानी अंमलाचा जो काही परिणाम त्यांना दिसून आला त्यामुळे त्यांच्या अंतःकरणात विलक्षण कालवा कालव झाली. 'समर्थ' हे पद प्राप्त होण्यापूर्वीचा हा काळ त्यांच्या चिंतनगर्भतेचा होता. आपल्या सुकुमार व कोवळया अंतःकरणास आजूबाजूंची परिस्थिती पोखरणारी होती. या समग्र परिस्थितीचा आढावा घेताना

त्यांच्या लेखणीस एकीकडे उधाण भरतीची लाट येते तर दुसरीकडे आपल्या तटस्थ वृत्तीच्या वैचारिक भूमिकेने तिला संथ आत्मपरिक्षणाचा ध्यास लागतो. आपण ज्या प्रतिभेच्या जोरावर काव्य दरवारात उज्ज्वल व भावगर्भ कविता ठेवणार आहोत, तिला काव्यशास्त्राच्या मर्यादित नियमांचे कुंपण घालायचे नसून समाजहिताच्या प्रेरणेने तिला व्यापक व समंजस करायचे आहे याची डोळस जाणीव रामदासांना होती आपल्या काळात ज्या परधर्मीय परराज्यामुळे हिंदुसमाजाची कशी दैना झाली त्याचे हुवेहुब वर्णन ते देतात. स्वभावोक्ति अलंकार रामदासांनी इतक्या सहजतेने येथे व्यक्त केला आहे की त्यातील गोडी केवळ आपणास अवीट वाटावी.

"वहूसाल कल्पांत लोकासी आला
महर्गे वहू धाडि केली जनांला
कितीयेक मृत्यूसि ते योग्य जाले
किती येक ते देश त्यागूनि गेले"

या वर्णनातील सरळता व त्यामागे रामदासांची सूक्ष्म अवलोकनशक्ती केवळ अवर्णनीय व चिंतनीय वाटते. या श्लोकापासून पुढे जे वर्णन आपणा समोर येते त्यातील विचारगर्भता मनाला अस्वस्थ करित त्यांच्या लेखणी प्रचाराच्या मतिमानतेची वेगवेगळी वळणे शोधत जाते. महर्गता त्यामुळे ग्रामत्याग, प्रसंगी मृत्यू, गांवेची गांवे ओस पडणे, परसैन्यांच्या धाडी येणे, अतिवृष्टि व अनावृष्टि यामुळे लोक अन्नाला महाग होणे इ. प्रकारची अरिष्टे प्रजेवर कोसळत होती. रामदासांनी ही अरिष्टे एका सुसंगत व क्रमवार पद्धतीने सांगितलेली आहेत. शिवाय या संकट परंपरेत भावनेपेक्षा देखील विचारांचाच अधिक चढउतार आहे. ऐहिक जीवनातील दैनंदिन संकटे लोकांना त्रस्त करतांना सामाजिक अरिष्टातून राजकीय अरिष्टांकडे रामदासांची लेखणी तितकीच अचूक व तिखटपणे वळताना दिसते.

"कितीयेक ते तांव्रवंदीच गेले
कितीयेक मान्हाष्ट्रवंदी विमाले
कितीयेक ते छंद ना वंद कांही
किती येक वेवंद ते ठाईठाई"

समाजातील आत्मशत्रु व परकीयशत्रु यात जणु काय स्पर्धाच लागलेली आहे. यामुळे समाज हा वेवंदशाहीस सन्मुख झालेला आहे. अन्नाची वाण पडल्यामुळे परधर्मात जाऊन भ्रष्ट झाले होते व कित्येक कुलवंतानी धर्मासाठी प्राण दिले होते. दोन भिन्न प्रवृत्तीतील विरोध रामदास सहज टिपून जातात व आपल्या सूक्ष्मावलोकनातून त्याला परखड शब्दाची धार देऊन जातात. या समाजात होत असलेली स्त्रियांची विटंबना व इतरांची होत असलेली वीभत्स अवहेलना रामदासांच्या दृष्टीस घायाळ करते. अशावेळी त्यांचे शब्द आर्द्रतेत ओथंवून तुम्हां आम्हाला भूतकाळातून वर्तमानाकाळापर्यंत विचार करण्यास भाग पाडतात. समग्र समाजाची होत असलेली सर्वांगीण विटंबना रामदासांना समाजापुढे ठेवण्यात जे औचित्य वाटत होते त्यामागे त्यांचे तळमळीचे मन अस्वस्थ पावलेले आहे. क्रमांक एक ते पांच पर्यंतचे श्लोक एका सलग प्रवाहातून आजूबाजूचा परिसर विचारी वनविणारे आहेत. त्यास एक प्रकारची सामाजिक तशीच तात्विक वैठक लाभल्यामुळे त्यातून येणारे सूत्रवद्ध विचार समाजमंथनाचा एक महत्वाचा भाग वनलेला आहे.

या पुढील वर्णनात रामदास लोकांच्या ऐहिक, धार्मिक दुस्थितीचा आढावा घेताना दिसतात. याही वर्णनास एक प्रकारचा वांधेसूद आकार आहे. स्वत: प्रमाणेच इतरांना अस्वस्थ करणारा विकार आहे. या वर्णनाचे नजरेत भरणारे एकमेव वैशिष्ठ्य म्हणजे प्रत्येक श्लोकात रामदासांनी एका खास क्रियापदांचा दुहेरी किंवा तिहेरी केलेला वापर हे होय.

"काही मिळेना मिळेना खायाला
ठाव नाही रे नाही रे नाही रे जायाला
हौस कैंची रे कैंची रे कैंची रे गायाला
कोठे जावे रे जावे रे जावे रे मागायाला

वरील श्लोकात 'मिळेना', 'नाही रे' आणि 'कैंची रे' 'जावे रे' या शब्दांचा तिहेरी वापर आल्यामुळे रामदासाचे श्लोकत्व आपल्या अंगभूत सौंदर्यातून एका आगळ्या वेगळ्या 'पावरफुल' शब्दांच्या अर्थवलयांनी संपन्न झालेले दिसते. ही रचना वरपांगी ओवडधोवड व रूक्ष वाटेल परंतु या खडकाळ माध्यमातूच जेव्हा आपले अस्वस्थ मन भावनेचा प्रवाह शोधतांना दिसते तेव्हा त्यातील 'थ्रिल' वैचारिक क्रांतीच्या ओघाकडे कल देताना सवळ होईल. शिवाय कोणत्या शब्दांचा तिहेरी व दुहेरी वापर करायचा याचा विवेक रामदासांनी अचकपणे जाणून घेतल्यामुळे अनेक प्रतिध्वनि त्यातून

तुम्हा आम्हांपर्यंत येताना दिसतात. क्षणभर आपण आजूबाजूला पाहतो– अस्वस्थ होतो. वैचारिक क्रांतीचा अंदाज घेतो व पुन्हा एकवार घायाळ होऊन अंतर्मुख होतो. एवढे यश या रचनेस प्राप्त झालेले आहे.

रामदासांचे अवलोकन जितके परखड व सूक्ष्म तितकेच ते अनेकांगांनी परिपूर्ण आहे. आपल्या समाजाची दुरवस्था वर्णन करिताना रामदासांनी वैयक्तिक अधःपतनाकडे दुर्लक्ष केलेले नाही. समाज हा अनेक व्यक्तींनी समृद्ध झालेला असतो. यामुळेच एकाच्या अधःपतनाचा कार्यभाग अनेकांना आपल्यात सामावून समाजाच्या अवनतीचा भाग बनलेला असतो. वैयक्तिक अधःपतनाचे अनेक बारकावे रामदासांनी येथे वर्णन केले आहेत. घरी खायला नाही व वाटेत कोणी भीक घालत नाही यातील कुंचबणा काळजाला भिडणारी वाटते शेते पिकत नाहीत, कष्ट करूनही फजितवाडा होतो व शेवटी दिसते काय तर:

"अवघे जाहाले जाहाले जाहाले थोतांड"

रामदासांच्या या विधानातील 'जाहाले' या क्रियापदाचा तिहेरी वापर अस्वस्थतेची धार तीक्ष्ण धरणारा आहे. रामदास नेमके क्रियापदच पुनः पुनः वापरतात. आपल्या समाजात जी क्रिया घडते यामागे असणारी कारणमीमांसा करण्यापेक्षा त्या क्रियेचे अचूक, परखड व निर्मळ रूप दाखवून 'क्रियाहीन' समाजास 'क्रियाशील' करण्याचे सामर्थ्य यावे ही त्यांची भूमिका आहे. सावधान, विवेक व प्रयत्नवाद ही समर्थ कर्तुत्वाची तेजस्वी अंगे. या अंगांचा परामर्ष घेता त्यांची वरील औचित्य मांडणी आशय आणि अभिव्यक्ती यांचा पदर एकमेकात मिसळून देणारी नव्हती काय? शिवाय या अभिव्यक्तीस आपल्या अंगभूत सौंदर्याने एक वेगळेच लेणे लाभलेले आहे.

"देश नासला नासला उठे तोचि कुटी
पिके होताचि होताचि होते लुटालुटी
घाळा करिता जिवलगा जाली तुटातुटी
अवघ्या कुटुंबा कुटुंबा होते फुटाफुटी"

धर्म आणि सदाचार यास लंड झालेली दुनिया (लंड हा शब्द गांवढळ असूनही अनेक अर्थवलये देऊन जातो) आपल्या बेबंदशाहीत प्रजेला लुटीत जाते. पीके कणसाला येतात न येतात तो ती लुटण्यात येतात. रामदासांना लुटण्याची क्रिया घरी, दारी व्यक्तीतून समष्टीत होतांना दिसते. मूळामकट ज्वारीचे झाड उपटावे त्याप्रमाणे हा समाज अयपासून इतिपर्यंत उध्वस्त होताना रामदासाचे विचारीमन पाहतो तेव्हा त्यास अगतिकता आल्यास नवल ते काय? आपले संघटना चातुर्याचे ब्रीद जेव्हा रसातळाला जाते तेव्हा हीच लेखणी समाजाचा खरपूस समाचार घेताना दिसते. ही फाटाफूट समाजाच्या विविध थरातून वावरतांना दिसते. व्यापारी, शेतकरी सारखेच कंगाल व धर्मभ्रष्ट झालेले आहेत. ही कुटुंबे विरघळीत असल्याने अवनतीकडे झुकणारी आहेत. त्यांना स्वरक्षणाचा आधार नाही. सहाजिकच प्रतिष्ठा, अब्रु त्यांच्याजवळ शिल्लक नाही. त्यामुळेच

"काय होणार होणार होणार टळेना
पुण्य गेलेरे गेलेरे कांहीच कळेना"

आपल्या भवितव्यापुढे घनदाट अंधार असल्याने अचूक भविष्याचा कठोर अंदाज घेणे क्रमप्राप्त आहे.

"सुडके पटकर पटकर न मिळे पांघरावया
शक्ती नाही रे नाही रे कोपट करावया"

अशी अवस्था असल्याने आपले समाजातील स्थान वेळीच जाणणे हिताचे आहे. दारिद्र्याचा उच्चांक जीवनातील काळोख पिंजत इतरांच्या जीवनाला चालना देतो तोही काळोखातून काळोखाकडेच. यातून मरणाची ओढ लागते. परंतु एवढे सहज प्राप्त मरण कसे यावे? ज्यांना जीवनाकडे पाहण्याची ते जगण्याची पात्रता नाही ते मरणाशी कसे सामना देऊ शकतील? हवे ते मरण मिळत नाही यामुळे आत्महत्येचा ध्यास लागतो. अनेक मार्गांनी आत्महत्येचा प्रयत्न होतो. कष्ट करून मिळविलेला पैसा शेवटी 'नागवले' करून जातो. अन्न, वस्त्र व निवारा या जीवनाच्या प्राथमिक गरजांचा हक्काचा हिशोब देखील अचूक प्राप्त होऊ नये या दुर्दैवाची महती कशी वर्णावी? जीवनापासून पलायनवाद करणारा समाज जो रामदासांनी विकलांगी पाहिला त्यास आलेली अवकळा सर्वांनाच पोखरणारी, प्रसंगी घायाळ करणारी आहे. भावना आणि विचार एकाचवेळी अस्वस्थ करून सोडतात.

सर्वांगाने नग्न पावलेला समाज न्याय मिळत नसल्यामुळे हताश होऊन दिशादिशातून धावतो आहे. मरमर चाकरी करून पोटभर भाकरी मिळत नाही. सर्वत्र शिरजोरपणा माजला आहे. चार पैसे दिले की मारामारीला सुरवात होते. घरचा पाहुणा घरातून

लेवकर जात नाही. उलट तो पाहुणा असून यजमान होतो. रामदासांनी पाहुण्याचा जो दाखला शेवटच्या वर्णनात दिला आहे त्यातून त्यांची सूक्ष्म अवलोकन शक्ती दिसतेच पण त्या बरोबरच विनोदी शैलीने या समाजाचे एक वेगळे दर्शन आपणास दिसते. शिवाय या पाहुण्याचा दाखला रोजच्या व्यवहारातील सर्वांनाच आपुलकीचा असल्याने त्यातील मार्मिक खुमास समाजाच्या अवनतीचे आवर्तन परिपूर्ण करण्यास मदत करते. "वस्त्रे धोतरेपातरे लपऊनी पळती" या विधानातील घडवट अर्धछटा अंतर्बाह्य समाजाच्या नग्नावस्थेचा अस्वस्थपणा देऊन जातात व रामदास शेवटी पश्चातापदग्ध होऊन अगतिकतेच्या मोक्याच्या ठिकाणावर उभे राहून आत्मनिरीक्षणाकडे तोल फेकताना दिसतात.

अस्मानी सुलतानीच्या दुसऱ्या आवर्तातील एक ते बारा श्लोक असे क्रमाक्रमाने अर्थ विकसनातून आत्मपरीक्षणाकडे येताना दिसतात. या समग्र चिंतनगर्भ शब्दांचा पसारा जेवढा कळण्यास सोपा तेवढाच आजच्या समाजास मार्गदर्शनपर आहे. म्हणूनच हे काव्य आपल्या काळाच्या सीमा ओलांडून केवळ वर्तमानकाळाशी एकरूप राहणारे आहे. ते जेवढे आज मार्गदर्शक आहे तेवढेच उद्या राहील. यातील विचारसूत्र सुसंगत तर आहेच पण त्याबरोबर ते आपल्या तात्विक बैठकीतून समष्टीस जागृत करणारे आहे. रामदास आपल्या अंतर्मुखतेच्या परमावधीने आत्मज्ञानाच्या पहाटे पूर्वीचा काळोख पिजत पिजत 'अनुदिन अनुतापे' इतरासाठी प्रकाश देण्यासाठी अट्टाहास करताना येथे दिसतात. रामदासांची स्फुटकाव्ये प्रासंगीक आहेत परंतु 'अस्मानी सुलतानी' हे काव्य प्रसंगानुरूप बदलणारे आहे. काळाशी प्रामाणिक राहण्याची या काव्याजवळ अचाट शक्ती आहे. म्हणूनच या काव्याचे आजच्या सामाजिक, धार्मिक व आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुनः चिंतन बुद्धीस चालना देणारे वाटते. सावधानता व प्रयत्न ही आपली दोन प्रमुख अंगे याही स्फुट काव्यातून प्रकटताना दिसतात. यातील कवीचे सूक्ष्म अवलोकन, त्याचा विशाल व्याप आपल्या मनाची गरूड झेप, प्रयत्नवाद व बुद्धीचा वारकावा, त्यांचे सर्व विषयीचे सावधपण व साक्षेप इ. गोष्टी येथे प्रत्ययास येतात. प्राचीन मराठी वाङमयात तत्कालीन परिस्थितीची एवढी अचूक पाहणी कोण्याही संतांनी आपल्या काव्यातून केलेली दिसत नाही. शिवाय या चौफेर पाहणीत एक आगळे द्रष्टेपण आहे. साक्षात्काराच्या दिव्य अंगा खुणा आहेत. समग्र या काव्यातून घडलेल्या गोष्टींचा गुंता पिजत घडणाऱ्या गोष्टीचा पाढा आपणापुढे ठेवून जातात. या काव्यातील वैचारिक बैठक मोठी नीटस, रेखीव व सुसंगत आहे. त्यात संदेह तिळमात्र नाही. रोकडा अनुभवाचा धागा यातून सलगपणे जात असल्याने त्यात कोठेही विस्कळीतपणा आलेला नाही. भावविवशतेच्या आहारी जाऊन व समाज चिंतेने आपला ऊर फाडून आक्रस्ताळी शैलीने हे काव्य समर्थ लिहत नाहीत तर एका समंजस, विवेकी व तटस्थपूर्ण शैलीपोटी या काव्याचा साज त्यांनी थाटला आहे. आपल्या देशभर चाललेल्या भ्रमंतीत समर्थांना जे चौफेर अवलोकन झोंवले त्याच्या चिंतनगर्व आशयात त्यांना आपल्या वैचारिक क्रांतीची बीजे दिसली. समर्थांचा दासबोध त्यांच्या महाराष्ट्रधर्माचा परिपाक असून परमार्थ प्राप्तीचा एकमेव आधार आहे. परंतु त्यांची इतर सर्वच स्फुट काव्ये सामाजिक तळाशी सूर घेऊन मंथन करणारी आहेत. आत्ममनन, आत्मचिंतन व आत्मनिरीक्षणा बरोबर आत्मपरीक्षण या सर्वातील 'स्व' ची त्रिज्या आपला परिघ समष्टीस कक्षेत घेऊन व्यापक व विशाल करणारी आहे.

समर्थांचे चरित्र आणि त्यांचे समग्र साहित्य एकमेकाशी कमालीचे एकरूप झालेले दिसते. मराठी वाङमयातील विविध वादंगात या साहित्याचे स्थान कसेही असो समर्थ कविता आपल्या अंगभूत वैचारिक सौंदर्याने तळपळणारी आहे. रंजन करणे हा तिचा गुणधर्म कधीच नव्हता. चिंतन करणे हा तिचा प्रवृतीधर्म आहे. म्हणून आपल्या टिपणातून भक्त झालेल्या निःसत्व आणि विकलांग समाजाचे दृष्य पाहिले म्हणजे रामदासांचा देशोद्धाराचा प्रयत्नवाद त्यांच्या सहजोद्गारातून आठवू लागतो. या कवनातील त्यांची मार्मिक शब्दचित्रे आजच्या वर्तमान काळातही तितकीच बोलकी वाटतात. कालचक्र सतत फिरणारे आहे हे लक्षात घेऊन समर्थांचे अस्मानी सुलतानी काव्य वैचारिक मंथनाने भावी 'आनंदवन भुवना'कडे धाव घेण्यास उत्सुक होते. समर्थ कविता आजवर एवढेच करीत आली आणि पुढेही तिने एवढेच करावे. वैचारिक धन हा राष्ट्राचा अमोल ठेवा आहे. राष्ट्र समर्थपणे उभे करण्याचे कार्य तिच्याजवळ निश्चितपणे आहे. या शिवाय तिला 'मूल्य' जोपासण्याची दुसरी हौस नाहीच.

● ●

# तुकारामांचे कवी, काव्य आणि कवित्वशक्ती या संबंधीचे विचार

मालती पाटील

कवी, काव्य आणि कवित्व या संज्ञा तुकारामाच्या काव्यात अनेकदा आलेल्या आढळतात. तुकारामांनी प्रत्येकचवेळी ह्या संज्ञा साहित्यशास्त्राच्या पारिभाषिक काटेकोर अर्थाने योजल्या नसल्या तरी त्या संबंधी त्यांनी बराच खोलवर विचार केलेला दिसतो. काव्य ह्या वाङमयप्रकारासंबंधी काही सर्वसामान्य विचार त्यांनी मांडले आहेत. पण प्रामुख्याने ते स्वतःच्या काव्याबद्दलच जास्त बोलतात असे दिसून येते. कसेही असो, काव्याबरोबर निर्माण झालेल्या 'काव्य म्हणजे काय?' या खूप चर्चिल्या गेलेल्या पण अद्यापही अनुत्तरीतच असणाऱ्या प्रश्नाला तुकारामांच्या ह्या विचारामुळे नवी चालना मिळते एवढे मात्र निश्चित !

### कवित्व ईश्वरी देणगी

तुकारामांच्या मते कवित्व ही ईश्वरी देणगी आहे परमेश्वर आपल्या आवडत्या भक्तांना ती देतो. ती नुसती भक्ताला देऊन टाकली की संपले अशी त्याची व्यापारी वृत्ती नाही. ह्या देणगीचा उत्तमोत्तम सदुपयोग तो स्वतः भक्ताकडून करवून घेतो हे विशेष ! आपली उभी अभंगवाणी देवाने आपल्या तोंडून वदविली याबद्दल तुकारामांच्या मनात संभ्रम नाही. "करितों कवित्व म्हणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ।। माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ।।"(१००७) काव्य मी करीत नाही, ही माझी स्वतःची वाणी नाही की हे माझ्या बुद्धीचे कौतुकही नाही. ही कवित्व शक्ती देवाने मला दिली व तो माझ्याकडून काव्य वदवून घेतो आहे, असे ते सांगतात. अर्थात परमेश्वराने प्रदान केलेल्या ह्या दैवी शक्तीचा विनियोग त्याचेच यशोगान गाण्यात करावा, वाणीने त्याचाच कीर्तिसुगंध चराचरावर उधळून द्यावा नि त्याच्या नामचिंतनात गर्क होऊन जावे, ही त्यांची मनिषा आहे. त्यामुळे 'परमेश्वराची भक्ती' हा काव्यलेखनाचा विषयही आपोआपच ठरून गेला.

### विनम्रवृत्तीने आत्मविश्वासपूर्वक काव्यलेखन

काव्यलेखनासंबंधी तुकारामांनी स्वीकारलेली भूमिका मोठी विनम्र व म्हणूनच विशेष रम्य आहे. स्वतःकडे लहानपण घेऊन हा कवी काव्य करतो. परमेश्वराची लीला अगाध आहे, अलौकिक आहे. मोठमोठ्या ऋषिमुनींनी, सिद्धांनी व कविश्रेष्ठांनी त्यांचे गुणवर्णन केले पण ते परिपूर्ण झाले नाही, तेथे तुझी स्तुती मी काय करणार असे ते देवाला विचारतात. "ऋषि मुनि बहु सिद्ध कविजन । वर्णितां ते गुण न सरती ।। तुका म्हणे तेथें काय माझी वाणी । जे तुझी वाखाणी कीर्ति देवा ।।" (११३०). पण ह्या विनम्रतेभोवतीही आत्मविश्वासाचे व आत्मतेजाचे एक सोनेरी वलय चमकताना दिसते. पुराणातील कथांचा गोड रस मी सेवन केला आहे. ह्या सर्वश्रेष्ठ भक्तीरसामुळेच माझे काव्य आहाच बोल नाही व म्हणूनच फोलही नाही असे ते कणखरपणे बजावतात. "पुराणींचा इतिहास । गोड रस सेविला ।। नव्हती हे आहाच बोल । मोकळे फोल कवित्व ।।" (१३८६). हे त्यांचे बाणेदार आत्मविश्वासाचे बोलही त्यांनाच शोभून दिसणारे आहेत.

### काव्यग्रहण भावपूर्ण अंतःकरणाने करावे

आपल्या भावकवितेचे ग्रहण रसिकांनी भाविकपणे व भावपूर्ण अंतःकरणानेच करायला हवे अशी तुकारामांची अपेक्षा आहे. तिचा आस्वाद "भावें घ्या रे भावें घ्या रे।.. " (१३८६) असा इशारा ते श्रोत्यांना देतात.

### काव्याची स्फूर्तिस्थाने

आपल्या कवित्वाची नामदेव, सद्गुरू व देव ही तीन स्फूर्तिस्थाने तुकारामांनी नमूद केली आहेत. पहिले स्फूर्तिस्थान त्यांच्या काव्यलेखनाचे आरंभस्थान व आदर्श आहे. सर्व संतकवीत तुकारामांना नामदेव अधिक जवळचे वाटत होते व आवडत होते, कारण 'समानशीले व्यसनेषु

सद्यम्.' नामदेवाच्या अभंगसंकीर्तनावर आधारीत असणाऱ्या पांडुरंगभक्तीचा स्वीकार तुकारामांनी केला होता. नामदेवांची भावनोत्कटताही तुकारामात पराकोटीला पोहोचलेली दिसते. म्हणून 'ज्ञान्याचा एका, नाम्याचा तुका' असे वारकरी पंथात म्हणतात. यौवनावस्थेत संसाराला कंटाळून तुकाराम परमार्थाकडे वळले, त्यावेळी ते भामनाथ, भंडाऱ्यावर जाऊन संतवाणीचे मनन करू लागले. याचवेळी नामदेवांचे अभंग त्यांनी वाचले व पचवले. ही काव्यलेखनाची साधी, सोपी पण प्रभावशाली शैली त्यांना पसंत पडली. अशावेळी नामदेवांनी पांडुरंगासह स्वप्नात येऊन तुकारामांना काव्यलेखनाची स्फूर्ती दिली. हा अभंग असा; "नामदेवें केले स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ।। सांगितले काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको ।। माप टाकी सळ धरिली विठ्ठलें । थापटोनि केलें सावधान ।। प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उरले शेवटीं लावी तुका ।।" (१३२०). ह्या अभंगाचा सरळ अर्थ हाच की नामदेवांनी पांडुरंगासह स्वप्नात येऊन तुकारामांना जागे केले व काव्यलेखन करण्याची जवळ जवळ आज्ञाच केली. यातील 'माप टाकी सळ धरिली विठ्ठलें' हे शब्द मोठ्या मोलाचे आहेत. आपली शतकोटी अभंगरचनेची प्रतिज्ञा तुकारामांना पूर्ण करायला सांगताना 'देवाने तुझा अभिमान धरला आहे' हे मुद्दाम सांगून तुकारामांना एक प्रकारे धीर दिला आहे. त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला आहे. मोठ्या युक्तीने 'देवाने तुझी बाजू घेतली आहे, अरे, या देवालाच तू काव्याचा विषय करीनास' हा विचारही तुकारामांच्या मनात पेरला आहे. यानंतर तुकाराम अभंगलेखन करू लागले. नामदेव हे अशा तऱ्हेने तुकारामांच्या अभंगलेखनाचे स्फूर्तिप्रद आरंभस्थान ठरते. नामदेवांच्याच काव्याचा आदर्श प्रामुख्याने तुकारामांच्या डोळ्यासमोर सतत होता. नामदेवांच्या भावनोत्कट, प्रासादिक, अर्थप्रवाही अभंगलेखनाचा ठसा तुकारामांच्या काव्यलेखनावर निश्चितपणे उमटलेला दिसतो. नामा म्हणे ऐवजी तुका म्हणे घातले तर अभंग कोणाचा हे ओळखू येऊ नये, इतके विलक्षण साम्य या दोघांच्या कवितेत आहे. "कवीने अभ्यासिलेल्या व त्याला अत्यंत आवडलेल्या कल्पना कोणत्या तरी रूपाने त्यांच्या कवितांमधून नकळत डोकावतातच. प्रियेची मूर्ती निरंतर हृदयात वाळगणाऱ्या चिताऱ्याने डोळे लावून कोणत्याही स्त्रीचे चित्र चितारण्याचा प्रयत्न केला तरी अखेरीस चित्र निघणार त्याच्या प्रेयसीचेच" डॉ. वि. भि. कोलते यांनी काव्याच्या संदर्भात काढलेले वरील उद्गार येथेही अगदी सार्थ वाटतात.

नामदेवांपासून स्फूर्ती घेऊन तुकाराम अभंग लेखन करू लागले. येथून उगम पावलेल्या कवितासरितेच्या प्रवाहाला योग्य वळण लावण्याचे कार्य पुढे सद्गुरूंनी केले. तुकारामांचा आत्मिक विकास विचारात घेऊन 'बाबाजी चैतन्य' या सत्पुरूषाने आपण होऊन त्यांना उपदेश केला. "मानियेला स्वप्नी गुरूचा उपदेश । घरिला विश्वास दृढ नामीं।। यावरि या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिलें चित्तीं विठोवाचें ।।" (१३३३). गुरूपदेशाच्या आधीच तुकारामांनी नामदेवापासून स्फूर्ती घेऊन काव्यलेखनाला प्रारंभ केला होता. पण आता यानंतर मूळचा अविरत पण झुळझुळ वाहणारा काव्यनिर्झर अप्रतिहत वेगाने व नव्या जोमाने जोरात वाहू लागला. तुकारामांच्या शब्दात चैतन्य संचरू लागले व त्यांचे सहज साधे बोल आता अक्षर कवितेत जमा होण्यास देहूवाहेर पडू लागले. सद्गुरूंची कृपा ही त्यांना सतत प्रेरक, प्रोत्साहक व मार्गदर्शक ठरली आहे.

तिसरे स्फूर्तिस्थान त्यांच्या काव्याचा सक्रिय विषय आहे. सारे काव्य त्यांनी देवावर लिहिले व देवालाच वाहिले.

### काव्यलेखनात अभ्यासाची आवश्यकता

तुकाराम जरी कवित्व ईश्वरदत्त देणगी मानीत असले व त्यांना स्वतःला आत्मतेजाच्या प्रकाशात, स्फूर्तीच्या उन्मेषाने काव्य स्फुरत असले तरी अभ्यासाचे महत्व त्यांनी वारंवार आवर्जुन सांगितले आहे. संतांच्या आग्रहावरून त्यांना आत्मचरित्र सांगताना तुकाराम म्हणतात– "आरंभी कीर्तन करीं एकादशी । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं।। काहीं पाठ केलीं संतांची उत्तरें। विश्वासें आदरें करोनियां।। संतांचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ।।" (१३३३). आरंभी ते कीर्तन व एकादशी करू लागले. (कीर्तन करू लागले म्हणजे 'गाती पुढे त्यांचे धरावें धृपद' या स्वरूपाचे) नंतर त्यांनी आपला व्यासंग वाढवला. संतांची वचने मुखोद्गत केली. त्यांचे विचार आत्मसात करून हे सारे संतकाव्य त्यांनी पचवले. हे सारे मोठ्या आत्मियतेने व विश्वासपूर्वक केले. तुकारामांचा हा

सारा अभ्यास ही त्यांच्या काव्यलेखनाची जय्यत पूर्व तयारीच आहे.

**कवीच काव्याचा सुजाण टीकाकार**

तुकाराम केवळ कवीच नाहीत तर आपल्या काव्याचे सुजाण टीकाकारही आहेत. केवळ काव्य लिहून तुकारामांचे समाधान कधीच झाले नाही. आपल्या काव्याची देवमान्यता, लोकमान्यता, रसिकमान्यता, त्याचा बरेवाईटपणा व प्रभाव तुकारामांनी वारंवार पारखून पाहिला आहे. "करितो कवित्व जोडितों अक्षरें। येणें काय पुरें जालें माझें ॥ तोंवरि हे माझी न सरे कुरकुर। जो नव्हे विचार तुझ्या मुखें ॥" (२९७९). नुसते काव्य लिहिल्याने मला काय मिळाले. जोपर्यंत हे काव्य तुला मान्य असल्याचे तू मला बोलून दाखवत नाहीस तोवर माझी कटकट संपायची नाही असे ते देवाला सांगतात. मग देवाला आपले काव्य पसंत का पडले नाही याचा विचार सुरु होतो. काव्याचे निरीक्षण व परीक्षण सुरू होते आणि एकेक दोष त्यांच्या तीक्ष्ण नजरेत भरू लागतो. आपले सहज बोल। न लगेचि ओल जिव्हाळ्याची ॥ नयेचि उत्तर कांही परतोनि। जालों नारायणी न सरतें ॥" (३६९१) अतिशय रसाळ कविता आपण लिहिली पण त्यात रंगवलेला अनुभव खरोखर आपल्याला आला नाही, त्यामुळे हे कवित्व माझे असे म्हटले तरी लाभ नाही. "कवित्वे रसाळ वदविली वाणी। साक्ष ही पुराणीं घडे ऐसी। तुका म्हणे गुरें राखोनि गोंवारी। माझीं म्हणे परि लाभ नाहीं ॥" (३७१९).

रामेश्वरभट तुकारामांना त्यांच्या काव्याचे जलदिव्य करायला लावतात. यावेळी तुकाराम देवाला अगदी कळवळून विनवतात "करूं कवित्व काय नाहीं आतां लाज। मज भक्तराज हांसतील ॥ आतां आला एक निवाड्याचा दिस। सत्यविण रस विरसला ॥" (२२२४). शेवटी तुकारामांचे काव्य तरते. साऱ्यांच्या समक्ष त्यावर देवमान्यतेचे शिक्कामोर्तब होते. तुकारामांना समाधान होते. या प्रसंगाचा उल्लेख तुकारामांनी असा केला आहे— "निषेधाचा कांहीं पडिला आघात। तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥ बुडविल्या वह्या बैसलो धरणें। केलें नारायणें समाधान ॥" (१३३३).

तुकारामांच्या काळातच त्यांचे काव्य बरेच लोकप्रिय झाले होते असे दिसते. "जगीं मान्य केलें हा तुझा देकार। कीं कांहीं विचार आहे पुढें ॥" (२३७९) देवाला विचारलेल्या या प्रश्नावरून जगात त्यांची व त्यांच्या कवितेची मानमान्यता खूप वाढली होती हे उघड दिसते. पण एकंदरीत 'सत्यअसत्याशी मन ग्वाही' करणाऱ्या तुकारामांना लोकमताची तिळकीशी पर्वाच वाटत नाही हेच खरे! आपल्या काव्याचा निषेध करणाऱ्या व आपल्याला कवी म्हणून चिडवणाऱ्या दुष्ट लोकांविषयी ते म्हणतात, "मज म्हणताती कवी। निषेधुनि पापी जीवी ॥ तुका म्हणे पांडुरंगा। आतां कोण लेखी जगा ॥" (३७९०). पर्वा करायची ती देवाची, मानवाची नाही हे तर तुकारामांचे मुख्य तत्त्व!

**काव्य कसे नसावे**

स्वतःचे काव्य निरनिराळ्या कठीण निकषांना लावून पारखून घेणाऱ्या तुकारामांना कसेतरी काव्य पसंत पडणे शक्यच नाही. पोटभरू भक्ती व अक्षरांची जोडाजोडी करून रूढीनुसार केलेली कृत्रिम, नकली काव्यरचना या दोन्ही गोष्टी तुकारामांना मान्य नव्हत्या. "काय कवित्वाची घालूनियां रुढी। करूं जोडा जोडी अक्षरांची ॥" (९७७).

कोणाचीही हाजी हाजी करणारे किंवा खुषमस्करी करून एखाद्याची सोय लावणारे काव्यही त्यांना पसंत नाही. "एकाचिये सोई कवित्वाचे बांधे। बांधिलिया साधे काम तेथें ॥ काय हातीं लागे भूसाचे कांडणीं। सत्यासी दाटणी करूनि काय ॥ कवित्वाचे रुढी पायां पाडी जग। सुखावोनि मग नरका जाय ॥ तुका म्हणे देव केल्याविण साहे। फजिती ते आहे लटिक्या अंगीं ॥" (३०३९). एकाची सोय पाहणारे काव्य एकदेशी होईल. तुकारामांना एकदेशीपण भक्तीत नको व भक्तिकाव्यातही नको. त्यांच्यामते असले काव्य म्हणजे भूसाचे कांडणच. सत्याची त्यात गळचेपी केली असणार. काव्याची अशी रूढी साऱ्या जगाला जरी कवीच्या पाया पडायला लावत असली तरी ती क्षणिक सुख देऊन अंती नरकाच्याच मार्गाने नेणारी आहे. देव दुरावण्यास कारणीभूत होणारे असे काव्य खोटेपणामुळे फजितीचा प्रसंग मात्र ओढवून आणते.

तुकाराम हे एक मोठे बंडखोर व क्रांतदर्शी कवी आहेत. चरितार्थाचे साधन म्हणून काव्य राबवले जाणे ही दुष्ट रूढी त्यांना अमान्य आहे. सांसारिक वृत्तीच्या काव्याची व्यवसाय व भिक्षा यांचेशी सांगड घालणाऱ्या

जगाच्या बुजबुजाटात राहून स्वतःच्या निःस्पृहतेचा टेंभा मिरवणाऱ्या, परस्परांशी एकजीव न होणाऱ्या तुपपाण्या-सारख्या पदार्थांची भेसळ करण्याप्रमाणे अर्थाशी सुसंगत नसणारी विजोड शब्दयोजना करणाऱ्या कवीचे हास्या-स्पद व विनोदी शब्दचित्र तुकारामांनी पेश केले आहे. "संसाराचा माथां भार । कांहीं पर न ठेवीं ।। भक्तीची ते जाती ऐसी । सर्वस्वासी मुकावें ।। भिक्षा आणि वेवसाव । काला करितो गाढव ।। करूनी वस्ती बाजारीं । म्हणवी कासया निस्पृही ।। प्रसादा आडुनि कवी । केलें तुप पाणी तेवीं ।।" (९०२).

काव्यात साचेबंदपणा असता कामा नये. काव्यातील शब्द टाकसाळी नाण्याप्रमाणे एकसारखे असू नये असे या रसिक कवीचे मत आहे. आपले काव्य नित्यनूतन आहे. त्यात टाकसाळी नाण्याचा तोच तोपणा नाही. "नव्हे हे कवित्व टाकसाळी नाणें । घेती भले जन भले लोक ।।" (४३९८). आपल्या काव्याच्या लोकप्रियतेचे एक कारण येथे सूचित केले आहे. तुकारामांचे हे वचन अतिशय अर्थपूर्ण आहे.

तुकारामांना काव्यचौर्याचाही अतिशय तिटकारा आहे. सतरा ठिकाणची वचने चोरून काव्याचा दिमाख मिरव-णारे कवी पातकी नि यावत्‌चंद्रदिवाकरौ नरकातच खप-णारे आहेत. "उष्टया पत्रावळी करूनियां गोळा । दाख-विती कळा कवित्वाची ।। ऐसे जे पातकी ते नरकीं पचती । जोंवरी भ्रमती चंद्रसूर्य ।।" (१२८४). इकडली तिक-डली वचने चोरून घेऊन मारुनमुटकून केलेल्या आपल्या कवितेचे लोकांनी पारायण करावे म्हणून दारोदार हिंड-णारा कवीही देवाचा नावडता व नालायकच असतो. अशा कवीची पारख तो गावात शिरण्यापूर्वी गावची शीवच करते. त्याने वेस ओलांडली की तीच लज्जित होते. "माझी पाठ करा कवी । उठ लावी दारोदार । तंव तया पारखी सिव । लाजे ठाव सांडितां ।। उष्टाळी करूनि जमा । कुंथुनि प्रेमा आणितसे । तुका म्हणे बाहेरमुदी । आहाच गोविंदीं न सरती ।।" (७९).

तुकारामांची अमृतमधुर अभंगवाणी चोरून आप-ल्याच नावावर खपवणाऱ्या सालोमालोचीही त्यांनी खरपूस व यथास्थित हजेरी घेतली आहे. "सालोमालो हरीचे दास । म्हणउन केला अवघा नाश ।। अवघें बच-मंगळ केलें । हमणती एकांचें आपुलें ।। मोडूनि संतांची वचनें । करिती आपणां भूषणें ।। तुका म्हणे कवी । जगामधीं रूढ दावी ।।" (२३७२). सालोमालो स्वतः-ला देवाचे दास म्हणवून घेतात, पण त्यांनी मोठा सत्या-नाश केला आहे असे औपरोधिक सुरात सांगून दुसऱ्याचे आपलेच समजण्याच्या स्वार्थी (की विश्वात्मक ! ) वृत्तीचाही खुबीदार निर्देश येथे केला आहे. संतांची वचने मोडून स्वतःचे काव्य सजवणारे हे दांभिक कवी जगाला काव्य करण्याचे पाठ देतात. तुकारामांची या अभंगातील टीकापद्धती मोठी मार्मिक व प्रभावी वाटते. संतांचे प्रसादसुंदर काव्य अशा ओंगळवाण्या रीतीने हाताळ-णाऱ्या कविश्वरांचा तुकारामांनी विटाळ मानला असून त्यांच्यापासून सदैव दूर राहण्याचीच इच्छा व्यक्त केली आहे (१३९५).

### लंड व भांड कवींची संख्या वाढली की काव्यमूल्य घसरते.

खऱ्या कवींपेक्षा कवी म्हणून मिरवून घेण्याची हौस असणारे, दुर्बोध, अर्थहीन, भावरहीत कोरडे काव्य कर-णारे, स्वतःच्या कुशलतेचे प्रदर्शन करण्यात धन्यता मानणारे नष्ट कवीच घरोघर खूप झाले. अशा कनिष्ठ हीन कवींवर तुकारामांनी सडाकून टीका केली आहे. "घरोघरीं वहुजाले कवि । नेणे प्रसादाची चवी ।। लंडा भूषणांची चाड पुढे न विचारी नाड ।।" (१४६८). "कलियुगीं कवित्व करिती पाषांड । कुशल हे भांड बहु जाले ।। द्रव्य दारा चित्तीं प्रजांची आवडी । मुखे वड-वडी कोरडा चि ।।" (८०४). अशा कवींची जात गवता ऐसी उदंड वाढली. काव्य सवंग झाले. काव्यमूल्य घसरले. काव्यक्षेत्रातील या अशा परिस्थितीवर किती भेदारक प्रकाश तुकारामांच्या वरील वचनांनी टाकला आहे ते पाहण्यासारखे आहे.

### वासनानिरपेक्ष काव्य श्रेष्ठ

देहासक्ती निरसन करून विशुद्ध भावनेने लिहि-लेल्या वासनानिरपेक्ष काव्याचा तुकाराम गौरव करतात. "नव्हती ते संत करितां कवित्व । संताचे ते आप्त नव्हती संत ।। तुका म्हणे नाहीं निरसला देहे । तों अवघे हे संसारिक ।।" (२३०५). केवळ काव्य करता येणे ही काही खऱ्या संताची कसोटी नाही असे ते स्पष्ट सांगतात. देहासक्ती नष्ट होत नाही तोवर ती व्यक्ती संत संज्ञेला पात्र नाही व अशी ती योग्य ठरेपर्यंत तिचे हातून विशुद्ध काव्यही निर्माण होऊ शकत नाही. वास-नांनी बरबटलेले काव्य गर्हणीयच. निरपेक्ष ब्रम्हानंदाच्या



अनुक्रमणिका

प्राप्तीसाठी काव्यानंदाची लयलूट करायला तुकारामांची हरकत नाही. किंबहुना भक्ती हेच त्यांच्या काव्यसाधनेचे ध्येय आहे. परंतु त्यासाठी मनाची निःसंगता त्यांना अपेक्षित आहे.

प्रस्तुत प्रकरणाची उभारणी करताना, तुकारामांच्या अभंगरचनेत कवी, काव्य आणि कवित्वशक्ती यांचा प्रत्यक्ष उल्लेख आला आहे, फक्त अशाच वचनांचा आधार घेतला आहे.

[अभंगाचे आकडे "श्री तुकारामबावांच्या अभंगाची गाथा" गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९५६ या गाथेतील आहेत.

डॉ वि. भि. कोलते, साहित्य–संचार, "पिचलेला पावा आणि चवथीचा चांद," पान ३९.]

---

( पान १४२ वरून )

चार नाटके छापली आहेत. त्याच्या प्रस्तावनेत Charles Marowitz नामक समीक्षक म्हणतो (वर्णन न्यूयॉर्कमधील ब्रॉडवे पथावरील नाट्यगृहांचे आहे.)––

"Brodway is no longer in the hands of anyone even remotely connected with the theatre..... The new trend-setters are the 'fat ladies in the fancy hats' who organise theatre parties and guarantee six or more months of black bookings if theatre is suitably cosy and mindless. ... Offerings that can be guaranteed to divert are at a premium. Plays that 'disturb' or 'make you think' are to be shunned."

हे पुस्तक आणि त्यातले अमेरिकी नाट्यसमीक्षकाचे हे उद्गार अकल्पित योगायोगाने प्रस्तुत लेख लिहिल्यानंतर, नजरेसमोर आले. त्यात वर्णिलेले परिस्थितिसाम्य लक्षणीय वाटल्यामुळे ते इथे उद्धृत केले. कोणताही विचार व्यक्त करावयाचा असो, त्याला आधार म्हणून इंग्रजी लेखकाचा उतारा दाखल करावा. हा आपल्या इकडल्या टीकाशास्त्रातला दंडकही त्यामुळे पाळला गेला हे बरेच झाले !

कुठेही जा, पळताला पाने तीन, हे सत्य या अमेरिकी लेखकाच्या उद्गारावरून मनात ठसते. उन्नति शिखरावर आरूढ झालेल्या बये अमेरिके ! तुझा ब्रॉडवे आणि आमचा उत्तर अंबाझरी मार्ग किंवा भालेराव मार्ग, दोघेही आपण सारख्याच (अव)दशेत आहो ! ● ●

---

(पान १५४ वरून)

'मेल्या, तुजी हृचे बिस्याद ? –बयनीवर वाईट नजर ? ...मोठा भाऊ बनूनशानी आलास ...कर्म कराले .... थू: तुज्या–!' पचकाभर थुकली.

–तिच्या या अचाट जहरी प्रहाराने मी ठार झालो. पायाखालची जमीन हादरल्याचा भास झाला.

'बगाचं नं बग बग .चोरून कायला ? ये बग–'

–आणि ती मग साडी सोडू लागली. मला आता राहावले नाही. तिच्या हाताला जोराचा हिसडा दिला आणि ओरडलो–

'साळु– हे काय, भानावर आहेस का नाही ? –काही लाज लज्ज्या ?'

'तूही माजीच लाज काहाडतंस ? ..मोठा आला लाज झांकणारा दयेचा पूत – कुत्रीचा मूत–? ....अरे मेल्या, संमदी मेली ! आतं कुटं मेला त्यो सांग ? सोताहा जनावर झाला आनं माज्यावर खोटी आळ आनली मार मारलन. मी–मी जयर–ईक खाऊन मरीन. आनं नायतर– हा–हा–हा–हा ! .' –बोलता बोलता तिने नखाने उभा पोलका चिरला. अंगखांदे व चेहरा ओरखडला. मग ती पिसाटसारखी थया थया नाचत धावत बाहेर गेली...

–मी 'साळु साळु–' ओरडत.. तीन चार घरं ओलांडत धावत मागोमाग गेलो. पण तिच्याजवळ पोचण्यापूर्वीच तिने धप्प्‌कन् विहिरीत उडी टाकली

लोक जमले. धडपडू लागले....पण...

मी इकडे तिकडे कालवील कालवील करत राहिलो ● ●

# पिसाट

योगेन्द्र मेश्राम

इमामवाड्यांतल्या एका तीनमजली माडीत झुग्गी-बरोबर साळूला शिरतांना बघून मला धक्काच बसला. साळु आणि झुग्गीच्या संगतीत–?

एक नंबरची रंगेल 'चालू' म्हणून झुग्गी पूऱ्या वस्तीत गाजली होती. ती देखणी व अजूनही जवान होती... बिबलकराच्या चाळीत राहणाऱ्या 'बॅचलर' बाबू लोकांची व कॉलेज कुमारांची ती 'खास' काम-करीन होती. शिवाय इतरत्र बंगल्या बंगल्यात साफ–सफाई साठी जात होती

.ती स्वत: 'जास्तीचे' काम करीच–शिवाय वस्तीमधल्या गरजू गिरजांचा गुपचूप 'सप्लाय' करण्याचे नाजूक कामसुद्धा ती करीत असे. त्यासाठी तिला पुरेसा मोबदला मिळत असावा,–'शानबाज' बनली होती.

–आणि अशा झुग्गीबरोबर– मला साळुचं बरं वाटलं नाही.

तशात नवराबायकोचं एवढ्यात फटकलं होतं. त्यांच्या भांडणा–बिडणाचं पण ऐकायला येत होतं... पण कुणाला कसं हटकायचं, हा माझ्यापुढे प्रश्न होता. –एकीकडे विठ्ठल माझा लंगोटीदोस्त होता, तर साळु माझी मामेबहीण.–मी होऊन त्याला देवविली होती.

माझ्या गावचा तो. मी मामाकडे पुढच्या शिक्षणा-साठी नागपूरलाच राहत होतो... एके दिवशी अचा-नक तो माझ्याकडे आला, डोक्यात भणभण आणि डोळ्यात दु:ख घेऊन.... गावची सगळी परस्थिति सांगीतली.... दुष्काळमहागाईमुळे उध्वस्त झालेलं खेडेजीवन.... कामंधामं. धंदा पाणी ठप्प. खायची जगायचीच पंचाईत !

...तो आधीपासून विणकाम करीत होता. पण सुताची कोठारे महागल्यामुळे खेड्यांतील हातमाग बंद पडले होते. हातचं साधनच मोडल्यावर.

–मी माझ्या ओळखीच्या – हबीबभाय सेठयाच्या 'हातमाग कंपनी'त त्याला लावून दिले.. हळूहळू जमला. मग त्याने इथेच आपला संसार थाटला....

.बरा बेताचा. सुखाचा नाही. दु:खाचा नाही.

तो झोपडपट्टीत राहत होता. तेथे सगळ्या तऱ्हेचे लोक– सगळी कामं करणारे– चोरी – छिनाली कुंटणखाणा, हातभट्टी चालवणारे, सट्टाबट्टावाले–जुगारी लाचार भाडखाऊ नुसतं अवदसेचं साम्राज्य !

सगळ्या वस्तीला गरीबीनं गंधी केली होती. परिस्थितिपोटी. पोटासाठी सगळं..!

–आणि पोटाच्या उबरीसाठीच झुग्गीबाई 'तशी' बनली होती.... पण साळूला ती ठाऊक असतांनाही –तिच्या चकमीत जायला नको होतं.... संगत गुण! .. सावळ्या – सुंदर साळूलासुद्धा झुग्गी नासवल्या-शिवाय–

–पण छे, आपलंच मन वाईट.... ती भडभडी अडाणभोळी असली तरी नेक आहे मनात उगाच उपटलेली शंका मी घालवली...., नंतर विठ्ठल डोळचापुढं उभा राहिला. उमद्या खुल्या दिलाचा मनमिळाऊ माणूस. कष्टाळू लवकरच हबीब सेठ्याच्या मर्जीतला झाला. सेठच्या घरादारांतले त्याच्या-वर जबाबदारीचे खाजगी स्वरुपाचे कामपण सोपवू लागला. .घरातल्या मंडळीशी बरीच ओळख झाली.

हबीबभायची दुसरी बायको मोठी देखणी होती. ती बाई मानाने वयाने पुष्कळच धाकटी – ऐन जवान होती, मदांत मावत नव्हती –त्याला चाहू लागली. शेठजी घराबाहेर असल्यावर ती पड्याबाहेर येऊन त्याच्याशी हंसू–बोलू लागली.....

विठ्ठलने मजजवळ सगळं सांगितलं. मी त्याला हुशारी देत चांगलंच फटकारलं– 'आजपासून त्याच्या घरी जाऊ नकोस. फाजील लफड्यामधि पडून फुक्कट बदनामी घेऊ नकोस तू बायको–लेकराचा माणूस –लाज धर. फुटव तिला..... नाहीतर एखाद् दिवशी उरावर घेऊन पडशील. पूरा पंथातून जाशील, ..सांगतो

तेव्हा हे बरं नाही. आपल्या कामाशीन काम ठेव बस.'

—त्यानंतर बरेच दिवस तो भेटला नव्हता. साळु एकदोनदा रडत तलतलत माहेराला येऊन गेली. आपले करमभोग सांगितले. मजजवळ रंज काढून बोलली होती, 'तुनंच मले त्याच्या गळ्यात बांधून दिलं. पन माजं नशीबच फुटकं निगालं.. पयले तो आसा नवता....काय बूद फिरली नं काय नइ—त्याचं समदं लक्षणच बिगल्डं.' ...भलताच बहकलेला. म्हणे— त्याला आता दारुचा चटका पण लागला होता. उधळ्या बनला होता. बाय-कोला मारहाण करत होता. घरात पैसे देत नव्हता. . बायको — लेकरांचे हाल चालले होते. ..म्हणून मग साळुला बाहेरचं मिळेल ते काम धरावं लागलं होतं. —बांधकामावर रेज्या—कुलीचं. सकाळसांज मोलकरणीचं झुग्गीबरोबर... —म्हणून काय बिघडले? —साळु काम अगदी—नासमज पोरसवदा पोर आहे एखाद्याबरोबर वाहवत जायला ? ...नाही नाही, साळु 'तशी' नाही —प्रसंगी तडक—कडक बनणारी आहे....

मी रस्त्याने तिचा विचार करत परत चाललो होतो .. मला विठ्ठलची याद आली. संध्याकाळ होत आली होती.. कामावरनं आला असेल. बऱ्याच दिवसापासनं घरी आला नाही. भेटला नाही ...मला त्याच्याशी भेटायचंच होतं. म्हणून मी घराकडे न जाता विठ्ठलच्या झोपड्याकडे फिरलो.

ओसरीसमोरील नहाणीच्या डबक्याजवळ संपू—गंपू दोघंही भणभण उडणाऱ्या व पुन्हा बसणाऱ्या मच्छराशी खेळत होते. मी बोचक्या दारातून आत गेलो. विठ्ठल खाली मान लटकून बसला होता. जागच्या जागीच झुलत. लांब सुस्कारे सोडत... हाय हाय... कण्हल्यासारखा करत होता. त्याचं माझ्याकडे लक्षच नव्हतं. पाळण्यांत पोरगी कलकला रडत—चिल्लावत होती.

'...अरेरे, विठ्ठल, तुला एवढंही पोरीचं भान नाही ?' —म्हणत मी अगोदर तिच्याकडे जाऊ लागलो, तोच जमीनीवर ओणवा पडून त्याने माझे पाय धरले.

'तू—तू आलास दामू दादा. (मला अगोदरपासून दादाच म्हणायचा) ...म—माझ्या घरी— मले माफी दे. तुला ठाव नसल, ... मी—मी नालायक — मी ! ...तरी आलास. ...ये, आगदूर माझ्याजवळ येऊन बस '

'—अरे सोडतरी, अगोदर त्या पोरीला बेऊ दे.. तू फत्तर दिल कधीपासून झालास ? —सोड. सोड.' मी पाय मोकळे करून गेलो. ...गोधळीच्या झोळणीत पोरगी हगून भरली होती. घाण वास सुटला होता. आणि घमाघम माशांचा पेलवा पेल तिच्या कमरीखाली नाकातोंडावर घोंघावत बसत—उडत होता. .मला ओकारी उबळी येऊ लागली. 'छी: छी:, विठू तुला—

साळु कधी येईल ?'

'म—मले काय ठावं

'का ?'

'भाड आणाले गेलीनं...' —मला पुन्हा धक्कन झुग्गी आठवली. मी पोरीला बाहेर काढून त्याच्या-वर चिडून म्हणालो, 'भलतं सलतं बोलू नकोस.... पागल बनू नको. चल, उठ. घे हिला आधी.' तो तड-गळत उठला. बाहेर जाऊन तिला दोघंही धुवून आलो.

मग पाळण्याची गोधळी पाठीमागच्या मांदीकडल्या सपेलीत ठेऊन आलो... त्याच्याजवळ बसून त्याच्या खर्राटा तब्येतीकडे पहात विचारलं, 'विठू — तुला काय झालं ?'

'काही नाही.'

'हे सगळं चाललं ते—'

'मी पेलो आहे — खूप. रोज पेतो.'

'ते कळलं मला. ..तू आज कामावर गेला नाहीस ?' ....त्याचा चेहरा काळा. त्याने कुळाच्या तरकटाआड ठेवलेली शिपी काढून तोंडाला लावली. मग छातीवर हात फिरवत बोलला—' मी—मी जात नाही.'

'जात नाहीस ? —का ?'

'कुटं जाऊ ?— अरे कुटं जाऊ दादा,—त्या कामा-नं तं माहा सत्यानास झाला. ..मी बी नालायक... पण तिच्यामुळं ...तिनं मले पिसं केलं व्हतं.... पूरा—नास केला.'

.....काहीतरी भयंकर दुखऱ्या आठवानं असेल, तो आता फडाफड हातपाय आपटत रडू—बोकलू लागला. आणि रडता रडताच ओसरीच्या थडीखाली ओणवा होऊन भडाभड ओकला — दारु—पाणी.... त्यात अन्नाचा कण नव्हता. नुसतं पाणी. मग फेस...

त्यात रक्त. . .तो घटीभर आदमुसा होऊन राहिला. मी त्याच्या पाठीवर हात फिरवू लागलो.

थोडया वेळाने त्यानं मला सगळं सांगितलं.

—दहाबारा दिवस झाले, त्याची नौकरी खतम झाली होती. . . . .त्याला मेल्यासारखे वाटले. म्हणून तो कुठेच — माझ्याकडेसुद्धा आला नव्हता. . .होऊ नये तेचं घडले होते. .त्याच्यामागं पिसाळ बनून अखेर तिनं त्याला पैसाआडका देऊन फुसलवलं होत. तोही तिच्याशी मग फसला होता. . .

—हवीवभायला हे समजले. त्याचवेळी त्याला कामावरनं काढलं. आणि हाताखालच्या वस्तादांकडनं असा मार दिला की—

विठ्ठल आता खोल कण्हत उद्वेग आणून सांगू लागला—

'मी. ग. .मी गांडू .नामरद झालो दादा. . माजंवालं लिंगच पिळून काहाडलं. वेकार करून टाकलं. आठ दिवसापास्नं वगतो. उपयोग नाही संडासाला असतांनी थेंब थेंब गळतानी वगतो. धार धरते रोज रोज तेच पाहून जीव कावतो. तडफडत राहयतो . .राती साळुचा इचार आला का—'

आने तिनंवी काय तरीच धरलंनसं वाटती...तिच्या पान उसन्या कमाईवरतं— . .दामुदादा, तू काई मन; मले आतं जगुसं वाटत नइ.'

—तो मग चूप होऊन विचारात राहिला. . . .मी काहीच बोललो नाही.

साळु अद्यापपर्यंत आली नव्हती. मी आणखी थोडावेळ वाट पाहयली. . . . .विठ्ठलचा करमभोग ऐकून मला अत्यंत वाईट वाटले. वाटत राहिले.

सातसाडेसातचा सुमार झाला होता. . .विठ्ठलला मी कसाबसा धीर दिला. आणि त्या दोघांचा विचार करत. . . हळहळत घराकडे निघून आलो. त्यांच्या 'घुव्वा धुव्वा' संसारामधलं वितुष्ट विकोपास गेलं होतं. .आईबाप पस्तावत होते. —मला साळुला भेटायची —तिला समजवायची घाई झाली होती. म्हणून पुन्हा दुसऱ्या दिवशी दुपारच्या वेळी मी त्यांच्या घरी गेलो. आंगणात पाय ठेवला — तोच कानावर कल्लोळ येऊन आदळला. मी जागच्या जागीच थबकलो.

कवाड बंद दिसलं. मी ढकललं. ते आतून लावलेलं होतं. .घरातले भांडे व सामान वस्तू फेकण्याच्या आवाजाबरोबर. . 'धपाधप्. .फटाफट्'चा आवाज. . पोरांचे भकांड रडे आणि विठू—साळुचे किंचाळणे.—

'मार, जिवं मारून तरी टाक.'

'तुजी भाड साप नोको घरात. नोको मनतो नं?'

'माजी भाड — कदी पायली—?'

'तू त्या झुग्गीवरं—'

'मंग काउ्य झालं ?'

'कोरीच राहयली मन नं—?'

—ती आता संतापाने कढत मोठमोठचाने रडत ओरडत बोलली— 'आरे देवा, नसले कुभांड रचत्यो. माजा हा सौंसय. . . सोताहा बारा ढगळे केलास—नासल्या, ते सांगतो ? मी—मी अजवरी नाइ केलं तं आतं करीन. . .मोठा नेकीचा ठसा — माणसीतला .जोर हाय का— मुर्दाळा, —बायकूसाटी—?'

—तो. .'साळेऽऽ—' म्हणून जिवाच्या आकांताने ओरडला. आणि— मी हांका देत मोठमोठ्यानं दार ठोकू लागलो, पण कोणीच उघडेना. . .काही वेळाने आतला आवाज एकदम बंद झाला. धाकधूक वाटू लागली. आतापर्यंत शेजारीपाजारी जमले होते. . . . . सर्वांनी मग दार तोडलं. .वघतो—तो विठू तेथून गायब झालेला. मागचं कवाड उघडं—सांदीतून—

मी साळुकडे धावत गेलो. ती मेल्यासारखी . . कोपऱ्यात चुलीमागं ठासून भरल्यासारखी पडली होती. . . .काही काळे — वेरं झाल्याच्या संशयाने — भीतीने शेजारी बाया माणसं साळुच्या पोरांनापण सांभाळून घेऊन —घरी गेली, मीही धकारलो. . . .तिच्या मांड्या उघड्या पडल्या होत्या. वरं वाटलं नाही.- म्हणून आत दवलेला पदर ओढून — त्या झाकल्या. —आणि ती दचकून उठली. . . माझ्याकडे ताठरल्या ठोळचाने रागाने पाहिले. आणि लगेच उभी होऊन दात खात कडाडली -

'तू काय वगत व्हतास — सांग. सांग काय वगत व्हतास ?'

—तिचा तो रुद्रभयंकर अवतार आणि भेसूर रूप पाहून मी मनातून चरकलो. अपराध्यासारखा नुसता बघत राहिलो. . . .माझ्याकडे तिने गरगरत पाहिले.

(पुढील मजकूर पान १५१ वर)

# नाटककार खाडिलकर

## व टीकाकार– माधव मनोहर

ना. कृ. शनवारे

एक नाटककार म्हणून कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्याबद्दल पुष्कळच लिहिले गेले. दोन वर्षापूर्वी त्यांची जन्मशताब्दी साजरी झाली. याही प्रसंगी नवीन लेखन झाले. नाटककार खाडिलकरांच्या ऐतिहासिक व वाङ्मयीन कार्याबद्दल तसे दुमत नसावे. भक्तिभावनेच्या भरात कुणी त्यांची अतिरेकी स्तुती केली असते. हे अर्थातच सूज्ञांच्या ध्यानी येते. विशिष्ट प्रसंग व संदर्भ लक्षात घेता ही स्तुती आपण क्षम्य समजतो. पण कृतज्ञतापूर्वक वंदन करण्याचा आव आणून बुद्ध्याच व प्रयत्नपूर्वक त्यांच्या नाट्यप्रतिभेला डांबर फासण्याचा प्रयत्न आपण समजू शकत नाही.

हा प्रयत्न असतो मराठी रंगभूमीला प्रगतीचा मार्ग दाखवण्याचा ! परंपरेचा त्याग म्हणजे प्रगती हे इथले समीकरण असते. गोंडस शब्दात बोलावयाचे तर ही डोळस व चिकित्सक कृतज्ञता असते. आणि नुसती कृतज्ञतात्र नव्हे तर उदंड कृतज्ञता. नाटककार म्हणून खाडिलकरांची जमेची बाजू पराकाष्ठेची क्षीण आहे हे या कृतज्ञतेचे सार !

माधव मनोहरांनी खाडिलकरी नाटकांचे पुनर्मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. या ठिकाणी खाडिलकरांना तर त्यांनी उडवून लावलेच पण श्रेष्ठ नाटककार म्हणून त्यांची भलामण करणाऱ्या वा. ल. कुळकर्णी व वि. स. खांडेकर यांच्यावरही धार धरली. बिचारे फडके, लेले त्यांच्या तावडीतून कसे निसटले नकळे !

एखाद्या नाट्यसंहितेच्या संदर्भात माधव मनोहरांना निश्चित काय हवं असतं हे सांगणं कठीण आहे पण खाडिलकरी नाटकावर टीका करताना त्यांनी काही गोष्टी निश्चितच सुचविल्या आहेत. ते लिहितात 'पण असे कधी घडले नाही, पुराणातील असो वा इतिहासातील असो, एखादा व्यक्तित्वविशेष त्यांच्या चित्तात कधी ठसला आणि झपाटल्यागत त्या व्यक्तित्वविशेषाच्या विश्लेपणासाठी त्यांनी एखादे नाटक लिहिले.' झपाटले जाण्यावर माधव मनोहरांचा विशेष जोर दिसतो. काकासाहेब खाडिलकर, लो. टिळकांच्या व्यक्तित्वाने झपाटलेच गेले होते. नामदार गोखले, शिवराम महादेव परांजपे, लॉर्ड कर्झन इत्यादी व्यक्तिविशेषांचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला होता. आपल्या नाटकामधून अशा व्यक्तिविशेषांचा शोध घेण्याचा प्रयत्न खाडिलकरांनी केला आहे.

खाडिलकर थोर देशभक्त होते. लो. टिळकांचे उजवे हात होते. त्यावेळच्या राजकारणात त्यांचा प्रत्यक्ष हिस्सा होता. भाग होता. खाडिलकरांची नाटके या त्यांच्या अनुभवाचे उत्स्फूर्त प्रदर्शनच होय.

पौराणिक वाङमय व इतिहास यांचा विशेष व्यासंग खाडिलकरांनी केला होता. परिस्थितीनुरूप रूपक नाट्याची योजना आवश्यक होती. या रूपकामध्ये रंगमंचावरील प्रत्यक्ष पात्रांपेक्षा त्याआड दडलेली व्यक्तिमत्वेच अधिक महत्वाची होती. खाडिलकरी नाट्यलेखनात अनुभवातील व्यक्ती व प्रसंग यांना पौराणिक वा ऐतिहासिक पात्रप्रसंगातून शोधण्याचा प्रयत्न असतो. पुराणकथा किंवा ऐतिहासिक कथा या ठिकाणी तेवढी महत्वाची नसते महत्व असते प्रत्यक्ष जिवंत अनुभवाला. हा जिवंत अनुभव चित्रित करण्याच्या संदर्भात खाडिलकरांनी पुराणकथेची वा इतिहासकथेची मोडतोड केलेली आपण पाहतो. त्यांच्या नाटकातून म्हणूनच इतिहास अगर पुराणाचे संशोधन करण्याचा प्रयत्न अप्रस्तुत ठरणार आहे.

खाडिलकरांच्या नाटकातील रूपके सैल स्वरूपाची असतात. कीचकवध नाटकातील रूपकाचा खूपच गाजावाजा झाला. या रूपकाचा अर्थ लावणाऱ्यामध्ये मतभेद आहेत. भाऊबंदकी नाटकातील रूपके वेगळी काढून दाखविणे कठीण आहे. रामशास्त्रांच्या काही उद्गारामध्ये लो. टिळकांचे स्वभावदर्शन घडते. पण कीचकवध

नाटकातील कीचकाप्रमाणे हे रूपक सर्वकश नाही. रामशास्त्र्यांना लो. टिळकांचा पोशाख चढवून टिळकांच्या अनुपस्थित त्यांची आठवण करून देण्याचा प्रयत्न महाराष्ट्र नाटक मंडळीने केला. या पोशाखामुळे ते रूपक लोकांना जास्त जाणवले असे म्हणावयास हरकत नाही.

राघोबा व आनंदीबाई या खाडिलकरांच्या व्यक्तिचित्रामध्ये तसेच शेक्सपीअरच्या मॅकबेथ व लेडी मॅकबेथ या कॅरेक्टर्समध्ये विलक्षण साम्य असल्याचे दिसून येते. राघोबा त्यावेळच्या इंग्रजी राजसत्तेचे व आनंदीबाई मवाळांचे प्रतिनिधित्व करतात. भाऊबंदकी नाटकाचे ऐतिहासिक कथानक त्यावेळच्या महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीचे रूपक म्हणता येते. हे कथानकाचे रूपकही आपल्याला फार ताणता येत नाही. स्थूल स्वरूपाची साम्ये दिसतात. अथपासून इतिपर्यंत सुसूत्र रूपक मांडता येत नाही.

खरे म्हणजे अशी अट्टहासपूर्वक रूपक योजना करणे हा खाडिलकरांचा उद्देशच नसतो. तो कीचकवधात नव्हता; भाऊबंदकीत तर नाहीच नाही. तीव्रतेने जाणवलेले व्यक्तिविशेष व राजकीय परिस्थिती एखाद्या कथानकाद्वारे बोलकी करण्याचा त्यांचा सततचा प्रयत्न दिसतो. रूपककथेची निवड केल्यावर कथानकाच्या शक्यतो दूर न जाता ते आपली नाटचवस्तू बांधीत जातात. मनात भावनांची व विचारांची गर्दी दाटलेली असते. चिंतनाचा भागही असतो. सगळे मग ठरलेल्या कथानकाच्या माध्यमातून साकार होऊ पाहते. खाडिलरांचे नाटक हे असे आतून दाटून आलेले व उत्स्फूर्त घडलेले नाटक होय.

कीचकवध, भाऊबंदकी या नाटकांना नाटक म्हणून काही किंमत आहे की नाही ? नाटक म्हणून या कलाकृतींचा विचार करताना जरी त्यामध्ये पुराण व इतिहास शोधणेही गैर आहे. विशुद्ध कलाकृती म्हणून खाडिलकरांच्या नाटकांचा विचार आम्हाला करता आला पाहिजे.

खाडिलकरांच्या नाटचकृतींची विस्तृत समीक्षा करणे हा या लेखाचा उद्देश नव्हे. त्यांच्या सर्वच कृती श्रेष्ठ अगर कनिष्ठ आहेत असा दावा कुणी करू शकणार नाही. त्यांच्या नाटच जीवनातील कलाविलासाच्या संदर्भात चढउतार निश्चितच आहेत. पण कीचकवध, भाऊबंदकी या त्यांच्या नाटकांचा उत्तम कलाकृती म्हणून निर्देश कुणालाही टाळता येऊ नये. खाडिलकरांची ही नाटके आकृतिबंध व आशय या दोन्ही दृष्टींनी दर्जेदारच आहेत. तसे जगात निर्दोष काहीच नाही. कुणा एखाद्या मान्य व्यक्तीची टीकाही सदोष असू सकते. पूर्वग्रहदूषित दृष्टी असली तर मग ही टीका विशेषच सदोष होते.

'पूर्वग्रहदूषित' हा शब्द मी मुद्दामच वापरला आहे. माधव मनोहर यांच्या सारख्या थोर टीकाकाराने अन्यथा आपल्या लेखात खाडिलकरांच्या नाटचलेखनासंबंधी इतकी ढोबळ विधाने केली नसती. ते लिहितात— 'रूढ परिभाषेत बोलावयाचे तर खाडिलकरी नाटकातील संघर्ष हा राजकीय न्याय आणि अन्याय यातील संघर्ष असतो. पण स्थलकाल आणि नावेगावे कितीही बदलली तरी शेवटी तो संघर्ष फक्त कर्झन आणि टिळक यांच्यातीलच वस्तुतः असतो. . या उग्रप्रकृती नायक—खलनायकातील संघर्षांची परिणती पूर्वनिश्चित असते. टिळकांचा जय व कर्झनचा पराजय' खाडिलकरी नाटचसंहितेचे रूप इतके ढोबळ आहे हे कुणीही मान्य करणार नाही. कीचकवध नाटकातील संघर्ष ढोबळ तर नाहीच उलट तो विशेष सूक्ष्म स्वरूपाचा आहे. एका बाजूने जित व जेते यांच्यामधील हा संघर्ष दुसऱ्या बाजूने भावा भावांमधील' पति-पत्नीमधील भिन्नप्रकृति धर्मांचा संघर्ष आहे. वैचारिक संदर्भात तो मवाळ, जहाल व ज्वलज्जहाल या प्रवृत्तीमधील संघर्ष आहे. धर्माधर्मासंबंधी चिंतन हा या नाटकाचा मूळ आधार आहे. स्थलकालाची मर्यादा पार करणारी ही एक लक्षणीय कथावस्तू आहे.

भाऊबंदकी नाटकाची कथावस्तू मानवी स्वभावातील मूलभूत प्रेरणा व त्यानेच निर्माण केलेली नीतितत्वे व न्यायसंस्था यांच्यातील संघर्षाचे मनोज्ञ रूपदर्शन आहे. कवी हा द्रष्टा असतो. भारतातील आगामी लोकशाहीचे दर्शन या द्रष्टचा नाटककाराने याच आपल्या भाऊबंदकी नाटकाच्या शेवटी घडविले आहे.

खाडिलकरांच्या 'स्वयंवर' मधील गद्यनाटच चांगले उतरले आहे. संगीताने या गद्यनाटचाला गिळून टाकले हे खरे. नाटचसंगीताचा उत्कर्ष हा मराठी रंगभूमिचा एक विशेष मान्य करूनही हा उत्कर्ष गद्य नाटचाला व पुढे संपूर्ण मराठी रंगभूमीला मारक ठरला हे खरे आहे.

दोन श्रेष्ठ व्यक्ती आपआपल्यापरीने श्रेष्ठ असतात. त्यांची तुलना करणे हे पुष्कळदा मूर्खपणाचेच ठरते. सम्राट अकबर व छत्रपती शिवाजी यांची तुलना कशासाठी करावयाची ? पंडित नेहरू व विस्टन चर्चिल यांना तोलण्याचा उपद्व्याप तसा अप्रस्तुतच. खाडिलकर व शेक्सपीअर यांची तुलनाही अशीच अप्रस्तुत असे मला वाटते. या संदर्भात उपकथानकासंबंधीचा मुद्दा माधव मनोहरांनी उपस्थित केला आहे. भाऊबंदकी नाटकातील नमकशास्त्री, दुर्गा व म्हाळसा, चमकशास्त्री हे उपकथानक मूळ नाट्यवस्तूशी एकरूप झालेले असून नाट्यार्थ व नाट्यसंघर्ष यांना उठाव देणारे आहे. याबद्दल दुमत असण्याचे कारण आहे का ? फक्त दोषच बघावयाचे, गुणांकडे कानाडोळा करावयाचा असेच ठरविले असल्यास प्रश्न मिटतो.

खाडिलकरांच्या नाटकातील भाषा अनलंकृत आहे असे कुणी म्हणतात. अर्थात ती 'शारदा' नाटकाच्या अर्थाने अनलंकृत नाही. ती जोरकस व वीररसपूर्ण आहे असेही काहींचे म्हणणे. पुष्कळ ठिकाणी ती अशी आहे यात शंकाच नाही. खाडिलकरांची भाषा पराकाष्ठेची गद्य आहे असे विधान माधव मनोहर करतात. नाटकभर खाडिलकरांचे विचार खाडिलकरी भाषेत मांडलेले असतात असाही त्यांचा आरोप. मला वाटतं नाटकाची भाषा कृत्रीम असतेच. नाट्यगत कथावस्तू आकार घेत असताना त्यातील पात्रांनी कसे बोलावयाचे हे ठरत असते. शोकांतिकेची भाषा वेगळी असते; सुखांतिकेची भाषा वेगळी असते भाषा कशी असते याचा वेगळा शोध घेण्यापेक्षा ती नाट्यप्रकृतीशी जुळणारी आहे की नाही हे पाहणे जास्त श्रेयस्कर असते. कीचकवध, भाऊबंदकी या नाटकांची भाषा त्या त्या नाट्यवस्तूंचा परिपोष साधणारी नाही असे कोण म्हणेल ?

'खाडिलकरी नाटक हे साधन होते. राजकीय मतप्रचाराचे साधन. नाटक हे स्वतःच साध्य आहे ही समजूत ठाम नसेल तर कोणत्याही प्रचारासाठी राबवलेल्या कलेला जी अवकळा येते, तीच अवकळा खाडिलकरी नाट्यकलेला प्राप्त झाल्याचे जाणवते.' (इति: माधव मनोहर) 'निरपवाद साध्य' वगैरे कल्पना निव्वळ घोषणारूप असतात. तसं पाहता सगळं काही रिलेटिव्ह आहे; सापेक्ष आहे. 'निरपेक्ष साध्य' वगैरे झूट ! तरतमचा भाग असतो हे मात्र मान्य. खाडिलकरांच्या नाटकात राजकारण आहे. पण सर्वच नाटकात समावेश प्रचार आहे हे मला मान्य नाही. तसे कोणतेही लेखन या ना त्या स्वरूपाचा प्रचार म्हणून कब करता येईल. खाडिलकरांचे नाट्यांतर्गत राजकारण जेव्हा प्रचाररूप झाले तेव्हा मात्र कलेला अवकळा आली; यात शंकाच नाही.

खाडिलकर–बालगंधर्व युती मराठी रंगभूमिला लाभदायक ठरली. रंगभूमीच्या गौरवशाली इतिहासात बालगंधर्वांचा वाटा फार मोठा आहे. अर्थात हा वाटा एक प्रतिभावंत नट व गायक म्हणून आहे. नाटककार म्हणून खाडिलकरांचे मोठेपण वेगळे आहे. 'मानापमान सारखे फालतू नाटकही बालगंधर्वांनी सर्वाधिक लोकप्रिय करून दाखविले' असे विधान माधव मनोहर करतात. विधानं ठोकून देण्याच्या वृत्तीबद्दल नापसंती व्यक्त करायची व स्वतः मात्र तशीच विधानं करायची हा एक गमतीचा प्रकार. 'मानापमान' चे यश हे एकट्या बालगंधर्वांचे यश आहे का ? तसे पाहिले तर श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'संगीत प्रेमशोधन' मध्ये इंदिरेची भूमिका त्यांनीच केली. हे नाटक जून १९१० मध्ये रंगमंचावर आले. मानापमानाच्या तुलनेत ते गाजले नाही. मानापमान नाटकाच्या यशाची वाटेकरी एखादी दुसरीच व्यक्ती नाही. चौघापाच जणांची नावं सहज घेता येतील. संगीतकार गो. स. टेंबे यांचा या नाटकाच्या यशात सिंहाचा वाटा आहे हे कुणीही मान्य करील.

खाडिलकरावर टीका करताना अलीकडच्या काही मान्यवर टिकाकारांनी अशी अतिव्याप्त विधानं वाचली म्हणजे आश्चर्य वाटते. आणि मग विचार येतो—हा आकस का ? खाडिलकरांना हिणकस ठरविल्यामुळे आपल्याला मोठेपण प्राप्त होईल असे तर यांना वाटत नसेल ना ?

परंपरेबद्दल तुच्छता व अनादर. परभृत आशयविषयाची विलक्षण भलामण! ही वृत्ती मराठी रंगभूमीचे स्वत्वशोषण केल्याशिवाय रहावयाची नाही. तिने आजपर्यंत केलेले कार्य कचराटोपलीच्या मोलाचे आहे असे म्हणणे निव्वळ कृतघ्नपणाचे आहे. कृतघ्नतेच्या आवरणाखाली ही उदंड कृतघ्नताच आहे. स्वाभिमान व त्रुटींची योग्य जाण यातूनच प्रगतीचा प्रवास होऊ शकतो. कमकुवत म्हणून आपले जिवंत पाय कापून काढायचे व लोभस सागवानी लाकडे बांधून मिरवायचे असा विक्षिप्तपणा कुणी का करावा ? ● ●

ग्रंथ परीक्षण –

# सामान्यातील असामान्य

वसंत खेरडीकर

श्री वसंतराव फुलसिंग नाईक या असामान्य व्यक्तिमत्वाच्या नाईकांचे चरित्र श्री पंढरीनाथ रावजी पाटील यांनी परिश्रमपूर्वक लिहिले आणि त्याला भारताचे प्रकांड पंडित व थोर विचारवंत तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तावना लिहून चरित्र वाङमयात एक मोलाची भर टाकली आहे.

भारतीय साहित्यात चरित्राची परंपरा फार जुनी. अशोकासारख्या सम्राटाने आपल्या हयातीत आपल्या विजयाची गाथा विजयस्तंभ व शिलालेखावर लिहवून घेतली आहे. बाणाचे 'हर्षचरित्र', कालिदासाचे 'रघुवंश' या पहिल्या चरित्रात्मक साहित्यिक कलाकृति होत. चरित्रकथन करण्याची पद्धत सुद्धा आपल्या सामाजिक परंपरेत आढळून येते. आख्यायिका, पुराणे, महाकाव्ये, वीरगाथा, खंडकाव्ये, दंतकथा, धार्मिक आख्याने इत्यादी बोली प्रकारात कर्तृत्वाचे पोवाडे गायिलेले आढळून येतात. 'जिवन घटनांचा वृत्तांत' म्हणजे चरित्र, अशी चरित्राची सरळ व्याख्या करतात. परंतु आता ही व्याख्या इतकी सोपी राहिलेली नाही. चरित्र–नायक ही कोणतीही व्यक्ती होऊ शकते या कल्पनेतही बरीच चरित्रे उदयास आली आहेत पण व्यक्तिचे सत्य दर्शन घडवायचे म्हणजे नायकाच्या जीवनातील असत्य, असंभाव्य, अलौकिक, अतिरंजीत व अवास्तव वातावरण सोडून त्या जागी सत्य, संभव, वास्तव व स्वाभाविक वातावरण निर्माण करावे लागणार व म्हणून चरित्र लिहिणे हे कार्य सोपे नाही ही गोष्ट श्री पाटील यांना माहीत होती असे त्यांनी श्री वसंतराव नाईकांच्या चरित्राला छोटेखानी चरित्र म्हटले आहे यावरून दिसून येते.

राजकीय व्यक्तींची चरित्रे लिहिताना व्यक्ती व त्याचे जीवन यापेक्षा तत्कालीन, सामाजिक, राजकीय आदींना जास्त महत्व प्राप्त होऊन व्यक्तीचे व्यक्तीमत्व हे न राहता सामाजिक किंवा राजकीय इतिहास ठरेल, अशी चरित्रे निर्माण होतात. प्रसिद्ध साहित्यक श्री न. र. फाटक यांनी रानडे चरित्र लिहीले किंवा न. चिं. केळकर यांनी टिळकांचे चरित्र लिहिले तेव्हा व्यक्तीला महत्व दिले नसून तत्कालीन, सामाजिक व राजकीय परिस्थितीच्या इतिहासालाच व्यक्ती चरित्रात गुंतवून टाकले. इतिहासातील प्रसंगात वर्ण्यव्यक्ती गडप होतात, त्यामुळे व्यक्तीला मध्यबिंदू कल्पून चरित्रात घटनांना त्याच्या भोवती फिरत ठेवणे आवश्यक आहे. श्री पाटील यांनी अशा प्रकारे प्रयत्न केलेला आहे.

या चरित्र लेखनामध्ये नाईकांची स्वभावचित्रे जागोजागी दिसतात. वसंतरावजी व नेहरू यांच्या मनमोकळया गप्पांचे वर्णन करताना लेखक लिहितात. पंडितजींनी वसंतरावजींना विचारले की, "तुम्ही कधी वाईट सवयी सोडण्याचा प्रयत्न केला आहे का?" तेव्हा वसंतरावजींनी लगेच हसंत हसंत उत्तर दिले, "पंडितजी सोडण्यासारख्या वाईट सवयी मी कधी लावूनच घेत नाही." संतवाङमयाच्या बाबतीत वसंतरावजी म्हणतात की, "महाराष्ट्र संताची भूमी आहे. त्यांनी समाजाला मानवतेची शिकवण दिली आहे. संत वाङमयाच्या शिकवणीमुळे मराठी जीवन समृद्ध झाले आहे." व्यक्तीच्या जीवनाचे व त्याच्या स्वभावाचे मर्म चरित्रकाराने तिच्या जीवनाशी व अंतरंगाशी समरस होऊन जणू काय ती व्यक्तीच आपली जीवनगाथा कथन करते आहे अशा प्रकारे विविध प्रसंग उघडे करून दाखविले आहे.

तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्थावनेत श्री नाईकांच्या खाजगी जीवनाची रूपरेषा उत्कटपणे रंगवलेली नाही असे प्रतिपादन केले आहे. राजकीय व्यक्तींची चरित्रे ही केव्हाही परिपूर्ण राहू शकत नाहीत. चरित्र–विषय झालेली विभूती ही विशिष्ट कृतीची समर्थक आहे हे दाखविण्याची लेखकाची इच्छा असल्यामुळे– चरित्र लेखकाला व्यक्तीच्या व्यापक जीवनातून

(पुढील मजकूर पान १६० वर)

ग्रंथ परीक्षणं –

# चंद्रास्त

**माधव कोंडविलकर**

'चंद्रास्त' हे श्री प्रभाकर श्रावण चौधरी यांचे खंडकाव्य सातपुड्याच्या डोंगरपायथ्याशी वसलेल्या कोण्या एका पाच हजार वस्तीच्या गावातील अभाग्यांची कथा आहे. जीवनातील भयानक ससेहोलपटीमुळे ही माणसे विदीर्ण झाली आहेत. वाकली आहेत. मोडली आहेत. या गावालगत एक कोरडी नदी आहे. त्या नदीत गावची विष्ठा आहे आणि गावच्या भन्नाट गोष्टीही आहेत.

'चंद्रास्त' मधील व्यक्तिचित्रे आणि प्रसंगचित्रे अतिशय वेधक आहेत. वंडू महाजन, वहिरी लोहारीण, धवाज्या, ठगी, आंधळी म्हातारी आणि तिचा नवरा श्याम्या मांग, किसन मांग आणि या सर्वांवर कळस म्हणजे राधा आणि शंकर हे तरुण दांपत्य मनाला चकावून जातात. कुशल चित्रकाराने कुंचल्याच्या कमीत कमी फटकाऱ्यात व्यक्तिचित्र रेखाटावे अशी ही काव्यमय रेखाचित्रे आहेत.

कमरेवर लफ्फेदाज गुंडाळलेले धोतर, अंगात बिनबाह्याची कोपरी, केसांना तेल नाही, दाढीमिशी आपली नेहमी वाढलेली असा हा वंडू महाजन मुलापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वांशी कौटुंबिक जिव्हाळ्याने बोलणारा एक साधासुधा माणूस. याला दारुचं व्यसन लागतं. दारुच्या धुंदीत तो लोकशाही, समाजवाद, समता, स्वातंत्र्य इ. वर मनसोक्त बडबडतो. साऱ्यांची हजेरी घेतो. महाजन घरचा बरा असतो. रानात पंचवीस एकर जमीन असते. चारचौघी सारखी बायको. दोन गोरी गोमटी मुले–मस्त संसार असतो पण महाजन ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत तीनदा पराभूत होतो आणि त्यामुळे तो खचतो.

गावच्या चौकात आपल्या हाडांचा सापळा सावरीत एक वहिरी लोहारीण बसलेली असते. या वहिरीने म्हणे तीन दादले भोगलेले असतात. पण एकानेही तिला सावली दिलेली नसते. ही वहिरी गावच्या उष्टयावर जगते. गावचा पालापाचोळा, शेणमाती करते आणि त्या कष्टातून एक वासन विकत घेते. वासन जीवापलिकडे जपते. पण एके दिवशी कोणीतरी चलवादी तिचे हे वासन चोरून नेतो. अशा प्रकारे वहिरीचे सर्वस्व हिरावून घेतले जाते.

असाच एक निराधार वेडा धवाज्या गावभर हिंडत असतो. वाढलेली दाढी खाजवत, स्वतः चाल लावलेली जुनी गाणी म्हणतो. याचं मुळचं नाव रामचंद्र पण गावरहाटीने याला धवाज्या बनवले आणि तेच कायम चिकटले. एका निवडणूकीच्या जलशात कुणाला तरी अचानक याची आठवण होते. तसे दोन एजंट टाळी मारून याला शोधून हॉटेलात नेतात आणि या रामचंद्र अमृत महाराला 'कोणत्याही जाती धर्माच्या माणसाला मज्जाव नसलेल्या' हॉटेलात कडक चहा पाजतात. आणि क्षणाचा राजा बनवतात.

'चंद्रास्त' मधील नायक शंकर आणि राधा. शंकरला वारं धरावी लागली नसती तर तो काव्यशास्त्र, अर्थशास्त्र वाचत वसला असता इतका तो बुद्धिमान आहे. पण एके दिवशी गप्पांच्या गिरकीत बाबू शेटच्या झोपडीकडे तो वाहतो. अड्डयावर कडक पावशेर झोकतो आणि घरी येतो. पण भपक्या सरशी राधा त्याला दूर सारते. पुढे शंकर आपल्या भावी मुलाची शपथ घेतो तेव्हा राधा चिमणीची वात अलगद बारीक करून त्याच्या खाटेशी जाते. चारचौघीत उठून दिसणारी राधा गव्हाळी रंगाची हात, गळा, कपाळ, सगळंच हिचं रिकामं असत. शंकर हिला जिवापलीकडे तळहातच्या फोडागत काळजातल्या चंद्रासारखा जपत असतो.

गावच्या जगन्नाथ पाटलाचा शंकर हा नोकर. एके दिवशी शंकरचे अपघाती निधन होते. तशी राधा रडरड रडते. तिच्या आनंदाचा अंधारच होतो. राधा

एके दिवशी रस्त्यावर खडी फोडायला जाते. खडी साहेबाची तिच्यावर नजर जाते:

"अशीच येते पहाटे कामावर तर
जाऊ नको आज खोपडीत दलिंदर तुह्या
वसली सायवाची मर्जी तुह्यावर
करत जाय सायवाले खूष रात्रीला
काम न करता दुप्पट रोजदारी
तुला घरपोच एकटीला'

असं साहेबाचा चमचा तिला सांगतो. पण राधा काहीही न बोलता आपल्या झोपडीत निघून जाते. अन् तिचे त्या गावचे कामही जाते. आता जायचे कुठे हा प्रश्न तिला सतावतो. भावाकडे जावे तर दारिद्र्य. राधा ठगीच्या आठवणीने विदीर्ण होते. ठगी नवऱ्याने टाकलेली एक वेडी बाई. ठगीचा दादला शाम्या मांग दारू, ओपनपंज्या लावायचा. पण नशीबाच्या अठ्ठ्याची जोड कधी वसायची नाही. घरी भयाण दारिद्र. दोन पोरं कोठे तरी निघून गेली. अंग झाकायला पुरेसं धडुत नसलेली ही ठगी जुने टमरेल हातात घेऊन भीक मागून भावाच्या –किसन मांगाच्या खोपटाशी अंग चोरून रात्र घालवत असते. या आठवणीने राधा काळवंडते. भावाकडे जाण्याचा विचार ती सोडून देते. आणि गावातल्या एका सधन शेतकऱ्याच्या शेतावर मजुरी करायला जाते तेथे अरुण नावाच्या तरुण शेतकऱ्याची तिच्यावर नजर फिरते. आणि पिसाट वासनांच्या भोवऱ्यात तरुण राधेचा बळी पडतो. अशी ही राधा–शंकरची शोकांतिका मनाला चटका लावून जाते. आजच्या सामाजिक आर्थिक विषमतेची कवीला चांगली जाण आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील, विकेंद्रिकरणानंतर ग्रामीण भागातील विषमता, दारिद्र्य, अज्ञान पाहून कवी दुभंगून जातो. मराठीत सामाजिक पार्श्वभूमीवर लिहिलेले हे पहिलेच उत्कृष्ट खंडकाव्य म्हटले तर अतिशयोक्ति ठरू नये. प्रा.उत्तम क्षीरसागर यांचे वेधक मृखपृष्ठ या पुस्तकाला लाभले आहे. श्री. देवीदास बागूल यांनी लक्षणीय मांडणी केली आहे. पुस्तकाची पहिली पाच पाने निव्वळ कोरी का ठेवली हे प्रकाशकच जाणोत. त्यामुळेच की काय पुस्तकाची किंमत रु. पाच झाली असावी.

चंद्रास्त (खंडकाव्य): प्रभाकर श्रावण चौधरी, रसयात्रा प्रकाशन, विद्यानगर, जळगाव, पृष्ठे–२४, मूल्य पाच रुपये.

---

(पान १५८ वरून)

चिकित्सक पद्धतीने त्याच्या विशिष्ट अंगाचेच वर्णन करावयाची प्रथा रूढ झाली आहे; त्यामुळे अशा असामान्य व्यक्तींची अनेक चरित्रे निर्माण होतात. टिळक, गांधी, नेहरू या सारख्या आधुनिक राजकीय व्यक्तींची चरित्रे चाळून पाहिली असता आपणास ही गोष्ट आढळून येईल. असामान्याचे सामान्य जीवन जाणून घेण्याची सामान्य वाचकाला उत्सुकता असते. सध्याच्या समाज सुधारणेच्या कालाशी तुलना करता श्री वसंतराव नाईक प्रतिकूल परिस्थितीत ज्या सामाजिक थरातून वर आले त्या व्यक्तीचे जीवन कसे घडविले गेले हे जाणून घेण्याची इच्छा व्यक्त करणारे श्री लक्ष्मणशास्त्री जोशी आजच्या समाजाला वेगळाच उपदेश तर करीत नाही ना! सरकारी सवलतीवर आणि सरकारी पातळीवर जे बहुजन समाजाला वरच्या सामाजिक थरामध्ये आणण्याचे प्रयत्न चालले आहेत त्याला श्री वसंतराव नाईकांच्या खाजगी चरित्रातून स्वावलंबी बनण्याची प्रेरणा होईल का? श्री पंढरीनाथ पाटील यांनी श्री लक्ष्मण शास्त्र्यांच्या आव्हानाचा स्विकार करावा असे आम्हाला वाटते.

सामान्यातील असामान्य–पंढरीनाथ पाटील
प्रकाशक: सौ. आशादेवी पंढरीनाथ पाटील,
मुंबई–५१. पृष्ठे–२०४, मूल्य दहा रुपये.

ग्रंथ परीक्षण –

# पानफूल

अ. ना. देशपांडे

'पानफूल' सूर्यकांत खांडेकरांचा तिसरा काव्य-संग्रह. यापूर्वी १९५४ साली त्यांचा 'सावली' हा निवडक कवितांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. ७९ कवितांच्या या संग्रहात खांडेकरांची प्रतीभा आता परिपक्व झाल्याचा प्रत्यय येतो.

आजच्या कवितेचा चेहरामोहरा अतिशय बदल-लेला आहे. तिचा खरा चेहरा कोणता आहे हेच आता लक्षात येणे कठीण होऊ लागले आहे. अशा परिस्थितीत आपली पूर्वपरंपरा न सोडणारी कविता अजून शिल्लक आहे हे पाहून मनाला संतोष वाटल्याशिवाय राहात नाही.

खांडेकरांच्या काव्यात प्रथम जाणवते ती त्यांची सश्रद्ध वृत्ती, संतवाणीच्या अमर प्रभावामुळे आणि ईश्वर-भक्ती मानवी मनाचे एक अमर स्फुरण असल्यामुळे त्यांच्या काव्यात ही सश्रद्ध वृत्ती जाणवणे अपरिहार्य आहे. जीवनात अवसेचा अंधकार दाटलेला असताना त्याला आधार देणारे व ही जीवननौका पार करण्यास मदत करणारे सुदर्शन चक्रच कवीला साह्यभूत होते.

अवसेचा अंधकार । जेव्हा असे जीवनात
धार अश्रूंची नयनी । जेव्हा असते झरत
– – – – – – – – – – – – – – –
हृदयाच्या यमुनेला । येते तेव्हाच भरते
लाटातून मुकुंदाचे । सुदर्शन झळकते

केवळ कष्टाच्याच प्रसंगी त्याला या रुपाचा साक्षात्कार होतो असे नाही तर पुष्पाच्या गंधातून, दीपाच्या ज्योतीतून त्याला हे परमेश्वराचे साथ देणारे दर्शन घडले आहे. आपल्या अचपळ मनामुळे हे दर्शन त्याला अपुरे वाटते पण त्याची धाव मात्र भव्यतेकडेच आहे.

हे 'असेच' अचपळ मन । आजवरी वघ कण्हते
तव शाश्वत भव्यरूप । जाणाया झुरमुरते

या कवीच्या प्रेम गीतातूनही सश्रद्ध वृत्तीचा परि-चय घडतो. त्यांची प्रेमगीते आत्मपर आहेत. त्यांच्या गीतातील स्थायिभाव सफल प्रीतीचा आहे. नादमधुर आणि ललित शब्दांची व कधी कधी शब्द स्पर्शादिकांच्या उन्मादक प्रतिमांची योजना करून हा कवी आपल्या प्रेमगीतात उत्कटता आणतो. कवी आपल्या संसारात रमलेला आहे, रंगलेला आहेत. प्रेमनिराशेचे व त्यामुळे उद्भवणाऱ्या कडवट विद्वेषाचे रंग त्याच्या कवितेत नाहीत. त्याची कविता तृप्तीची आहे, समाधानाची आहे.

तुझ्या माझ्या संसारात । खेळ ऊन सावलीचा
कधी सुख कधी दुःख । असा रंग गमतीचा

या कवीच्या प्रेमगीतामध्ये बहुतेक कविता विवा-होत्तर प्रेमावर व पत्नीवरच आहेत. तिची दवासारखी गोरीपान अंगकांती, तिचा पारिजातकाचा स्पर्श कवीला स्फूर्ती देतो.

रोज दिवस सोन्याचा । फुले अपुल्या घरात
रोज रात्रीला ग होते । चांदण्याची बरसात

त्यांची कविता प्रणयाकडे झुकते पण वहावत नाही. कुठे थांबावयाचे ते खांडेकराना बरोबर साधले आहे. खांडेकर उन्मत्त प्रणयवीर नाहीत. ते एकनिष्ठ प्रेमाचे पाईक आहेत त्यांनी विवाहपूर्व प्रेमावर कविता लिहिल्याच नाहीत असे नाही, पण त्या कवितामध्ये देखील त्यांच्या मनाचा व लेखणीचा संयम स्पष्ट झाला आहे. प्रचलित भोगवादी प्रेमकवितेपासून खांडेकरांची कविता कशी वेगळी आहे हे स्पष्ट होते. प्रेयसीविषयी त्यांना आकर्षण वाटत नाही असे नाही पण त्यांची इच्छा मात्र

त्याच स्तरावर जीवन माझे
पवित्रतेने जावे उजळुन
मनातले हे पापी स्पंदन
जळता जळता व्हावे चंदन

अशीच आहे, कारण त्यांची प्रेमाची कल्पना

> तुझे नि माझे प्रेम मात्र पण
> एक हवेसे स्वप्नच सुंदर
> तुझे नि माझे प्रेम शुभांगी
> अविनाशी शिव सत्य मनोहर

अशीच आहे.

कवी हा निसर्गवेडा आहे. वनरायीच्या कुशीत तो प्रसन्न होतो. स्वतःच्या आनंदात मग्न असतो व 'रत्नलोभी कुबेरांना'

> सागराचा धरतीचा । ग्रहताऱ्यांचा मी वेडा
> रत्नलोभी कुबेरांनो । पळा माझा नाद सोडा

असा सल्लाही देतो. त्यांची निसर्गगीते प्रभावी असून त्यात रेखाटलेल्या प्रतिमा निस्संशय रेखीव व समृद्ध आहेत. निसर्गातील अभिनव सौंदर्याची मोहिनी त्यांच्या मनावर पडली, की त्यांच्या प्रतिभेला एका मागोमाग एक सरस कल्पना सुचू लागतात. आणि अशा कल्पनांच्या द्वारा सुंदर निसर्गदृश्याची रम्य चित्रे ते आपल्या डोळ्यासमोर उभी करतात.

> पांघरुनी चांदीची दुलई
> वेळुवनातील निजले पक्षी

किंवा

> परतली रानातून । घराकडे गाईगुरे
> पाठीवर पाखडत । थेंब टपोरे टपोरे

अशी कितीतरी चित्रे देता येतील. याशिवाय, शुभ्र ढगांचे पक्षी, पवनाचे मिटणारे फूल, उन्हाने भिजणारी पायवाट या प्रतिमा पाहण्यासारख्या आहेत.

पण कधी कधी मात्र हा निसर्ग त्यांना आनंदी ठेवू शकत नाही.

> एकाकी पथ बुडला । अंधारी दाट दाट
> शून्यताच एक उरे । अंतरात आर्त आर्त

पण कवीची निराशा व्यापक नाही, ती प्रेमातून तर मुळीच आली नाही. ती किंचितकाल येणारी तात्पुरती जीवन निराशा आहे.

> असे असावे सागरापरी ।
> विशाल सुंदर अवघे जीवन

असे म्हणणाऱ्या कवीला फार काळ जीवन निराशा झाकोळून टाकेल तरी कशी? प्रेमावरचा व त्यागावरचा विश्वास कवीला सदैव आशावादी ठेवतो. या आशावादातूनच त्यांच्या मोजक्या राष्ट्रीय कवितेची निर्मिती झाली आहे.

> हिंदभूमिचे पाईक आम्ही सारे एक करा निर्धार
> शिवरायांची पुन्हा गाजवू पराक्रमी तलवार

असे ते म्हणतात व या जुन्या पराक्रमाच्या पार्श्वभूमीवर १९६५ सालच्या भारत–पाक युद्धावर लिहिलेली

> आज इथे रणकुंड पेटले
> स्वातंत्र्यावर संकट आले
> आक्रमकांना दूर लोटता रक्त पडे बलिदानी

ही कविता एकदम नजरेत भरते व त्यांची प्रतिभा समाजमनाच्या कंपनाबरोबर कशी स्पंदन पावते हे आपल्या लक्षात येते. कविमन जर जिवंत असेल तर भोवतालच्या परिस्थितीचा व समाजमंथनाचा संस्कार त्यांच्या मनावर झाल्याशिवाय राहात नाही. हे अगदी खरे, पण हे अगदी स्वाभाविकपणे झाले पाहिजे. कवीला स्वतःला तरी आपल्या प्रतिभेला एका विशिष्ट वाटेने वळविणे कसे काय शक्य होणार? व नेमके हेच खांडेकरांनी ओळखले आहे व म्हणून अशा स्वरूपाच्या कविता त्यांच्या काव्यसंग्रहात कमी आहेत.

'पानफूल' काव्यसंग्रहाच्या परिचयात म्हटल्याप्रमाणे जीवनाची पाने उलगडणारे हे पानफूल मराठी साहित्यात पुष्पगुच्छ ठरले आहे.

> पानफूल – सूर्यकांत खांडेकर, प्रकाशक:
> दि कोल्हापूर रायटर्स कॉ ऑप–सोसायटी
> लि. १०४९ इ. वार्ड, शाहूपुरी, कोल्हापूर,
> पृष्ठे १०२. मूल्य पाच रुपये.



अनुक्रमणिका

# अभ्र

उषा लिमये

प्रा. कृ. ब. निकुंब यांचा हा सहावा काव्यसंग्रह. संग्रहाचं नाव अभ्र पाहून मनातही जरा शंकेचे अभ्र आले की सर्व निराशावादी कविताच आपल्याला वाचावयास मिळणार पण संग्रह वाचू लागल्यावर कळून आले की या अभ्रांना चंदेरी किनार आहे. मानवी जीवनात अभ्र आहे. पाऊसही आहेच पण त्यातूनही ऊन चांदणे यामुळे त्या अभ्रांनाही एक प्रकारचे सौंदर्य प्राप्त होते, तसेच हा संग्रह वाचून वाटले.

प्रा. निकुंब यांच्या या संग्रहात नवे जुने हातात हात घालून मिरवत आहे. साध्या प्रासादिक छंदोबद्ध रचनेबरोबर नव्याचाही ते मागोवा घेत असल्याचे प्रत्ययाला येते. अर्थात तो प्रयत्न नव्हे. कारण कविता जन्माला येते ती मानवाप्रमाणे नैसर्गिक अवस्थेत नाही ती जन्मतानाच रसालंकाराचे लेणे लेवून येते. छंदवृत्तांचा साज घेऊन येते. त्यासाठी प्रयत्न लागत नाही. निकुम्बांची जन्म ही कविताच त्याची साक्ष देत आहे.

'उजवे' या कवितेत

"वृक्षवेलींच्या जुंवाडांनी किर्र झालेली"
सळसळणारी खसपसणारी
फुत्कार टाकणारी
हिंस्र गर्जनांनी थरथरणारी
शहारणारी भुतांच्या थंडगार निश्वासांनी

अशा तऱ्हेची अरण्ये सतत तुडवीत रहायचे असले तरी कदाचित कुणालाच ठाऊक नसेल असे अरण्यांच्या पैलपारच्या वळणावर त्याच्या कठड्यापाशी 'एक उषःस्वप्न वाट पहात असेल' हा त्यांचा आशावाद आहे जो ती अरण्ये तुडवीत जाण्याचे धैर्य त्यांना देतो.

आपलं दुःख आपणच निर्माण करतो नि त्यातच मन केन्द्रित होऊन जीवनात आलेले मधुरमनोहर प्रसंगही त्याने काळवंडतात याची जाणीव त्यांनी–

'यांच्या तत्पर सत्कारात उदासीन असणे गुन्हा आहे
हे तुला सांगायलाच हवे ! तुला–
आंधळे दुःख पांगळ्या रेपांनी सतत चितारणाऱ्या
तुला !'

या ओळीतून 'गुन्हा' या कवितेत आपल्या प्रेयसीला किंवा स्वमनाला दिली आहे.

शब्द विरून जातात पण त्याचे व्रण कायम उरतात म्हणून अर्थ तोलून बोलायला हवं असं ते आपल्या अनुताप झालेल्या प्रेयसीला सांगतात.

'चाळा' या कवितेतील संसाराचे गणित त्यांनी सुंदर रीतीने सोडविले आहे. 'अदभुत' ही कविता अत्यंत सुंदर असून–

'समजा की मी सुरक्षित आहे
जोवर ही फुलं अशीच राहतील अम्लान !
एखादंही शीर्ण होताच – – –'

–उरल्या शब्दांची आमवे झाली या ओळी अत्यंत उत्कट आहेत. 'तुझी वाट चुकणार नाही' या कवितेत सर्व सामान्यांना असलेल्या महाद्वारा शिवाय आपल्या प्रेयसी वा पत्नीसाठी खास वेगळी नि अंतरंगात प्रवेश करणारी श्वासांची वाट कवींनी राखून ठेवलेली आहे. 'एखाद्या शब्दावर' ही कविता म्हणजे एक सुंदर काव्यशिल्प आहे.

'कुठे शिकलीस असे', 'चार चौघात न कधी', 'शब्द जातात विरून', 'निस्सीम', 'वाट वाहती मोडून' इत्यादी अष्टाक्षरीतून प्रसादाची रोपण होताना दिसते, 'तपशील', 'श्रीकार', 'अक्षुण्ण', 'सोहळा', 'चिरतरुण', 'खडे' इ. कवितांची आशयघनता मनाला जाणवते, तर बालगीतांतून निर्मळ निरागसता प्रगट होते.

'शाप नसता' मधील मनीची घालमेल आणि कर्मयोगाचा निर्धार मनावर परिणाम करून जातो तर 'नाही तुमच्या शस्त्रांनी' मधून त्यांच्या शुद्ध सात्विक मनाची अनोखी अस्मिता दिसून येते. त्यांच्या या काव्याकाशातील अभ्रातून कित्येक सुंदर कलाकृती निर्माण झाल्या आहेत.

तरल, उत्कट–भावनांचा आर्त आविष्कार, सौंदर्यासक्ती, आशयघनता आणि प्रसाद यांचा प्रत्यय पावलोपावली येतो, आणि हे काव्यपुष्प खाली ठेवतांना त्यातील सुगंध बराच काळ मागे रेंगाळत रहातो.

अभ्र– क्र. ब. निकुम्ब, प्रकाशक
नवसाहित्य प्रकाशन, समादेवी रस्ता,
बेळगांव, पृष्ठे ७५ मूल्य– ७ रुपये. ● ●

ग्रंथ परीक्षण –

# तेवत असलेली जीवन ज्योत

कृ. पां. काणे

नागपूरचे एक वयोवृद्ध सामाजिक कार्यकर्ते आणि नगरपालिकेचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. गोपाळराव पाठक यांचे वरील पुस्तकं नुकतेच वाचण्यात आलं. केवळ वस्तुगत भागापुरती या पुस्तकाची तुलना मराठी साहित्यात अतिशय गाजलेल्या 'स्मृतिचित्रे' या कै. लक्ष्मीबाई टिळकांच्या पुस्तकाशी करावीशी वाटते. कारण संघर्ष-कथन, हा या दोन्ही पुस्तकांचा पिंड सारखाच आहे. आणखी एक साम्य. कै. लक्ष्मीबाई टिळक आणि श्री. गोपाळराव पाठक दोघही आपण लेखक नसल्याचं सांगतात ! पण लेखक नसणारी व्यक्ति इतकं चांगलं लिहूं शकते ही एक "न पटणारी गोष्ट" आहे ! मात्र 'स्मृतिचित्रे' आणि "जीवनज्योत" यात इतर कसलंच साम्य नाही ! भाषा आणि व्यक्ति, शैली आणि निवेदन पद्धती या बाबतीत या दोन पुस्तकात कसलेच साम्य नाही. "स्मृतिचित्रांचा" हळुवारपणा आणि या पुस्तकाचा रांगडेपणा चटकन लक्षात येण्याइतका स्पष्ट आहे.

तसंच पाहिलं तर प्रत्येक माणसाच्या आयुष्यात कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाच्या वर्तुळरेषा एकमेकास छेद देऊन गेलेल्या असतातच. सामान्य माणसाच्या कौटुंबिक रेषेनं निर्माण केलेलं वर्तुळ फार मोठं आणि सामाजिक रेषेचं अगदी लहान असतं तर थोर माणसाचं नेमकं याच्या उलट असतं. या पुस्तकात ज्या घटनांचं वर्णन आलेलं आहे त्यावरून पाहाता, नागपूर नगरीपुरतं तरी श्री गोपाळराव पाठकांचं सामाजिक वर्तुळ त्यांच्या कौटुंबिक वर्तुळापेक्षा फार मोठ होतं, असं दिसतं.

"Censure is a tax which man pays for being eminent" आणि "जो लोककल्याण साधावया जाण, घेई शिरी प्राण त्या सौख्य कैचे" हे सत्य गोपाळरावांच्या बाबतीत अेकशेएक टक्के अनुभवास आलेलं दिसतं ! कै. माधवराव जोशी यांचं "स्थानिक स्वराज्य" किंवा "म्युनिसिपालिटी" हे एका काळी अतिशय गाजलेलं नाटक मी पाहिलं तेव्हा त्यातील अतिशयोक्ति रसहानी करण्याइतकी आहे असं मला उगाचच वाटून गेलं होतं. पण श्री. पाठक यांनी व्यक्ति, घटना आणि प्रसंग यांच वर्णन प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारावर दिलं आहे ते वाचून "सत्य हे कल्पनेपेक्षाही अधिक विलक्षण असू शकतं" या विधानाचा प्रत्यय आला.

भर्तृहरीनं माणसांचे चार वर्ग केले आहेत. पण नावं तिघांनाच दिली आहेत. आपलं नुकसान करूनही दुसऱ्याचं भलं करणारा पहिला वर्ग "सत्पुरुषांचा." आपल्या हितावरोबरच दुसऱ्याच हित कटाक्षानं जपणारा निदान स्वहितासाठी दुसऱ्याचं नुकसान न करणारा दुसरा वर्ग "माणसांचा." आपल्या फायद्यासाठी दुसऱ्याच्या हिताची बिनदिक्तपणे होळी करणारा तिसरा वर्ग "राक्षसां"चा. तर स्वतःचा किंवा दुसऱ्याचा कसलाही फायदा नसतांना केवळ द्वेषभावनेने दुसऱ्याचं अकारण नुकसान करणारा चौथा वर्ग–छे ! या वर्गाला त्याला योग्य नाव सुचलंच नाही ! म्हणून, "ते के न जाणीमहे !" असं जाहीर करून त्यात आपली असमर्थतता प्रगट केली आहे !

या वर्गवारीकडे नुसती नजर टाकली (सत्पुरुष, माणूस, राक्षस आणि अनामिक! ) तरी एकंदर माणसात पहिल्या वर्गात वसू शकणारांची, जवळ जवळ दुर्मीळ अशी अगदी थोडी संख्या, दुसऱ्या वर्गात वसू शकणारांची थोडी अधिक संख्या आणि तिसऱ्या वर्गात वसू शकणारांची प्रचंड संख्या आज सगळीकडे आढळून येईल ! चौथ्या अनामिक वर्गात वसणारे लोकही संख्येनं कमी नाहीत ! श्री. पाठक यांच्या नगरसेवा कार्यात त्यांना तिसऱ्या आणि चौथ्या वर्गातील लोक फार भेटले. दुसऱ्या वर्गातील अगदी थोडे तर पहिल्या म्हणजे "सत्पुरुष" वर्गातील प्रायः कुणी नाही, असं दिसतं ! समाजात आढळून येणाऱ्या वर्गवार संख्येच्या प्रमाणाशी

(पुढील मजकूर पान १८३ वर)

# आधुनिक इंग्रजी काव्याची प्रमुख वळणे

एच. व्ही. देशपांडे

सुमारे १९२० नंतरच्या इंग्रजी काव्यामध्ये जी स्थित्यंतरे जितक्या जलद व जाणीवपूर्वकतेने निर्माण झाली तशी ती या पूर्वीच्या काळात क्वचितच झाली असतील. यापूर्वी एकेका प्रकारचे काव्य सुमारे ४०।५० वर्षे टिकून राही. या प्रकारामध्येच प्रगत काव्य निर्माण होई. उदा. रोमँटिसिझममध्ये ब्लेक, बर्नस् यांनी जो पुढाकार घेऊन सौंदर्यवादी काव्याची वाट मोकळी केली ती वर्डस्वर्थ, कोलरिज, शेली, कीटस् बायरन इ. नामवंतांनी सुमारे ५०।६० वर्षे चोखाळली, समृद्ध केली. पण असा प्रकार आधुनिक इंग्रजी काव्याच्या या अलिकडच्या ५० वर्षामध्ये दिसत नाही. प्रत्येक ८–१० वर्षांनी आधुनिक इंग्रजी काव्यामध्ये नवेनवे धुमारे फुललेले दिसतात. काव्यासंबंधीची इतकी विलक्षण जाण, चिकित्सा आणि मर्मग्राही दृष्टी सर्वसामान्यपणे आजपर्यंतच्या काळात एवढ्या सूक्ष्म प्रकारे कधी दिसून आली नाही. याचे एक कारण म्हणजे आधुनिक काळात मानवी जीवनावर खोलवर प्रभाव पाडणाऱ्या अनेक गोष्टी फार झपाट्याने निर्माण झाल्या. डार्विनच्या उत्क्रांतीवादाने ॲडम-इव्हची मानव-निर्मितीची धार्मिक उपपत्ती खोटी ठरविली. औद्योगिक क्रांतीने पूर्वीच्या कृषिप्रधान संस्कृतीने एकदम शहरी व गुंतागुंतीच्या नागरी संस्कृतीमध्ये रुपांतर केले. फ्राईडच्या व जंगच्या मानसशास्त्रीय सिद्धांतांनी पूर्वीच्या नीतीच्या व धर्माच्या कल्पनांवर प्रहार केले. मार्क्सने सामाजिक रचनेच्या भिंती खिळखिळ्या केल्या. दोन महायुद्धांनी मानवी जीवनावर सर्वार्थाने दूरगामी परिणाम केला. या सर्वांचा ठसा आधुनिक इंग्रजी काव्यावर उमटत गेलेला आपणास दिसून येतो

१९०० ते १९२० या काळातील काव्याला 'जार्जियन पोएट्री' असे म्हणतात. या काव्यामध्ये भावनांचा तोच तोच नेमकेपणा होता. या काळातील कविमध्ये सभ्यतेची, प्रतिष्ठेची शेखी मिरविण्याची पद्धत वा टूम होती (cult of respectability) अलिप्तपणा ठेवून लिहिलेल्या या काव्यामध्ये अनुभवांचा प्रामाणिकपणा नव्हता, जीवनाला प्रत्यक्षपणे सामोरे जाण्याची ताकद नव्हती.

१९१६ साली प्रसिद्ध झालेल्या व्हील्स (Wheels) या काव्यसंग्रहाने या पारंपारिक काव्याला थोडा धक्का देण्याचा एक तोकडा प्रयत्न केला- पण त्यातही फारसा जोर नव्हता. इंग्रजी काव्याला जुन्या जोखंडातून सोडवून नवेनवे उन्मेष दाखविण्याची, ते काव्य स्वतंत्र करण्याची आणि त्याला भरारीसाठी एक निश्चित दिशा देण्याची ऐतिहासिक कामगिरी १९१६ चे दरम्यान इंग्लंडमध्ये निर्माण झालेल्या प्रतिमावादी चळवळीने, त्यातही टी. एस्. इलियट सारख्या प्रतिभावान कवींनी केली हे आज मान्य झालेले आहे.

प्रतिमावाद्यांनी इंग्रजी काव्य 'कठीण परंतु स्पष्ट आणि संक्षेपी' केले. (Hard but clear and precise). पूर्वीच्या गैरलागू आत्मनिष्ठेला त्यांचा तीव्र विरोध होता. काही अमेरिकन व इंग्लीश कवींनी ही चळवळ चालू केली. एमी लॉवेल, टी. इ. ह्युम, इलियट, पाऊंड, हिल्डा डू लिटल ही त्यातील काही प्रमुख नावे होत जॉर्जियन कवींच्या फोफशा (Flabby) काव्याच्या विरोधात हे प्रतिमावादी कवी ठामपणे व जाणीवपूर्वक उभे राहिले. पण त्याचवेळी त्यांनी स्वतःची अशी चांगल्या काव्याची कल्पना पुढे मांडली. मुख्य अशी सहा कलमे असलेला नवा जाहीरनामाच प्रतिमावाद्यांनी प्रसिद्ध केला. त्यामध्ये आलेल्या जीवनानुभूतीला काव्यरुप देताना तो अनुभव नेमका जशाच्या तसा वाचकापर्यंत पोहोचण्यासाठी नेमक्या प्रतिमांचा वापर करण्याचा त्यांचा निर्धार महत्त्वाचा होय. त्यामुळेच त्यांना प्रतिमावादी (Imagist) असे संबोधण्यात येते. या चळवळीमुळे काव्याचे तंत्र तर बदललेच परंतु काव्याचे विषय व काव्याकडे पहाण्याची दृष्टि ही बदलून गेली. इलियटच्या West land सारख्या काव्यामधून आधुनिक जगातील समस्या, मानसिक गुंतागुंत, अन्याय, बेचैनी इ. सर्वांचा अत्यंत नेमकेपणाने थोडक्यात पण, प्रभावी अविष्कार झालेला आहे. आधुनिक संस्कृतीला तो

Broken joy of the Kingdom म्हणतो. प्रतिमावादी कवींच्या मते कविता ही एक अनेक प्रतिमांची मालिकाच असते. कित्येकदा शेजारच्या दोन प्रतिमांचा एकमेकींशी तसा काही संबंध असतोच असे नाही. परंतु स्वतंत्र आशय असलेल्या अनेक प्रतिमांच्या मालिकेचा सर्व मिळून एक सर्वसामान्य आशय चित्तवृत्ती (mood) असतो. आणि तोच त्या कवितेचा मूलभूत घटक होय.

ख्रिश्चानिटी, आधुनिक औद्योगिक शहर, युरोपीय इतिहासाची पार्श्वभूमी या नव्या विषयांवर इलियटने काव्यनिर्मिती केली आणि व्याजोक्ति, उपहास, बुद्धिनिष्ठ कल्पक विनोद यांच्या सहाय्याने त्याने काव्यात नवचैतन्य आणले. इलियटच्या प्रभावामुळे इंग्रजी काव्य क्लिष्ट बनले. थोडया लोकाचीच ती एक मिरासदारी होऊन बसली. दुर्बोधता त्यामध्ये प्रामुख्याने आली. या गोष्टी खऱ्या असल्या तरी काव्याची झेप उंचावली, विषय बदलले, मार्मिकता वाढली आणि ते सूक्ष्म बनले हेही मान्य करावयास हवे.

इलियटच्या किंवा प्रतिमावाद्यांच्या काव्यातील काही ठळक दोषामुळे विशेषतः त्यातील आत्यंतिक बुद्धिनिष्ठतेमुळे, वैचारिकतेमुळे व दुर्बोधतेमुळे लवकरच म्हणजे १९२८–३० चे दरम्यान या काव्याच्या विरोधी मोहीम उघडली गेली. इलियटने स्वतःची भूमिका पुढील शब्दात व्यक्त केली होती.

We can only say that it appears likely that poets in our civilization, as it exists at present, must be difficult. Our civilization comprehends great variety and complexity, and this variety and complexity playing upon a refined sensibility, must produce various and complex results. The poet must become more and more complex . . . allusive . . . indirect in order to force, to dislocate it necessary, language into this meening. परंतू गुंतागुंतीच्या समाजामध्ये गुंतागुंतीचे काव्यच निर्माण झाले पाहिजे असे कुठे आहे ? असा प्रश्न विचारणारे नवे कवी निर्माण होऊ लागले. व्हिक्टोरिया राणीच्या गुंतागुंतीच्या समाजामध्ये असे कठीण काव्य कसे निर्माण झाले नाही ? असाही त्यांनी सवाल टाकला. सुमारे १९३२ चे दरम्यान इलियटच्या काव्याचे अनुकरण झपाट्याने मावळून गेले. डब्लू. एच्. अडेन्, स्पेन्डर, डेलेव्हीस इ. नव्या कवींनी इंग्रजी काव्याला एक वेगळेच वळण दिले. मायकेल रॉबर्टस्ने इलियटच्या भूमिकेला पुढील उत्तर दिले:—'The solution of too insistent problems may make it possible to write 'popular' poetry again . . .' या नवीन चळवळीमध्येच अडेन् हा अग्रेसर कवि होता. त्याचा इतरांवरही बराच प्रभाव पडलेला होता, या नव्या कवींच्या समुहाने जाणीवेची कविता निर्माण केली. त्यांच्या या प्रकारच्या काव्याला 'सोशल पोएट्री' असे म्हणतात. अडेन ने तर कवी हा थोडासा 'रिपोर्टर' ही असला पाहिजे असे विनोदाने म्हटले आहे. काही वेळा या काव्यातील विषय अगदी प्रत्यक्षपणे राजकीय असे. या नव्या सामाजिक कविंना आपली कविता रसिक मान्य होईल याची पूर्ण खात्री होती. कारण त्यांचे विचार, कल्पना, भावना, भाषा, त्यांच्या प्रतिमा या प्रत्यक्ष समाजाच्या विश्लेपणातून, पृथक्करणातून घेतलेल्या होत्या. इलियटची विविधता व गुंतागुंत (variety and complexity) या सामाजिक कवींनी जाणीवपूर्वक कमी करीत आणली आणि त्याचे रुपांतर काही स्पष्ट अशा सामाजिक समस्यांमध्ये केले. या कविंच्या काव्यात सामाजिक जाणीवेचा केवढा प्रभाव होता हे ॲडेनच्या law like love या छोटयाशा कवितेतही दिसून येते. कायदा आणि प्रेम यांच्या तुलनेमध्ये कायद्याविषयी तो म्हणतो.

Like love we don't know where or why
Like love we can't compel or fly
Like love we often weep
Like love we seldom keep.

कायद्याचे हे प्रेमाशी सांगड घालून केलेले वर्णन फार मर्मग्राही आहे. अशा प्रकारे सोप्या भाषेमध्ये प्रतिमांचे फारसे अवडंबर न मांडता उत्कट सामाजिक जाणीव व्यक्त करणारे काव्य इंग्रजी रसिकांना थोडाकाळ का होईना पण मोहिनी घालणारे व आकर्षक वाटले. या काळातील प्रतिमा कित्येकदा मशीनरी, झोपडपट्या, (slums) इ. सामाजिक विपन्नतेच्या गोष्टीमधून निवडलेल्या आढळतात. या कविंनी मानसशास्त्र आणि डाव्या राजकारणामध्ये या सामाजिक वैफल्यांवरील उपायांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. स्वतःची प्रगती आणि समाजाची जाणीव या दोन टोकांमध्ये सापडलेल्या माणसाचे चित्र या काव्यात प्रभावीपणे रेखाटलेले दिसते. मार्क्सचाही या काव्यावर

झालेला परिणाम दिसून येतो.

परंतु १९४० नंतरच्या काळात या सामाजिक काव्याविरुद्धही एक चळवळ उभी राहिली. या चळवळीमध्ये सामाजिक रिपोर्टिंग विरोधी व व्यक्तिगत प्रगतीला पूरक अशा कल्पनांचा प्रभाव होता. १९३९ मध्ये नवकवींचा एक समूह या नव्या विचारांनी एकत्र आला. ते स्वत:ला 'न्यू अपोकॅलिप्स' म्हणत असत.

बायबलमधील शेवटच्या भागामध्ये सेंट ज्योनला जे दैवी शक्तीचे ज्ञान झाले त्याला 'अपोकॅलिप्स' म्हणतात. त्यावरूनच या कवीलोकांनी स्वत:ला 'ॲपोकॅलिप्स' असे नाव घेतले. डिलॅन थॉमस हा त्यांचा नेता होता तसेच बार्कर इ. या पंथातील कवी हर्बर्ट रीडच्या विचारांनी भारलेले होते. या नव्या कवींनी नव्या रोमॅंटिक किंवा सौंदर्यवादी प्रकारची कविता लिहिली आणि इंग्लंडच्या सांस्कृतिक हवेत बराच बदल घडवून आणला. या कवींना मशीन, वैफल्य इ. नित्याच्या गोष्टींचा मनस्वी तिटकारा होता. ते अधिक व्यक्तिवादी होते. म्हणूनच आत्यंतिक समाजिकतेविरुद्ध इंग्रजी काव्यात त्यांनी चळवळ उभारली.

या व्यक्तित्ववादी चळवळीने—दैवी सामर्थ्यावर विश्वास ठेवणाऱ्या चळवळीचे लोक अशा प्रकारच्या विचारांकडे कसे गेले हे पहाणे इष्ट ठरेल. दुसऱ्या महायुद्धातील मिलीटरी शक्ती, नोकरशाही रशियन परराष्ट्रीय धोरण, हिरोशिमावरील बाँबचा प्रयोग, प्रचारकी घोषणांचा आलेला तिटकारा या सर्वांच्या कोलाहलमध्ये राजकीय आशावाद बालिश वाटू लागला. इ. एम् फोस्टरच्या कादंबऱ्या सर्वत्र आवडीने वाचू जाऊ लागल्या; आणि हा नवा मानवतावादी दृष्टिकोन निर्माण होऊन पुन्हा परमेश्वराच्या शक्तीवर विश्वास ठेवणारा सामान्य माणूस तयार झाला. या सर्वातूनच ही नवी ॲपोकॅलिप्सची चळवळ निर्माण झाली. जीवनातील निराशा, चांगल्याचा, न्यायाचा पराभव, वाईटाचा विजय, शारीरीक दु:ख, मानसिक छळ, पापाचा वाढता प्रभाव; दुसऱ्या महायुद्धातील या सर्व गोष्टींचा युरोपिय समाजावर फार मोठा परिणाम झाला. आणि म्हणून काही नवे कवी इलियटच्या ख्रिश्चानिटीकडे पुन्हा वळू लागले. त्याच्या (Four Quartets) या काव्याचा अधिक जाणीवपूर्वक अभ्यास होऊ लागला. या धार्मिक सद्भावना व सामाजिक बंधुभाव याची तीव्र जाणीव लोकांना होऊ लागली.

अशा प्रकारे इलियटच्या विचारांपासून काही काळ दूर गेलेली इंग्रजी कविता पुन्हा इलियटच्या विचारांजवळ येऊन ठेपली. अर्थातच इलियटचे तंत्र मात्र पुन्हा महत्त्व पावू शकले नाहीं. अशा प्रकारे जॉर्जियन काव्याकडून प्रतिमावादी काव्याकडे, प्रतिमावादी काव्याकडून सामाजिक आशयप्रधान काव्याकडे आणि तेथून ॲपोकॅलिप्स काव्याकडे अशी विविध वळणे घेत इंग्रजी काव्याची वाटचाल चालू आहे. १९५० नंतरची कविता कसकशी पुढे जात राहिली हे आत्ताच पहाणे धाडसाचे ठरेल. १९५० नंतरची इंग्रजी कविता समीक्षेच्या दृष्टीने फार जवळची आणि तरीही फार अस्पष्ट आहे. परंतु विचारांच्या दृष्टीने इलियट ते इलियट हा इंग्रजी काव्याचा प्रवास पहाणे हा एक चित्तवेधक अनुभव आहे हे निर्विवाद होय.

# शहादत्त कलमा

भाऊ मांडवकर

महाराष्ट्रात महानुभाव पंथासारखाच 'आनंद पंथ' काही शतकापासून चालत आला आहे. संत श्री. गुलाबराव महाराजांनी या पंथाबद्दल एक टिपण लिहिले आहे. या पंथाच्या बऱ्याच पोथ्या असून त्या अजून प्रकाशात आल्या नाहीत. 'आजरामर सिद्धान्ता'वर मी मागे एक लेख लिहिला होता. श्री. रा. चिं. ढेरे यांच्या ग्रंथातून मधून मधून या पंथाची माहिती आली आहे. 'शहादत्त' प्रभूला हा पंथ मानतो. इस्लामी आक्रमणाच्या काळात समन्वायक भूमिकेवर हा पंथ कार्यप्रवण असावा, असे वाटते.

या पंथातील एक लहानशी पोथी कळंव येथील कै. रामजी सारडे यांच्या दत्तपूजेत आढळली. ती मला त्यांच्या चिरंजीवांनी दिली. ग्रंथाचे नाव 'शहादत्त कलमा' असे असून हिच्या आणखी प्रति उपलब्ध होऊ शकतात. मला उपलब्ध झालेल्या पोथीत क्वचित काही जागी अक्षरे लागत नसली तरी पोथी स्पष्ट व बाळबोध लिपीत सुंदर अक्षरात लिहिली आहे इस्लाम धर्म-तत्त्वांवरील श्रद्धेचा पुनरुच्चार 'कलमा पढून' इस्लाम लोक करतात. आनंद पंथाच्या 'शहादत्त' दैवताच्या स्मरणार्थ लिहिलेल्या या 'कलमा' हिंदी–उर्दू–मराठी अशा विविध स्वरुपी दिसतात. ती संपूर्ण पोथीच येथे देत आहे.

## ॥ शहादत्त कलमा ॥

॥ श्री सद्गुरुवेनम: ॥ अथ शहादत्त कलमा लिख्यते ॥

धूप ज्याहां रुप देव ज्यांहां पुज्या
पुजु देव दत्त प्रभू और नहीं दुज्या
शहादत्त देवा तु सदा सावधान
मी तुझा अंश म्हणवितो थान मान
तु आगम अगोचर निर्गुण निराकार
तुम रुप न रेखा अंत न पारू
तेथे मी वापुडा केन्हडी तुझी स्तुती करू
तुझे रूप पाहता पांगुळली मन वुद्धि
चित्त चैतंन्या लागली तुझी शुद्धि
माहामाया हारपली तुजमधी
द्वैत नाही तेथे भेद कैचा
पारापार ताहां शब्द कैचा
नांद नाही तेथे विंद कैचा
लखलखाट तेज तेथे सूर्य कैचा
विवसी चैतन्य तहां अग्न कैसा
भानु लोपे तहां उदोअस्त कैचा
स्वरुपस्वामी भोजलिंगाचा प्रसाद लाधला
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥१॥

दुर्ग दुलिचा आगास चंवु
ज्याहा चंद्रसुरज चिराग साजे
ज्याहा इंद्र पाणी भरे वेद भाटो करे
आकार निराकार और पाछाया करे
घुमेका कोट वायोका गोला
कहे वैज नान्ही
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥२॥

अमृताचा कंद मृत्यूलोकी उभविला
अगाध सर्वेश्वरू मायावेश धरियेला
चोहो युगाप्रति प्रभुधनी निष्कलंक आपण आला
तामसी नाही कोणी आपी आप एकला
काश्मिरिचे लिंग दिसतसे निर्मळ
ज्यावरी ठेविलेयासारिखे दिसतसे सुढाय
भितर वाहिर एक जोति वरिवरिहाकति किरळ
अनंत रंगाचा तो एक आरंग यालागि
सोन्याचा देव सोन्याची पेटी
सोन्याचे कुलूप माल्गी अर्हेनिशी
भितर पुजू की वाहिर पुजू की पूजू कुलूपासी
तु मज पाहतोसी मी तुज पाहतो
पुजितोसी कवणासी
तु माझे दर्पण मी तुझे दर्पण
दुसरे न्याहाळीता वेद भांवाविले
वोवडी पडिली चौंयासी सिद्ध
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥३॥

चारो जुगमे कलजुग सार
शहादत्त प्यारा शहादत्त अवतार
उमटती महंमद की लेख वरा
करेंगे सो जितेंगे
नज्जर अव्वल तख्त निराकार
चारो वाजार पैदा किये
चारो वाजार म्याने आय खडे शहादत्त अवतार
अनन्त लक्षेन सर्वेश्वर
आप हय्यात किन्ने पाई
चांद सुरजकु ज्योती किन्ने ल्याई
रातदिन किसकी कमाई
निला छत्र शहाशीर पातशाही
जले पतंगा जलमरे चारो देश भस्म उडे
ओज न पडे संपुष्ठमे सो कडे
न छुडावे न्याजी शहादत्त छुडावे
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ ४ ॥

आखरी जम्मा उतरे है उतरेंगे शहादत्त
जमीं तख्त आसमान गुम्मज
नवलाख हिरे मंडप दिया जडित मेघडंवर
अव्वल आखरके साहेव धनी सिद्ध और साधक
पीर और पैगंवर
आफतावे गिरी सीर निला छत्त निली चुनडी
सुहावे आप हय्याद के कारणे पवन चोपदार
नवनाथ सोला सिद्ध कौरव पांडव के तोडेंगे दंत
उमराव आवुवेकार उसमान दाउद पंजतन पाक
झाडा लेवेंगे ज्याहां ताहां मुलतान महंमद
ज्योगी और संन्यासी नाशंगे पाताल
भट्ट और ब्राम्हण जोशी इनोकी काढेंगे खाल
छपनिक श्रावक भगेंगे माहात्माके दल
खुरदलमे जायेंगे मक्के शहर
दवलतावाद व्हा मक्के उतरेंगे,
मर्द आगे लेना मानिक पीठसे लेना हव्वद
ज्याहा ताहा सुलतान महंमद गलेतोख लेखनी
वाधेंगे
मसिद तावेकी जमीं फत्तरके कोलसे होवेंगे
हाडनका सुरमा होवेंगा
कलि बैठे पिछे शहादत्त
हात न जीवनके फासे
आताल पाताल संगजाल
तांवेकी जमीं आसमान होवेंगे लाल

पनपानीखी काढेंगे खाल
समरस कुहर महंकाल
विजल्याका हिसाव होवेंगा
आदली दिवान उतरेंगे
समरी कैफियेत ल्यावेंगे धनी उतरेंगे
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ ५ ॥

कवनेविन वे प्रभुकु जिधर देखे उधर तू
तु साहेव गनिमत न्यारा
जिधर देखे उधर तु सारा
सारी मोहव्वत सत्तर हजार
जितना जीव उतना प्यार
प्यार मोहव्वत तो करे
सातो भेस्तो आगे धरे
भेस्तोम्याने वडि न्यामत
मुरशद मिले तो आवे हात
मुरशदविना तालिम क्या करे
आखो झ्यापडी ओंधा फिरे
मुरशद तालिम तो करे
खुलासा खोलकर आगे धरे
तो दिन सारा उजियाला पडे ।
कहे प्रभु वो पुरूष दुनियामे तेर
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ ६ ॥

संकल्प करे विकल्प धरे
सो भवसागरमे डुव डुव मरे
भवसागरमेसे कौन काढेगा
फट मन मर्कट
जीव वुद्धि कपट
कवनपे टाले अव तरेगा
घोरांदर वडा अघोर
सव जीव जंतु आय घेरेगा
आया ऊत जमका तो ओंधा उलटा मारेगा
भवसागरका अथाक जोर
कवन तारू तारेगा
फुटापेटा कंवर खाल
झुटा क्यों अव तरेगा
भवसागरमे आते जाते
गोते खाते गणिकापूत किसे पुकारेगा
न पछाने वाप वडा पाप
विना सद्‌गुरू कवन तारेगा

भवसागरमे आते ज्योत गुचक्गा खाते डुवेगा
आया कहासे हैं कौन काहा ज्यावेगा
तपास कर खवर धर
नहि तो फेर पछतावेगा
आपतेपर सवल्यापर वेसुमार मुक्काम पावेगा
सच्या मुरशद मिलेगा तो हात आवेगा
नही तो खाली ज्यावेगा
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ ७ ॥

जमीं असमान पाताल
जधा न थे तिनो ताल
आकार निराकार ये दोनो न थे
तधा कौन मूल कौन डाल
न था पंचतत्यका मेला
शुन्य निर्शुन्य ये दोनो न थे
तधा कौन कौन गुरू कौन चेला
न थे जुग प्यार न था पुन्य और पाप
अलख अपरंपार ये दोनो न थे
तधा कौन मा और वाप
अर्वुज निर्वुज घुम घुमकार
न था चौथा करतार
जमीं असमान कीस वाट निपजा
इसीका कहे दे विचार
शहादत्त कलमा हरदम करे
फिर तीतसविक ध्यान विसरे
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ ८ ॥

अवधी नजर उलटी कर
एक साहेव सवलापर
करण कर दोनो समाये
अमर ताहा उन्मत्त पाये
अमर अमर स्मरत प्रभु
स्मरत सोना होये
हातो लिजे त सवी तो
तप सालिम होवे
दिल दर्याव की खवर न वुझे
तो भेस्त क्योंकर हुवे
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ ९ ॥

मनमे मसीद मनमे मक्का
मनकी ज्यारज ज्याना
मनमे निमाज मनमे रोजे
मनमे जिकिर करना
ये मन जिन्ने जी मुंडाया
उन्ने आपकु पहिच्याना
मनके फेरे आल्लम फिरे
मनोमन समाना
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ १० ॥

ईस तन म्याने खुदा ताला
आखर तन छोड निरयाला
हय कोई वस्तादोका चेला
उस फाम तनकु खाली न कहेना
तनमो खलक धुंड कर लेना
निमाज गुज्यारतको जिन्ने ज्याना
हर दाईम जिसको आलम कहते खुदा
वो तो तन म्याने अलाहिया
वेद कितावका धंदा ल्याया नेम
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ ११ ॥

खुदा हाजरकु हुजूर
खुदा गाफलकु दूर
तेरे उमेदके करार
कुल आल्लम हम
कोई दिलोका भाई दिवाना
उन्ने आपसकु भाई पहेच्याना
वाह विन आखोका देखना
ईलाही वीन जुव्वा पढना कलमा प्यारे
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ १२ ॥

ईस तन म्याने खुदा ताला
अल्ला सव रंग से निर्याला
उसने कहेना काला पिला हरा उजियाला
अल्ला सव रंगसे निर्याला
आल्लमपणा तेरा तू अकेला
अल्ला सव रंगसे निर्याला
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ १३ ॥

जहां देखुं तहा तूही खाली
ठौर कहू नही मैं धुंडताव तेरे तोंई तोई
अल्ला तू साहेव अव्वलका
तेरे हातो पैदा मक्का
तेर दिदारका भुका लागी प्यार
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ १४ ॥

अल्ला जमी आसमान सारा
किन्ने अंत नही पाया तेरा
तनोमे तनसो न्यारा
न्यारा फुलमे वास
अल्ला तू साहेब अव्वलका
तेरे हातो पैंदा मक्का
तेरे दिदारका मे भुका लागी प्यार
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ १५ ॥

अहेताव महेताव दोनो तारे
तेरे हातोके सिघारे
हर हुकूम देते फेरे
रातदिन साहेब दिल दर्याव तु माहामुर
जमीं असमान तेरी लहर
दस्त पजास सीर
तेरे उम्मेदके करार
कुल आल्लम मेरे
दस्तादोने यीं बतलाया फंद
अल्ला सब सिद्धोका सिद्धो
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ १६ ॥

मुसलमानोकु किताबा भाई हिंदूको देते वेद
अल्ला सब सिद्धोका सिद्ध
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ १७ ॥

अव्वल कलमा अल्ला एक
व्हासे हुआ महंमद देख
मिळा महंमद तुटी दुई
न्यामुजकु किया सही
इलिल्ला सु जोटा मन
जीव तेमुबा छुटा तन
होकर रहच ऐनज्यात
व्हा ना देखु दीनरात
बाहेर भीतर एक रब्ब
उसे ना विसरू कब्ब
अल्लाके घर हंमारा रहेना
व्हासु गुजारा आनाज्याना
अल्ला मुक्काम पाया हैं
व्हासु दुनिया फाना तमाम ये
एक अल्ला दुज्या नही
दुज्या पंज्या सो समज्यां मही
अवजुद मे सुमवजुद आया
अवजुद मवजुद दोनो समाया
अवजुद मवजुद दोनो एक
पींर परमादे परत छ देख
ऐसा पीर मिले साच्या
पढना गुणणा खुंटी वाच्या
यक वन ज्याने नव तो भाई
बुझे सो विरला कोई
अवजुद मवजुद कुच मुक्काम
लेते तो पास करो फाम
शहादत्त अल्लमा प्रभुकी खुदरत ॥ १८ ॥

गगनी लखलखाट विजेचा
ओळला मेघ पाये पखाळे
सवे लिते ढग
भरले चेपे सरोवर मग खुंटले मार्ग
शहादत्त नाम अभंगी चहुयुगाभीतरी
नांदेजत आणि सत अखया जंबुद्वीप गर्जेत
अलक्ष अपरंपार तयाचा न कळे अंत
कुदरतचे दिवान धनी शहादत्त
पण चंद्रसूर्यासारखी दिपमाळा
प नी याची कोठे आहे कळा
धरती आकाशाचा कोठे आहे जिव्हाळा
हे खुन जाने एखादा विरळा
लवन जिवन पवन पांगुळा
तयामाजी मेघ सावळा
कवने घरी खेळे जिवनकळा
शहादत्त आल्लमा प्रभु इतुक्याहुनी वेगळा
पावे तो परामर्थ अवधुत धर्म तो निश्चळ
देव तो शहादत्त और सब कीर्तन
कहिया द्वैव ना अद्वैत
त्रिगुनारहित अतीता
अतित पंथाहि वेगळा
शहादत्त अल्लमा प्रभूकी कुदरत ॥ १९ ॥

॥ इति श्री शहादत्त कलमा संपूर्णमस्तु ॥छं॥

हस्ताक्षर जनार्दन नारायेण जोगी राहानार
• तळेगाव शामजीपंताचे कळंवास लिहिले असे
.... भाद्रपद शुद्ध पोरनिमा रोज बुधवार
सन १३१५ साल फसली हे पुस्तक जगन्नाथ
विश्वनाथ धोबे पाटील यास दत्तप्रसाद
दिला असे ● ●

# जाणीव...

मंदा विजय टेंबे

कवी 'पारिजात' तथा प्रा. कृ. वा. कर्णिक एका हाताने कोटीचा कॉलर घट्ट पकडीत आपल्याच तंद्रीत रस्त्याने चालले होते. एखादा पोक्तमा ढग वाऱ्याने साव-काश ढकलला जावा तसे–सायकलची वेल घणघण वाजली. समोरून येणारा सायकलवाला एकाद्या वेड्या-कडं पहावं तसं चमत्कारिक पहात झपाटचानं निघून गेला. अेक काळीभोर अँबेसॅडर त्यांना घासपटून गेली ब्रेक खर्रकन् दावले गेले. वहानास वाट करून देण्यासाठी पारिजात बाजूस सरकले पण वहान थांबले होते अन् खाडकन् दरवाजा अुघडून अेक रूबाबदार तरुण बाहेर आला.

"सर, तुम्ही ! ओळखलं कां मला ? '

पारिजात बावळट चेहऱ्याने त्याच्याकडे व त्याच्या कोऱ्या गाडीकडे पहातच राहिले. तो पुढे म्हणाला "मी एस्. व्ही. तांबे तुमच्या हाताखाली बी. ए. होऊन वकील झालो. नुकताच आलो आहे येथे ! सर, गाडींत बसा. तुम्हाला कोठे सोडू ?" तांबेचा स्वर आदरानें चिंब भिजला होता. पारिजातना नाही म्हणवेना. ते गाडीत वळेवळेच बसले. ओशाळवाणे मागच्या बाजूला टेकाय-चेही विसरले. गाडी स्टार्ट करीत तांबे म्हणाला "सर, अगदी अॅट इज वसा ! तांबेनी गाडी सुसाट चालू केली. गाडी चालवता चालवता तो उत्साहाने बोलत होता वाऱ्याच्या अन् गाडीच्या वेगात पारिजातना ते नीटसं अैकूही येत नव्हतं. अचानक पारिजात ओरडले "मि. तांबे थांबा–थांबा. इथंच सोडा मला. समुद्रावर जायचंय मला !" तांबेनी हंसत गाडी थांबवली. नमस्कार करून, आपल्या बंगल्याचा पत्ता सांगून यायचं आमंत्रण देऊन तो निघून गेला.

पारिजात समुद्राच्या दिशेने आपल्या संथ चालीने गर्दीचा लोंढा चुकवीत चालू लागले. समुद्रावरचा खारा वारा तोंडावर सपकारला तेव्हा त्यांना बरं वाटलं. माडाच्या झाडाखाली एका खडकावर ते जाऊन बसले. पायाखालची चुरचुरीत वाळू मावळत्या सूर्यकिरणांत अभ्रकासारखी कणाकणांनी चमकत होती. जवळच अेका मारवेलाने आपला पसारा पसरला होता. नाजूक हरळी आहोटीच्या नक्षीला छेदीत होती. मारल आणि हरळी अेकमेकाला एकदा बिलगून आपआपल्या मार्गाने पुढं निघाली होती समांतरच्या नात्याने ! अेक घंटेच्या आकाराचं जांभळं फूल मिटू पाहणाऱ्या हिरव्या द्विदलांत मान तिरपं करून हंसत होते. दूरवर अेका खडकावर लाटा पुढं येऊन फुटत होत्या, पुनः पुनः पांढऱ्या शुभ्र तुषारांचा मोतीचूर हवेत अुधळीत होत्या. वाळूंत शंख-शिपले कसेही अस्ताव्यस्त पडले होते. कांही रिते, कांही मिटलेले–काही सताड अुघडे. पारिजात हे सारं पहात होते. त्यांना सारं दिसत होतं पण शब्दात साकार होत नव्हतं पूर्वी त्याच खडकांवर हीच दृष्ये कितीवेळा शब्दांत गुंफली होती पण आज शब्दच अपुरे पडत होते. खऱ्या शब्दाची जरुरच नाही शब्दाच्या भूमितींत निसर्गाची· निसर्गाला उसळी पकडता येत नाही याची आज त्यांना नव्याने जाणीव झाली होती. खरं म्हणजे आज त्यांचं मन पूर्ण प्रसन्न असायला हवं होतं. काव्याची कारंजी थुईथुई नाचायला हवी होती पण आज आकाश भरून यावं अन् पाऊस पडूच नये, असं कांहीस झालं होतं. आज २१ वर्षे उपेक्षीला गेलेला, विद्यार्थीवर्गात चेष्टेचा विषय झालेला अेक फालतू प्राध्यापक व वेडा कवी सेवानिवृत्त होतांना सत्कारपात्र झाला होता. साऱ्या महाविद्यालयाने केवढा सोहळा केला होता. पुष्पगुच्छ काय! हार काय! भाषणे काय ! एका प्राध्यापकांनी तर त्यांना उदारपणे महाविद्यालयाचा 'कोहिनूर' म्हणून पदवी दिली होती. पारिजातना वाटलं ओरडून विचारावं, "अरे हे चाललय काय ?" ते अगदी हाराखाली अन् फुलांच्या भाराखाली गुदमरून गेले होते. सत्काराला उत्तर देतांना त्यांच्या-कडून शब्दही फुटेना. डोळे डबडबले. ओठ थरथरले. ते आपले स्तब्ध अुभे राहिले. समोर चेहेऱ्यांचा समुद्र ! सारे चेहेरे अनोळखी वाटले. एकादं परदेशी तारू किना-ऱ्याला लागावं अन् मुशाफिऱ्याला किनाऱ्यावरच्या लोकांची ओळख पटू नये तसं. ते हात जोडून उभे राहिले.

अन् निमिषार्धात तसेच खाली बसले. टाळ्यांचा कडकडाट झाला. टेबलावर त्यांच्या प्रसिद्ध काव्यसंग्रहांची चवड रचली होती. अनेकांनी कुतुहलाने त्या ग्रंथांना स्पर्श केला. कॉफीपान व अल्पोपहार आटोपल्यावर सर्वजण घरी परतले अन् कवी पारिजातही. क्षणापूर्वी गजबजलेली इमारत एकदम शून्य झाली. सकाळी पाखरांच्या किलबिलाटाने चैतन्याच्या कोंभानी थरारणारी विद्युत तार पाखरे उडून जाताच पोरकी व्हावी तशी. त्यांच्या मनात कल्पना आली अन् विरुन गेली. समुद्रावर आज अनेक वर्षे ते नियमाने येत होते. त्यांचा तारुण्याचा बहर माडांच्या अन् सनातन वाळूच्या साक्षीनेच बहरला, अन् आता आयुष्याचा अवघड अुतारही ! उद्या लवकर उठायची घाई नव्हती. पिरियड घ्यायची जरुर नव्हती अन् घरापासून विद्यालयापर्यंतचा रस्ताही तुडवायला नको होता या विचारानं त्यांना खूप बरं वाटलं. याच खडकांवर बसून स्वप्नातल्या काल्पनीक प्रेयसीवर त्यांनी अुत्कट विरही ओळी लिहिल्या होत्या. एकाकीपणाचं दुःख येथेच गुंफलं पण आज सारं काव्यच निरर्थक वाटत होतं अगदी वेडेपणा—ते स्वतःच त्या शब्दाशी ठेचाळले. "पोअेट्री—सब्लिमेटेड आऊटलेट ऑफ फ्रस्ट्रेटेड सेक्स्युॲलिटी" कोणा पाश्चात्य विद्वानाने काव्याची केलेली व्याख्या त्यांना आठवली. याच अुक्तीवर मराठी स्पेशलच्या मुलीबरोबर तासनतास वितंडवाद घातल्याचं त्यांना आठवलं. त्यावेळचा तो जोश हायड्रोजन वायूच्या फुग्यासारखा वरवर जाणारा अन् उत्तुंगात जाताच असह्य तापानी फुटणाऱ्या पॉलिथिनच्या फुग्यासारखा... त्याचं त्यांनाच हसूं आलं. अचानक ते भानावर आले. समोरून दोन किशोरी अेकमेकीला बिलगून चिवचिवत चालल्या होत्या, त्यांनी चित्रविचित्र कुडते व लुंग्या घातल्या होत्या. पोरींनी वेण्या न घालता केस नुसतेच मोकळे सोडले होते मानेवर. आपल्याच नादात त्या चालल्या होत्या. त्यांच्या चालण्यात बोलण्यात जीवनाची ओढ, आसक्ती अन् अुत्साह थुईथुई नाचत होता. त्या पोरी पुढे गेल्या. कोणी अेक कवी पारिजात जवळच्या खडकावर बसलाय हे त्यांच्या गावीही नव्हतं. कवी पारिजातना अुगाचच मिस् मृदुला मानेची आठवण झाली. तलम पांढरे पातळ नेसणारी भावूक डोळ्यांची लांबसडक केसांची मृदुला ते काव्य शिकवताना तल्लीन व्हायची अन् तिच्या पाठोपाठ सुचेता भावे, सुगंधा साठे अन् सुशीला थत्ते..एकामागोमाग नेहेरेच चेहेरे आठवू लागले. बोलके, उत्सुक अन् तृप्त! भावड्या पोरी. सुगंधाच्या लकेरीसारख्या त्यांच्या जीवनात आल्या अन् निघून गेल्या. कोणाची लग्ने झाली कोणी इकडं कोणी तिकडं. चिमण्या इकडं तिकडं पांगाव्या तशा. काव्याच्या शंका विचारताना त्या पोरी विश्रब्ध हरणीसारख्या जवळ यायच्या. त्यांच्याशी वागताना पारिजातांना अेक आगळीच हूरहुर वाटली होती, शेकडो कविता स्फुरल्या होत्या. त्यांच्याविषयी काय वाटलं हे त्यांचं त्यांनाच समजलं नव्हतं. त्यावेळीही अन् आताही ! प्लेटॉनिक लव्ह ! वासनाविरहित अशरिरी प्रेम, या कल्पनेवर त्यांचा पोरवयात विश्वास होता. आता ते सारं बाष्कळ वाटत होतं. सुगंधी काळात कोणी कोणी दिलेली बकुळीची फुले जुन्या डायरीतून काढून पारिजात हुंगीत व धुंद होत.

स्वप्न काय नि काव्य काय सारं असत्यच ! सत्य फक्त एकचं होतं प्रा. कृष्णाजी वामन कणिक आज सेवानिवृत्त झाले होते. अन् आज नेहमीच्या प्रमाणे समुद्रावर नेहमीच्या जागी बसले होते. सूर्य मावळतीला टेकला होता अन् पाखरांचा व्याकुळ जथा क्षितिजावरल्या गूढ झाडीत दिसेनासा होत होता. शिड टर्रर फुगलेलं, एक तारु कुठूनसं अचानक समुद्रात अुमटलं. रस्त्यात एकदम एखादा तांबे टपकावा तसं ..पारिजातानी अलिप्तपणे त्याकडे पाहिलं. पूर्वी टरारून फुगलेल्या त्या शिडाशी आपलं जन्मोजन्मीचं नात वाटायचं पण आता या क्षणाला ते अेक तारु होतं कुठूनतरी आलं होतं, कुठेतरी जाणार होतं. आपला त्याचा अर्थाअर्थी संबंध नाही. त्यांच्या विचाराचं त्यांना आश्चर्य वाटलं. सूर्याचं लाल भगवं पूर्ण बिंब अथांग सागरात बघता बघता बुडून गेलं. पृथ्वीला सर्वात जवळचा असलेला एक तारा आपल्या ठराविक कक्षेत फिरता फिरता मानवी दृष्टीच्या टप्प्यापलिकडे गेला होता इतकच. हाच सूर्य पाहून पूर्वी किती सुंदर कल्पना स्फुरत. क्षितिजाच्या देठावरून टपकन् गळून पडणारं पक्व आम्रफळ. छे ! कल्पनांची नुसती आतषबाजी. भुईनळच्यातून उंच उंच उडणारी निळी स्फुल्लिंगे. क्षणाचा खेळ ! पुनः सारा नथिंगनेस ! सत्य होतं ते फक्त आयुष्याची ओढगस्त. संसाराचे जोखड एकटीने वाहून थकलेली त्यांची बायको वैदेही ! हेच सत्य होतं! वैदेहीची त्यांना आठवण आली अन् एकदम कणव आली. बिचारी ! फकिरासारख्या नवऱ्याची वाट पाहून एव्हाना दमली असेल. बिचारीला काव्य कशाशी खातात हे माहीत नव्हतं. नकळतपणे कवितेचे गुटे कागद ती

शेगडीत जाळून टाकी. अंधारात एकटाच बसणारा नवरा तिला विक्षिप्त आणि माणूसघाणा वाटायचा. पारिजातांना आठवलं. वडिलांच्या इच्छेसाठी वैदेहीला माळ घालून ते मोकळे झाले होते. सहवासोत्तर प्रीतिविवाहाचा वाङमयात पुरस्कार करणाऱ्या पारिजातांना तो कृतीत आणण्याइतका पुरोगामीपणा दाखविण्याचे धैर्य झाले नाही. वडिलांनीच वैदेही पसंत केली. त्यांनाही आवडली होती नंतर. लांब केसांची, सतेज सोनकांतीची, गुलछडीसारखी वैदेही ! त्यांना वाटलं आता संसार म्हणजे फुलबाग ! रोज एकेक कविता ! त्यांच्या जीवनात जिवंत प्रतिभाच आली होती. वैदेहीचं नांवही त्यांनी बदलून प्रतिभा ठेवलं ! पण माहेरच्या नावानेच सारी हाका मारीत. प्रतीभा नाव ताम्हनातल्या तांदूळातच राहिलं ! त्यांनी तिला कधी हाक मारलीच नाही.

आज झालेला त्यांचा सत्कार तिच्या गावीही नसेल. उद्या एखाद्या स्थानीक दैनिकात तो छापून आला तरी ते दैनीक उघडून वैदेही पाहील अशी शक्यता नव्हती. तिला त्यांचं कवीमन कधीच कळलं नाही, अगदीच बाळबोध वळणाची ती ! सासूसासऱ्यांची सेवा, मूलमूल त्यापलिकडे तिची धाव गेली नाही. तिने सैल वेणी घालावी व आपण चाफा माळावा ही इच्छा सुद्धा त्यांची मनात राहिली. तिचा घट्ट अंबाडा पाहून त्यांच्या घशात आवंढा यायचा. त्या मृदुला मानेसारखे तिने पाचवारी नेसावं असं त्यांना वाटे पण ही आपली काठपदराचे रास्ते आवळून नेसायची. एकदोनदा त्यांनी तिला सांगितलं पण सासूबाईंच्या इच्छेविरुद्ध वागून नवऱ्याची इच्छा पूर्ण करण्याइतकी ती पुढारलेली नव्हती. साताजन्माच्या सहचरीबरोबर निसर्गाचा आस्वाद घेत, संध्याकाळी मनमोकळे फिरणेही कधी झाले नाही. एकापाठोपाठ तीन कन्या रत्ने झाली, यापेक्षा गेल्या पंचवीस वर्षांच्या संसाराचा अर्थ त्यांना जाणवला नाही. मुलींना खूप शिकवावे असं वाटले पण वैदेहीने सोळावं लागताच, माहेरच्या सल्ल्याने साऱ्यांना उजवून टाकले. पारिजातांच्या तीन आकडी पगारांत वैदेही असुखी होती. घरातल्या कार्यांना काढलेल्या कर्जांचे हप्ते दरमहा जात होते. वैदेहीने आपल्याला जाणून घेतले नाही. आपण तरी तिला कुठं समजून घेतली ? स्त्रीसुलभ अशी कोणती इच्छा पूर्ण केली तिची ? मंगळसूत्राच्या वाट्यांशिवाय गुंजभर सोनंदेखिल घातलं नाही. आपण मंड्यातून नीट भाजी सुद्धा आणू शकलेलो नाही. वंदी नोट देऊन सुटे पैसे घ्यायला विसरणारा व्यवहारशून्य नवरा यापेक्षा काय किंमत असणार ? कधी मुलींना स्थळे पाहिली की कधी नियमाने जमाखर्च लिहीला की कधी किराणा माल आणून दिला तिला. खऱ्या अर्थाने आपल्याला संसार आहे हे ते विसरलेच होते ! सदाकदा एकांताची ऊब ! अंडी उबवीत खुडूक बसलेल्या एखाद्या उदास कोंबडीसारखे ! आपण पंचवीस वर्षे स्वतःचे दुःख उबवीत स्वतःच्या व्यथा कुरवाळीत बसलो ! कधीही तिच्या मनाचा विचार केला नाही. आज प्रथमच वैदेहीला जाणून घेण्याचा प्रयत्न केला त्यांनी. उद्यापासून सेवानिवृत्त होणार या घटनेने ते थोडेफार हळवे झाले म्हणून तर हे घडले नसेल ?. . .विचार करता करता ते भानावर आले. खडकावरून सोडलेल्या त्यांच्या तळव्यांना गार स्पर्श झाला. एक भरतीची लाट चूळूक चूळूक करीत त्यांची पावले धूत होती. लाटेच्या त्या स्पर्शाने ते आतबाहेर उचंबळून आले.

सारा किनारा निर्मनुष्य झाला होता. सत्कारानंतरच्या त्या हॉलसारखा ! ते उठले. भेळीच्या गाड्या किणकिणत घराकडे जात होत्या, एक कावळा काव काव करीत एकटाच रंगहीन अवकाशाला छेदून जात होता. बिचारा आपल्या जथ्यातून एकटाच चुकून कसा मागे राहिला ? पश्चिमेकडे सारे करडे क्षीतिज ! रंगसुद्धा निवून गेले होते. ती पांखरे, ते रंग ! त्या मघाच्या किशोरी, ते भेळवाले सारे सारे माघारी परतले होते. घरट्याच्या ओढीने ! पारिजातानाही आता घरट्याकडे जायला हवे होते, ओढ नसली तरी ! कपड्यांना चिकटलेली वाळू त्यांनी हातांनी झटकली अन् हळूहळू पाय ओढीत वाळूतून चालू लागले. वाळूतील पावले भरतीच्या लाटा थोड्या वेळाने पुसून टाकतील. कसलीही खूण मागे न ठेवता ! ह्या विचाराने ते व्याकूळ झाले.

घरासमोर आले ! घराचे दार ढकलून ते आत आले. त्यांची चाहूल लागताच वैदेही बाहेर आली. तिच्याकडे न बघतां, तिच्या पावलांच्या नुसत्या आवाजावरून ती रागावली होती हे त्यांना कळले. त्यांच्या अवताराकडे पहात ती म्हणाली 'हे काय ! भाजीची पिशवी कुठाय ?' 'अं अं' करीत पारिजातांनी कोटाचे खिसे चाचपले. आता त्यांना आठवले. वैदेहीने रुपयाची नोट आणि पिशवी बरोबर दिली होती व तीनतीनदा

(पुढील मजकूर १७९ वर)

# करुणरस आणि हास्यरस : एक उपपत्ती

म. ना. लोही

भारतीय साहित्यशास्त्रातील रससिद्धान्त नाट्यानुषंगाने मांडण्यात आलेला आहे. त्यावर अनेक आचार्यांनी सांगोपांग चर्चाही केलेली आहे. या चर्चेत अंतर्भूत न झालेला एक वेगळा विचार नाटकातील करुण आणि हास्य या दोन रसांच्या संदर्भात मांडण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

संस्कृतातील साहित्यशास्त्र नाट्यसंहिता आणि नाट्यप्रयोग यातील रसनिष्पत्तीचा विचार करीत असताना रंगभूमीवरील अभिनेता (किंवा अभिनेत्री) द्वारे प्रेक्षककक्षातील रसिक (स्त्री–पुरुष) यांच्या ठिकाणी रसनिर्मिती कशी होते याविषयी सविस्तर विवेचन करते, मात्र नाट्यसंहितेत रसपोषक कोणत्या गोष्टी असू शकतात याचा तेवढासा विचार करीत नाही. प्रस्तुत लेखात करुण आणि हास्य या प्रतिद्वंद्वी समजल्या जाणाऱ्या रसांच्या उगमस्थानाचा विचार करावयाचा आहे. किंबहुना हे दोन भिन्न व परस्परविरोधी वाटणारे रस समान मूलतत्त्वांपासून निर्माण होतात असे विचारांती आढळते. ही मूलतत्त्वे म्हणजेच विसंगती (Incongruity), विरोध (Contrast) आणि अनौचित्य. या मूलत्रयांपैकी कोणत्याही एका किंवा दोहोंच्या दर्शनातून, अनुभवातून किंवा अभिव्यक्तीतून जो अपेक्षाभंग होतो तोच कारुण्याला व विनोदाला कारणीभूत ठरतो. हा विचार अजून तरी मराठी नाट्यसमीक्षेत वा साहित्यसमीक्षेत मांडला गेलेला दिसत नाही म्हणून प्रस्तुत लेख लिहीत आहे.

भरतमुनींनी रस आठ मानले आहेत. भरतोत्तर काळात रससंख्येत भर पडत गेली. एकीकडे संख्येत वाढ होत होती तर दुसरीकडे ती घटवण्याची अहमहमिका सुरु होती. भरताने शृंगाराला प्राधान्य दिले तर भोजाने अहंकारशृंगार हाच एकमेव मूलभूत रस मानला. भवभूतीने ‘एको रस: करुण एव’ असा विचार मांडला तर अभिनवगुप्ताने ‘इति आनंदरूपता सर्वरसानाम्’ या आपल्या प्रतिपादनास अनुसरून ‘एतेन सर्वे रसा हास्यान्तर्भूता’ असा अभिप्राय व्यक्त केला. सर्व रस आनंदप्रद आहेत हे अभिनवगुप्ताचे म्हणणे मान्य करावेच लागते. आणि ते एकदा मान्य केले की करुण आणि हास्य यांना विरोधी मानण्याचे कारण दिसत नाही. नाटकात दोन्ही रस सारखेच आस्वाद्य असतात. फक्त आनंद देण्याची त्यांची पातळी आणि प्रमाण यात फरक पडतो. दुर्दैवाने संस्कृत ललित वाङ्मयात व साहित्यशास्त्रात हास्यरस दुय्यम दर्जाचा मानला गेला. अनौचित्य हे रसविघ्न समजले जाते आणि ‘एते अनौचित्यप्रवर्तित:’ असा हा हास्यरस. त्याचा संस्कृत नाट्यवाङ्मयातून योग्य तो विकास झालाच नाही. ‘अंगवेषवचोविकृ:’ असा विदूषक आपल्या हास्यास्पद वागण्याबोलण्याने विनोदनिर्मिती करताना दिसतो. इंग्रजी वाङ्मयात व तदनुषंगाने अलीकडील मराठी वाङ्मयात जो प्रसंगनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ किंवा शाब्दिक विनोद आढळतो तसा संस्कृत वाङ्मयात आढळत नाही. ही वस्तुस्थिती कोण अमान्य करील ? दुसरे असे की कालपरत्वे नाट्यासंबंधीच्या रूढ कल्पना बदलल्या आहेत. सुखात्मिका (Comedy) व दुःखात्मिका (Tragedy) याविषयीचे रूढ संकेत मागे पडून नवे संकेत रूढ होत आहेत. अशा काळात रससिद्धान्त नव्याने पडताळून पाहणे आवश्यक नाही का ? गेल्या दहा वीस वर्षांत तसे प्रयत्नही झाले आहेत. त्या सर्वांची पुनरावृत्ती अप्रस्तुत ठरेल. किंबहुना तशी गरजही नाही.

भारतीय साहित्यशास्त्रात रसनिष्पत्ती स्थायिभावांमुळे होते असे सूत्र मांडले आहे. हा स्थायिभाव कोणाचा ? भरताच्या मते प्रेक्षकाचा. ‘स्थायीभावान् आस्वादयन्ति प्रेक्षका:’ असे भरत म्हणतो. वास्तविक कोणत्याही ललितकृतीचे बीजारोपण साहित्यिकाच्या मनातच होत असते. मग आपल्या प्रतिभेने तो त्या कल्पनेचा विस्तार व विकास करतो. म्हणजेच साहित्यकृतीमधील रसजन्य भाव लेखकाच्या हृदयात प्रस्फुटित होतो. पहिला रसिकही तोच असतो. आपल्या हृदयातील भाव तो शब्दांच्या माध्यमातून मांडत असतो. निर्मितीच्या क्षणी तो किती प्रमाणात कलावंत असतो व किती प्रमाणात रसिक असतो ह्या वादात शिरण्याचे कारण

नाही. मात्र आत्मगत भावांचा आविष्कार कल्पनानिर्मित पात्रांच्याद्वारे तो करीत असतो हे उघड आहे. नाटकाच्या बाबतीत नाट्यसंहिता (स्क्रिप्ट) आणि नाट्यप्रयोग (परफॉर्मन्स) हे दोन्ही रसनिर्मितिक्षम असतात. नाट्यसंहितेत असणारी रसबीजे प्रयोगात नटांच्या विभावानुभावांनी परिपुष्ट होऊन रसविष्कार सुस्पष्ट व प्रभावशाली होतो एवढेच. हे विवेचनही साहित्यशास्त्रात सर्वांगानी येऊन गेलेले आहे. येथे आवश्यकते पुरताच उल्लेख केलेला आहे.

नाटककाराचे नाट्यसंहितेतील मानसपुत्र आणि मानसकन्या जे बोलतात त्यातून रसनिष्पत्ती होते, या सूत्राचा अधिक विचार करू या. करुण काय अगर हास्य काय, नाटककाराच्या मनात त्याक्षणी निर्माण होणाऱ्या भावनेतून निष्पन्न होतात. नाटककाराने कल्पिलेल्या परिस्थितीकडे व घटनांकडे तो स्वतः आणि त्याची मानसिक अपत्ये ज्या दृष्टिकोनातून बघतात त्यानुसार रस निर्माण होतो. एखाद्या घटनेकडे किंवा व्यक्तीकडे गंभीरपणे (seriously) पाहिले जाते तेव्हा कारुण्य आणि खेळकरपणे (playfully or humourously) पाहिले जाते तेव्हा हास्य निर्माण होते. भिन्न दृष्टिकोनांमुळे एकच घटना करुण अगर हास्योत्पादक ठरू शकते. वस्तुतः मृत्यू हा सर्वत्र आणि सर्वदा शोककारक ठरतो. पण प्राचीन रोममध्ये गुलामांना व अपराध्यांना उपाशी सिंहाच्या पिंजऱ्यात ढकलून देत व मृत्यूशी झुंजणाऱ्या आणि असहाय्यपणे आक्रोश करणाऱ्या गुलामांचे ते हाल पाहून जमलेले प्रेक्षक हर्षित होऊन टाळ्या पिटत. भारतातही राजे लोक माणसांना हत्तीच्या पायी देत तेव्हा ती मौज पाहण्यासाठी प्रेक्षक गर्दी करीत. त्या प्रसंगी जर मृत्युमुखी दिलेल्या व्यक्तीचे आप्त प्रेक्षकात असले तर ते निश्चितच शोकविव्हल होत असावेत. उलट बहुतांश प्रेक्षक आनंदित होत असावेत. आता वेगळ्या प्रकारची एक ऐतिहासिक घटना घेऊ. अकबराशी झुंज देत असताना विपत्काली महाराणा प्रतापाला जंगलात वास्तव्य करून रहावे लागले होते. त्याकाळात एके दिवशी एका रानमांजराने राणा प्रतापाच्या मुलीच्या ताटातील भाकरी पळवली. भुकेने व्याकुळ झालेल्या आपल्या मुलीला रडताना पाहून राणा प्रताप इतका विचलीत झाला की त्याने अकबराला शरणचिठ्ठि लिहून पाठवली. अशीच घटना त्याच्या वैभवकाळात घडली असती तर ..तो मनसोक्त हसला असता ! सारांश, एकच घटना परिस्थिती आणि दृष्टिकोण यानुसार करुणजन्य किंवा हास्यजन्य ठरू शकते. मृत्यू हा कसा विनोदविषय ठरू शकतो हे गडकऱ्यांनी 'एकच प्याला' नाटकात तळीरामच्या मृत्यूच्या प्रसंगी दाखवून दिले आहे. उलट तोच मृत्यू शोककारक कसा ठरतो याचेही प्रात्यक्षिक सिंधू व सुधाकराच्या मृत्यूच्या प्रसंगी दाखवून दिले आहे.

शोक हा करुणरसाचा स्थायीभाव असून दुःख हे शोककारण असते. वास्तवात किंवा वाङ्मयात सामान्यतः मृत्यू, विरह आणि पश्चात्ताप हेच दुःखविषय (subjects) असतात. खळखळता जीवनप्रवाह अचानक खंडित करणारा मृत्यू अपेक्षाभंगच करीत नाही का ? एकीकडे कालावर मात करण्यासाठी सतत धडपडणारा, मृत्युंजय बनण्याची आकांक्षा बाळगणारा आणि दुसरीकडे असहायपणे कालाधीन होणारा माणूस ही मानवी जीवनातील विसंगतीच नव्हे काय ? हे विसंगतीदर्शन कारुण्याला कारणीभूत ठरत असते. मृत्यूचेही प्रकार असतात. वृद्धापकालीन मृत्यू आणि तारुण्यातील मृत्यू यातील दुःखात फरक असतो. दीर्घकालीन आजारातील मरण आणि अपघाती मरण यातील दुःखातही फरक पडतो. जबरीने घडवून आणलेला मृत्यू तर अधिकच दुःखद ठरतो. ऑथेल्लोने केलेली निरपराध डेस्डिमोनाची हत्या म्हणूनच तीव्र करुणरसजनक ठरते. मृत्यूमध्ये जसे विसंगतीदर्शन घडते तसेच पश्चातापातूनही घडते. पश्चात्ताप म्हणजे काय ? आपण केलेल्या समाजविरोधी, व्यक्तिविरोधी दुष्कृत्याबद्दल खेद. अन्याय हीच मुळात विसंगती नसते का ? ज्या व्यक्तीच्या वर्तनात अन्याय ही स्वाभाविक प्रवृत्ती ठरते तिला खलप्रवृत्ती म्हणतात, समाजकंटक समजतात. सर्वसामान्य माणूस अशा व्यक्तीचा तिरस्कार करतो. कारण अशा व्यक्तीला आपल्या दुष्कृत्याबद्दल पश्चात्ताप होत नाही. अशी व्यक्ती संकटात सापडली किंवा तिची हत्या झाली तरी इतरांना दुःख होत नाही. पण पश्चात्तापदग्ध व्यक्तीबद्दल अनुकंपा निर्माण होते. कारण पश्चात्ताप झालेली व्यक्ती प्रायश्चित्त घेण्याला प्रवृत्त होते. प्रायश्चित्तामागे जी अव्यक्त उदात्तता ती इतरांना प्रभावित करते. 'ऑथेल्लो' मधील ऑथेल्लो किंवा 'एकच प्याला' मधील सुधाकर पश्चात्तापाने प्रायश्चित्ताला प्रवृत्त होतात तेव्हा प्रेक्षकांचे डोळे पाणावतात, कंठ दाटून येतो, एखादी कठोर वा दुष्ट व्यक्ती आपल्या नैसर्गिक स्वभावाविरुद्ध वागते व बोलते

तेव्हा ती विसंगतीच नसते का ? परंतु तीव्र पात्रगत करुण आणि प्रेक्षकगत शोक जागृत करते. अन्यायाबद्दल चीड वाटते तर पश्चात्तापाबद्दल सहानुभूती. अनुतप्त व्यक्तीच्या अन्याय निस्तरण्याच्या व केलेल्या कृत्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याच्या निर्धारामुळे वाचक-प्रेक्षकांना एक उदात्त समाधान लाभते. खलव्यक्तीचा अहंकार जाऊन ती आत्मनिर्भत्सना करू लागली म्हणजे प्रेक्षकालाही दुःख होते. त्याचे स्वरूप संमिश्र असते. मात्र नाट्यदर्शनाने होणारे दुःख हा दुःखाभास असतो हे विसरून चालणार नाही. प्रत्यक्षातील दुःख वेगळे आणि वाङ्मयीन दुःख वेगळे. हे सर्व खरे असले तरी करुणरसात विसंगती असते हे उघड आहे.

विरह आणि वियोग यातील ताटातूट ही दैवदत्त असली तरी ती सुसंगतीविरुद्ध असते. दोन प्रेमी जीव एकत्र आल्यावर अखेरपर्यंत एकत्र असावेत हेच सुसंगत नव्हे का ? उलट त्यांचा ऐन तारुण्यात वियोग व्हावा ही विसंगतीच होय. कधी यात दैवाचा उपरोधही (Irony of fate) असतो. वियोगामुळे विरहव्याकुळ होणारे दोन जीव प्रत्यक्षात दुःखी होतात, शोकाकूल होतात. आणि त्यांचे दुःख पाहून प्रेक्षकही शोकाकूल होतात. विसंगतीचे आणखी एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे शकुंतला सासरी जात असताना कण्वाला होणारे दुःख. कण्व हा एक ऋषी. ज्याने मनावर विजय मिळवला आहे तो ऋषी. असे असूनही त्याची मानलेली मुलगी शकुंतला सासरी जावयास निघते तेव्हा दुःखी होतो. त्याच्या दुःखाने प्रेक्षकही शोकविव्हल होतात. म्हणजेच करुण रसाचा स्थायिभाव शोक हा विसंगती व विसंगतीदर्शन यातून निर्माण होतो. कारुण्य आणि दुःख या भावनांच्या मुळाशी बहुतांशी विसंगती कशी असते हे आपण पाहिले.

जीवनाचा अंत हा शोककारक असतो कारण तो दुःखदायक असतो. उलट जीवनाचा आरंभ, म्हणजेच पुत्रजन्म, सर्वांना आनंद देत असला तरी आईला प्रसववेदना सहन कराव्या लागतात. गर्भवतीच्या त्या वेदना तिलाही वेदना आणि यातना देतात. मात्र सुटका होताच ती वेदना विसरून अपत्यमुख पाहून तृप्त होते, आनंदित होते. आईचे अपत्यप्रेम हा तर ललित वाङ्मयाचा सनातन विषय आहे. पुत्रप्रेमाची महती गाणारी जी इंग्रजी (की फ्रेंच ?) कविता आहे तिच्यातील मुलाने खून केलेल्या आईचे हृदय जेव्हा मुलाला जपून चालण्यास सांगते तेव्हाची वाचकांच्या मनाची अवस्था काय असते? करुण रसात असते तशीच नसते का ? येथे विसंगती वाचकांच्या मनातील उदात्ततेची भावना (Sublimation) जागृत करते आणि करुण रसोद्भव भाव उत्पन्न होतात. अशा प्रकारे शोककारणांचा विचार झाल्यावर आता हास्यकारणांचा विचार करू या.

हसणारा प्राणी तो मानव असे म्हटले जाते. याचाच अर्थ असा की, हसण्याची प्रवृत्ती माणसाच्या ठिकाणी उपजतच असते. हास्य सकारण तसेच अकारण असते. हास्यकारक पदार्थ आणि परिस्थिती यांचे दर्शन किंवा स्मरण हास्याला कारणीभूत होत असते. प्रत्यक्षात घडते ते असे की, मानवाच्या ठिकाणी असणाऱ्या उपजत हास्यप्रवृत्तीला विरोध व विसंगती यांच्या दर्शनाने चालना मिळते. भारतीय साहित्यशास्त्रानुसार विनोदन हा हास्यरसाचा स्थायीभाव आहे. विनोदन कसे होते ? विरोध आणि विसंगती यांच्या दर्शनातून अपेक्षाभंग होतो व तोच विनोदनाचा कारणभाव ठरतो. अलीकडे विनोदाचा (म्हणजेच हास्यरसाचा) खूपच विचार झालेला असल्याने त्याची चर्चा टाळलेली आहे.

करुणरस आणि हास्यरस यांचे स्थायीभाव व विभावानुभाव जरी सकृतदर्शनी परस्परविरोधी दिसत असले तरी त्यांच्या अंतरंगात कुठेतरी आत्मीयता, सहृदयता दडून असते. ज्या व्यक्तीसाठी आपण रडतो किंवा जिला हसतो तिच्याशी बहुधा आपले दृष्यादृष्य नाते जुळलेले असते. वास्तवातील सुखदुःखात सापेक्षता असते, आपपर-भाव असतो. आप्तमित्रांच्या दुःखाने आपल्या हृदयातील शोक जागृत होतो. आपण व्यथित होतो. उलट शत्रूच्या दुःखाने सुखावतो. मात्र आप्तता-निरपेक्ष सुखदुःखही असू शकते. एखादा खुदिराम बोस आपला कुणी नसतो. तरीही त्याची कथा आपले नेत्र ओले करते. त्याच्या आयुष्यातील ही घटनाच घ्या. खुदिरामला फाशी देण्याच्या आदल्या दिवशी दयाळू जेलरने त्याला पिकलेले आंबे खायला दिले. जेलर राऊंडवरून परत आला तेव्हा खुदिरामने ते आंबे तसेच परत केले. आपल्या सद्भावनेचा अवमान झालेला पाहून क्षणभर जेलर रागावला. पण दुसऱ्याच क्षणी त्याच्या लक्षात आले की, खुदिरामने आंब्यातील रस चोखून घेतला आणि आपली गंमत करण्यासाठी हा बनाव केलेला आहे. त्याने पाणावलेल्या डोळ्यांनी खुदि-

रामकडे पाहिले तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर मिष्किल स्मित होते. खुदिराम स्वतःच्या मृत्यूला तुच्छतेने हसत होता तर जेलर मृत्यूच्या नुसत्या जाणिवेने रडत होता. एकाच प्रसंगी होणाऱ्या भिन्न, नव्हे परस्परविरोधी प्रतिक्रिया काय दर्शवितात ? नेमके हेच वाङमयात घडते. राम जसा आपला आप्त नसतो तसाच रावणही आपला शत्रू नसतो. पण राम वनवासात जाताना पाहून आपण व्यथित होतो. आणि रावणाच्या मृत्यूने व्यथित न होता सुखावतो हे सर्व कसब रामायणकाराचे आहे. दुसरे उदाहरण द्यायचे तर सुधाकर व तळीराम (एकच प्याला) यांचे देता येईल. सुधाकर हे एक कल्पित पात्र तसेच तळीराम हे देखील काल्पनिक पात्र. पण सुधाकराविषयी आपल्याला आपुलकी वाटते तर तळीरामविषयी तिरस्कार.सुधाकराच्या आत्महत्येने शोक जागृत होतो तर तळीरामाचा मृत्यू हास्याला कारण ठरतो. लेखक ज्या पात्राविषयी आत्मीयता निर्माण करतो त्या पात्राच्या दुःखाने प्रेक्षक विचलीत होतो. अर्थात् ते दुःख नसून केवळ दुःखाचा आभास असतो. उलट ज्या व्यक्तीच्या विक्षिप्तपणाचे विडंबन करून हास्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो तिच्याबद्दल सहानुभूती वाटूनही आपण तिला हसतो. वास्तविक लेखकाने निर्माण केलेला उपरोध, उपहास, विसंगती या सर्व गोष्टी सत्य नसून आभासात्मक असतात. यासंबंधी मानसशास्त्र असे सांगते की, मानवाला स्वजातीबद्दल (Human beings) सहानुभूती वाटत असते. अतिरेकी सहानुभाव दुःखाला कारणीभूत ठरतो. सहानुभूतीजन्य दुःखापासून मानवाची सुटका करण्यासाठी निसर्गाने त्याच्याठिकाणी हास्याची उपजत भावना निर्माण केली. 'Laughter is the antidote to sympathy' (हास्य हा सहानुभूतीवरील उतारा होय) ह्या उपपत्तीत हास्याच्या सहानुभूतीशून्यतेचा उल्लेख नाही. ती अध्याहृतही नाही. उलट हास्यातही सीमित व संयमित सहानुभूती असते असेच सुचवलेले आहे.

आतापर्यंत केलेल्या विवेचनाला काही आधार आहे का, असा प्रश्न अनपेक्षित नाही. भारतीय रसविषयक विवेचनात यावर काहीच प्रकाश टाकलेला दिसत नाही. साहित्यशास्त्र सांगते ते एवढेच की, कविगत साधारणीभूत संवेदना हीच परमार्थतः रस आहे. कवि आपल्या प्रतिभाबलाने आपला वैयक्तिक अनुभव लौकिक व्यक्तिगत पातळीवरून वर उचलतो व त्याला साधारणीभूत करतो. रसिकाला येणारी प्रतीती ही कविगत प्रतीतीच असते. कवीला (नाटककाराला) आलेला प्रत्यय आणि रसिकाला नाट्यवाचनाने व नाट्यदर्शनाने येणारा प्रत्यय हे एकजातीय असतात. हाच हृदयसंवाद होय. रसप्रतीती ही लौकिक पातळीवरून घ्यावयाची नसते. साहित्याचे माध्यम शब्द हेच असल्याने हे सर्व कार्य शब्दांच्याद्वारे होत असते. या साहित्यशास्त्रीय विवेचनातून मला मांडावयाचा मुद्दा उपेक्षितच राहतो. रसनिष्पत्तीसाठी एका विशिष्ट पद्धतीने शब्दांची मांडणी करावी लागते. विशेषतः करुण आणि हास्य या रसांच्या निर्मितीसाठी लागणारे शब्दलावव एकजातीय असते. 'The genius of Tragedy and Comedy is the same,' असे सॉक्रेटिस म्हणतो तेव्हा त्याला हीच गोष्ट अभिप्रेत असावी. हास्यरसाचा स्थायीभाव जो हास त्याचे पोषण विनोद करीत असतो. पण विनोदातही कारूण्य दडलेले असते. मॅक्स ईस्ट्मन् जेव्हा म्हणतो की, 'Every kind of humour can be matched by a kind of pain,' तेव्हा त्याला हेच अभिप्रेत दिसते. विनोदात कुठेतरी खोल दडलेले विषाद, वैताग, निराशा हे भाव दडलेले असतात. गोकुळचा विसराळूपणा हा आपल्या दृष्टीने विनोदविषय ठरत असला तरी त्याच्या जिवाला वैताग आणणाराच नाही का ? इंदूबिंदूवरील विनोदाला आपले समीक्षक नाके मुरडतात ती का ? त्यांच्या कुरूपतेची क्रूर थट्टा केली गेली म्हणूनच ना ? पुष्कळदा उक्ती आणि कृती यातील विरोध व विसंगती विनोदविषय ठरते. याबद्दल कोणीही आक्षेप घेणार नाही. हे करुणाच्या बाबतीत कितपत खरे समजता येईल हाच प्रश्न आहे. करुणाचा स्थायीभाव शोक. त्याचे पोषण करणाऱ्या घटना म्हणजे मृत्यू, विरह व पश्चात्ताप. याच गोष्टी मुळात विरोध, विसंगती आणि अनौचित्य यावर आधारित आहेत याचा सविस्तर विचार झालेला आहेच. दैवी उपरोध (Irony of fate) किंवा नाट्यविरोध ( Dramatic Irony ) हा सुद्धा करुणरसाला पोषक ठरतो. गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' व आतापर्यंत केलेल्या विवेचनाला सबळ आधार सापडतो.

'एकच प्याला' तील पहिल्या अंकाचा दुसरा प्रवेश विनोदी आहे. या प्रवेशात तळीराम केवळ जीवनातील विसंगती दाखवून वाचक-प्रेक्षकांना हसवून बेजार करतो. तो म्हणतो, "(दोन्ही पायात वाटली

धरून बूच काढीत) म्हणे दारू सुटत नाही! एकदा घेतली म्हणजे सुटत नाही म्हणे! सुटत नाही म्हणजे विशाद काय? (भगीरथापुढे प्याला धरून) घ्या! (दोघे पितात)...वरं मी म्हणतो, सुटत नाही! पण तेवढ्यानं दारू वाईट कशी ठरते? भगीरथ, तुम्ही विश्वविद्यालयाचे पदवीधर आहात. चार दिवस परीक्षा देऊन एकदाचं पदवी मिळवता, आणि ती जन्माची चिकटते खरी! म्हणून कुणी पदव्या घ्यायचं टाकलं आहे का? तशीच बायको! एकदा नुसती माळ घातल्यानं उभा जन्म बायकोचा लवेदा विल्गतो ना?... पदवी वाईट नाही, बायको वाईट नाही मग दारूच तेवढी वाईट का?" पुढील भाषणात तो म्हणतो, "प्रेमापेक्षा मदिरा प्रत्येक बाबतीत श्रेष्ठ आहे. पाहा, प्रेमात राजासुद्धा अगदी गुलाम होतो, पण मदिरेत गुलामसुद्धा राजासारखा स्वतंत्र होतो. प्रेम भीक मागायला शिकवतं, तर मदिरेच्या उदारतेला मर्यादा नसते. प्रेमाखातर प्रणयिनीच्या लाथा खाव्या लागतात, तर मदिरेच्या जोरावर सगळ्या जगाला लाथ मारता येते..." ही दोन्ही भाषणे अनौचित्य आणि विसंगती यांनी पुरेपूर भरली आहेत. शिवाय त्यात उपरोध आहेच.

आता कारुण्यरसाला पोषक अशा काही भाषणांचा विचार करू. चौथ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशात दारूमुळे भिकेला लागलेल्या सुधाकर-सिंधूच्या संसाराचे चित्र आहे. सिंधू आणि गीता बोलत असतात व सुधाकर त्यांचे बोलणे आतून ऐकत असतो. गीता म्हणते, "मोलानं दळण्याचं काम का तुमच्यासारख्यांनी करायचं? नव-कोट-नारायण तुमचे वडील. लक्ष्मीशी गोरगोटा खेळ-ण्यात तुमचा जन्म गेला; आणखी आता हे करायचं?" त्यावर सिंधू म्हणते, "हं! अशी डावावरून लक्ष्मी उठून गेली आणि आपल्या हातात कवड्या राहिल्या! आपला हातगुण, त्याला कोण काय करणार?" हे आणि पुढचे संवाद ऐकून (आणि वाचूनसुद्धा) प्रेक्षक व वाचकांचे डोळे भरून येतात आणि कंठ अवरुद्ध होतो. वास्तविक येथे करुण निर्मितीसाठी मान्यताप्राप्त मृत्यू नाही, विरह वा वियोग नाही. तरीही रसिकाच्या अंतरंगातील शोक या स्थायीभावाची जागृती होते. अर्थात् यावर साहित्यशास्त्रज्ञ असा आक्षेप घेणे संभवते की ही रसनिर्मिती नसून भावनिष्पत्ती आहे. पण जेथे उत्कटतेने शोकावेग निष्पन्न होतो त्या प्रसंगातील अनौचित्य, विसंगती व विरोध यांची चर्चा आधीच केलेली असल्याने हा आक्षेप विचारात घेण्याचे कारण दिसत नाही. सारांश, हास्यरसात व करुणरसात विरोध, उपरोध, विसंगती, अनौचित्य व अपेक्षाभंग यापैकी काहींचा अंतर्भाव (प्रसंगानुरूप) होतो. म्हणजेच या परस्परविरोधी समजल्या जाणाऱ्या रसांच्या उगमाशी समान तत्त्वे असल्याने त्यांची प्रतीती भिन्न प्रकारे होत असली तरी ते विजातीय नसून सजातीय आहेत. तरी या उपपत्तीचा नाट्याभ्यासक आणि साहित्यशास्त्रज्ञ यांनी गंभीरपणे विचार करावा अशी माझी विनंती आहे.

---

(पान १७४ वरून)

वाजवून भाजी आणायला सांगितले होते. ते स्वतःशीच म्हणाले 'अरे! पिशवी कुठाय?' त्या हॉलमधल्या खुर्चीवर राहिली? तांबेच्या मोटारीतल्या त्या सीटवर की, समुद्रावरच्या त्या खडकावर? त्यांच्या नीट लक्षात येईना. अंगठा आणि तर्जनीने ठणकणारे कपाळ दाबीत ते मटकन् खुर्चीत बसले.

# पाणी

महावीर जोंधळे

दिवसाचा तिसरा प्रहर उलटला, सूर्य हळूहळू खाली जाऊ लागला. मावळत्या सूर्याच्या उन्हात लिंबाच्या झाडाची लांबट सावली मळयाजवळून जाणाऱ्या गाडी रस्त्याला भिडलेली पाहताच धनजीशेटच्या मळयात मिरच्या तोडायला आलेल्या सर्व बायकांनी मिरच्या तोडायचे काम थांबविले. त्या एक एक जणी, माप घेणाऱ्या दामूपुढे मिरच्या ओतू लागल्या. त्या हिरव्या-लाल मिरच्या मावळतीच्या फिकट प्रकाशात वेगळयाच दिसत होत्या. माप मोजले जाई. कमी-जास्त भरले जाई. वाद होई. जसे माप असेल त्याप्रमाणे दामू प्रत्येकीला त्यांचा वाटा देऊ लागला. सर्वांच्या पाठीमागून रंभाने दामूपुढे मिरच्या ओतल्या आणि भिरभिरत्या नजरेनं इकडं-तिकडं पाहू लागली. दामूने तिच्या वाटेच्या मिरच्या तिने पुढे केलेल्या घोतरात टाकल्या. तिने चटकन त्याचा गुंडाळा केला व विहीरीवर आली.

गंगाराम आजच्या दिवसातल्या शेवटच्या उरलेल्या चार-पाच मोटा उपसणार होता. रंभाने शेतातील चिकणमाती टाकल्या हातावर खसखस् चोळली आणि गंगारामकडे पाहात ती बाजुला फेकली, गोऱ्या हातावर चोळल्यामुळे हात तांबूस झाले व तलम रेषा झळकल्या. हात झटकून ती थारोळयात उभी राहीली व मोट केव्हा वर येते, व खळाळते शुभ्र पाणी रिते केव्हा होते याची वाट पाहात राहीली. गंगारामने रंभेला पाहताच रंगेल लावणी गुणगुणायला प्रारंभ केली. आपण येथे आलो की याचा आवाज चढतो याचा पडताळा रंभेला गेल्या आठ दिवसांपासून सारखा येत होता. त्याकडे तिने दुर्लक्ष केले व थारोळयात गुडघ्यापर्यंत लुगडे वर करून थारोळयातल्या पाण्याशी चाळा करीत भरपूर पाण्याची वाट बघू लागली. तिच्या पुष्ट गोऱ्यापान पोटऱ्या सायंकाळच्या उन्हात मोठया लोभस दिसत होत्या हात धुण्यासाठी ओणवी झाल्यामुळे तिचा उरोभाग बेफाम उमटून दिसत होता. ऐन विशितली तरणीताठी रंभा दिसायला अत्यंत सुन्दर होती. याचमुळे रंगेल-गंगारामला आवडायची. आताची तीची ओणवी झालेली आकर्षक 'पोज' पाहताच गंगारामचं दिल टणाटण नाचू लागलं आणि त्या हुळहुळया नादात तो मोट हाकता हाकता थांबला. इशाऱ्यासरशी बैल थांबले. विहिरीत मोट अर्ध्यावरच थांबली. पाटात खळखळ करीत धावणारे पाणी अचानक बंद का झाले हे पाहण्यासाठी रंभा तट्कन सरळ झाली आणि तिची अन् गंगारामची क्षणभरच नजरानजर झाली न् तोच बैलांना हाकारले गेले आणि पाटातून पुन्हा पाणी खळाळू लागले. रंभेने हातपाय धुतले. पाण्यातून तिला बाहेर निघावेसे वाटत नव्हते. पण——तोंडावरून ओला हात फिरवून ती घराकडे निघाली. जाताना सहज तिने गंगारामकडे पाहीले अन ती चपापलीच. गंगाराम तिच्याकडेच टकमक बघत होता. मोट थांबलेली होती. त्याला चांगली शिवी हासडावी असं मनोमन तिला वाटलं. परंतु पुढले परिणाम काय हे लक्षात येताच उसळणारे विचार तात्काळ आतमध्ये दाबून टाकले. पण ह्याची खोड चांगलीच मोडायची असं मनाशी टरवूनच ती घराची वाट तुडवू लागली.

रंभा घरी आली. तिची सासू अंगणात खाट टाकून नुकतीच वाऱ्याला येऊन बसली होती. गावकुसाला असलेल्या शेतातून शेळयांसाठी तिने थोडा पाखर घेतला होता आणि शेतातून शेळया येण्याची वाट बघत ती बसली होती. मोठया टोपलीखाली कोंडलेली शेळीची करडी खूपच ओरडायला लागली. त्यांच्या ओरडण्याने संध्याकाळ भरून गेली.वातावरणात उदासी वाटू लागली होती करडा रंग भरू लागला होता. करडयांची दूध पिण्याची वेळ झाली होती. रंभाने चट्कन जाऊन टोपलं काढलं. त्यासरशी तीन इवलाली करडी बाहेर पडली आणि ओरडत उडया मारू लागली. हे पाहून तिची सासू म्हणाली—

'आताच कशापायी सोडलय् त्यांनी. बकरी आली न्हाओ आजून.'

'येल आता.' असं म्हणत रंभा घरात शिरली. कोनाड्यातील काड्याची पेटी घेऊन तीने फरकन काडी ओढली अन् दिवा लावला. दिवा पेटलान् लागलीच विझला. तिने तो हालवून पाहिला. तेल संपले होते. रिकामी वाटली सासूपुढे आदळीत ती म्हणाली.

'घासलेट घेऊन या. चिमणी कोरडीठाण पडलीय़ा.'

'अगो वया ! मी कशी जाऊ ग रंभा. माझ्याचानं न्हाओ ना चालवायचं तूच विगी विगी जा अन् चटशीरी घेऊन ये, त्येला मीच काय करायची ?' बुकनीली आन् आटवणीनं च्याची. मी आज च्याच पील निस्ता.'

रागाच्या एका कटाक्षाने रंभेने घासलेटची वाटली उचलली अन् वाण्याच्या दुकानी गेली. तेल, चहाची पूड, एक काडीपेटी घेऊन ती घरी आली. भाकऱ्या दुपारच्याच होत्या. स्वत:पुरतेच भाजीचे करून तिने घाईघाईने पोटात दोन घास ढकलले. चांगली तांब्याभर चहा करून तिने अन् सासूने चवीनं गळ्याखाली उतरवीला. अंगणातल्या खाटेवर आपला विछाना टाकीत सासू म्हणाली,

'लवंडते ग मी आता ! पायाला गोळे आलेती.'

रंभाने भांडेकुंडे आवरले. चुलीला पोथरं ओढलं अन् गोधडी आंथरून ती लवंडली. पण झोप येईचना. डोळाच लागेना. तशी ती वाहेर आली. तीची शेजारीण जाई स्वयंपाक करीत होती. रंभा तेथे जाऊन बसली.

—गप्पा चांगल्याच रंगात येऊ लागल्या— तेवढ्यात बाहेरून कुठूनसा जाईचा नवरा आला. मग रंभेला उठावेच लागले. ती घरी आली. दार लावून अंथरूणावर पडली. डोळे वळेच मिटावे म्हटले तरी झोप येईना. मनात काहीबाही विचार येत होते अन् मन तडफडत होते, जीव धडधडत होता. तोंडावरून पांघरूण घेऊन झोपावे म्हणजे झोप लागेल, असं वाटल्यावरून पायालगतचे पांघरूण पायानेच ओढून घेण्याचा तिने प्रयत्न केला. या ओढाताणीत कशी कुणास ठाऊक तिच्या चोळीची गाठ सुटली. क्षणभर त्या दिव्याच्या प्रकाशात एकटी असूनही रंभा दचकली. तिचा हात झट्कन चोळीकडे गेला आणि ती विपण्ण झाली. तिने कशीवशी चोळीची गाठ वांधली आणि जड पावलांनी अंगणात येऊन उभी राहीली.

वाहेर शांतता पसरली होती चांदणे टिपूर पसरले होते वारा 'आ' वासून शांत झोपला होता. झाडाचे पान देखील हलत नव्हते. दूरवर कोठून तरी बैलाचा घुंगर नाद कानी येत होता. रंभा पायरीवरच मांडी घालून तशीच वसून राहीली. छातीवरला पदर केव्हा भूईशी खेळू लागला याचेही तिला भान नव्हते. शून्य नजरेने ती घनदाट काळोखात फडफडती दृष्टी लावून वसली होती. तोच तिला खुद्कन हसण्याचा आवाज आला. जाई अन् तीचा नवरा हलक्या आवाजात काही तरी कुजवूजत होते. हंसत होते. इकडे रंभा अनावर पेटत होती. विझत होती. एवढ्यात सासू खाकरून म्हणाली,

'वाहेर कशापायी वासलीस ? झोप आता. पुन्हा पहाटचं उठावं लागतं —'

एरवी रंभाने म्हातारीला मुळीच जुमानले नसते. पण आता फुकट रात जागण्यात काय अर्थ होता ? तिलाही अखेर हे पटले अन् मुकाटयाने आत आली अन् अंथरुणावर पडली. दिवसभराच्या श्रमाने गलितगात्र अन् दमलेल्या शरीरावर हलके हलके झोपेची गुंगी चढली अन् रंभा थोड्याच वेळात निद्राधीन झाली.

रंभाचे लग्न होऊन पाच वर्ष झाली होती. तिचा नवरा गणपत आईचा एकुलता एक मुलगा होता, फार कष्टाळू, शेतातली कामे करी. स्वत: गुरे चारी. दोघांचे पोट कसेतरी भरे. गणपत स्वभावाने जरा वांत्रटच होता. वयाचा परिणाम. गावच्या तलाठ्याची पोरगी दिसायला छान होती. गणपतसह गावातील साऱ्या तरुण पोरांचा ती विषय होऊन वसली होती. दोस्ताच्या मस्करीला भरीस पडून त्याने एक दिवस तिला वाटेत अडविले. तिच्या वापाला त्याचे हे चाळे कळताच तो काठी घेऊन धावून आला अन् त्या भीतीने गणपत पळाला ते थेट मुंवईलाच.

मुंवईला आल्यावर त्याला कशी कोणास ठाऊक एका मिलमध्ये नोकरी लागली. मधून-मधून तो आईला चार पैसे पाठवू लागला. हातावर पोट भरणाऱ्या शहरी गणपतचं स्थळ रंभाच्या वडिलाला पसंत पडलं अन् त्यासरशी त्यांनी हालचाल करून रजा काढून गावी आलेल्या गणपतचं अन् रंभाचं लगीन वाजवूनही टाकलं.

चार दिवसच रंभाला गणपतचा सहवास लाभला. पुन्हा गणपत मुंबईला परतला तो वर्षभर आलाच नाही. नंतर वर्षाविर्षाने गणपत महिन्याच्या रजेनिशी गावाकडे परते. रंभा मात्र आनंदाने भरून येऔ घराला घरपण लाभे.

अलीकडे मात्र गणपत नियमित येऔनासा झाला अन् त्यापाठोपाठ त्याची भावनेनी ओथंबलेली पत्रंही येणं बंद झाली. त्याची हकीकत कळण्याचे मार्गच बंद झाले, रंभा तळमळू लागली. ओटी-पोटीत भरून येऊ लागलं—

नशिबाला दोष देण्याशिवाय अन् दुर्दैव आठवीत त्याच्या नावाने बोटं मोडण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. नवऱ्यापासून दूर असलेल्या शीलवान रंभेवर अनेकांची नजर होती पण रंभेने कोणालाच थुटमळू दिले नाही.

एकदा पाटलाच्या मळचात कामासाठी ती गेली होती. वेळ दुपारची. विश्रामीची, हीच वेळ साधून एकाकी पडलेल्या रंभेवर पाटलाच्या पोराने अतिप्रसंग करण्याचा अमानुष प्रयत्न केला. परंतु रंभेने त्यास चांगलाच हात दाखविला. आज धनजी शेठच्या मळचात काम करीत असताना त्याच नजरेचा गंगारामही आपल्या साठीच वेडापिसा झालाय हे लक्षात येताच त्यालाही इंगा दाखवायचा असे मनोमन ठरविलेच.

सकाळ होताच नव्या दमानं रंभा उठली, झाटलोट केले. अंगणात रांगोळीचे नक्षीदार दोन ठिपके काढले. चहा केला अन् तो दोघींनी घेतला. अंगणात आली तोच समोरून तुकाराम येताना दिसताच ती त्याला आडवी गेली अन् त्याला विचारले,

'कोण तुकारामभाऊ? कवा आलास मुंबऔरनं ?'

'रातीच आलोय !'

तितक्यात तिथं म्हातारी येऊन टपकली अन् तीने त्यास विचारले,

'माझ्या गणपत दिसला कारे

'नाही. आताशी त्याची गाठभेट पडतच न्हायी.' रंभा यामुळे नाराज झाली. आतनं फुटल्यागत झालं. तिने त्यास चहा करुन दिला. चहा पिऊन तुकाराम गेला.

रोजच्या प्रमाणे रंभा आजही मळचात गेली. मन लावून काम केले. मिरच्याचा हा ढीग जमा केला. चिकनमातीने हात धुण्यासाठी सरावानं ती पाण्यात उतरली. गंगाराम आजही टपून बसला होताच. परंतू तिच्या ते ध्यानात आले नाही. ती गणपतच्याच विचारात होती. गंगारामला त्यामुळे धीर आला.

संध्याकाळ होताच ती घरी आली. तिला जेवण गोड लागेना की, काम सुचेना. ती कसल्यातरी निश्चयाने तशीच उठली अन् तुकारामच्या घरी गेली. तिला पाहताच तुकाराम म्हणाला,

'बरं झालं. तूच आलीस. त्या म्हातारी देखत मी काय सांगितलं न्हायी.'

'काय——?'

'अग तुझा दादला एका बयेच्या नादी लागलाय् ?' रंभा एकदम दचकलीच.

'गिरणी सुटली की हातात बाटली अन् जोडीला ती बया असतीच. म्या त्याला खुप समजविलं. तुला मुंबईला घेऊन ये म्हनलं, पर छे ! ऐकायचं नाव न्हाऔ. गडी चांगलाच गुंतलाय त्या बयेच्या रंगरंगोटीत.'

रंभा जड पावलाने घरी परतली.

ती घरी आली. अंथरुणावर उसासे टाकीत पडून राहीली. सरळ, सात्विक स्वभावाची रंभा उद्ध्वस्त झाली होती. वर्षा-वर्षाच्या नंतर मिळणाऱ्या सुखानं ती भरून जाऔ अन् त्यावर दिवस काढे. नैसर्गिक भूक दाबून ठेवी. कढत श्वास पिऊन घेऔ. किती हा कोंडमारा ? आपण इकडे सुखासाठी तडफडत असताना आपल्या नवऱ्याने त्याचसाठी कोणत्या वाटेने बेलगाम हिंडावे ? मनोमनती गणपतीला शिव्या देऊ लागली. अंग प्रत्यंगातून वीज सळसळू लागती. अन् तिच्या नजरेसमोर अचानक मोट थांबवून गहिऱ्या नजरेनं गोऱ्या पोटऱ्या न्याहाळणारा गंगाराम आला अन् तीला खुद्कन् हसूंच आले. तिने ठरविले उद्या आपणहून गंगारामशी बोलायचे—हसायचे—

सगळी आवराआवर करून ती सकाळी मळचात गेली तेव्हा तिचे मन स्वच्छ झाले होते. मळचात गेल्यावर गंगारामच समोर दिसला, अन् अस्फुट हसू आले. गंगाराम तिच्याकडे पाहत होता, रंभाचे हसू त्याने टिपले. रंभा पुढे निघून गेली अन् गंगाराम दुप्पट उत्साहाने मोट हाकू लागला.

गंगारामचे मोटेवरील गाणे आज खूपच जोराने

होत असलेले पाहून इतर बायका कुजबुजू लागल्या अन् हसू लागल्या. रंभा शांत होती, गंभीर होती. तिसरा प्रहर उलटला. मिरच्या देऊन नित्याप्रमाणे हात धुवायला ती पाटावर आली. गंगाराम तयारीतच होता. तिचे त्या दिवशीचे हसणे, आपल्याकडे बघणे या घटना त्याला अनुकूल वाटल्या. सावज जाळ्यात फसते आहेची चाहूल त्यास लागली होती. मोट हाकता हाकता हात धुत असलेल्या रंभाच्या अंगावर त्याने एक बारीकसा खडा अलगद टाकला अन् तो नेमका रंभाच्या छातीवर लागला. अन् बिजली कडकडावी तशी रंभा लाल झाली. तिने तोंडाचा भडीमार सुरू केला. बायका माणसं जमली अन् गंगारामला ओशाळवाणे झाले. त्याने चटकन रंभाचे पाय धरले–

तिला घरी जावयाचे होते. गेळीच्या करडांना टोपलीतून मुक्त करावयाचे होते. त्यांची भूक तिला दावायची नव्हती.

गंगाराम विहिरीच्या काठावर बसून होता. पाण्याकडे बघत राहीला. हे पाणी कुठून येतं, कसे येतं आणि किती येतं याचा त्याला थांगपत्ता लागेना... ●

---

( पान १६४ वरून )

हा अनुभव अत्यंत सुसंगत असाच आहे. "नगर सेवा एक दिव्य" हे पर्यायी नाव म्हणूनच सुचलं असावं !

थोरांची चरित्रं दीपस्तंभ, होकायंत्र यांच्याप्रमाणे सुरक्षा आणि मार्गदर्शन करण्यासाठी सामान्यांच्या उपयोगी पडतात असं म्हणतात या दृष्टिनं लोकसेवा करण्याची थोडीफार तळमळ ज्याच्या मनाला आहे अशा प्रत्येक वाचकाला, जीवन सागरांतले लपलेले खडक आणि हरवलेल्या दिशा यांचं ज्ञान या पुस्तकाच्या वाचनानं निश्चित होईल असं वाटतं. आता वर दिलेल्या वर्गीकरणानुसार माणसांची संख्या असल्यामुळं या मार्गदर्शनाचा व सुरक्षेचा प्रत्यक्ष उपयोग कितपत होईल याबद्दल संशयच आहे ! मग ती कै. माधवराव जोशांना दिसलेली पुण्याची म्युनिसिपालीटी असो की श्री. पाठक यांनी अनुभवलेली नागपुरची म्युनिसिपल कमेटी असो!

पण हे काहीही असले तरी प्रस्तुत पुस्तक प्रत्येक सुबुद्ध नागरिकाने वाचावे असे आहे यात शंका नाही. याला कारणे अनेक आहेत. पैकी पहिलं असं की हे आत्मचरित्र असलं तरीं त्यांत "आत्म" थोडं आणि चरित्र फार आहे; म्हणून वाचनीय. त्यातील व्यक्तिदर्शन संकेतात्मक कमी तर सिद्धान्तात्मक अधीक आहे. निराळ्या शब्दात असं म्हणता येईल की, वर्णनाच्या ओघात श्री पाठक यांनी घडविलेल्या व्यक्तिदर्शनात नकळत मौलिकता फार आली आहे; तर कृत्रिमता अगदि क्वचित आहे. दुसरं कारण असं की, वर्डस्वर्थनं अक्षरवाङमयाची जी– "Spontaneous overflow" ही कसोटी दिली आहे ती (वर्णनातला अभिनिवेश वजा केला–तर) या पुस्तकातील साऱ्याच प्रकरणांना लागु पडणारी आहे. त्यामुळं आरंभापासून अखेरीपर्यंत वाचकाला वाहून नेण्याचं सामर्थ्य त्यात आहे. परिणामी चित्तशुद्धीचे काही परिणाम वाचकाच्या मनावर रेंगाळत रहावेत असं वाटतं.

निदान या दोन कारणासाठी तरी प्रत्येकानं हे पुस्तक एकदा वाचावं असं निःसंदिग्धपणे म्हणावसं वाटतं. ●

---

( पान १८७ वरून )

गणांचे आहेत. हे शब्द वृष धातूपासून व्युत्पन्न असले तरी त्यांची बनावट अभारतीय व अप्राकृतीय आहे. म्हणून हे शब्द उत्तरकालीन जनसम्पर्कानें संस्कृतात आलेले आहेत. त्यांचा काळ फारच प्राचीन आहे. करक शब्द महाभारत व रामायणात वावरतो. संस्कृत साहित्यात करकवाहक म्हणजे राजादिकांना पाणी देणारा असा शब्द रूढ आहे. त्या शब्दावरून मराठीने कऱ्हेर शब्द बनविला आहे कार शब्दाचा अर्थ मात्र जलपात्र असा आढळत नाही त्याचा अर्थ हिमस्थान किंवा वर्फखण्ड असाच आहे. मराठीतील गार गारा हा शब्द संस्कृतमधील कार शब्दापासून आलेला नाही, असे सुचवावे असे मला वाटते. कारण असे की एकतर त्याच्या मूळ अर्थाचा भाग मराठीत लागत नाही आणि दुसरे असे की, मराठीत त्याचे, पश्तो भाषेतल्यासारखे तद्भव रूप रूढ आहे. म्हणून सूचन असे की, गार शब्द, शकादि पश्तो भाषीयांकडून मौखिक परम्परेने मराठीत आला. म्हणून त्याचा थंड, शीत, वर्फवर्षा असा दुहेरी अर्थ मराठीने स्वीकारला. ●

# गारा, कण्हेर व करक

देवीसिंह चौहान

गारा म्हणजे वर्फखण्ड असा शब्द महानुभावीय मराठी साहित्यात रूढ होता हे सर्व मराठी वाचकास ज्ञात व मान्य आहेच. या अर्थाने हा शब्द नरेंद्राच्या रुक्मिणी-स्वयंवरात (लेखनकाल शक १२२५) वापरलेला आढळतो (पाहा-डोळके). ती ओवी अशी-

आंकाळ-जळदाचीया धारा
वहु करूनी वरुसति गारा
ते गाराचे पाणी धरीती चतुरा
तडसी कमळ-दळांचा। ५७०

या ओवीत गारा वर्षतात (अर्थात वर्फाच्या) आणि वर्षावानंतर त्या गारांपासून पाणी झिरपते असा स्पष्ट वोध होतो. म्हणून गारा म्हणजे वर्फखण्ड हा अर्थ निश्चयाने स्थिर होतो. याच काव्यात गारेला म्हणजे गारठला, गोठून गेला असे क्रियापद वापरलेले आहे.

मुरारी-नगराची आइकोनि थोरी
कैळासु गारेला तिये अवसरी
लाजा अंमरावती अनुष्ठान करीं
तीरीं मंदाकिनीचा। ८६४

यावरून स्पष्टपणे दिसून येते की, नरेन्द्रकविकाळी गारा या मूळ शब्दावरून, गारा या वस्तूच्या स्वभावावरून, गारठणे, गोठणे या अर्थी गारावेणे असा शब्द रूढ होता. व त्याचे भूतकालिक रूप गारैला असे त्याने प्रयुक्त केलेले आहे. ओवी कमांक १०२६ मध्येही.

सभामंडपाचे देखोनि वरवेपण
कैलास गारैला आपण

असा वापर आलेला आहे एकूण हे क्रियापद देवगिरी-पैठण परिसरात चांगलेच रूढ होते, सच्चिदानन्द वावांच्या सांगण्याप्रमाणे ज्ञानेश्वरी शक १२१२ त लिहिली गेली. ज्ञानेश्वरांनीही गार म्हणजे थंड असा प्रयोग केलेला आहे (पाहा राजवाडे)

कैसे उन्मेखचांदिणे तार।
आणि भावार्थी पडतसे गार।
हे चि श्लोकार्थकुमुदिं तरि फार।
सेवितां होते। ६.१३४

येथे गारा म्हणजे वर्फखण्ड या शब्दावरून गारा वस्तूच्या स्वभावगुणावरून मराठीने गार म्हणजे थण्ड, शीत असा अर्थ निष्पादिला आहे. अलीकडील मराठीने अधिक शीतता व्यक्तविण्यासाठी थण्डगार असा शब्द घडविलेला सर्वपरिचित आहे.

ज्ञानेश्वरीतही गारा शब्द वापरलेला आहे. ती ओवी अशी.

तरि तेयां चि आसुरां।
दोखांमाजि जेयां वीरा।
वाडपणाचा गारा।
तो दंभु ऐसा। १६.२१५

परंतु येथील गारा शब्दाचा अर्थ चिखल असा आहे. हा अर्थ बऱ्याच विद्वानांनी स्वीकारलेला आहे. तो योग्यही आहे असे वाटते. तो कर्दम (सं. धातु कर्द, कर्दती) शब्दापासून व्युत्पन्न आहे (पाहा मोनियर पृ. २५८.१) म्हणून प्रस्तुत चर्च्य शब्द गारा म्हणजे वर्फखण्ड या पासून त्याला वेगळे ठेवलेले आहे. त्याची व्युत्पति सरळ आहे.

भास्करभट्ट वोरीकराच्या शिशुपाळवध काव्यात (लेखनकाल शक १२३५) गारवनी हा शब्द ओवी क्रमांक ७८१ च्या पाठभेदात आलेला आहे. विद्यारत्न कोलते यांनी तो शब्दकोशात स्वीकारून योग्यसा अर्थही दिलेला आहे (पाहा-संक्षेप कोलते). ओवी अशी...

सोने-केतकीची दृती
काढूनि कीजे कनकनिती
तीए सरीसा भांजिजती
मळयानीळु ७८१

येथे मळयानीळु शब्दाच्या ऐवजी तीन प्रतीत गारवनिए असा शब्द प्रयुक्त आहे. येथेही गार म्हणजे थंड, शीत हा अर्थ योग्य दिसतो. वनी म्हणजे पाणी परिचितच आहे.

**कन्हेर**

भाषाविषयक अभ्यासाच्या दृष्टीने पाहाता कन्हेर, कन्हेर हा शब्द नरेन्द्र कवीच्या रुक्मिणी स्वयंवरात सर्वप्रथम वावरताना दिसतो. खालील दोन ओव्या पहाव्यात (पाहा—डोळके)

जे कथा साहीत्याचे क्षीरार
नव रसाचे कन्हेर
अनेगा भावाचे भांडार
कीर्ति उदार केवल्याची ५०
कीं ते पंच–सरोवराचें भांडार
की महानदीचें वसोवार
ना ना ते हों काज कन्हेर
सकळ सुखाचे ४३६

या दोन्दी ओव्यात कन्हेर शब्दाचा योगिक अर्थ पाणपोई असाच आहे. हाच अर्थ श्री. डोळके व डॉ. कोलते यांनी आपापल्या आवृत्यात दिलेला आहे. याशिवाय या काव्यात कन्हेरी असा शब्दही प्रयुक्त आहे (पाहा—डोळके, ओव्या ७४६,२०४८). शब्दाचा अर्थ आहे पाणी देणारा. पाण्याची झारी बरोबर वागवून योग्य वेळी यजमानास पाणी देणारा. पाणी देणाऱ्या सेविकेसाठी कन्हेरीणी (ओ. ३९५) व कन्हेरीणी (ओ. १०३) असा शब्द याच वृहत्काव्यात प्रयुक्त आहे. कन्हेर शब्दाची व्युत्पति श्री. डोळके यांनी दिलेली नाही. या शब्दाचा उल्लेख व्युत्पति कोशात स्व. कृ. पां. कुलकर्णी यांनी सुयोग्य रीतीने सं. करक शब्दापासून दिलेली आहे (पाहा—कुलकर्णी पृ. १५६.२) त्यांनी करअ या प्राकृत शब्दाचाही उल्लेख केलेला आहे. परंतु कन्हेरी शब्दाचा अर्थ, तो स्त्रीलींगी आहे असे मानून पाणी देणारी दासी असा अर्थ दिलेला आहे. हे योग्य नव्हे, हे कन्हेरीणी या स्त्रीलिंगी रूपावरून दिसून येतच आहे. कन्हेरी हा शब्द सह्याद्रिवर्णन या उत्तरकालीन ग्रंथातही (रचना—काल शक १२७५) आलेला आहे. नरेन्द्राच्या समकालीन व समानपंथीय भास्करभट्टाच्या शिशुपाळवधातही तो आलेला आहे. (पहा—कोलते ५०,३५५) त्याचा अर्थ पाणी देणारा सेवक असाच देण्यात आलेला आहे.

**करक, कारक—**

करक आणि कार, कारक या शब्दांची चर्चा मोनियर वुइल्यन्सने सं. कृ. धातूच्या संदर्भाने केलेली आहे. शब्द पृ. २५४.१ वर आणि कर, व करक (वर्फखण्ड) शब्द पृ. २५४.३ वर चर्चिला आहे. पहिल्या ठिकाणी करक शब्दाचा अर्थ जलपात्र, नारिकेलादि पाणी असणारी फळे असा दिलेला आहे. दुसऱ्या ठिकाणी कर, कार या दोन शब्दांचा अर्थ (१) कर, खंडणी, बलि आणि (२) वर्फखण्ड असा दोन्ही पद्धतीने परंतु एकापुढे एक असा मिसळून दिलेला आहे. दुसऱ्या ठिकाणी करक शब्दाचेही वरील दोन्ही अर्थ दिलेले आहेत. पृ. २७४ वर कार, कारक शब्दांची चर्चा आहे. कार शब्दाच्या दुसऱ्या अर्थाची नोंद करताना या शब्दाचे वरील दोन्ही अर्थ एकापुढे एक दिलेले आहेत. व्युत्पत्तिसंकेत केलेला नाही. कर शब्दाची नोंद घेताना (पृ. २५४.३) मात्र सं. कृ. धातूचा व्युत्पत्यर्थ उल्लेख आहे. अर्थात कार शब्दासाठीही हा धातु सम्बद्ध आहे असे पर्यायाने येते. कारक शब्दाचा कोशगत म्हणून फक्त वर्फ, वर्फखण्ड असा अर्थ दिलेला आहे. येथे बलि अर्थाचा निर्देश नाही.

येथे कोशकाराने दोन्ही शब्दाची गल्लत केलेली आहे असे स्पष्टपणे दिसून येते. कृ. या मूळ धातूपासून कर हा शब्द खंडणी, बलि या अर्थाने निघालेला आहे. परंतु कर, करक, कार, कारक या वर्फ अर्थी असलेल्या शब्दाचा या सं. कृ धातूशी सुतराम् संबंध नाही. कृ धातूचा आज्ञा, आदेश देणे असा अर्थ मात्र अनेक ठिकाणी आढळतो. या कृ धातुपासून बलि या अर्थाने असलेला कर, कार शब्द अगदी योग्य रीतीने व्युत्पन्न होऊ शकतो. कृ धातूचे ३ वैदिक अर्थप्रकार दिलेले आहेत (पृ. ३०१). परंतु या वृहत्संकलनात कृ या धातूचा पाणी देणे, झिरपणे, पाण्याचा साठा असणे अशा प्रकारचा अर्थ कोठेच आढळत नाही. म्हणून वर्फ, पाणी अर्थाने असलेल्या कर, कार, करक आणि कारक शब्दाची व्युत्पति अन्यत्र पाहिली पाहिजे. सं. कृ धातूशी त्याचा सम्बन्ध जोडणे अर्थसंधारणेच्या दृष्टीने अगदी अयोग्य आहे. दोन्ही शब्द केवळ समकाय आहेत. एवढ्यावर विसंबून, दोन्ही शब्दांचा एकत्र विचार करण्यात आलेला आहे. याचा फेरविचार होणे योग्य होईल.

**पार्श्वभूमि—**

संस्कृत भाषेनेही बऱ्याच प्रमाणात अभारोपीय भाषांकडून उसणवारी केलेली आहे. अशा उसणवारीचा अभ्यास विद्वान आता करीत आहेत. संस्कृत भाषेने मुण्डा ख्मेर (ऑस्ट्रो आशियायी) भाषेतून आणि विशेषतः

द्राविडकुल भाषांकडून उसणवारी केलेली आहे. अनार्य भाषांचा प्रभाव ऋग्वेद कालात देखील पडलेला दिसून येतो. टी. बरो याने या प्रभावाचा परामर्श घेतलेला आहे (पाहा बरो, पृ. ३७८ ते ३८६). खुद्द ऋग्वेदात उलुखल, कटुक, कुण्ड, खल, दण्ड, पिण्ड, बल (शक्ति), बिल (बिळ), मयूर इत्यादी द्राविडकुलीय शब्द शिरल्याचे त्याने सांगितले आहे. अथर्ववेद काली तूल (कापूस, हा शब्दसुद्धा मुण्डाभाषेतून आला) व बिल्व आल्याचे नोंदविले आहे. संस्कृत प्रविष्ट अशा १०८ द्रविड शब्दांची याद बरोने दिलेली आहे. उत्तर कालात या प्रभावाची गति वाढलेली आहे. पाली आदि प्राचीन आर्यभारतीय भाषातही हा प्रभाव कार्यप्रवण आहेच. शेजारील भाषांचा प्रभाव कोणाही भाषेवर पडतच असतो. निदान शब्दाच्या आवकीपर्यंत तरी ही देवाणघेवाण असतेच असते.

ईराणी आणि संस्कृत एकाच भारोपीय (भारत–युरोपीय) भाषेच्या सुविकसित शाखा आहेत. ईराणीवर इस्लामी अरबांचा वरचष्मा झाल्याने तिचे हे फार्सी नाव अधिक रूढ झाले. तिला अरबी लिपीचा स्वीकार करावा लागला व अनेक अरबी शब्दांना घरात स्थान द्यावे लागले. हे जरी घडले तरी तिचा मूळ आर्य पिण्ड अबाधित राहिलेला आहे इराणी लोकांचा (यात पठाण, बलूच, तुषार, बाल्हीक, शक चूलिक इत्यादीचा समावेश होतो) भारताशी गेल्या हजारो वर्षापासूनच सम्बन्ध येत राहिलेला आहे. या लोकजीवन साहचर्याने एकमेकांच्या भाषा प्रभावित होणे सहज आहे. परंतु दुर्दैवाने संस्कृतमधील ईराणी ऋण शब्दांचा पद्धतशीर अभ्यास झालेला नाही. या दोन शाखा आर्य भाषेच्याच असल्या तरी दोघींची विकासदिशा भिन्न होती. म्हणून वियुक्तीकरणाच्या मागाहूनच्या कालात झालेली आवक जावक नोंद व्हावयाला पाहिजे. ईराणीवरील उत्तर कालीन संस्कृतचा प्रभाव बारकाईने अभ्यासिला गेलेला नाही. फार्सी भाषेत कर्गदन म्हणजे गेण्डा (इंग्रजी र्‍हेनासरस) असा शब्द आढळतो. हा संस्कृत खड्गधेनु (मादी गेण्डा) शब्दाची उसणवारी आहे. अशी उदाहरणे अनेक देता येतील. याच्या उलट वियुक्तीनंतर संस्कृत भाषेनेही काही उसणवारी ईराणी भाषेकडून (हीत पप्तो, फार्सी, बलूच, खोतनी शक, सोग्दी–चूलिक–शूलिक आदींचा समावेश होतो) केलेली आहे. याच्या खुणा नित्य समोर येतात. भारतात इस्लाम संपर्क झाल्यानंतर नव्य आर्यभारतीय भाषांवरील ईराणीच्या प्रभावाची छाननी बऱ्याच भाषांच्या बाबतीत झालेली आहे. परंतु इस्लाम सम्पर्कपूर्व काळातील प्रभाव अद्यापी पद्धतशीर रीतीने मोजला जावयाचा आहे. ईराणी भाषेच्या दुराव्यामुळे, हे कार्य भारतात केव्हा घडले हे सांगता येत नाही.

**वृष, वर्षति-**

या प्रस्तावनेचे प्रयोजन करक, कारक शब्दांची व्युत्पत्ति पप्तो ईराणी भाषातून पाहाता येते हे सांगण्याकरिता आहे. या शब्दांचे मूळ वैदिक संस्कृत वृष् धातूत आहे. वृष्, वर्षति वैदिक धातूचा अर्थ पाण्याचा वर्षाव करणे असा आहे. पाऊस पडणे, जोराची जलवृष्टि होणे, असा मुळातला अर्थ. धातु आत्मनेपदीही आहे. तसा तो असेल तर जननक्षम वृष्टि करणे असा त्याचा अर्थ ध्वनित होतो. म्हणून पुरुषाला, तसेच धष्टपुष्ट बैलाला वृष हा शब्द प्रयुक्त होई. या मूळ ध्वन्यर्थावरून एखाद्या प्रमुख मनुष्य वा पशूला वृष हा शब्द वापरला जाई. येथे जोरदार व प्रभावी वृष्टि हीच अभिप्रेत आहे. हा अर्थ सामान्यपणे दुसऱ्या वर्षावाला लागू लागला. बाणांचा वर्षाव, दगडांचा वर्षाव हे मागाहून अर्थ विकसित झाले. इतकेच नव्हे तर जेथे वर्षणक्षमता आहे किंवा जेथे प्रत्यक्ष वर्षणलाभ होतो अशा स्थानालाही या मूळ अर्थावरून नाव प्राप्त झाले. कार (पाहा मोनियर पृ. २७४.३) शब्दाचा अर्थ वर्फराशि व वर्फस्थान असाही होतो, म्हणून कार म्हणजे हिमाच्छादित पर्वत असा अर्थ आला. तसेच जेथे जेथे या हिमवर्षणाचा लाभ होतो त्या प्रदेशालाही करक (पृ. २५४.१) आणि कारकुक्षीय असे शब्द प्रयुक्त झालेले आहेत. हा भारताच्या वायव्य कोपऱ्यात असलेला शाल्व प्रदेश होय. या जलाशय क्षमतेमुळे नारळाला देखील करक असा शब्द निर्माण झाला. तोच पुढे जाऊन अधिक जलमय फळांना व फलवृक्षाला प्रयुक्त होऊ लागला. या सर्व अर्थाच्या मुळाशी वृष धातूतील पाण्याचे अस्तित्व आणि त्याचे प्रवाहण हे सुप्त रूपाने वावरत आहेत.

प्प्तो व पैशाची प्राकृतच्या मराठीशी असलेल्या सम्बन्ध धाग्याची चर्चा करीत असताना आम्ही गार, गारा शब्द सं. वृष् धातूपासून निघाल्याची चर्चा केलेली आहे. (पाहा चौहान, पृ. १९१-२). पप्तो भाषेच्या अनेक बोली आहेत. अफगानिस्तानची आजची

लोकसंख्या केवळ कोटि, सव्वा कोटीची आहे. पण हा प्रदेश बोलभाषांनी बहरलेला आहे. गंगेच्या खोऱ्याच्या आसमन्तात पसरलेल्या जितक्या हिंदीच्या बोली आहेत, तितक्याच बोलभाषा पश्चिम व आग्नेय अफगाणिस्तानात पसरलेल्या आहेत. सपाट व सुपीक भूमीवर विशाल क्षेत्रात एकच भाषा, परिनिष्ठित रूपाने पसरण्याची प्रवृत्ति असते. पर्वतमय प्रदेशात एकेका खोऱ्यात एकेक बोली हजारो वर्षे जगू शकते. बोली भाषांच्या जीवनासाठी पर्वतमय प्रदेशासारखा जीवनानुकूल प्रदेश असू शकत नाही. म्हणूनच अफगाणिस्तान या पर्वतमय देशात अनेक बोली अस्तित्व टिकवून आहेत, पप्तो भाषेत वृष् धातूचे रूप वोरे-दल म्हणजे वर्षणे, पाऊस पडणे असे आहे. दल हा मूलधातुदर्शक प्रत्यय आहे. म्हणजे तेथे वृष् धातूचे वोरे असे रूप होते.

पप्तोतील दुसरे पर्यायी रूप वरे-दल असेही आहे. अवेस्ता भाषेत वार म्हणजे पाऊस होय. पप्तोच्या वजीरानी बोलीत हे रूप वोर (पाऊस),वरन्दे (पाऊस पडत आहे), पेशावर प्रदेशात वारे-दल (वर्षणे), कोहात भागात वरेगी (पाऊस) असे आढळते.

ईराणीत व पप्तोच्या काही बोलीत सं. व ध्वनीचे ग ध्वनीत परिवर्तन करण्याची प्रवृति आढळते. ईराणीच्या पराची बोलीत सं. वेत शब्दाचें रूपान्तर गी. सं. वितस्ति शब्दाचे ईराणोत गिदस्त, असे रूप आढळते. ईराणीत सं. वृष् धातूचे गर्दीवन, सं. वृक शब्दाचे गुर्ग इत्यादी अनेक उदाहरणे आहेत. काही बोलीत वृष् धातूचे असेच रूपांतर होते. असा बदल पराची, ब्रार्डा बोलीत आढळतो. सं. वत्स शब्दाचे पराची बोलीतील रूप गसो असे आहे. यावरून वृष् शब्दापासून गार शब्द निघण्याची प्रक्रिया दिसून येते. वृष् शब्दाचे अवेस्ता व वंद रूप वार असून पराची बोलीत ते गार असे आहे. दुसरे पर्यायी रूप गोर असे आहे. ओर्मुरी बोलीत ते रूप गोर-एक किंवा गोरयेक म्हणजे वर्सणे, पाऊस पडणे असे आहे. ईराणच्या कम प्रदेशातही हेच रूप रूढ आहे.

सं. वृष् धातूतील व ध्वनीचा ग झाल्याची उदाहरणे ईराणीत कमी आढळतात. एक शब्द गार स्टीनगास याने दिलेला आहे. त्याचा अर्थ उपयुक्त तेल देणारे मोठे झाड आहे व त्या तेलाचा सर्पाचे विष उतरविण्यासाठी उपयोग होतो, असेही सांगितले आहे. हे झाड नागळाचेही असू शकेल. नेमका हाच अर्थ करक या शब्दाचा वरती उल्लेखिलेला आहे. गार हे कार शब्दाचे सरळ सरळ किंचित् रूपांतर आहे. ईराणी भाषेत ज्हाल्, ज्हाल म्हणणे बर्फखण्ड, बर्फ वर्षाव, होय. तसेच ज्हीक्, ज्हीग म्हणजे पावसाचे तुषार असे शब्द रूढ आहेत. पप्तो भाषेत गलई म्हणजे हिमवर्षाव. तसेच पप्तो भाषेत जुलई व ज्हल-ई म्हणजे हिमवर्षाव ही रूपे रूढ आहेत. गलई हा शब्द करक शब्दाचे वेषान्तर आहे हे उघड आहे. र आणि ल यांची अदलाबदल ऋग्वेदातही आहे तेथे मिश्ल (म्हणजे मिश्र) शब्द अनेक वेळा प्रयुक्त आहे क ध्वनीचे ग रूपान्तरही नित्याचेआहे. दुसरे जल-ई व ज्हल-ई रूपेही करक शब्दाची वेषान्तरेच होत. कारण पप्तो प्रदेशात क, ग, ज, व ज्ह ही स्थानपरत्वे एकाच मूळ ध्वनीची रूपान्तरे बनतात. हा नियम ई. ट्रम्प याने आपल्या पप्तो भाषेच्या व्याकरणात आरम्भीच चर्चिलेला आहे याचा उल्लेख आम्ही एका ठिकाणी केलेला आहे. (पाहा-चौहान, पृ. २०८). हाच नियम एच्. डब्ल्यू. बेल्लिव या पप्तो भाषेच्या कोशकाराने प्रारम्भिक सूचनांमध्ये देऊन ठेवलेला आहे. (पाहा–बेल्लिव, पृ. १). तो म्हणतो की ज या ध्वनीचे उच्चारण पश्चिमेकडील अफगान ज्ह असे करतात आणि पूर्वेकडील ज़ ध्वनीप्रमाणे तसेच ज़ (मराठी जत्रा शब्दातील ज ध्वनीचे उच्चारण) ध्वनीचे उच्चारण पश्चिम भागात ज्ह असे होते, तर त्याचे उच्चारण पूर्वेकडे ग असे होते. हे उच्चार परिवर्तनीय असतात असेही त्याने सांगून ठेवले आहे. प् या ध्वनीबद्दल तो म्हणतो की, पूर्वेकडील अफगान लोक त्याचे उच्चारण वृख असे करतात आणि पश्चिमेकडील वश उच्चारण करतात, बऱ्याच वेळा केवळ श् ध्वनीत त्याचे रूपान्तर होते. प् ध्वनीच्या उच्चाराचीही अवस्था भारतात देखील मध्यकाळात सर्वत्र रूढ होती. खुद जुन्या मराठीतही हेच चालू होते. उषाहरण का उखाहरण हे ठरविणे कठीणच होते कारण लिहिलेल्या प वर्णाचा उच्चार ख करण्याची रूढी होती.


**समारोप–**

वरील चर्चेवरून असे प्रतिपादावयाचे आहे की करक आणि कार हे संस्कृतातील शब्द मूलतः वैदिक आर्यांचे नव्हते. ते अफगाणिस्तानातील आर्यभाषीय

(पुढील मजकूर पान १८३ वर)



अनुक्रमणिका




## प्रीत पान्हावुन आली

ज्ञानेश्वर साधु

थेंब थेंब गळतसे
माझ्या शैशवभावाचा ।
मधु पाझरतो जणू
मातृ–सुख–मोहोळाचा ॥

थेंबे थेंबे तळे साचे
अनुभव गोंजारतो ।
पर्युत्सुकता–सरोजी
स्मृति–पराग हासतो ॥

वाहु कुणाला कमळ
कोमलता करपली ।
लुब्ध लेकराच्या संगे
प्रीत पान्हावुन आली ॥

## चाळीस उन्हाळे

म. शं. वावगावकर

चाळीस अुन्हाळे सहज लोटुनी गेले
सखि, तुझ्या संगती त्यांचे हिमकण झाले
त्या शुभ्र हिमाने तुझ्या रुपेरी बटा
नव अधिकच सुंदर पोक्त पुरंध्री दशा ।

स्वप्नात तुला मी सहज पाहिले होते
त्या प्रीतिपथावर दिपाक्त होते काटे
या कलंदराची सहज बांधलिस पूजा
अन् हसून म्हणालिस–
'मम जन्म जन्मिच्या फळल्या काजळतिजा' ।

सखि, सुख दुःखांच्या कितीक वादळ लाटा
आदळल्या वळल्या फुटल्या अपुल्या माथां
पण तुझ्यासंगती भान हरवले नाही
अन् खोल तळाशी अविचल शांति राही ।

कधि अपेक्षिताला वळण मिळावे अुलटे
का हवे हवे ते सर्वच मनुजा मिळते ?
पण जीवन काही शिकवुन अपणां गेले
सखि, तुझ्या संगती जगणे सार्थक झाले ।

तृप्तीत रेखिल्या साफल्याच्या खुणा
कधि तप्त उसासे अतृप्तीचे टुण्या
निरवून सर्व हे अता मुलांच्या हाती
सखि, सुखे आचरू आपण वानप्रस्था ।

संसार जाहला अपुले पुण्यप्रयाग
प्रवृत्ति आळवी निवृत्तीचा राग
शिवशक्ति जाहलो उमा महेश्वर अंगें
सखि, प्रेमसाधना मुकुलित तुझिया संगें ।



अनुक्रमणिका

## ही वाट एकटीची

रेखा निमगडे

ही वाट एकटीची
निर्मनुष्य शांततेची
सत्य वाण त्यांची
सोशिक जीवनाची
उध्वस्त मंदिराची
कधीच तयार न होणारी
ही वाट एकटीची – – –

तहानलेल्या जीवाची
भुकेल्या मनाची
विद्ध भावनांची
तडकलेल्या क्षणांची
नष्टलेल्या ध्येयांची
कधीच न संपणारी
ही वाट एकटीची – – –

ही वाट एकटीची
कांटे कोरांटीची
खडकाळ दगडांची
अंधार दीर्घतेची
संपूर्ण एकांताची
खळखळ संथतेची
कधी न पोहचणारी
ही वाट एकटीची !

## खांदे

कृष्णा चौधरी

किती आल्या सागरलाटा किती गेल्या उलटून रात्री
तुझ्यासोबत भरतीओहटी कधी जाणवलीच नाही
आठवणींची पळसफुलें अशी ओंजळीत जपतांना
असा कोसळलो असा कधी कोसळलोच नाही.
तुझे दुःख तुझे आहे का ? नाही ते माझेही,
शब्द किती साधे, मनस्वी आज मात्र डंसणारे
अर्थातून उन्मत्त होत गेला बेताल अनर्थ
आज खांदे उरले केवळ परवालीच वाहणारे

## एक कविता

रंजना विगम

माती-गवताची झाली
राती झोपडी बांधून
सडा टाकून सन्यानी
केला आंगन्–सवान

पुढं धन्याले पाहून
कशी डोलते जवारी
पानापानातून निघे
कशी हिरवी–भरारी

दाट जवारीत जाता
पाय सोन्याचेच होते
हात पानाले लावता
हासा डोयालेच येते

डोये भरून पाह्यता
उभ्या पिकाले भोवय
ओल्या पदराच्या आडे
झालं कनिस दुधाय

## प्रतीक्षा

उषा लिमये

कसा चुर्गळला माझ्या । मृदु कर्दळीचा काठ
आज शांत का जाहली । माझी वर्दळीची वाट ।

आता उच्चारात आहे । फक्त अर्थावीण गाणे
निळ्या लाटातील ओढ । पुढे स्वार्थावीण जाणे ।

संध्यारंगाचा श्रृंगार । झाला क्षणाचा सारथी
झाली ज्योतीविना मूक । माझी अनोखी आरती ।

आता उजाडणे नाही । आता नेहमीच रात्र
आता चेतन्यावाचून । फक्त चालणार गात्र ।

कधीतरी कुठेतरी । उजळेल का क्षितिज
याच एका स्वप्नामध्ये । माझी निरवली नीज ।

## विष्णुपुराण
शिरीष गोपाळ देशपांडे

बेंबीवर तोलत आहे,
मी, चार फुलांची साय;
छातीवर हुरळत आहे
नियतीचा अंधुक पाय;

निजलेल्या पायांपाशी
उन्मत्त सखीचा खेद:
डंखाच्या पाच मुखांना
पण, कसे कळावे वेद !!

## धर्मशाळा
सुधीर देव

दोन कवडचा फेकाव्या किंवा लाचार होऊन
निःशुल्क पसरवावा देह चिरगुटासारखा
एकमेकांशेजारी कानाकोपऱ्यात
एकेकांचे असणे तेलकट ताडपत्रीवर वेगवेगळे
टिचकीने झटकले तर निर्लज्जालारखे
पायी पडून विरघळून जाणे.
धर्मशाळेचे अस्तित्व केवळ दोन दिवसांचे
त्याचे उध्वस्त होणे न होणे
कोणताच समाज चित्र ढासाळत नाही
हे निश्चित

## जातक कथा इ. स. पूर्व
चित्रसेन शबाब

इ. स. पूर्व रुजलेल्या जातक कथांचे आरण्य
ओसाड डोळयांच्या गुह्य आकारातून फोफावलेलें,
सावल्यांचे उतार वाहाणारे औरंगाबादी रस्ते–
ग्रीष्मतराणे गाणारे किंवा फ्रेस्कोची तादात्म्य गार्णी
माझ्या मांसलखंडावर कोरलेल्या कलामंडपात
उर्वरीत
तुझ्या चित्रलिपीचा शेवटला शब्द अजंठा–
हृदयातल्या यात्रिकाने केलेला मंतर पदन्यास;
माझ्या डोळयांच्या गुह्य आकारावर ललाट रेखा
जातक कथांची इ. स. पूर्व...

## निःशब्द संध्याकाळ
सुलभा हेर्लेकर

एक निःशब्द संध्याकाळ
तुझे नितळ निर्मळ येणे
फेसाळल्या लाटेवरून अलगद पावलांचा ठेका.
निळयासमोर जलाशयाचा अडवलेला किनारा
येण्याच्या वाटेवर लाल जर्द पळसांचे थवे
नको पुसून येऊस असे तुझे
पावसाचे गंधित नाते...

## चाफा बहरलेला
रंगनाथ कुळकर्णी

अमर्याद आकांक्षांची मोहलता बंदिस्त चौकटीत देखील
बहरेल मुक्तपणे कुठल्याहि आर्द्रतेशिवाय !

चाकोरीबद्ध खुज्यांना संपूर्ण समाधानाचे सुख दुर्मिळच
सरडयाची धाव कुंपणापर्यंत– आणि
बिबळाच जाणू शकतो चित्त्याची झेप.

सुखरूप प्रांगणातल्या तुळशीवृंदावनाआडून
जखमी वाघाला हसणाऱ्यांनो,
तोंडातली अर्धी भाकरी सांभाळा म्हणजे खूप झाले !

रोखलेल्या वाटांना धडका देत
समाप्तीतच सार्थक मानणाऱ्या
झपाटलेल्या आत्म्याला जखडून ठेवणारी विशाल
बंदीशाला,
आणि उभ्या विश्वाचे अंगण उणे करणारा
चाफा बहरलेला.

दृष्ट लावणाऱ्या घुबडांनो !
दिवसाढवळचा आरशात आपले रुप पाहून घ्या
ऐकू येतात विषारी धूत्कार तुमचेच तुम्हाला ?

अरे, तुमच्या सडक्या–कुजक्या आत्म्याला
जखडून ठेवणाऱ्या दुर्गंधयुक्त शरिराला
तोंड लावताना गिधाडे देखील शरमतील !
त्या सद्‌गृहस्थांची ती लज्जा कोळून प्या...
गरुडाच्या वाटांची उठाठेव गांडुळांना हवीच कशाला !

## गुंथा . . . !

अविनाश वरोकर

अुजाड वाडा      जलखड भिंती
कमरेतून आरपार खचलेला पिंपळाचा पार
जखमेतून निथळणाऱ्या आसवागत
अकस्मात निखळणारे अेखादे पिकले पान
पिंगट डोळ्यांचा कुणी अुजाड देह
अस्ताच्या अलिकडील अस्तित्वाची आठवण देणारा. !

अुध्वस्त दिवाणखाण्याच्या खांद्यावर
अस्ताव्यस्त वाढलेलं तरोटयाचं तारवटलेलं बन
अवस पुणवेला अुन्मळून पडलेल्या मयालीखाली
रात्री बेरात्री फडफडणारा
कुण्या अतृप्त अभागिनीचा अुसवलेला पदर
आणि त्या पिंगट डोळ्यांच्या मुठभर
हाडांची भेदक थरथर !

अुत्तर रात्रीला अुतरत्या प्रहरात
भेगाळलेल्या भिंतींच्या तडकलेल्या अुरातून
काजळाला छेद देत वातावरणात विरणारे
कुण्या नवजात जाईत्रे दडपलेले स्वर
आणि भुंकणाऱ्या कुत्र्यासमोर फेकलेला चतकोर. . .!

भडक माथ्याच्या पोखरलेल्या छाताडावर
का'ळोखाच्या आक्राळ विक्राळ जबडयात
अनेक अपशकुनांचा साक्षी घुबड
आजही बसतो . . .
अखेरीची दमछाक करीत जमिन दोस्त झालेल्या
अुत्तुंग आडयाच्या विवस्त्र माथ्यावर. . .!

आणि तो पिंगट डोळ्यांचा अुजाडदेह
शून्यात हरवून स्वतःला
अंधार वाटेवरच्या खचलेल्या ढिगाऱ्याखाली
अगणित जखमी पाअुल खुणांसोबत
अुकलीत बसतो गुंथा.   अुभारीत शून्यांच्या
सहस्त्र राशी. . .
अुकलता अुकलता गुंततच जातात धागे
आणि तळावर दिसतात फक्त
जबरदस्तीनं फाडलेल्या निर्व्याज पेशी ..!

## रस्ता

नीळकंठ महाजन

खोदायचाय एक निर्जन रस्ता
ज्या रस्त्यानं वापरायला
सहसा कुणी धजणार नाही असा
कुत्रं मांजरच काय पण
पशुपक्षीही फिरकणार नाही असा रस्ता.

आकाश तर डोकावणार नाहीच.
पाताळापर्यंत रस्ता खोदायचाय.
हा तेवढ्यापुरता टिकणारा प्रकाश
नकोसा झालाय.

पाताळात फक्त काळोख असणार
काळोख तरी सातत्यानं साथ देतो काय
ते अनुभवायचंहि.

आपला शब्दही फुटून आला नाही
म्हणजे येतीलच शोधणारे

आता नका भरून देऊ रे
माझ्या या चिमण्या ओंजळी
सूर्य विझवायला हमखास पुरणार नाही
डोळ्यातलं पाणी.

## पाखरांना

शरद साटम

आयुष्यभराच्या उन्हांत तळ्खलत
हांपणाऱ्या पाखरांना
मी हिरवागार चारा घेऊन आलोय
हें त्याना जाणवलं असेल ?

पिवळचा पडत चाललेल्या शुष्क पिकांवर
तीं बसलींत माझे आयुष्यलोम आठवीत
कधीकाळच्या स्वप्नांत उगवलेले

आत्ता या पाऊसपूर्व ढगांत
माझं आयुष्य मी पेरतोय
उगवेल म्हणून
वांझोटचा शक्यतेत

## नभ पेटले तरी

प्रफुल्ल चौधरी

नभ् पेटले तरी जो तो चालतोच आहे
हा कारवाँ कुणाचा कुणी सांगतो न आहे.
ते दूर कोण गेले क्षितिजावरून काल
मी तोल सावरू तो कुणी पाहतो न आहे.
बोला अजून काही माझ्यात अर्थवाही
मी थांबलो तरीही कुणी बोलतो न आहे.
मागे वळून पाहू देऊ नका क्षणांना
हा संधीचा इशारा कुणी ऐकतो न आहे.
वळणावरील कलणे कळलेही ज्यास नाही
दगडास कालच्या या कुणी टाळतो न आहे.

## सावल्यांची फुले

उत्तम कोळगावकर

माझ्या आस्तित्वाच्या खिळखिळीत टापूत होणारे
सुरुंगांचे स्फोट
आणि त्यांचे कान फाडणारे आवाज
मलाच फक्त ऐकू येतात आहेत
मी कुणालाच सांगत नाही ही दुर्घटना
मलाही.

मी संपूर्ण थरकंपत असतांना
तुझ्यावर कविता करतो
तुला हसवत असतांना
स्वत: मी खूप खूप हसून घेतो
सावल्यांच्या झापेतून केळीच्या बागातून
तुझ्यामागे धावतांना
तुला गुंतवून ठेवतो मी खेळण्यात
तुला मिळूच देत नाही फुरसद
अंधार गोठून काळवंडत चाललेल्या
माझ्या नाड्या पहायला.

माझ्या आस्तित्वाच्या खिळखिळीत टापूत होताहेत
सुरुंगांचे स्फोट
आणि मी वेचून घेतो आहे
वेचता येतील तेवढी
सावल्यांची फुले.

## द्यूत

बाळकृष्ण वन्नोरे

तुझ्या अमृताच्या वाटीत
बुडविले आभाळ पोळलेले – – –
पसायदाने वेढिले – – – आ – पाद – – –
दुर्ग दुरितांचे – – –
शतकानु – शतकांचे तर्पन लावले पणाला
पण हरला धर्म – – – हरली पांचालीही – – –
गीतेच्या गवळणी सह – – –
धम्म पदांच्या झिम्म्यांत
एक उत्तप्त मनस्विता – – –
उगाळित फोड तळहातावरचे
डागत आहे श्वेत – प्रदरी त्रिपुण्ड्र
नाभीवर धरतीच्या – – –
दु:स्वास करीत उभ्या आयुष्याचा – – –
गांधारीच्या चक्षूने निरखीत '
विटक्या वस्त्राच्या जिद्दीत – – –
शिव–पार्वतीचे ते प्रागैतिहासिक
द्यूत–कर्म – – – मर्मभेदी – – – अविकल्प
चाललेले बेदरकार
अंतर्गाभाऱ्यात– – –
नंदीश्वराच्या सवत पहाऱ्यात

## सावधान !

मु. वा. कांत

सावधान
आठवर्णीचे असंख्य बेलगाम घोडे खूर झाडून उधळलेत.

सावधान
दिशाविशांतून रक्तलाल सांजरंगांची डायबेटीक
जखम भळभळतेय.

सावधान :
हे निकोटीनचे धूम्रढग आभाळापर्यंत झांकोळून आलेत.

सावधान
स्लो पॉयझनींग केलेले कित्येक काळे दिवस
धडपडू पहाताहेत.

सावधान :
नाक्यानाक्यावर भविष्याची भयाकूल भूतं गस्त
घालू लागलेत.

सावधान.

## माणसं जागी असली तर

नीलकांत ढोले

माणसं जागी असली की सूर्य कवेत घेतात–
किंवा पिकनिकलाही जातात ज्वालामुखीवर
आणि भरतात चुळा तप्त लाव्हारसाच्या
अग्निलोळांच्या नक्षीदार कमानीतून
ताठरपणे तुडवित जातात फुललेल्या
निखाऱ्यांचे ढीग.. !

माणसं जागी असली तर...
संगिनींना थरकांप सुटतो, बुलेट्सच्या पेपरमिंट
अन् माईन्सचे फुटबॉल होतात.
कळ्या फुलतात लोखंडी... हाताहातावर !
हंसणे उद्दाम त्यांच्या ओठाओठावर
मारून टाकतात हुंकार त्यांचे
क्षितिजे दिशादिशांची !
किती ओवाळावा जीव त्यांच्या पावलापावलावर
मासावर तुटून पडणाऱ्या गिधाडांची
झुंबड उठते रंगीन आकाशात !
आणि कावळ्यांच्या कंठातून पाझरू लागतात
अंधारसुक्तें... !

माणसं जागी असली म्हणजे
फासाच्या किमती वाढतात
भिंती तुरुंगाच्या आणि रांगा बुजगावण्यांच्या
कफनांचे दर तेज होतात,
वस्तू महागतात मतिकाच्या–
तृप्त होते प्रेताच्या टाळूवरील लोणी चाटणाऱ्या
'इमान'दार कुत्र्यांची पिलावळ
थरारतात टिनोपालचे टिनपाट पिसारे
थांबतात घुवडांचे फितूर घुमारे
थबकतात जागोजाग झेपावणारे वारे
उरात वादळ घेऊन घोंघावणाऱ्या–
प्राणांची शपथ !
माणसं जागी असली की–
काळोख पिवून टाकतात
थुंकण्याऐवजी बेधडक डांबर फासतात
संगमरवरी शिल्पांच्या निरागस स्मितावर
भिंती हादरू लागतात आणि ऐकू येतात
चिऱ्याचिऱ्यांतून क्रांतीचे उद्घोष !
माणसं जागी झालीत की–
त्यांना झोपविण्यासाठी गायिली जातात
निरर्थक घोषणांची मंजूळ गीते–
आणि उठविली जाते फालतू नशाबंदी हास्यास्पद !
कारण माणसं जागी असली की
सूर्य फुलून येतात जळण्यासाठी !
जाळण्यासाठी !

## शनीच्या पाराजवळ

श्यामकांत कुळकर्णी

ऐन चौकातील शनीच्या पाराजवळ
वाहनांची वर्दळ, माणसांची सळसळ
चालते आहे अहोरात्र
आज गर्दीत वाहत चाललेल्या माझे
पाय अकल्पितपणे इथे थबकतात
पादत्राणं दूर सारून पावलं
प्रदक्षिणा घालू लागतात
पण हे 'महान् देवा' ! तुला मी काय वाहू ?
बाजूच्या दुकानांतले पुष्पहार
सभासंमेलनांसाठी संपून गेलेत
मिठायांचे ढीग पार्ट्यांसाठी
सत्कारणी लागले आहेत
देवापुढं 'पैसा' ठेवावा, तर
पैशालाही आता मोल नाही
माझ्या खात्यावर काही पुण्य ?
शक्य असेल, असं वाटत नाही
माझं चित्त, माझं मन, माझं हृदय
तेही निव्वळ भेसळच आहे... !
तथापि हे महान् देवा,
माझ्या लेखी मात्र जो पापराशी आहे
ती मात्र निखळ शुद्ध आहे, कारण
ललाटरेषा तिची जननी आहे
तीच तुझ्या चरणी नम्रभावे समर्पण
ती तुला नम्रभावे समर्पण... पण
साडेसातीच्या तुझ्या फेऱ्याच्या
भीतीनं नव्हे. कारण आता
जीवनचक्रात अहोरात्र
सर्वत्रच साडेसाती चालू आहे

## मी

श्रीपाद शंकर कावळे

माझी प्रत्येक हालचाल
स्वतःशी क्वचितच संबंध
कितीतरी दूर माझ्या पासून
धाडस होत नाही म्हणायला 'मी' माझा
कित्येक डाव खेळून गेलो
मी तेथें नव्हतो
माझ्या प्रत्येक आकृतीत
'व्यस्त' माझेपण
झाडापासून विलग झालेल्या फांदीगत
माझे अस्तित्व अनाठायी
आस्थाविहीन
अलग, सलग काहीच नाही
माझ्या सावल्यांत मी नव्हतो
प्रत्येक दृश्य
एक प्रात्यक्षिक
एक प्रत्यंतर
एक अविर्भाव

## जगण्याची जाणीव जोपासतांना

नीलकृष्ण देशपांडे

अखेर खरं ते सांगून टाकण्याची वेळ आता आली आहे
आयुष्यभर जगलेल्या जीवनाचा, भोगलेल्या क्षणांचा
हिशोब देणे आहे
अर्थहीन जीवनात माणसाळलेले आई वडील बहिण भाऊ
बायकोही त्यातच मुले बाळे वाटते क्षणभर सुखाने राहू
प्रत्येकालाच असते आयुष्य जगण्यासाठी, भोगण्यासाठी
आपल्या सारखे
नाते केवळ स्वार्थासाठी शेवटी व्हायचेच असते
सर्वांना पारखे
ठरविलेले कधीच घडत नसते ठरवूनही कित्येकदा
हे माझे, ते माझे अस्तित्वाच्या संदर्भांसाठीच प्रत्येकदा
जगण्याची जाणीव जोपासतांना जन्मभर असेच
असते साऱ्यांचे
आणि मरणापर्यंत जगतांना अपरिहार्यतेने
वाढलेल्या पसाऱ्यांचे

## रिकामी झोळी

निरंजन उजगरे

कवितांच्या ओळी झोळीत टाकून
निघालो एकदा मुशाफिरीला.
स्वागतोत्सुक वृक्षांच्या गमतीदार टोळ्या.
किलबिलत होत्या आजूबाजूला,
गुणगुणत ओळी पहाटगाण्याच्या
नाचली पावलं;
थकली पावलं–
सूर्याने नंतर छावण्या उभारल्या.
निष्पर्ण वृक्षांनी संगिनी रोखल्या;
भेगाळली पावलं.
तहानली पावलं–
एक घोट पाण्यासाठी,
देऊ केल्या कवितांच्या ओळी.
मी पाहिलं,
लयबद्ध लांब सावल्या.
मला दगडांनी ठेचीत होत्या–
दुर्लक्ष करून.
युद्धभूमी निमूट सोडली
सावरत–सावरत रिकामी झोळी.

## आकृतिहीन चेहरा

वि. शं. तेलकुंटे

काल पाहिलया स्वप्नात
देशाचा
नकाशाच कसातरी
– ओबडधोबड : छिन्नभिन्न !
विचारले –
कां रे बुवा –
असा. का ?
कालपर्यंत तर बरा दिसायचा
उडत असल्या पतंगासारखा !
आज असा का ?
आकृती नसल्यासारखा !
म्हणाला –
'माणसांच्या चेहऱ्यांनाच
कुठं –
आकृती राहिली आहे आता ?'

## डूब

बजरंग सरोदे

काळोखली रात
लकाकते वीज
धूवाधार वर्षा
तिला चढे माज !

शाबूत घरटे
आत भरे तेज
निवान्तशा वेळी
चाले हितगुज !

विसावल्या देही
फूलपंखी ऊब
चोचीमधे चोच
अंतरात डूब

## विधी

शरद पिदडी

घेऊनिया उगाची आलात पुष्पमाला
माझ्या कलेवराला त्या पाहिजे कशाला।

आयुष्य पूर्ण गेले नेसोनिया जुनेरे
मेल्यावरी कशाला हे शुभ्र वस्त्र कोरे।

आतावरी कधीही ढुंकून पाहिले ना
खांद्यावरी मढे हे वाहून चालला ना।

मी भीक मागतांना सर्दावले न कोणी
घ्या चाखुनी जरासे टाळूवरील लोणी।

लावोनी बँडबाजा काढा वरात माझी
मारे स्तुती कराया द्या भाषणे फुकाची।

संपूर्ण जीवनाची झाली असून होळी
घ्या जाळुनी कुडीला भाजावयास पोळी।

माझ्या भुकेपणाची ना राखिली फिकीर
फेडून आवडीला घ्या ओरपून खीर।

आजन्म राहिलो मी घेवून भूक पोटी
व्हा मोकळे गड्यांनो देवून पिंड ओठी।

का वाट पाहता हो त्या दुष्ट कावळ्याची
झाली असेल घाई तुम्हास भोजनाची।

मेल्यावरी कशाला वा पाळता विधीही
माझे जितेपणी जो ना पाळला कधीही।

## मला नीटसं कळत नव्हतं तेव्हाची गोष्ट

कृष्णचंद्र ज्ञाते

मला नीटसं कळतं नव्हतं तेव्हाची गोष्ट
तेव्हा माझ्या गोळीबंद स्वत्वाला कसलीही वेष्टणं नव्हती.
स्वत्वाचा हा गोळीबंदपणा मी नुकताच कुठे
जपायला शिकत होतो तेव्हा
तृप्तीचे श्वास अनावर होत होते
पायापासून केसाच्या टोकापर्यंत
विद्युत्लहरींचे लोट वाहिल्यागत
गदगदून येत होते.
शिकंदरे आझमच्या शिरस्त्राणावरील डौलदार
रोंगटचागत
स्वत्व माझे लवलवत होते.. दर पावलागणिक.
भोवतीच्या हिमवादळाची नव्हती पर्वा
नव्हती अंधाराची भीती
माझे नव्हतेच काही होते स्वत्व अवघे माझे...
तेव्हा कसे जगल्याजगल्यासारखे वाटायचे...

मला आता नीटसं कळतंय तेव्हाची गोष्ट
आता पावलापावलावरल्या लढाईत
स्वत्व अवघे माझे भुईसपाट.
रोमरोमागणिक माझ्या
जखमा खड्गाच्या—बुजलेल्या.
सारे शरीर कसे आता
बुळबुळीत.
आता थरथरता एक थेंबही पाण्याचा
ठरत नाही शरीरावर.
मी आता नखशिखान्त
वज्र
जगण्यासाठी झुकताना.



अनुक्रमणिका

## सीमोल्लंघन !

मंदा कदम

जेव्हा दाटून येते ऊर
तेव्हाच धीरगंभीर, स्थितप्रज्ञ आभाळातून
'कोसळतात' जलवंतीच्या असहाय्य हळव्या व्यथा...

जेव्हा दाटून येते ऊर
तेव्हाच
श्रावणचुडा ल्यालेल्या वल्लरी देखील
पांढऱ्या शुभ्र 'सुमनांचे'
अश्रू ढाळू लागतात
आठवणींसारख्या सतत ओल्या
मातीवर

जेव्हा दाटून येते ऊर
तेव्हाच
युगायुगांची शल्ये
प्रवाहाबरोबर बेगुमानपणे वाहून नेणारी सरिता
बावरी होते...
दोन काठात वहायचे सोडून...
किनाऱ्याला कवेत घेते...

जेव्हा दाटून येते ऊर
तेव्हाच
पंख कापलेल्या जटायूकडून देखील
घडते सीमोल्लंघन..
आखीव सीमेचे.. !

## यांत्रिक

वासंती इनामदार

किती मिळवावे सुख
स्वार्थ शिणला शिणला
रित्या आनंदाच्या काठी
देह डुबला डुबला.. !
देह डुबला डुबला
झाले सार्थक दुःखाचे
किती जुळवावे वण
सारे यांत्रिक उन्हाचे. !

## एक कविता

लक्ष्मीकांत प्रामाणिक

अंबरठा ओलांडला
माणसांच्या कळपात आलो
आधी मागे रेंगाळलो,
मागचे पुढे गेले
त्यांचे झिडत्कारू श्वास झोंबले;

मग मीही तिरीमिरीत घुसलो
श्वास अंचावून चरू लागलो
दुशा देत दुशा घेत
पाय तुडवीत तुडवून घेत
आपण किती जोरात तुडवलं
या समाधानात श्वास घोळीत;

एकाला विचारलं: किती चरलास रे तू !
म्हणाला: या कुरणातून हलालपट्टी झाल्यावर
रवंथायची तरतूद करायचीय् ना !

थोडं थांबलो, पुन्हा विचारलं :
काय रे, आपण चरत सुटतो असं ओरबाडल्यासारखं
कित्येकांच्या रक्तालाच इजा पोचत असेल,–
–आपल्याही ?

तसा तो प्रसन्न हसला, म्हणाला:
माणसांच्या कळपात चरता चरता
अधून-मधून असंच कुंथायला होतं
अगदी आंतून चरचरून.
मग आपण कसे घट्ट होत जातो !

नंतर मला काहीच सुचलं नाही
मी बहुदा रवंथत बसलो;

घाईघाईनं परतलो
अंबरठा ओलांडला
ती लावत होती सांजवात
प्राणज्योतच पेटली
थरथरत
फुटला हुंबरडा
शुभंकरोति कल्याणम्

## पावसाळा

मोहन पाटील

किरमीजी 'पावसाळा
शहरभर सडलेली उदासिनता
ओतत रहातो. थांबलेल्या कोकरावर. लेकरावर
घरादारावर. बेदम पछाडलेल्या झोपड्या
अलगद उचलतात आपलं दारिद्रय..
जसे हिरमुसले कुंकू ढळावे
कपाळभर, तसे रस्त्यातहि.. सगळीकडे
भरवशाचे हात तुटलेल्या या झोपड्या
आपल्याशीच ढसढसत राहाणार. गळाभरुन
मी पावसाळा पाहातो
माझ्या भोवती साकळलेल्या
अश्रूचा थेंब बनून
आभाळभर कोसळताना.

## वाटतं आकाशभर

धर्मराज निर्मसरकर

वाटतं आकाशभर रडून घ्यावं
दिशा दिशा चिंब होइस्तो
होइस्तो डोळ्याचे विवर
अंधारावर काजळ येइस्तो
येइस्तो उचंबळून समुद्र
जाइस्तो वाहून पाऊस
क्षणाक्षणाला साचणारा–
उन्मळून पडलेला पहाडावरून
पराजीत होवून परतलेला जंगलातून
होळपडून निघालेला वाळवंटातून
वस्त्या वस्त्यातून गस्ता घातलेला
लक्तरं ओढून झोपण्यात
व्यय केलेल्या जगण्यातून

वाटतं रडण्याच्या भेसूर
सूरांना पिवून घ्याव आकंठ
जीव बुडून जाइस्तो
गात्र सैल होइस्तो
होइस्तो आभाळ हलके
ठेंगणे ठुसके झोपड्या सारखे
पसरलेले अस्ताव्यस्त
इथे तिथे पोरके बोरके
लेण्यां सारखं कोरून घ्यावं
नाही तरि आहे कुठे
गळत बंदिस्त होवून बसलेल्या
हुंदक्यांना गावचे माहेर
चार दिवस घालविण्यासाठी

## विश्व

किशोर पाठक

विश्व उजाड उजाड
डोळी कुसळल्या राती
घरादारात पेटल्या
लाख गाभणल्या मोती

विश्व उजाड उजाड
दिस रडले मोकळे
पानापानात दिसले
अंग वेगळे वेगळे

विश्व उजाड उजाड
रान झालं माती माती
देठ बेंबीचा फुटून
वाहे प्राणांतिक नाती.

## ठेव द्यावी सांभाळायला

सुशीला पगारीया

ठेव द्यावी सांभाळायला कोणी कपाटाआत–
तितकाच सांभाळलेला तुला उदरांत
(करू शकला असता जे कुठलाही स्त्री देह)
कळत नाही का यावे भरून–
अहं वरून ममत्व कर्तृत्व नसतानाही
कशासाठी घालाव्यात वेड्या..
नसलेल्या ऋणाच्या भरतीच्या पायात
विसरावं का ? मागच्या लाटेने दिलेला खो
पुढच्या लाटेला...
कशासाठी यावा दाटून उमाळा
निरखतांना तुला. कुरवाळताना ?

## माझ्या आठवणींचं क्षितिज
बाळ राणे

माझ्या आठवणींच्या क्षितिजावरून
यातनांचे लालभडक किरण खाली उतरतात.
झाडावर बसलेला कावळ्यांचा थवा
कर्कशपणे कावकाव करीत
क्षितिजाच्या रोखाने येतो.
क्षितिजाखाली पडलेल्या एका बेवारशी प्रेतावर
ते तुटून पडतात.
त्यांच्या कल्लोळानं क्षितिज हादरत.
तेथून खाली उतरणारे यातनांचे किरण
वैफल्याच्या लाल मुंग्या डसल्यासारखे
थयथय नाचतात
पिसाटासारखे भेसूर हसतात.
पायाखाली पडलेल्या प्रेताच्या सांगाड्याकडे बघून
माझ्या आठवणीचं क्षितिज
पेटलेल्या यज्ञकुंडासारखं धडधडू लागतं.

## त्यांनी मला
अशोक सोनवणे

त्यांनी मला झिडकारावे
अथवा एकाकी करावे
मी मला संतुलित करावे
अथवा एकांती विरावे...

काजळीने अरण्या गिळावे
अथवा आकाशा किट्ट गावे
डोळ्यांची तळी आटवीत जावे
अथवा प्रदूषणी हतबुद्ध व्हावे...

व्हावे निखारे कोळशांचे
अथवा गितांचे अंगार व्हावे
अश्रूंचे अर्घ्य अर्पीत जावे
अथवा शब्दांनी कुरूप व्हावे

त्यांनी मला धुत्कारावे
अथवा नगण्य गणावे
नाणे बद्द वाजो वा खण्ण्
मी स्वत:ला मोजीत जावे...

## पाच रुबाया
शिरीष

रुबाईच्या धुंद जगीं माझा मला विसरतों
पैंजणांच्या झणत्कारीं कसा धुंदावुनी जातों
नको मला मद्यपेला, तुझा सहवास होतां,
तुझ्या चुंबनासाठी मी अधीरसा तरसतों

सुगंधाची बरसात जवळीक होऊं गेली
तुझ्या माझ्या मीलनांत पुष्प आभा फुलोरली
निशिगंध तुरा आणि रातराणीचा पिसारा
तुझ्या माझ्या श्वासांतून पुन्हा नवती फुलली

तुझ्या नजरेंतून विश्व मला पाहुं दे
तुझ्या श्रुतीभरून गीत मला ऐकुं दे
हरवून जाउं दे मला एकरूप होतांना
तुझ्या हृदयामधून श्वास माझे रुंजुं दे

उत्तरेला ध्रुवावर तुझा पदर फडफडतो
दक्षिणेच्या सागरांत जीव माझा तरंगतो
कशीं पाहूं मीलनाचीं स्वप्नें अशा विराणांत–
दक्षिणेचा वारा कधी उत्तरेला भरारतो ?

अनामिकें, त्वदीय संगतींत रंग रंगलों
गान ऐकतां वितान तान भरुनि दंगलों
सुगंध सांडला अमाप, रापणींत आसमंत–
भंगतां अशी सुषुप्ति, कोरडाच राहिलों !

## तळ्यात की मळ्यात
कुंदा केकरे

सारं सारं खरं आहे तरि एकूण
एक खोटं आहे;
खऱ्या खोट्याच्या अभिजात सीमाच मुळी
पुसल्या जातात.
अर्थात शून्याच्या हिंदळत्या कडीवरच
बांधायचं आपलं इवलसं घरटं
अन वेडावत राहायचे शून्यालाच
तळ्यांत की मळ्यात ?
तळ्यांत की मळ्यात

## अंतरीच्या अनंतांत... तु. ना. काटकर

अंतरीच्या अनंतांत...
अमृताचा मेघ वाटे
अवकाशीचा गंगौघ
प्रियरत्नाकरा भेटे !

अंतरीच्या अनंतांत ..
किती चांदण्या नक्षत्रे ?
विश्वसाहित्य-सागरीं
तरंगती दिव्याक्षरें !

अंतरीच्या अनंतांत
हेलावता भावसिंधु
किती उसळती लाटा ?
नभीं गाठाया पूर्णेन्दु !

अंतरीच्या अनंतात...
कलेभोती फिरे शास्त्र
अव्यक्तांतुनी झडवी
प्रतिभादेवी शब्दास्त्र !

अंतरीच्या अनंतांत
नवनवोन्मेष सदा
विश्वहंसावरी सिद्ध
विश्वमोहिनी शारदा !

## तो जुळवीत होता... यशवंत मनोहर

तो जुळवीत होता गाण्यासाठी हृदयाचा पाचोळा
युगभर काळोखातून होडचा काढीत होता
मावळलेल्या.
काढीत होता कंठातील धूळमाती सूर्याकडे सरकत.
तेव्हा त्याच्या पावलांना पैंजणाच्या कळपांनी
वरले होते.
त्याचे आयुष्य तो तिच्या बाहूभर
नाचत राहू देणार होता.
त्याला माळायची होती एक मस्तानी पुनव
तिच्या सुगंधसाकार देहभर.
आणि एके पहाटे तिने आकाश बदलून घेतले.

पुढे जन्मभर साहिल्या त्याच्या ओंजळीने
फुलांच्या मुकाट आत्महत्या.

चुरगाळलेल्या दिवसांच्या उकिरडयावर
शब्दांना उमलणे साधले नाही नंतर
हृदय निषेधून गेल्यावर नक्षत्रांची आरती
चकोरांचे आभाळ पुढे चंद्राशिवाय आटत राहिले
इथेच त्याच्या भक्तिचा शिरच्छेद झाला.
झाली डोळघातील प्रार्थना मंदिरांची खांडोळी
इथेच पाहिला त्याने तळहातावरून
विषारी नांगर फिरताना, होताना
बरगडयांची ओंजळ लोळागोळा.
पुढे त्याच्या चंद्रांगिनीच्या मावळतीला
त्याने बरगडयांचे तुकडे वेचून
मुक्तांचे नित्य व्याकूळ तोरण बांधले.
आणि फुलांच्या स्मशानात तो फुलपाखरांचे
हुंबरणे शापाप्रमाणे भोगत राहिला.
भोगतच राहिला.
आयुष्याची दातखिळी बसल्यानंतरही
जन्मकळा.

## एक कविता वसंत माने

सूर्याचा रथ
गर्द झाडीतून जाताना
घोडयांच्या टापा
टच टच रुतल्या पाणथळ जमिनीत
पाणी भुळभुळलं चाकोरीतून
चिंचा शहारल्या, थरारला निंब
दूरात लपलेल्या उजाड हवेलीत
वाळलेल्या तुळशीच्या वृंदावनावर
बसलेला मोर
टकटक बघायला लागला
मान वाकडी करून
येशील ? येशील ?
जीव कंठात गोळा झालाय

# मिळ्या कैकाडी

सी. ही. धनवाडीकर

पश्चिमेकडची टेकडी चढल्यावर सारं गांव आणि शिवारही पायाखाली दिसू लागली. हिवाळ्यातील सायंकाळची उबदार किरणं आल्हादकारक वाटत होती. बदामी रंगाच्या माळा-माळातून दिसणाऱ्या हिरव्या दाट झाडीतून वहाणाऱ्या नदीच्या पृष्ठतलावर पडलेलं सूर्याचं सोनेरी किरण वाऱ्याच्या झुळकीमुळं थरथरत होतं आणि त्या चमकणाऱ्या पाण्याच्या ऐलतिरावरील शिंदीच्या झाडाचा डेरा शेंदरी रंगाच्या आकाशामध्ये वाऱ्याबरोबर डुलत होता. त्या झुबक्याच्या खालच्या बाजुला कुणीतरी माकडासारखं बुंदाला चिकटून त्यावरील पन्हाळ्या कापीत होतं.

माझ्या थकलेल्या मनाला हा देखावा फार मजेदार वाटला. मी खाली आलो आणि त्या झाडाखालच्या हिरवळीत त्या गृहस्थाकडे पहात उभा ठाकलो. त्याचं माझ्याकडे लक्ष नव्हतं. शिवाय त्याची पाठ माझ्याकडे असल्यामुळं मी पण त्याला ओळखू शकलो नाही. परंतु त्याच्या अंगातील ढगळ बाह्याचा आणि पाठीवर दुहेरी कापड लावून शिवलेला सदरा, डाव्या हातात चांदिचं कडं, गळ्यातील काळा दोरा आणि गालाच्या टोंगळाखालून दिसणारा मिशाचा पिळदार झुबका; यावरून हा काळ्या रंगाचा धिप्पाड बाबा कैकाडीच असावा असा मी तर्क केला.

एक आठवड्यापासून कैकाडी लोक आमच्या गावात येऊन राहिले होते. रानातून शिंदीच्या फोकांचे गठ्ठे गाढवावर लादून आणीत आणि त्यांची कणगी टोपली करून गावात आणि आसपासच्या खेड्यात नेऊन विकत होते. बायकापोरं गावातल्यागावात फिरून त्यांची विक्री करीत असत. पहाटे पासून ते दिवे लागणी पर्यंत त्याचं काम सतत चालायचं.

शाळा सुटली म्हणजे कांही मुलं त्यांच्या कॅंपकडे जात असत आणि त्यांची ती विचित्र भाषा, पोषाख आणि त्यांच्या पोरांचा खेळ वगैरे पहात उभी राहत असत. पण त्यांच्यापैकी कोणाचंहि लक्ष आमच्या मुलांकडे नसायचं. मोठी माणसं कमलीतरी बडबड करीत काम करायची आणि आपमानच हसायची. त्यांची मुलं बाजुला एकत्र जमून वाटी एवढाल्या टोपल्या करीत खेळत बसायची. आपसातच कसल्यातरी शिव्या देऊन भांडायची, रडायची पुन्हा खेळायची.

या सगळ्याची आमच्या मुलांना मोठी गंमत वाटायची. त्या मुलांच्या लहान टोपल्या आणि कणगी पाहून आपणहि तशा वस्तु त्यांच्या जवळून करून घ्याव्यात असं त्यांना वाटायचं. पण ती मुलं यांना बोलता बोलत नव्हती. काही विचारलं तर कुणीतरी तेवढ्यापुरतं सांगायचा आणि पुन्हा खेळायला लागायचा.

एके दिवशी आमची मुलं त्यांचा खेळ पहात उभी होती. "अशाच टोपल्या आम्हाला करून देना का रे ?"

आमच्या मुलांपैकी राजु त्यांना म्हणाला परंतु त्यांपैकी त्याला कोणीच उतर दिलं नाही. म्हणून इतर मुलं त्याची टवाळी करून त्याला चिडवू लागली, हसू लागली. कैकाड्यांच्या मुलांना वाटलं ही पोरं आपल्या खेळाला आणि आपणाला पाहून हसत आहेत. त्यांच्यातील एक गुटगुटीत काळा मुलगा उठला. "अबे ये !" तो म्हणाला "का हसतोस बे ? ज्यातुम की नाई ? चॅल." त्या मुलाचा काळाकुट्ट अवतार गळ्यातील पेटी आणि दोन्ही टिरीवर भोकं पडलेली दाटकी चड्डी; हे पाहून या मुलांना आणखी हसू आलं. ती मोठ्याने हसू लागली, तो काळा छोकरा चिडला आणि बारीक फोक घेऊन राजुच्या अंगावर आला राजुहि काही भित्रा नव्हता. तोहि सरसावून पुढे गेला. दोघांची झटापट झाली. इतक्यात एका कैकाड्यानं येऊन त्यांना सोडवलं. मुलं घरी गेली. राजुहि घरी गेला. त्यानं आपल्या आईला ते सांगितलं. राजुला घेऊन ती आली आणि राजुच्या हाताला धरून रागाने म्हणाली "कुठं हाय ते कारटं ? दाखव ! आता त्याचे कान उपटते." राजुनं तो काळा पोऱ्या दाखवला. राजुची आई त्याच्यावर धावून गेली-पण तो पोऱ्या रानडुकरा सारखा पाय

अनुक्रमणिका

रोवून उभा ठाकला. कैकाडी लोकांनी तिची समजूत घातली. त्या पोराचा स्वभाव ओळखून तीही चपापली आणि त्या कैकाड्यांना गाऱ्हाणं सांगू लागली. एक कैकाडी तिला म्हणाला "पोराच्या भांडनात तू कशाला आलीस माय ? उगी गपचीप जा. हा एका गरीब बापाचा ल्यॊक हाय !"

या लोकांना कपिलेसारखं समजणाऱ्या राजुच्या आईनं त्यांना इंगळीत जमा केलं आणि वलवल करीत ती निघून गेली.

थोड्या वेळानं मी त्या सर्व मुलांना तिथून घालवून दिलं. त्या काळ्या मुलाकडे बोट करून मी एका कैकाड्याला म्हणालो." हा पोरगा कुणाचा आहे ?"

"भिव्याचा" त्याची एक लहान मुलगी म्हणाली "तो पावन्याकडं गेलाय आनकीन आला नाय."

दुसरा कैकाडी त्या मुलीकडे रागाने पाहून तो तिला काही तरी म्हणू लागला. सगळी माणसं त्याच्या भाषेतून तिला रागाने काहीतरी बोलत होती. मी घरी निघून आलो. त्या लोकांची नावे मला माहीत नव्हती पण येता जाता मी त्यांना नेहमी पाहिलं असल्यामुळे मला त्यांची तोंडओळख झालेली होती.

झाडावरील हा माणूस त्यांच्यापैकीच कोणीतरी असावा म्हणून त्याला म्हटलं "कोण आहे वरं ?"

खडा मारलेल्या माकडा सारखा तो दचकला आणि मागं वळून त्यानं माझ्याकडं चांगलं निरिक्षण करून पाहिलं. थोड्या वेळानं घोगऱ्या आवाजात त्यानं मला "कां वरं ?" असं म्हटलं व पऱ्हाळ्या कापायला पुन्हा सुरुवात केली. मला थोडं आश्चर्य वाटलं कारण मी पाहिलेल्या कैकाड्यापैकी तो नव्हता. शिवाय आपल्या प्रश्नाचं उत्तर तो अशा त्रोटक आणि निर्भिड शद्वातून देईल असं मला वाटलं नव्हतं. माझी निराशा झाल्यामुळं बराच वेळ मी गप्प राहिलो. त्याला काय वाटलं कुणास ठाऊक ! त्यानं माझ्याकडं एकदोन वेळा फिरून पाहिलं. हातातील कत्ती कमरेला खोचून तो खाली उतरला. कत्ती काढून पुन्हा पऱ्हाळ्या साळू लागला "तू कोन ?" साळता साळता तो मला म्हणाला. अशा लोकांची निबरट भाषा माझ्या अंगवळणी पडलेली होती.

"शाळा मास्तर" मी सरळ उत्तर दिलं. साळायचं बंद करून मला त्यानं खालून वरपर्यंत एकदाच पाहून घेतलं आणि हसरा चेहरा करून तो म्हणाला "याचं खेड्यात ऱ्होतोस ?"

शाळा मास्तर म्हटल्यानंतर तरी मला तो नीट बोलेल असं वाटलं, पण त्यानं आपल्या बोलण्याचा तराटा सोडला नाही. मी फक्त "होय" म्हणालो.

"कुणाच्या घरी ?" पुन्हा त्यानं प्रश्न केला. आता त्याचा प्रश्नाची उत्तरं देऊन मोकळं व्हावं म्हणून मी म्हटलं "किशनरावाच्या".

"तो सकाराम पाटलाचा पुतन्या ? त्याच्याच घरी ना ?"

मला त्याच्या बोलण्याचं नवल वाटलं. या गावात येऊन आपण नव्याचे जुने झालो तरी गावातील बऱ्याच लोकांचा मला परीचय झालेला नव्हता आणि कधी न पाहिलेला हा नवखा माणूस सखारामाची व किशनराव सारख्या श्रीमंत जमीनदाराची ओळख सांगतो. चांगली माणसं सर्वांच्या परीचयाचीच असतात ही गोष्ट खरी. मग किशनरावासारख्या साध्या पुतण्यापर्यंत ओळख काढणारा हा परका कोण असावा असं माझ्या मनात येऊ लागलं. मी उगीच होकार दिला. आणि हा माणूस आपणालाच आता काही काही विचारीत सुटणार म्हणून मीहि त्याला त्याच भाषेतून प्रश्न केला. "तू कोण ?"

"असं काय इचारतोस ? मी कैकाडी न्हव काय ?"

"तसाच दिसतोस पण आमच्या गावातल्या पैकी दिसत नाहीस. माझ हे बोलणं ऐकून त्यानं साळायचं बंद केलं, माझ्याकडं थोडं पाहिलं आणि मग तो म्हणाला "दुसऱ्यायला वळकितोस ?"

"फक्त तोंडओळख आहे."

"मग माझी तोंडओळक ऱ्हाई ?"

"नाही !"

तो हसत पुन्हा पऱ्हाळी साळु लागला. "बरोबर बोललास" तो म्हणाला "मी सोयऱ्याच्या घरी व्हतो. आजच आलोय."

"काय नाव तुझं ?"

डोळ्याच्या कोपऱ्यातून त्याना माझ्याकडं पाहिलं आणि वरच्या ओठावर जिभेचा शेंडा दाबून त्यानं फोकाच्या आगाडर्यावर जोरानं कत्ती मारली आणि तो

आगारडा तोडून टाकला. त्यानं दुसरी पन्हाळी घेतली आणि म्हणाला, "माजं नाव व्हय?" पुन्हा दोनचार पानं साळून फोकाच्या वुडुखावर त्यानं जोरानं कत्ती मारली आणि त्या झटक्यातच "भिव्या" असं म्हणून पुन्हा फोक साळायला त्यानं सुरुवात केली. हा गृहस्थ काही नीट बोलायचा अंदाजा दिसेना. राजुनी भांड-लेल्या काळचा पोराची मला आठवण झाली. राजुची आई त्याच्यावर धावून गेली त्यावेळी "हा एका गरीब बापाचा ल्यौक हाय" असं एका कैकाड्यानं तिला म्हटलेलं होतं. तो गरीब भिवा हाच याची मला खात्री झाली. अशा माणसास आपण काय बोलावं म्हणून मी गप्प राहिलो. एक गोष्ट चटकन माझ्या ध्यानात आली. आमच्या वत्सलानं एक टोपली करवून घेण्यासाठी मला विचारलेलं होतं.

"एक टोपली करून देतोस का?" मी त्याला म्हटलं.

"हां हां ! तोइ माजा धंदा हाय."

"काय घेतोस ?"

"तू काय देतोस ? बोल !"

टोपलीची नक्की किंमत मला माहीत नव्हती. आपणच त्याला विचारावं असं वाटलं पण हा माणूस पुन्हा तोच प्रश्न करणार होता. "दोन पायल्याची चांगली टोपली कर" मीच त्याला म्हटलं "आठ आणे देतो."

"कदी फायजे ?" दुसरं काहीच न बोलता तो म्हणाला. मी थोडा बुचकळ्यात पडलो. हे लोक पै पैशासाठी पाल्हाळ लावीत बसतात. यानं तर सरळ होकार दिला. आपण या सौद्यामध्ये नक्कीच फसलो असं मला वाटलं, पण आता नाईलाज होता. आपल्या ऐपतीच्या मानानं तशी किंमत काही जास्त नव्हती. भिव्यासारख्या कष्टाळु गरीबाला आपण आठ आणे दिले तर काय वाईट असा विचार करून मी आपल्या मनाला समजूत घातली आणि उद्याचा वायदा केला.

त्यानं फोकांचा गठ्ठा बांधला. त्याचा वजनदार भाग जमीनीवर टेकवून तो उभा केला तो स्वत: खाली बसला आणि तो हळूच डोक्यावर सोडून त्यानं तो उचलून घेतला. गुपचूप तो पुढं निघाला. तो काहीच बोलणार नाही म्हणून मीहि त्याच्या मागोमाग निघालो.

"अरे, येऊ दे तर" मी त्याला म्हटलं. "हे बी मांगावर लागनय का ? चल की !" मागं वळून तो मला म्हणाला व पुन्हा चालू लागला.

त्याचं म्हणणं बरोबर होतं. पण मला कसली तरी चीड आल्यासारखी झाली. "असा कसा रे आहेस तू ?" मी म्हटलं. "कसा हाय ? सांग तूच !"

"मुक्यासारखा !

"कशावरून

"मग तू बोलत का नाहीस ?"

"काय बोललं न्हाई ? सांग !"

आता मात्र बोलण्यात सोय नव्हती कारण माझ्या प्रत्येक प्रश्नाचं त्यानं उत्तर दिलेलच होतं. या गृहस्थानं पुन्हा "सांग" असं म्हणून हट्ट धरला तर आपण त्याला काय सांगावं म्हणून मी दुसराच प्रश्न विचारला.

" तुझे सोयरे कोणत्या गावावर आहेत ?"

चालता चालता तो उभा राहिला आणि फिरून माझ्याकडे पाहू लागला. त्याच्या आताच्या हावभावात वेगळीच धमक होती.

"तू मास्तर हाइस ना ?" तो डोळे वटारून मला म्हणाला.

"एवढी इच्यारपूस का करतोस ?"

मी शरमलो. साधारण गोष्टीचा याला राग का बरे यावा असं वाटलं. "अरं यात राग येण्यासारखं काय आहे ? मी सहज विचारतोय" मी म्हटलं.

"कसलं सहज ? आमचा कदी ठाव ठिकाना असतो का ? दोन दिवस का दोन म्हैने ऱ्हानार हे आमचं आमालाच सांगता येत न्हाई." आज मला कसली घडी लागली होती. प्रत्येक बोलण्यात अजाणता मी फसतच चाललो होतो. असला येरा गबाळा माणूस आपणाला सहज पकडीत आहे म्हणून माझ्या मनाला माझी कमजोरी वाटू लागली. कसला जरी माणूस असला तरी विचार करूनच त्याला प्रश्न करण्याची सवय असावी याचा मला चांगला धडा मिळाला.

"चल, तुला राग असल्यासारखं दिसतय !" मी त्याला पुढं चलण्याचा इशारा केला; पण त्यानंच मला पुढं घातलं आणि म्हणाला "अरे राग कसला दादा ! मानसानं कामापुरतच बोलावं !"

मी होकार दिला आणि झपाझप चालत पुढे निघून आलो.

\+ \+ \+

घरी आलो तेव्हा वत्सला कंदीलाची काच उजळीत बसली होती आणि शेजारी तिचा भाऊ समोर बॅग घेऊन बसला होता. त्याच्या अंगावर पोलीसाचा खाकी ड्रेस नव्हता. रजा घेऊन वहीणीच्या भेटीला आला असावा म्हणून मलाहि बरं वाटलं.

"किती दिवसाची रजा घेतलीस?" मी म्हटलं.

"रजा वगैरे काही नाही. कामासाठी निघालो आहे."

'कसल्या कामासाठी ?' असं म्हणावसं वाटलं पण तसं विचारणं मला योग्य दिसलं नाही. ते काही न विचारता त्याचा मुक्काम किती दिवसाचा म्हणून विचारलं पण 'पाहू उद्याचं उद्या' असं म्हणून त्यानं उडवा उडवी केली. वत्सलास ताटं माडायला सांगून मी वर्तमानपत्र चाळु लागलो. पण त्यांत काही विशेष दिसलं नाही, मी तो पेपर फेकून दिला.

"काही विशेष नाही वाटतं?" तो म्हणाला.

"कसलं विशेष" मी म्हणालो "गाड्यांची टक्कर, माणसाचा खून चोरी, - डाका या शिवाय दुसरं काय देणार हे संपादक लोक ?"

"तुमचं लक्ष संपादकाच्या अग्रलेखाकडं आणि आमचं बातम्याकडं" तो म्हणाला.

"स्वयंपाक करून बराच वेळ झाला. तुमची वाट पाहिली. कुठं गेला होता ?" वत्सला ताट पुढं करीत म्हणाली. कैकाड्याजवळ केलेल्या सौद्याची मला आठवण झाली.

"एक टोपली करायला कैकाड्याला सांगितलं आहे."

"किती पैशात ?"

"आठ आणे" हे ऐकून ती खो खो हसू लागली. त्यामुळे माझी उडालेली गाळण पाहूनच की काय जेवायचं सोडून बालुहि हसत सुटला. हसणं थांबवून थोड्यावेळानं वत्सला म्हणाली "दोन आण्याच्या टोपलीसाठी आठ आणे देऊं केलेत. कोण आहे तो कैकाडी ?"

"भिव्या" मी म्हटलं.

हे ऐकून बल्लु दचकला. "कोण भिव्या ?" तो म्हणाला. "डाव्या हातात चांदीचं कडं आणि गळयात काळा दोरा आहे तो मिशावालाच ना ?"

त्याचं बोलणं ऐकून मी चकीत झालो. बालुच्याहि परिचयाचा कैकाडी हा आहे तरी कोण ? मी फक्त मान हलविली. हातावर पाणी सोडून बालु अर्ध्या ताटावरूनच उठला.

"कुठं आहे तो ?" तो म्हणाला.

"आताच आला आहे नदीवरून".

माझं बोलणंहि त्यानं बरोबर ऐकलं नसावं. बॅग उघडली. खाकी ड्रेस चढवला.

"आता आलोच" असं म्हणून तो घराबाहेर पडला. थोड्या वेळातं कैकाड्यांच्या घराकडून बायका पोरांची ओरडू ऐकू आली. मी खडबडून उठलो आणि कंदील घेऊन बाहेर आलो. तोच बुटाचा खाड खाड असा आवाज ऐकू आला.

बालुबरोबर दुसरे दोन पोलिस दिसत होते आणि त्यांच्यापुढे भिव्या कैकाडी उभा होता. त्याला हातकडी घातलेली होती.

मला पाहून त्यानं आपले लाल भडक डोळे वटारले. बालुनं बॅग घेतली; "माफ करा भावजी". तो म्हणाला "या साटीच मी आलो होतो. चलतो आता."

भिव्याच्या ढोपरावर त्यानं बुटाचा एक ठोसा मारला. आतापर्यंत माझ्याकडे रागाने लाल होऊन पहाणारा भिव्या जाता जाता मला म्हणाला, "मास्तरा पोरायला शिकवायचं सोडलास आन् गुंड लोकाबरोबर टोपल्याचे सौदे करायचा शयाडीपना बी शिकलास ! बरं हाय मीही भिव्या कैकाडी नावाचा डाकू हाय."

# माता मंदोदरी

मनोहर रोकडे

**स्थळ** लंकेच्या किनाऱ्यावरील समुद्रकिनारा—वृक्षाचा पार.

**वेळ** 'सूर्योदयाची.

(पारावर मयासूर ध्यानस्त बसला आहे. तेवढ्यात भिक्षुकाचं रूप घेऊन इंद्र येतो. 'भिक्षांदेहि' असा आवाज देतो. त्यामुळे मयासुराचे लक्ष तिकडे वेधते.)

**मय** : कोण आहे ? या सूर्योदयसमयी भिक्षा कोण मागते आहे ?

**इंद्र** दानवराज मयासुर महाराज ! मी पीडित. भिक्षू आहे—मला भिक्षा हवी.

**मय** :-इथं ? आम्ही तुला इथं कशी ,भिक्षा देणार ? भिक्षुका, हे आमचं गृह नव्हे. आणि तू भिक्षा तरी कुणाला मागतो आहेस ? नगरात जा. तुला आयुष्यभर पुरेल एवढी भिक्षा तिथं मिळेल. कारण सध्या लंकानगरी केवळ सुवर्णमय झाली आहे. यक्षांचा पराभव करून दशाननानं कुबेराला जिंकलं आहे आणि सगळं सुवर्ण लंकेत आणलं आहे. नगरीत कुठल्याही प्रासादात भिक्षा मागितलीस तरी सुवर्णानं मढून निघशील. पुष्पक विमानात वसून दशानन प्रभातसमयीच नगरीत आले आहेत. त्यामुळं सर्वांनाच आनंद झाला आहे. नगरात आज तुला हवं ते मिळेल ![1]

**इंद्र** दानवराज ! मला हवं ते नगरात मिळालं असतं तर मी आपल्याकडे कशाला आलो असतो.

**मय** माझ्याकडून तुला काय हवं ?—सांग ?

**इंद्र** मला हवं ते आपल्याजवळच आहे दानवराज ! आपण द्याल ना ?

**मय** शक्य झालं तर अवश्य देईन. याचकाला आम्ही विन्मुख पाठवीत नसतो.

**इंद्र** : आपण मला रिक्त हस्तानं पाठवणार नाही हे निश्चित ना ?

**मय** तुझ्या गूढ वाणीवरून संभ्रम निर्माण झालाय की तुला अत्यंत महत्त्वाचं काही मागायचं आहे. 'तथास्तु' म्हणताच तू आमचं सामर्थ्य हिरावणार आहेस आणि त्यामुळे कदाचित आमचाच विनाश होण्याची शक्यता आहे !—तू कोण आहेस ? विष्णू की इंद्र ? कारण याचकाचं रूप घेऊन शत्रूपक्षाचं सामर्थ्य भिक्षेत मागायचं आणि नंतर त्यांना पराभूत करायचं ही इंद्राची जन्मजात सवयच आहे.[2] कोण-आहेस तू ? बोलत का नाहीस ?

**इंद्र** मी इंद्र आहे—!

**मय** कशाकरिता आला होता ?

**इंद्र**. आपण स्वसामर्थ्याने जी शक्ती निर्माण केली आहात—

**मय** : . .ती भिक्षेत मागून न्यायला ?

**इंद्र**: होय. कारण आपले जामात दशानन महाराज यांनी अद्भुत पराक्रम करून नाग,यक्ष,दानव,मानव, देव या सर्वांनच पराभूत केलं ! कुबेर, वरुण, यम हे दिग्पाल देखील पराभव पावलेत. सांप्रत त्यांचा मनोदय इंद्रलोकावर स्वारी करण्याचा असल्याचं राजबंधू बिभीषणाकरवी आम्हाला ज्ञात झालं. त्यावेळी आमच्या वज्रानं आम्ही कोणत्याही शक्तीशी सामना द्यायला समर्थ असलो तरी केवळ आपली शक्ती मात्र आमचा प्राणघात करू शकते. या कारणानं ती प्राणहरक शक्ती आपणाकडून आम्हाला दान हवी दानवराज !

---

१. कुबेराचा पराभव करून रावण पुष्पक विमान लंकेत आणतो. उत्तरकांड सर्ग १५

२. पुढे कर्णाला अमरकुंडले इंद्राने अशीच मागितली. अहल्या, दमयंती यांचे वेळीही रूप बदलूनच इंद्र गेला होता. बळीराजा, भस्मासूर यांचेवेळी असे रूप विष्णूने घेतले होते.

**मय :** इंद्रराज ! ती शक्ती आम्ही मंदोदरीच्या हट्टामुळे निर्माण केली होती. तिला विचारल्याशिवाय आम्हाला ती कुणालाही देता येणं शक्य नाही.

**इंद्र :** मंदोदरीला ?–तर मग आमचा विनाश अटळ आहे. दानवाधिपती, आम्ही आपणाकडे भिक्षा मागत आहोत. आम्हाला विन्मुख पाठवू नका !

**मय** इंद्रराज ! तो दिवस आठवा, ज्या दिवशी आम्ही आमच्या पत्नीकरिता कमलपुष्प आणायला सरोवराकडे गेलो होतो. ती संधी साधून आपण आमच्या पत्नीचं–हेमाचं–अपहरण केलंत ! तिला पळवून आपल्याकडे घेऊन गेलात. आम्ही तिची मागणी करायला आपणाकडे आलो तेव्हा आमच्यावर वज्र उगारून, आम्हाला पराभूत करून रानोमाळ भटकायला लावलंत ! [३]

**इंद्र :** हेमा आमच्या बरोवर यायला उत्सुक होती.

**मय:** दोष थोडा तिचाही होता पण आपण निर्दोष निश्चितच नव्हता ! तरीही आम्ही पृथ्वीतलावर रक्ताच्या नद्या वाहू नयेत एवढ्यासाठी आपल्याशी आमचं वैर संपवलं. पण याचा अर्थ असा नव्हे की आमची प्राणरक्षक शक्ती आम्ही आपल्या स्वाधीन करावी. तशीच वेळ आली तर शक्तीचा आम्हालाही उपयोग करावा लागेल. [४]

**इंद्र:** गत अपराधावद्दल क्षमा असावी दानवराज ! आम्हाला आपल्याकडून केवळ अभयाची अपेक्षा आहे.

**मय :** वेळ सूर्योदयाची आहे... याचकाला रिक्त हस्तानं पाठवायचं नाही ही दानवांची परंपरा आहे. आपल्याला शक्ती देत नाही पण अभय मात्र देतो– आमच्या शक्तीचा उपयोग आपल्यावर केला जाणार नाही. तथास्तु !

**इंद्र** प्रणाम दानवाधिराज ! (प्रस्थान. सूर्याला नमस्कार करून मयाचे प्रस्थान. तेवढ्यात वक्रलतेला शोधत शंख व शंखाला शोधत वक्रलता येतात. कुणी आपल्याला पाहत तर नाही ना ? या भीतीमुळं ते मागे पाहत पुढे चालतात. परस्परांची टक्कर होते !)

**शंख :** सांगितले ना, तुझी चालच वक्र.

**वक्र :** सांगू काय चाल कशी वक्र असते ती ? धक्का देतोस काय ! मी आहे म्हणून महाराणीजवळ तक्रार करणार नाही असं वाटलं काय तुला ? चोरचा चोर न् वरून शिरजोर.

**शंख** उजाडला दिवस कलह करायला ?

**वक्र :** मी कलह करते आहे ? धक्का देतोस काय ? यासाठीच आला होतास वाटतं !

**शंख** नाही, आलो ते दर्शन घ्यायला.

**वक्र :** झालं ना दर्शन ? जा आता–जा...!

**शंख :** नाही ग वक्रलते ! मी अजून अतृप्तच आहे. आज आठ दिवस झालेत–तुझी माझी भेट नाही. तुला आमच्या वाड्यात ठेवा किंवा मला तरी महाराणीच्या महालात राहू द्या असं कितीदा तरी विनवलं राक्षसराजांना–

**वक्र** तुला पण कितीदा म्हणाले की राक्षसराज हा शब्द मला अप्रिय आहे ! त्यांना दानवराज कां नाही म्हणत ?

**शंख :** यालाच म्हणतात स्त्रीबुद्धी ! राक्षस म्हणजे कोण ?

**वक्र :** तू !

**शंख :** मग ! आता मी म्हणजे कोण ? तुला ठाऊक आहे–समुद्रमंथन झालं आणि उदक आटू लागलं. असं समुद्रातलं सगळं जल संपलं तर आपले काय होणार ही भीती स्वाभाविकच जलचरांना वाटली. म्हणून ते गेले ब्रम्हदेवाकडे. ब्रम्हदेव म्हणाले, उर्वरित सागराचं पूजन करा म्हणजे सागर शुष्क होणार नाही. काही म्हणाले आम्ही यक्षण म्हणजे पूजन करू–काही म्हणाले रक्षण करू. यक्षण करणारे ते झाले यक्ष. रक्षण करणारे ते झाले राक्षस ! [५] मी तुमचा रक्षणकर्ता म्हणजेच–

---

३. किष्किंधाकांड सर्ग ५१ व उत्तरकांड सर्ग १०.

४. मयाने निर्माण केलेली ही शक्ती पुढे इंद्रजिताने लक्ष्मणाला मारली. लक्ष्मण मृतवत् पडला. त्याला जिवंत करण्यासाठी हनुमानाला महोदय पर्वतावरून विशल्यकरणी, सावर्ण्यकरणी, संजीवकरणी व संधानीं या महौषधी जांबुवंताने सांगितल्यावरून आणाव्या लागल्या. युद्धकांड सर्ग १००, १०१

५ राक्षस शब्दाची ही व्युत्पत्ति–बालकांड

**वक्र**: राक्षस ! – राक्षसा, जा आता !

**शंख**: जातो पण महाराणीला तेवढं सांगशील ना ?

**वक्र**: आता काय सांगायचं उरलं ?

**शंख**: म्हणावं, मला राणीच्या महाला ऐवजी राजाच्या राजवाड्यात कां नाही पाठवत सेवेसाठी ?

**वक्र**: काही नको ! महाराणींची दासी म्हणजे इतरांची महाराणीच. म्हणून तर कुंभकर्ण महाराजांच्या राणी वज्रज्वाला आणि विभीषण महाराजांच्या राणी सरमा मला सारख्या वक्रलते-वक्रलते म्हणून पाचारण करतात. युद्धात दशानन स्वामी विजयी झाल्यामुळे त्यांनी अलंकार देखील दिलेत मला.

**शंख**: पण विभीषण महाराजांनी आम्हाला मोत्याचा कंठा देखील दिला नाही. कसा देतील ? दशानन स्वामी विजयी होऊन आलेत आणि तोवर सिंहासनावर बसलेल्या विभीषण महाराजांना खाली उतरावं लागलं !

**वक्र**: हा त्यांचा मत्सर एवढ्यातलाच नाही. विवाहापूर्वी हे बंधुद्वय आपल्या आश्रमात आले होते तेव्हाही विभीषण महाराज म्हणाले होते, 'दशानन सत्ताधीश आहे आणि आम्ही मात्र नाही'. त्यानंतर स्वामिनीचा विवाह झाला. त्यांना पुत्रही झाला आणि पित्या बरोबर युद्धावर गेला. एवढा यौवनात आला. पण इतक्यावर्षापूर्वीचं विभीषण महाराजांचं ते असुधापूर्ण वाक्य अजून माझ्या कर्णात रेंगाळते आहे. (मेघनाद येतो) यावं युवराज ! स्वागतम्.

**शंख**: म्हणजे मी इथं अशासाठी आलो होतो की.

**वक्र**: महाराणी यायच्या आहेत. आपण इथंच त्यांची प्रतीक्षा करावी असा आपल्याला त्यांचा निरोप आहे.

**शंख**: हां, निरोप आहे.

**मेघ**: आपण इकडे ?– (अभावितपणे वक्रलतेकडे पाहतो. शंख गडबडतो)

**शंख**: हा निरोप मला कळला. म्हटलं युवराजांचं आगमन इकडे निश्चितच. तेव्हा 'युद्धस्य कथा रम्या' म्हणतात ना त्या आपल्या मुखातून श्रवण करण्याची इच्छा प्रबल. यास्तव थांबलो युद्धात विजयी होऊन परतल्यामुळे आपण आनंदातिशयानं सेवकांना उपहार म्हणून अलंकार प्रदान कराल असा हेतू अजिबात नव्हता. (मेघ. स्मित करतो व दोघांनाही मोत्यांच्या माळा देतो.) स्वामींनी आणि आपण प्रचंड पराक्रम करून संपूर्ण पृथ्वीतलावर आपलं अधिराज्य निर्माण केल्याचं ऐकिवात आहे.

**मेघ**: सत्य आहे. तात दशाननांनी केलेला पराक्रम तर अतुलनीय आहे. त्यांच्या पराक्रमावर प्रसन्न होऊन प्रत्यक्ष भगवान शंकरांनी त्यांना चंद्रहास खड्ग प्रदान केलं.[६] नंतर आम्ही अयोध्येवर चालून गेलो आणि राजा अनरण्याचाही पराभव केला.[७]

**शंख**: वाऽ हे घ्या (म्हणून मोत्यांची माळ मेघनादाला आणि लक्षात आल्यावर वक्र-ला देतो)

**मेघ**: तदनंतर आम्ही पुष्पक विमानात बसून उशरबीज देशात मरुत्तावर चाल केली. तात म्हणाले, 'आमच्याशी युद्ध कर अन्यथा हरलो म्हण !'

**शंख**: 'हरलो'-म्हणाला असेल.

**मेघ**: जमलेले सर्व देव आमच्या भीतीनं पक्षांचं रूप घेऊन लपून बसले.[८]

**वक्र**: गंमतच आली म्हणायची.

**मेघ**: निवातकवच, कालकेय इत्यादि सगळ्यांनाच जिंकत आम्ही पुढे चाललो केवढाही पराक्रमी राजा असला तरी आमच्यापुढं तो विलाप करून रडायचा. त्यामुळं तर ते तात दशाननांना रडवणारा म्हणून रावण म्हणू लागले.[९] आता आम्हाला आत्मविश्वास

---

६ उत्तरकांड सर्ग १६.

७. या पराभूत राजाने रावणाला शाप दिला होता. इक्ष्वाकु वंशातला हा १० व राम ४० वा राजा– बालकांड सर्ग ७०

८. यावेळी इंद्र मयुराचे, वरुण हंसाचे, यम कावळ्याचे रूप घेऊन लपले होते. पुढे त्यांनी या पक्षांना वर दिले–उत्तरकांड सर्ग १८

९. उत्तरकांड सर्ग २०

आहे की या पृथ्वीतलावर आम्हाला कुणीही कालत्रयी जिंकू शकत नाही. (मंदो. येते.)

**मंदो** मेघनाद ! कधी आलात वत्स ! ( मेघ तिचे चरण वंदन करतो.)

**मेघ** : एवढ्यातच ! (शंख व वक्र. प्रणाम करून जातात.)

**मंदो** : युवराज मेघनाद ! आम्ही आपल्याला इथं अत्यंत महत्त्वाच्या विचाराप्रित्यर्थ पाचारण केलं. आपण आणि स्वामी युद्धात गुंतला होता तेव्हा आम्ही इकडे भगवान शंकराची आराधना करून आपल्या विजयास्तव प्रार्थना करीत होतो. आपण विजयी होऊन आलात–आम्हाला आणि संपूर्ण नगरीला केवळ आनंदच नव्हे तर आपला अभिमान वाटतो. तथापि वत्स ! विजयानं धुंद होऊ नका–जे धुंद होतात ते अखेर पराभव पावतात.

**मेघ** माते ! आम्हाला कुणीही पराभूत करणे नाही.

**मंदो** : हा गर्व व्यर्थ आहे मेघनाद ! आणि केवळ हेच सांगायला आम्ही आपल्याला पाचारण केलं आहे. वास्तविक विशेष सावध असण्याची आवश्यकता यापुढंच अधिक आहे.

**मेघ** : कारण ?

**मंदो** कारण हा इतिहास आहे की अशावेळी सगळ्या पराभूत शक्ती एकत्र येतात आणि विजेत्या-विरुद्ध एकवटून उभ्या राहतात. यास्तव वेळीच सावध व्हा ! कालत्रयी आम्हाला कुहीही जिंकणे नाही हे आपले शब्द आम्ही श्रवण केले आहेत आणि वत्सा ! त्यामुळंच आम्ही सचिंत झालो आहोत.

**मेघ** होय ! आम्ही तसे वदलो आणि अजूनही वदतो आहे–'कुणीही आम्हाला जिंकणं शक्य नाही'.

**मंदो** मग तर बोलणच खुंटलं !

**मेघ** : नाही माते ! आपली आज्ञा आम्हाला शिरसावंद्य आहे. आपले शब्द आम्हाला प्रमाण आहेत.

**मंदो** मेघनाद ! आपण जन्मलात तेव्हाच मुळी आपण मेघासारखा नाद केलात. म्हणून आपलं नामकरण 'मेघनाद' असं झालं.[१०] आषाढातले मेघ जसे संपूर्ण आकाश व्यापून टाकतात तसेच आपण देखील आपल्या पराक्रमानं संपूर्ण पृथ्वी व्यापून टाकावीत हीच आमची इच्छा आणि महत्त्वाकांक्षा आहे. देवांचाही राजा इंद्र. तथापि तोही आपल्यापुढे नतमस्तक व्हावा याच हेतूनं आम्ही आपल्याला घडविलं आहे–घडवीत आहोत !

**मेघ** आम्हाला याची पूर्ण जाणीव आहे माते !

**मंदो** (किंचित कठोरपणे) तथापि आम्हाला एकच भीती वाटते युवराज की इतिहासाचं सत्य आपण नाकारत आहात–आणि त्यातच आपल्या पराभवाची बीजं सामावली आहेत. आपण तिकडे विजय मिळवीत होता आणि त्याचवेळी इकडे शत्रूची कारस्थानं सुरू झाली होती. इंद्रानं अनेकदा बिभीषण महाराजांची भेट घेतली. आपल्या मातामहांनी निर्माण केलेली शक्ती आम्ही इंद्रवधाकरिता राखून ठेवली होती. ती त्याच्यावर उपयोगिली जाणार नाही असं अभिवचन पित्यापासून तो नुकताच घेऊन गेल्याचं आमच्या कर्णी आलं !

**मेघ** हं! स्वतःला वाचवण्याचा तो आता प्राण-पणानं प्रयत्न करतो आहे याचाच अर्थ, माते–तो आम्हाला भ्यायला हे स्पष्ट आहे.

**मंदो** तेवढाच तो सावध आहे हेही उघड आहे आणि आपण बेसावध असू नये हेही आवश्यक आहे. (दशानन व बिभीषण बोलत बोलत येतात)

**बिभी** : राजन ! यास्तव आम्हाला वाटतं, 'देवेंद्रावर आपण आक्रमण करू नये !'

**दशा** : महाराणी ! आम्हाला ज्ञात झालं की आपण इथं आला आहात. यास्तव आम्ही आपला विचार घ्यायला आपणाकडे जाणून आलो आहोत.

**मेघ** प्रणाम तात ! (दोघांच्याही चरणस्पर्शा-नंतर) माते, आपले मनोरथ आम्ही पूर्ण करू. आपला विचारविनिमय संपल्यावर आम्ही इकडे येतोच आहोत. (प्रस्थान)

**दशा** : महाराणी ! इंद्रावर आम्ही आक्रमण करू नये असं बिभीषणाचं अभिमत आहे. आपला मौलिक विचार आम्हाला निर्भीडपणे सांगा !

---

१०. उत्तरकांड सर्ग १२

**मंदो** आम्ही स्त्रीजात ! पुरुषी राजकारणात आम्ही काय विचार देणार ? दिला तरी एका स्त्रीच्या विचारांना पराक्रमी पुरुषांच्या दृष्टीनं कितीसं मूल्य असणार ? -त्यातून वुद्धिमान, राजकारणनिपुण आणि धर्मज्ञ म्हणून आपला त्रिखंडात लौकिक.[११]

**दश :** महाराणी ! इतक्या वर्षांच्या सहवासा-नंतरही आपण आम्हाला ओळखू नये हे आश्चर्य आहे. दश वुद्धिमान प्राणी एकत्र येऊन जो सारासार निर्णय घेऊ शकतील तो आम्ही एकटेच घेतो म्हणून आम्ही दशानन ! सभेमध्ये दहांनी दिलेला निर्णय मान्य करतो म्हणून आम्ही दशानन ! विभीषण आमचे प्रमुख विचारमंत्री खरे तथापि आम्हाला आपलाही निर्णय आवश्यक वाटतो.

**मंदो** विभीषण आपले जिव्हाळ्याचे वंधू आहेत त्यांनी दिलेला विचार हिताचाच असेल.

**बिभी :** अर्थातच ! हिताहिताचा विचार करूनच आम्ही देवेंद्र-स्वारीला विरोध दर्शविला.

**मंदो :** विचार हिताचा निश्चितच-पण कुणाच्या?

**बिभी** याचा अर्थ ?

**मंदो :** अर्थ, हा विचार स्वत: आपला की आपल्या करणी इंद्राचाच !

**दशा** महाराणी, इथं इंद्राचा संबंध येतोच कुठं ?

**मंदो :** येतो !-कारण इंद्र अनेकदा आपल्या भेटीला येऊन गेल्याचं आम्हाला ज्ञात झालं !-म्हणून म्हणतो, विचार आपला की इंद्राचा ?

**दशा :** वत्सा विभीषणा ।-हे सत्य आहे ? (शंख येतो)

**शंख :** महाराणी-(आणि विभीषणाला पाहून थवकतो)

**बिभी** लंकाधिपती सम्राट वंधूवर--आमच्या राजप्रासादावर महाराणींनं गुप्तचर ठेवावेत हे स्वत: सम्राटांनाच लांछनास्पद आहे. (शंखाकडे साभिप्राय पाहतो. शंख गडवडतो.)

**शंख :** मेघनाद युवराजाकडे जायला निघालो हे सांगायला आलो होतो (प्रस्थान)

**बिभी** आमचं मन आम्ही व्यक्त केलं. देव-लोकांवर आपण आक्रमण केल्यामुळं अनेक देव संतप्त होऊन शाप देत आहेत.

**मंदो :** स्वत: काचेच्या गृहात राहणाऱ्यांनी इतरांच्या वाड्यावर पाषाण फेकू नयेत. वळीराजानं कोणता अपराध केला होता म्हणून देवांनी त्याला पाताळात घातलं ? तो सत्वशील होता, आदर्श राजा होता हाच ना त्याचा अपराध ?[१२] मूळातच सदाचारी प्राणी जेव्हा तपश्चर्या करतो तेव्हा तो देवांनाही अजिंक्य होतो या एकाच कल्पनेनं धर्मनीतिज्ञ वृत्रासुराला देवांनी ठार केलं तेव्हा त्यांना धर्म आठवला नाही ?[१३] किती उदाहरणं द्यावीत ?

**बिभी :** त्याची आवश्यकताही नाही. आपले मत तेवढं कथन करावं !

**मंदो :** इंद्राचा गर्व उतरायलाच हवा.

**दशा :** विभीषणा ! मंदोदरी स्त्री असली तरी महाराणीचं मत अधिक तर्कशुद्ध वाटतं.

**बिभी :** तर्कदुष्ट म्हणा वंधुराज ! पराक्रमाची धुंदी चढली की विवेक नष्ट होतो. भस्मासूर-हिरण्य-कश्यपू-किती उदाहरणं द्यावीत ?

**मंदो :** त्याची गरज नाही !-पुढं बोला-

**बिभी :** महाराणी ! आमची ज्येष्ठ भगिनी शूर्पणखा-तथापि तिच्या सख्ख्या वंधूनं ह्या दशाननानंच तिला वैधव्यदशेत लोटलं हे ज्ञात आहे आपल्याला ? (मंदो. दशाननाकडे साभिप्राय पाहते)

---

११. रावणावद्दल हे विधान राम, हनुमान व विभीषण यांनी केले आहे. सुंदरकांड सर्ग ४८

१२. वळीराजा निरपराध आणि चांगुलपणाचा आदर्श. म्हणूनच तो सर्वश्रेष्ठ होईल या एकच भीतीनं देवांनी विष्णूला विनंती केल्यावरून वामनरूपाने त्याला पाताळात घातले-वालकांड सर्ग २९

१३. वृत्रासूर चारित्र्यसंपन्न म्हणून तपश्चर्येनं तो अजिंक्य होईल या भीतीनं देवांच्या म्हणण्यावरून विष्णूने त्याचा वध केला- उत्तरकांड सर्ग ७६-८४-८६

**दशा** : होय ! शुर्पणखेच्या पतीचा–विद्युत्‌जिव्हाचा–आम्ही वध केला हे सत्य आहे. तथापि त्यावेळी तो रणांगणात आमचा शत्रू म्हणून उभा ठाकला होता.[१४] भगिनी या नात्यानं शुर्पणखा घरी रडत आली तेव्हा आम्हीच तिला दंडकारण्याचं राज्य प्रदान केलं. खर आणि दूषण यांच्यासह चतुर्दशहजार राक्षस सेवेला पाठवले. आम्ही रणांगणात युद्धामध्ये जशी युद्धनीति पाळली तशीच कुटुंबजीवनात कुटुंबनीति पाळली. यात आमच्या हस्ते काही अपराध घडला महाराणी ?

**मंदो** राजबंधू बिभीषण महाराज ! शत्रूशिवाय दुसरं कुठलंही नातं रणांगणात नसतं !

**बिभी** : हे जर सत्य तर आम्हाला वाटतं, क्षमा असावी, तथापि आम्हाला निर्विवाद वाटतं की आपण निव्वळ पक्षपात करीत आहात. आपली मावसबहीण कुंभीनसी हिचं मधु राक्षसानं अपहरण केलं तेव्हा आपण त्याच्यावर चालून गेलात. आणि तरी ही त्याचा वध मात्र केला नाहीत. कारण तो आपला मित्र होता म्हणूनच ? ह्याला सर्वसमतेची बुद्धी म्हणत नाहीत.

**दशा** आम्ही मधूवर आक्रमण केलं तथापि रणांगणात तो आलाच नाही पश्चात कुंभीनसी आली आणि तिनं मधूशी विवाह केला असल्यामुळे आम्हाला सौभाग्यदान मागितलं. हा प्रश्न रणांगणातला नसून कौटुंबिक होता म्हणून आम्ही त्याला जीवदान दिलं. प्रथमतः तो आमचा मित्र नव्हे-जीवनदानामुळं मित्र झाला.

**मंदो** : आम्हाला वाटतं. शंका निरसन झालं असावं !

**बिभी** : केवळ शंका निरसन होण्यानं प्रश्न सुटत नसतात महाराणी !

**मंदो** : होय ! किंबहुना काही वेळेला तर ते अधिक गुंतागुंतीचे होतात

**दशा** : वत्सा ! मधूची गोष्ट काढल्यामुळं आम्हाला आठवण झाली. आम्ही आपले आभार मानायचे विसरूनच गेलो.

**बिभी** : कशाबद्दल ?

**दशा** : आम्ही तिकडे गेल्यापासून आतापर्यंत आपण ज्या -कुशलतेनं राज्य चालवलंत, त्याबद्दल ! आमच्या पश्चात इकडे कारभार कोण सांभाळील याची आम्हाला खरोखर विवंचनाच होती.[१५]

**मंदो** : प्रिय देवर ! बोलण्याची वेळ आली म्हणून बोलतो. आपले बंधू युद्धावर गेले आहेत आणि आपण मात्र इकडे राजसिंहासनावर बसून राज्यकारभार करीत आहात या घटनेचं आम्ही स्वागतच केलं तथापि तिकडे महाराज पराभूत झाले असते तर आपण इकडे आपोआपच उत्तराधिकारी झाला असता, यास्तव आपण युद्धावर गेला नाहीत, असा तर्क कुणी काढला तर त्याची समजूत काढणं कठीण जातं.

**बिभी** : आडून कशाला प्रहार करता ? सरळच सांगा की आमची लंकेचा अधिपती व्हायची इच्छा आहे म्हणून ?

**मंदो** : आम्ही आधीच म्हणालो की हा आमचा तर्क नव्हे. आम्हाला तसा संशय अजून आलेलाही नाही.

**बिभी** : मग आम्हालाही म्हणता येईल की देवेंद्रावर स्वारी करण्यात जर महाराज पराभूत झालेत तर ? हा निर्णय घेण्यात महाराणींच्या हेतूबद्दल कुणी संशय घेतला तर ?–उत्तराधिकारी होण्याची आकांक्षा महाराणी बाळगून असाव्यात असं निदान आम्हाला तरी वाटत नाही.

**दशा** : आपणा द्वयांचं आमच्यावर नितांत प्रेम आहे हे आम्ही जाणतो. परस्परांच्या हेतूबद्दल परस्परांनी विनाकारण संशय व्यक्त करणं अनुचित आहे. त्यातून निरर्थक अपसमज मात्र निर्माण होतील. वत्सा ! आजपर्यंत आम्ही तुझा शब्द कधीतरी टाकला काय ?

**बिभी** : आजवर नाही. तथापि आज मात्र–– (मंदो. कडे पाहतो)

---

१४. उत्तरकांड सर्ग २५

१५. रावणाची मावसबहीण कुंभीनशी हिला मधूने पळवले. त्यांचा विवाह झाला. पण केवळ पळवले एवढयाच कारणाने रावणाने त्याच्यावर स्वारी केली. तेव्हा कुंभीनसीने सौभाग्यदान मागितले. रावणाने ते दिले. या घटनेच्या वेळी बिभीषण स्वारीवर न जाता लंकेत राज्य करीत होता– उत्तरकांड सर्ग २५

**मंदो :** शब्द निर्मळ मनातून आलेत तर स्वामी कधीच टाळत नाहीत.

**बिभी :** ( जळजळीत कटाक्ष टाकून ) आज्ञा असावी. (प्रस्थान)

**दशा :** विभीषणा–वत्सा....! मंदोदरी, आपण असं बोलायला नको होतं. विभीषण कितीही झाला तरी आमचा कनिष्ठ बंधू ! आपण त्याचं मन दुखविता कामा नये.

**मंदो :** स्वामी ! सत्यामुळं कुणाचं मन दुखावणार असेल तर त्याला काय उपाय ? इंद्र त्यांच्याकडे गेला होता हे सत्य त्यांनी आपल्याला कां सांगू नये ? कनिष्ठ बंधू ना तो ? मग ही गोष्ट ज्येष्ठ बंधूपासून कां लपविली गेली ?

**दशा :** ते तर आम्हालाही उमगत नाही.

**मंदो :** पण आम्हाला उमगतं ! स्वामी, आपण पाणिग्रहणाच्या वेळी अभिवचन दिलं होतं की इंद्राचा पराभव करून आपण आमची मनोकामना पूर्ण कराल. बिभीषण महाराजांनी आमच्या हेतूबद्दल कितीही संशय व्यक्त केला तरी आपण आमचं मन निश्चितपणे जाणता स्वामी !

**दशा :** विभीषणावर आपण संशय व्यक्त केलात म्हणूनच केवळ त्यानं हा युक्तिवाद मांडला–यापलीकडे त्याला अर्थ नाही.

**मंदो :** पण स्वामी ! तत्पूर्वी आपण एक गोष्ट लक्षात घ्यावी. त्यावेळी जरी आम्हाला पटलं नव्हतं तरी आज आमच्या पिताच्या विचारातलं सत्य आम्हाला उमगलं आहे. ते आपणही लक्षात घ्यावं–

**दशा :** सत्य ? कोणतं ?

**मंदो :** तात म्हणाले होते, 'दानव संघटित नाहीत म्हणून पराभूत होतात.'

**दशा :** तथापि आम्ही तर प्रत्येकाला जिंकलं आहे.

**मंदो :** प्रत्येकाला ! हेच महत्त्वाचं ! प्रत्येकाला म्हणजे एकेकट्याला. पण जेव्हा हे एकएकटे प्रत्येक एकवटून उभे राहतात, तेव्हा जेता कितीही बलाढ्य असला, तरी त्याला नतमस्तक व्हावं लागतं !

**दशा :** चुकताहात आपण ! ज्यांना आम्ही अवध्य आहोत त्यांची मैत्री जोडून काय उपयोग ?

**मंदो :** स्वामी ! संघटित सामर्थ्यापुढं एकटी शक्ती कितीही महान असली तरी ती दुबळी ठरते. आपण यक्ष, किन्नर, राक्षस, गंधर्व आणि देवदेखील यांची मैत्री संपादन करून मगच संघटितपणे इंद्रावर स्वारी करावी.

**दशा :** आम्हाला अमान्य आहे ! अंतरातून मतभेद पण वरपांगी मैत्री असलेले विरोधी पक्ष कितीही जवळ आले तरी त्यांची एकजूट म्हणजे त्यांना आलेली सूज असते. उलट त्यामुळं प्रत्येक संघटनेचं स्वतःचं सामर्थ्य मात्र मूलतः कमी होत असतं !

**मंदो** या आत्मविश्वासाचं कारण आपण प्रत्येकाला जिंकलंत. पण तो झाला भूतकाळ. तीच परिस्थिती आज राहील असं नाही. आणि विचारवंतांनी विचार करायचा असतो तो उद्याचा–आजचा नव्हे !

**दशा** महाराणी ! आमचा संघटनेवर विश्वास नाही असं नाही. पण संघटना केवळ आमच्या पक्षाची. कुंभीनसीचं अपहरण करूनही मधूला आम्ही मित्र बनवलं यांचा कारणही हेच. निवातकवचाचा पराभव करून त्याची मैत्री संपादन केली आणि त्याच्यापासूनच शंभर मायांचं ज्ञान प्राप्त करून घेतलं[१६] शिवाय मानव सोडून आम्ही इतर सर्वांपासूनच अवध्य आहोत.

**मंदो :** (विलक्षण आवात होऊन) काय ? मानव सोडून ?–हे तेव्हा आपण आम्हाला वदला नव्हता.

**दशा :** आवश्यकताही नव्हती.

**मंदो :** तथापि आम्हाला सर्वाधिक भीती वाटते ती मानवाचीच !

**दशा: :** मानवाची ? त्या क्षुद्र प्राण्याची ? ब्रम्हदेवाला आम्ही अमरत्व मागितलं तर ते म्हणाले, संपूर्ण अमरत्व कुणालाही देता येत नाही. तेव्हा आम्ही म्हणालो, 'देव, गरुड, नाग, यक्ष, दैत्य, दानव आणि राक्षस यांच्याकडून आमचा वध होऊ नये एवढंच अमरत्व द्या. दुसऱ्या प्राण्यांची आम्हाला मुळीच चिंता

---

१६ उत्तरकांड सर्ग २३

नाही. मानवादी प्राणी आम्ही तृणवत मानतो.[१७] त्या क्षुल्लक मानवाची आपल्याला भीती वाटावी हे महदाश्चर्य !

**मंदो** : मानव क्षुल्लक नाही स्वामी ! देव, दानव यक्ष यांच्याप्रमाणे तो एकटा लढत नाही. संघटित सामर्थ्य केवळ त्याच्याच लक्षात आलं आहे. म्हणूनच दुबळा असूनही केवळ तोच मला सर्वाधिक शक्तिमान वाटतो लंकेश्वर ! (मेघनाद येतो.)

**मेघ** : तरीही मानव आमच्यापुढं तृणवतच राहणार ! आणि तो प्रश्न इथं उद्‌भवतोच कुठं ? इंद्र काही मानव नव्हे आणि तात देवांना अवध्य आहेत. इंद्राला आम्ही सहज जिंकू !

**दशा** : आपणा उभयतांचा कौल आम्हाला मिळाला. मेघनाद इंद्रस्वारीची सिद्धता करा. (प्रस्थान)

**मेघ** : माते ! आपले मनोरथ आम्ही पूर्ण करू.

**मंदो** : वत्सा !, आमचा आपल्यावर पूर्ण विश्वास आहे. तथापि इंद्रस्वारीपूर्वी आपलं बळ वाढवायला आपल्याला तीन गोष्टी कराव्या लागतील. इतरत्र नाही ते पुष्पक विमान म्हणजे लंकेचं विज्ञानभूषण. ही विज्ञानाची उपासना थांबवू नका. विज्ञान सामर्थ्य हेच सर्वश्रेष्ठ सामर्थ्य आहे हे निरंतर लक्षात असू द्या ! वक्रलते ! ते पूजापात्र आणि ती शक्ती आण !

**मेघ** : आज्ञा प्रमाण माते !

**मंदो** : दुसरं, संस्कृतीवैभव ही समाजाची सुप्त शक्ती असते. आपला चैत्यप्रासाद हे विश्वातील एक शिल्पनवल आहे. संस्कृतिसंवर्धनाची उपेक्षा करू नका.

**मेघ** : आज्ञा शिरसावंद्य !

**मंदो** : आणि शेवटचं ! आत्मतेजाशिवाय शौर्य सफल होत नाही. म्हणून आपण शिवाची उपासना चालू ठेवा ! यज्ञ, याग या मानवी कर्मकांडांपेक्षा आपला राक्षसांचा भक्तिमार्ग सोपा आणि सहज आहे. याच भक्तिमार्गानं राक्षसांनी आजवर वर मिळवले आहेत.

**मेघ** : आज्ञावंदन माते ! आपल्या चरणाला स्पर्शून आम्ही प्रतिज्ञाबद्ध होत आहोत की इंद्राला आपल्या चरणावर लोळण घ्यायला लावल्याशिवाय आम्ही अन्न ग्रहण करणार नाही.

**मंदो** : विजयी व्हा युवराज ! आपल्याकडून मला हीच अपेक्षा होती. (वक्र. तिला शक्ती आणून देते) या वृक्षाखाली उपासना सुरू करा. भगवान शिव त्यामुळं प्रसन्न होतील. बलांच्या उपासनेवरच आपलं अस्तित्व असतं हे नीट लक्षात घ्या ! दुर्बल दीर्घकाल टिकू शकत नाहीत कारण त्यांना सबल दीर्घकाल जगू देत नाहीत. मोठा मासा लहानांचा घास घेणारच. आपण मोठा मासा व्हा आणि मेघनादाचा इंद्रजीत होण्याचे आमचे स्वप्न पूर्ण करा.[१७]

**मेघ** : तपस्येच्या साधनेकरिता आजपासूनच सुरुवात करतो. आम्हाला मंत्रदीक्षा द्या—आशीर्वाद द्या ! (मंदो. त्याला आशीर्वाद देते. तो पूजा करून साधनेकरिता उभा राहतो. मंदोदरी ॐ नमः शिवाय हा मंत्र म्हणते तसाच मेघनाद म्हणतो. थोड्याच वेळात आकाशात प्रचंड गडगडाट होतो. वीज लखलखते– )

**मंदो** मेघनादा ! इंद्र व्यत्यय आणतो आहे सावध व्हा ! अविचल राहा. अविचल राहा—(ती आकाशाकडे पाहून शक्ती उंच धरते. मेघनादाचा उंच स्वरात उच्चारलेला मंत्र. मंदोदरीचा 'अविचल राहा' हा आर्त स्वर आणि मेघांचा गडगडाट एकमेकात मिसळून गेलेले बराच काळ ऐकू येतात— —गडगडाट हळूहळू बंद होतो—मंदोदरीचेही शब्द लुप्त होतात आणी मेघनादाचाच काय तो घनगंभीर मंत्र ऐकू येतो— ॐ नमः शिवाय ! मंदोदरीच्या मुखावर विजयाचे हास्य——निर्भयतेची साक्ष देणारे—पुत्राला घडविल्याचं समाधान असणारे——)

---

१७. मंदोदरीने मेघनादाला असे घडवले. आणि खरोखरच त्याने पुढे इंद्राचा पराभव केला. म्हणूनच पुढे मेघनादाऐवजी तो इंद्रजित या नावाने प्रख्यात झाला. उत्तरकांड सर्ग ३०.

# ‘एका शुक्रवारी’

श्रीराम खांडेकर

शेवटी ती बातमी नॅन्सी ली पर्यंत पोचलीच. फारच मोठी बातमी. नॅन्सीला बक्षिस मिळाल होतं. पण ती त्यावद्दल फारसे बोलली नाही. उलट ज्या मुलांना कंड्या पिकविण्याचा किंवा तर्कट अंदाज करण्याचा तसा अधिकार नव्हता, त्यांनी शाळा डोक्यावर घेतली होती. खर तर ह्या वर्षी आर्ट स्कॉलरशिप् कोणाला मिळाली आहे हे एकाही मुलाला धड ठाऊक नव्हत.

पण नॅन्सीच चित्र इतकं सुंदर होत, तिच्या रंग-रेषा इतक्या रेखीव आणि सुसुत्र होत्या की जॉर्ज वाशिंग्टन हाय मधील इतर कोणत्याही मुलाला ह्या वर्षी चान्सच नव्हता. पण तरीही सांगता येत नव्हत. कारण गेल्यावर्षी जो विल्यम्स्‌च्या त्या सामान्य चित्राला आर्टीस्ट क्लबची स्कॉलरशिप मिळेल अस कोणाच्या स्वप्नात देखील आल नव्हत. पण जो विल्यम्स्‌ला ती मिळाली. नंतर जो ला मोठी पार्टी देण्यात आली, मोठ-मोठ्या चित्रकारांनी त्याची पाठ थोपटली आणि आज तो आर्टस्कूलचा अॅवॉर्ड-स्टुडंट होता.

नॅन्सी ली जॉनसन् ही काळी निग्रो मुलगी काही वर्षापूर्वी दक्षिणेतून आली होती. पण तिचे हे काळेपण तिच्या वर्गातील सोबत्यांना तसे कधीच जाणवले नाही. ती ह्या शाळेत आता रुळली होती. तिला शाळेच्या स्कॉलरशिप्स् नेहमीच मिळत. म्हणजे ती त्या पटकावी. ती बॉस्केटबॉल तर उत्तम खेळत असे आणि संगीत-स्पर्धांमधे तिचा मखमली आवाज घुमला नाही असं कधी झालच नाही. त्यामुळे ह्या गोष्टीचा उल्लेख कधीच होत नसे.— काळेपणाचा !

ती स्वतःच कधीकधी तिचे हे काळेपण विसरून जायची. तिला तिची शाळा आणि तिचे सोबती दोन्ही खूप आवडायची. तिची टीचर, मिस् डेट्रीच् तर तिला फारच आवडायची. मिस् डेट्रीचने तिला खुप महत्वाच्या गोष्टी शिकवल्या. — ब्रशचे स्ट्रोक्स् किती फर्म असावेत, कलर्स कसे स्वच्छ असावेत, काम नियमबद्ध आणि व्यवस्थित कसे करावे वगैरे वगैरे. पायरी पायरीने चित्र कागदावर उतरले की ते इतके सुंदर स्वच्छ आणि भारदस्त असायला हवे की त्या कागदाला एक आगळा अर्थ प्राप्त झालाच पाहिजे. जगातील इतर कोणत्याही चित्रासारखे ते व्हायला नको . आणि नॅन्सी खरोखर अशी चित्रे रंगवू लागली. खरे सर्जन असेच असते. ते इतर कोणालाही घडविता येत नाही. फक्त तुम्हालाच ते घडविता येते !

मिस डेट्रीच तिच्या विद्यार्थ्यांमध्ये असणारे सुप्त कलागुण असे बाहेर आणित असे. पण सारी किमया विद्यार्थ्यांची स्वतःची. नक्कल कधीच कुणाची नाही. मग ती मायकेल अँजेलोची का असेना. मिस् डेट्रीच्‌ला त्याने समाधान होत नसे. कारण तिला तरुण अमेरी-कन मुलामुलींची ही शक्ति वाढवण्याचे आणि जोपास-ण्याचे फार मोठे काम असे.

नॅन्सीला आपण अमेरीकन असल्याचा फार अभि-मान ! तशी मूळ ती आफ्रिकेची. तिच्या आईवडिलांनी तिला आफ्रिकेबद्दल खूपसे कांही सांगितले होते. तेथील निसर्ग सौंदर्य, तेथील लोकगीते, तेथील मोठाल्या नद्या, पिरॅमिडस् आणि आफ्रिकेची पुराणी भव्य संस्कृती वगैरे तिला ऐकून माहित होते. मिस डेट्रीच्‌ने तिच्या-साठी आफ्रिकेतील शिल्प—बेनीन, कांगो, मॅकोन्डे वगैरे शोधून ठेवलेच होते. नॅन्सीचे वडील पोस्टमन आणि आई सोशल वर्कर. ते इतर सामान्य अमेरीकन लोकां-सारखेच होते. शिक्षणासाठी त्यांनी खूप कष्ट उपसले होते. आता नॅन्सीला तसले कष्ट सोसण्याची पाळी येऊ नाही ह्याचीच ते नेहमी दक्षता घेत. नॅन्सीने तिच्या अॅवॉर्डबद्दल कांहीच सांगितले नव्हते. तिला त्यांना आश्चर्याचा गोड धक्का द्यायचा होता. शिवाय तिने वचन दिले होते.

नॅन्सीच पेंटींग मॉडर्न नव्हतं. म्हणजे ते कळण्या-साठी बराच वेळ त्याच्याकडे पहात बसण्याची आव-श्यकता नव्हती. ते एक साधं दृश्य होत. बागेत वसंत फुलला होता. झाडांना अजून तशी पालवी फुटली

नव्हती. बागेच्या मधोमध एका खांबावर अमेरीकेचा झेंडा फडकत होता. त्याच्या आजुबाजूला मुलं खेळत होती. त्याच्याजवळच एका बाकावर एक नीग्रो स्त्री बसली होती. तिचा चेहरा वर उचललेला होता. एका चित्राच्या मानाने तशा गोष्टी बऱ्याच होत्या त्या चित्रात. पण सगळं कसं प्रफुल्ल होत. वरचस निळं आकाश आणि पांढरे शुभ्र ढग त्यात होते. कोणीही सांगू शकलं असत की ती नीग्रो स्त्री त्या झेंड्याकडे पहात होती, तो झेंडा वाऱ्याच्या झुळुकेने ताठर अभिमानी झाला होता. आणि त्याच वाऱ्याच्या झुळुकीने खाली खेळणाऱ्या मुलांचे तलम कपडे सुळसुळत होते.

वसंत कागदावर कसा रेखाटायचा, चेहरे कसे रंगवायचे, वाऱ्याची झुळुक कशी दर्शवायची वगैरे गोष्टी मिस् डेट्रीच्नेच नॅन्सीला शिकवल्या होत्या. पण त्या वसंताला, त्या चेहऱ्यांना आणि त्या वाऱ्याला कोणता अर्थ प्राप्त करून द्यायचा हे काही मिस् डेट्रीच्ने नॅन्सीला सांगीतले नव्हते. ते काम नॅन्सीवरच सोपवण्यात आले होते. आणि म्हणूनच ती नीग्रो बाई तेथे बसली होती. तो झेंडा, तो वसंत आणि ती स्त्री यांचा तो त्रिकोण–नॅन्सीच्या स्वप्नाची ती अभिव्यक्ती... आर्टीस्ट क्लबच्या परीक्षकांना हे सारं आवडल असतं ?

एप्रिल महिन्याच्या एका पावसाळी दिवशी नॅन्सीला तिच्या व्हाईस–प्रिन्सिपॉलचा–मिस् ओ-शाय्-चा मेसेज् मिळाला. शाळा सुटल्यावर त्यांनी तिला त्यांच्या ऑफिसात भेटायला सांगितले होते. नॅन्सीला ह्याचा बोध होईना. एकदोनदा तिने तिचे कपाट जोराने लावले होते. काल सॅलीला गंमतीखातर तिने फ्रेंच भाषेत एक पत्र लिहीले होते. सॅलीच्या ऐवजी ते मिस् ओ-शाय्च्या हातात तर पडले नाही ? किंवा एखाद्या विषयात ती नापास झाली असेल. केमेस्ट्री ! नॅन्सीच्या पोटात गोळा उठला.

घाबरतच तिने मिस् ओ-शाय्च्या फ्लॅप् डोअरवर नॉक् केले.

'कम इन' आतून परिचित आवाज आला. नॅन्सी फ्लॅप डोअरचा आवाज न होऊ देता आत गेली.

"नॅन्सी ली. तुला...सीट डाऊन नॅन्सी. तुला एक बातमी द्यायची आहे. बघ, पण एवढ्यात कोणाला सांगायच नाही हं." मिस् ओ-शाय् हंसतच म्हणाल्या.

नॅन्सी तशीच बावरल्यागत उभी राहीली.

"नॅन्सी आता तू आर्ट स्कूल मधे जाणार. वुई शॅल रीयली मिस यु."

इतक्यात दारावर टकटक झाली.

'कम इन'.

मिस् डेट्रीच आत आल्या. "मी सुद्धा सहभागी होऊ द्यात ?"

"ऑफ कोर्स," मिस् ओ-शाय् ने हंसत म्हटले, "मी आता नॅन्सीला तेच सांगणार होते. अस करा, तुम्हीच सांगा तिला. ते जास्त छान वाटेल."

मिस् डेट्रीच्ने लागलीच ती बातमी नॅन्सीला दिली.

नॅन्सी ली. तुझ्या चित्राला आर्टीस्ट क्लबची स्कॉलरशिप् मिळाली आहे."

नॅन्सीला काय बोलाव तेच सुचलं नाही. तिला छातीत धडधडायला लागल. तिचा गळा दाटून आला. तिने हंसण्याचा प्रयत्न केला. पण अचानक तिचे डोळे ओले होऊन आले. मिस् डेट्रीच्ने तिचे दोन्ही हात हातात घेऊन हळूच दाबले. मिस् डेट्रीच्चा चेहरा अभिमानाने फुलून आला.

नॅन्सी नाचतच घरी आली. पावसातून ओलीचिंब होऊन ! हे गुपित तिने कुठेच उघडे केले नाही. तिचे हंसु, तिचे आंसु आणि पावसाचे थेंब-सारेच जमले होते तिच्या गालांवर ! पण कोणी भेटण्याअगोदर तिला नार्मल व्हायला हवे होते. फार मोठे गुपित तिला सांभाळायचे होते.

मिस् ओ–शाय्ने स्कॉलरशिप्ची बातमी मुद्दामच तिला लवकर दिली होती. शुक्रवारी तिला ॲवॉर्ड मिळाल्याची बातमी प्रार्थनेच्या वेळी शाळेत जाहीर करण्यात येणार होती. त्याच दिवशी संध्याकाळी आर्टीस्ट क्लबच्या अध्यक्षांच्या हस्ते तिला ॲवॉर्ड मिळणार होते. ह्या दोन्ही प्रसंगी नॅन्सीला छोटेखानी भाषण देणे आवश्यक होते. मिस् ओ–शाय्ना ही कल्पना होतीच. म्हणूनच नॅन्सीने तयार असावे असे त्यांना वाटले आणि त्यांनी ही गोड बातमी तिला दिली.

"आता आईला थंडीत नवा कोट घेता येईल. माझी फी स्कॉलरशिप्च्या पैशांतूनच भरली जाईल.

आर्ट स्कूलमधे मला इतर स्कॉलरशिप्स् पटकावता येतील." नॅन्सीची स्वप्नं रंगू लागली.आता ती स्वत:साठी तिच्या आईवडीलांसाठी आणि नीग्रो लोकांसाठी एक नवे विश्व निर्माण करणार होती. नॅन्सीला तिच्या जातीविषयी खूप कणव होती. अमेरीकेतील नीग्रो ! नेहमीच दुर्लक्षिलेले, हेटाळले गेलेले ! पण त्या झेंड्या-वरच्या चांदण्या ? त्यांचे काय ? इतक्या चांदण्या जगातील कोणताहि झेंड्यावर नसतील !

शुक्रवारी तिच्या हाती मेडल आणि स्कॉलर-शिप्‌चा कागद पडल्यावर ती म्हणेल,

"माननीय....आणि आर्टीस्ट क्लबच्या सभासद मित्रांनो, मी तुमची फार आभारी आहे. मला दिलेल्या ह्या अॅवॉर्डबद्दल. ह्यात माझा गौरव तर तुम्ही केलाच पण आमचा—नीग्रोंचा—देखील त्यात गौरव झाला. तेच नीग्रो——ज्यांच्या पदरी नेहमीच निराशा आणि लज्जा-स्पद जिणं पडल. त्यांचे काळेपण आणि त्यांची गरीबी त्याना खायला उठलेली आहे. मी ह्या अॅवॉर्डचा केवळ माझ्यासाठीच नव्हे तर माझा जातिसाठी सुद्धा स्वीकार करते. माझी जात अमेरीकेवर, तुम्हा सगळयांवर आणि आपल्या झेंड्यातील त्या चांदण्यावर श्रद्धा ठेऊन आहे. माझ्या टीचर मिस् डेट्रीच आणि माझे सोबती ह्यांची मी फार आभारी आहे. त्यांच्यामुळेच आजचा हा दिवस मला दिसला. आम्ही प्रार्थनेत नेहमीच शपथ घेतो की अमेरीकेच्या स्वातंत्र्य आणि समतेच्या स्व-प्नाला साकार करण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न करू मी ही शपथ आज—इथे पुन्हा घेते."

सकाळी मुलांसमोर नॅन्सी हेच सांगणार होती. नीग्रो मुलांना किती बरे वाटेल ! आई तर आनंदाने रडेलच...असेच सगळे विचार डोक्यात घेऊन नॅन्सी त्या रात्री झोपली.

शुक्रवारी सकाळी नॅन्सी शाळेत गेली. रोल कॉल घेण्यापूर्वी तिच्या टीचरने नॅन्सीला स्वत:जवळ बोला-वले. "नॅन्सी, मिस्-ओ-शाय्‌ने तुला आताच त्यांच्या ऑफिसात यायला सांगीतलय." त्या म्हणाल्या. नॅन्सी मिस् ओ—शाय्‌च्या ऑफिसकडे निघाली. तिला वाटलं रिपोर्टर्स आले असतील. तिची माहिती विचारणार असतील. तिचा फोटो घेणार असतील. तिने नॉक् केले.

'कम इन'.

नॅन्सी आत गेल्याबरोबर मिस् ओ—शाय उठून उभ्या राहिल्या. त्यांनी नॅन्सीला बसण्यास सांगीतले. त्यांना काहीच सुचत नव्हते. पण मग त्या म्हणाल्या, "नॅन्सी, कसं सांगु तुला ? मला लाज वाटतेय." नंतर पुन्हा त्या थांबल्या. मग अचानक त्या म्हणाल्या," नॅन्सी, तुला स्कॉलरशिप मिळणार नाहीये."

बाहेर पहिल्या पिरीयडची घंटा जोराने खणाणली.

नंतर थोडा वेळ सर्वत्र शांत झाले. मिस् ओ-शाय् म्हणाल्या, "नॅन्सी, कमिटीला जेव्हा कळलं की तू... नीग्रो आहेस, तेव्हा त्यांनी त्यांचा विचार बदलला."

नॅन्सीला बोलताच येत नव्हत. तिच्या आजु-बाजुला हवाच उरली नव्हती. खोली लहान लहान होत चालली.

"नॅन्सी तुला ही बातमी देताना मला फार दुःख होतय." मिस् ओ-शाय् म्हणाल्या.

"पण मिस् ओ-शाय् ..माझं भाषण.

' मिस् ओ-शाय् खिडकीच्या बाहेर पाहू लागल्या. बागेत ट्यूलीप्स्‌ची फुलं डुलत होती.

"मी प्रार्थनेनंतर माझ्या भाषणात स्वातंत्र्य आणि समतेच्या शपथेबद्दल बोलणार होते मिस् ओ-शाय्" तिच्या नकळत नॅन्सीच्या तोंडातून हे शब्द अचानक बाहेर पडले.

"मला माहित आहे," मिस ओ—शाय् पुन्हा तिच्याकडे वळत म्हणाल्या, "नॅन्सी, मी स्वत: आयरीश आहे. तुला माहित नसेल नॅन्सी, पण कांही वर्षापूर्वी अमेरीकेत आम्हाला 'डर्टी आयरीश' म्हणत. जेव्हा आम्ही येथे आलो तेव्हा अमेरीकन्स अक्षरश: आमच्या-वर तुटून पडले. आम्हाला परत जायला सांगू लागले. पण आम्ही गेलो नाही. आम्ही आमचा नाद सोडला नाही, कारण अमेरीकेच्या स्वप्नात आम्हाला पूर्ण श्रद्धा होती. ते स्वप्न साकार करण्याची ताकद आम-च्यात आहे ह्या बद्दल आम्ही मुळीच साशंक नव्हतो. डिफीकल्टीज्....येस्—होत्या त्या. प्रश्न—होय— डोंगर होते प्रश्नांचे—निराशा—तीही होतीच. लोकशाही तर हवी होती—हवी होती ती खऱ्या अर्थाने. अजुन आपल्या ह्या जगात लोकशाही निर्माण व्हायचीच नॅन्सी. तुला आणि मला ती निर्माण करायची आहे. पण त्यासाठी जमीन हीच आहे. पाया हाच. लिंकनचे शब्द इथेच

आहेत. आणि झेंड्यावरच्या ह्या चांदण्या ! ज्यांनी तुला स्कॉलरशिप् देण्याचे नाकारले त्यांना ह्या चांदण्यांचा अर्थ माहित नाही नॅन्सी. आपणच तो त्यांना समजवायचाय." अचानक मिस् ओ–शाय् बोलायच्या थांबल्या. त्यांच्या डोळ्यात नॅन्सीला एक चमक दिसली.

"वर बघ नॅन्सी. हूंम पाहू आता." त्या हळुच म्हणाल्या. नॅन्सीला वाटले–अज्ञान, कुपमंडूकता आणि द्वेषाच्या विरुद्ध जे जे महाभाग उभे राहिले असतील. ते असेच असतील. मिस् ओ–शाय् सारखे. नॅन्सीने वर बघितले आणि ती हंसली.

प्रार्थनेची घंटा झाली. नॅन्सी सभाखंडाकडे जाऊ लागली. "मी जेव्हा मोठी होईन तेव्हा कोणत्याही मुलीवर असा प्रसंग येऊ देणार नाही. आणि मिस ओ–शाय् सारख्या व्यक्ति माझ्या पाठीशी असतील." नॅन्सीने मनातच आणखी एक शपथ घेतली-

नॅन्सी तिच्या जागेवर पोचली. सभाखंडाचे दरवाजे बंद झाले. प्रिन्सिपॉल आत आल्यावर सगळी उभी राहिली. एक हात छातीवर आणि दुसरा झेंड्याकडे ! तीन हजार आवाज एकाच वेळी घुमले. त्यातच एका काळ्या मुलीचा आवाज मिसळला. तिचे गाल भिजले होते.

"आय प्लेज अॅलीजिअन्स् टू द फ्लॅग् ऑफ द युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरीका अॅंड टू द रीपब्लीक फॉर व्हीच् इट स्टॅंड्स्. वन नेशन् इनडिव्हीझिबल वुइथ लिबर्टी अॅंड जस्टीस फॉर ऑल."

"दॅट इज द लॅंड वुइ मस्ट मेक" ती काळी मुलगी मनातच म्हणाली.

# 'दुपार जळते आहे'

अरुणा कुगावकर

आज शनिवार सकाळची शाळा असल्याने दुपार मोकळीच आहे. मन रिकामच आहे. ह्या खेळयात ना मैत्रिण ना दुसरी करमणुक ! ग्रंथांनाच मित्र मानण्या-खेरीज गती नाही. सोमवारी वर्गावर शिकवण्याची टाचणं काढून मी पुस्तक चाळीत पडले. बाहेर उन रणरणतय ! मी पडल्या ठिकाणाहूनच बाहेरच्या उन्हाचा अनुभव घेते आहे मनानं ! समोरच्या भिंतीवर वळचणीत पारवा घुमतो आहे स्वतःभोवती. हा नेहमी स्वतःतच दंग. एक सारख घूं ऽ घूं ऽ घूं ऽऽ ऽऽ मला हसूच आल.

समोर विहिर खणणं चालल होत गावाला पाणी पाहिजे म्हणून मजूर त्या रखरखत्या रक्ताच पाणी करून घाम गाळीत आहेत. आरोळया मारीत आहे. राघू मैनांची गाणी ही मधून मधून म्हणतात 'गाण्याने श्रम वाटतात हलके हे ही नसे थोडके.'

खिडकीवर पंखांची फडफड ऐकून मी वळून पाहिले एक पोपटाचं जोडप आल होत सावलीला ! त्याचे ते हिरवेगार पंख, लालबुंद चोची, टुळूटुळू पाहणारे डोळे ! पोपटाच्या गळयातला तो गाळा गोफ; त्यांच्या त्या नखरेल मोहक हालचाली. जीव सुखावून गेला. मनाची उगीचच तगमग व्हायला लागली. त्या पोपटांनी उगीचच माझ्या पूर्वस्मृती चोची खुपसून चाळवल्या.

मला नुकतच दोन दिवसापूर्वी आलेल ते सुनिलच पत्र आठवल "मधू ! किती सतावणार मला ? अगदी अधीर झालो आहे तुझ्या निर्णयाबाबत ! एवढा कसला विचार करतेस या विषयावर ? मी तुला मनापासून आवडतो हे समजतं तुझ्या हालचालीतून ! मग का छळ मांडला आहेस माझा असा ? चातका सारखी वाट पाहतो आहे उत्तर दे " इ. पुढच सार पत्र अलंकृत, उपमा रुपकांनी भरलेल. चार चौघ्या वेडया प्रेमिकांच्या सारखच. मी कपाळावर हात मारुन घेतला. काय सांगू त्याला ? मनाची उगीचच उलघाल होते. वाटतं स्पष्ट सांगाव त्याला, मी ह्या फंदात पडायच नाही म्हणून ठरवल आहे अस पण ! इथेच गाडी अडते.

पुन्हा पंखांच्या फडफडीन मी भानावर आले. राघू, मैना निघून चालली होती. राघू निघून गेला दूर अंतराळात. तिरा सारखा ! आणि मैना ? एकटीच पानझडल्या काटेरी बोरीवर जाऊन बसली होती रुसल्या सारखी ! तिच एकाकीपण मला भकास वाटल. मी डोळे मिटून घेतले. माझाही राघू असाच मला टाकून गेला आहे मी एकाकी बनले आहे. त्याच्यावर रुसून बसले आह. चिडले आहे पण हा जळफळाट माझ्या जवळच राहणार आहे.

मजूरांच्या पहारी खणखणत होत्या. बायकांची पाटयात माती भरुन टाकण्याची घाई उडाली होती. त्यांची काळीशार शरीरं लयीत हालत होती. मला मर्ढे-करांची 'गिरीधर पुतळा' ही कविता आठवली. किती रस घेऊन मी ती मुलांना शिकवली. याच कवितेवर चर्चा करताना दिवाकर मला प्रथम भेटला होता. नंतर पुढे सारखाच भेटत गेला या ना त्या कारणाने नेहमीच चर्चा वादविवाद यात समरस होण्याच्या वृत्तीनेच आम्ही कॉलेज मध्ये खेचले गेले होतो एकमेकांकडे. कशी कुणाला ठाऊक पण विलक्षण ओढ उत्पन्न होत गेली आमच्यात. आणि चंदेरी प्रीति म्हणजे काय असते हे अनुभवायला मिळत होत मला पहिल्यानच ! प्रेम का जडल ? वाऱ्याची झुळूक का आली ? अचानक ठसका का लागला ? हे कधी कुणाला सांगायला का येत ? मस्त धुंदीत एक सारख भरावलेपण अनुभवत होतो आम्ही.

प्रसंग घडत होते. संकटही येत होती. माझ्या घरात तर दवाखान्यानं ठाण मांडलं होतं.सारख्या आई-च्या आजारपणानं मानसिक तोल ढळत होता. कणा-कणानं खचत होते मी. पण दिवाकरच्या नेहमीच मिळ-णाऱ्या मदतीच्या हातान मी सावरत होते. अधिकच जवळ येत होतो आम्ही. अभ्यास करीत होतो, भांडत

होतो, हसत होतो. स्वप्नही रंगवित होतो वेड्या-सारखी. टप्याटप्यानं कॉलेजची वर्षे चढत होती. दिवाकरची बुद्धी जास्त कुशाग्र. त्याचा हात धरणारा सवंध कॉलेज मध्ये कुणी नव्हता. आणि नेहमीच हसत-मुख, खेळकर आणि चेष्टा मस्करीत रमणारा. मला अभिमान वाटायचा त्याचा.

एक जात सोडता काय उण होत त्याच्यात ! माझ्या जीवनसाथीदारावद्दलच्या सर्व कल्पना एकवटून आल्या होत्या त्याच्यात. मी मोहरुन जात होते. वर्षा मागून वर्ष पाठ शिवणीचा खेळ खेळत होती. आता शेवटच वर्ष होत दोघांच. प्रयत्नांची पराकाष्टा चालली होती. नेहमीचा बोलका हसरा दिवाकर गंभीर बनत चालला होता. फारसा भेटेनासा झाला होता. मीही माझ्यात गुंतले होते.

परीक्षा पार पडली. आता मला कुठं तरी सर्व्हिस करण भाग होत. इतक्या दिवस संसाराचा गाडा ओढून थकलेल्या वडिलांना नव्या दमाच इंजिन हवं होत. मी ते आव्हान हसत स्वीकारलं. चालून आलेल्या नोकरीसाठी खेड्यात जाण्याचीही तयारी केली. दिवाकर कडून गोड गोड अभिवचन घेऊन मी कामावर रुजू झाले. मन स्वप्निल रंगात बुडत होत. दिवाकर डिस्टिंगशन मध्ये आला होता. तो आता सर्व्हिस धरेल. मग राजाराणीचा संसार थाटू.....त्याची गोड गोड भरगच्च पत्र नेहमी येत. मन शहारून जाई...!!!

फडफडाटाने मी भानावर आले. मैना अजून तिथच होती. फडफडाट करीत होती असह्यपणानं. तिचे पंख गुरफटले होते काटेरी बोरीत. कसे सोडवणार विचारी ? तिच्या शक्तिवाहेरचे होत ते. माझे अुर धपापू लागल. मला ते दिवाकरच दुष्ट पत्र आठवल. जे येऊन माझ्या जीविताचा चुराडा करून गेले होते. मलाही या मैनेप्रमाणेच असहाय्य बनवून तडफडत ठेवून गेल होत.

शनिवारची शाळा आटोपून मी परत येत होते. सारखा उजवा डोळा उडत होता. मन बेचैन बनत होत. २–३ महिन्यात दिवाकरचं पत्र आल नव्हत. त्याचे हालहवाल कळले नव्हते. एक साळुंकी नाचत पुढ आली. मला लहानपण आठवल.एक साळुंकी दिसली की अशुभ, दोन दिसल्या की शुभ. असे ठोकताळे बन-विले होते आम्ही. किती चटकन विश्वास वसे त्या संकेतांवर. झटकन मन कावर बावर होऊन आम्ही दुसरीचा शोध घेत असू. त्या शिवाय चैनच पडत नसे. आताही हे उगिचच अशुभ झाल अस वाटू लागल. उदास उदास झाल मन...

धाडधाड जिना चढून घाईन घरात आले. घरी एक पत्र येऊन पडल होत. मी अक्षरावरून ओळखल हे माझ्या दिवाकरच पत्र. तुटून पडले त्यावर ! ते अपशकुन पार विसरून गेले. अधाश्यागत फोडल ते. भरभर अक्षर सरकत होती डोळ्यापुढून. माझ अंग थरथरत होत. मी हे काय वाचत होते. भोवळ आल्या-सारख वाटू लागल. मी पलंगाचा आधार घेत खाली बसले, पत्रातला मजकूर कानात घुमत होता मी नको नको म्हणून कानात बोट घालीत होते.

दिवाकरला पुढ खूप शिकायचं होत. त्याला सर्व बाजू अनुकूल होत्या पण परिस्थिती बेताचीच असल्याने आर्थिक बाजू लंगडत होती. त्यासाठी त्याचे मामा सहाय्य करणार होते. त्याला स्वतःचा जावई बनवून. दिवाकरन लिहिलं होत. खूप खूप विचारांती मी हा निर्णय घ्यायचा ठरवलं आहे. मधू मला क्षम कर. मी मनाने सदैव तुझाच आहे. माझ्या हृदयात स्थान फक्त तुला आणि तुलाच आहे. आपला स्नेहबंध तोडू नकोस ग." मी टारकन् पत्र फाडल. चिंध्या चिंध्या केल्या त्याच्या. माझ्या मनाच्या उडाल्या होत्या तितक्या. शेवटी दिवाकरनी आपल मायावी रुप दाखवल होत. माती झाली माझ्या सप्तरंगी स्वप्नांची. आता पुन्हा कशाला हवे आहेत त्याला हे स्नेहबंध. मी पेटून उठले. मला उबग आली पुरुष जातीचीच. मी निश्चय केला पुन्हा पुरुष जातीवर विश्वास म्हणून ठेवायचा नाही. या मायामोहात पुन्हा फसायचं नाही.

काळ लोटत होता. मी लहानग्या चिमण्यांच्या विश्वात मला गुरफटून घेतल त्यांच्यात एक प्रकारच समाधान मला लाभायच. त्यांचे निष्पाप, निर्व्याज्य चेहरे. ते मन मोकळे हसणे. ते हरणाच्या पाडसा सारख वागडण. मी लहानात लहान होऊन त्यांच्यात रस घेऊ लागले. मन शांत बनत चालल. पूर ओसरून गाळ खाली बसून पाणी स्वच्छ व्हाव तस. मी दिवाकरला विसरण्याचा मनोमन प्रयत्न करू लागले. पण कधी कधी उंबर उलून किडे वळवळत बाहेर यावेत तश्या आठवणी माझा पाठलाग करीत येत. बेचैन बनवत.पण

मीही प्रयत्नांनी त्यांना परतविण्यास आता शिकले होते. मी त्याला पुन्हा पत्र पाठवल नाही. पुन्हा कधी त्याची गाठ घेतली नाही. आणि माझ गाव माझ क्षेत्र सोडून बाहेरही गेले नाही. आईच येई माझ्याकडे हवापालटाला.

मजुरांची जेवणाची सुटी झाली. आता सगळे मजूर रेंगाळू लागले. त्यांचा साहेब गेला होता ना गावाला. त्यामुळे सूत्र तुटलेल्या मण्यांसारखे मजूर विखुरले–सुनिल–त्यांचा तो उंच किडकिडीत साहेब दिसायला खूप स्मार्ट होता. आणि युनिफार्म मध्ये तर अधिक रुबाबदार दिसे.माझ्याकडे एकदा तो पाणीप्यायला आला होता आणि त्याची माझी ओळख झाली मजुरांना हव तिथल पाणी चालतं कारण ते पडले अडाणी. हा पडला सुशिक्षित गृहस्थ. त्यालाकस ने चालाव,? आणि मग रोजच तो येत गेला. पाणी पिण्याचा निमित्तानं. आता सानिध्याने, सहवासाने पुष्कळच मोकळेपणा आला होता त्याच्या माझ्यात. त्यान माझ्या एकलेपणाचा कोंडांळ फोडल. मला पुन्हा हसरी खेळकर बनवल. मुळात व्रात्य असलेल्या माझ्या मनावर जो अबोलणाचा गंज चढला होता तो त्यान हलकेच पुसून काढला.

काम आटोपून सुनिल माझ्याकडे येई. गप्पा मारायला. तोही या गावात एकटाच होता. बदलून आला होता नुकताच इथे. कुटुंबही मोठ होत त्याच त्यामुळे त्याला एकलेपणा फार जाणवे. मला माणूस हवाच अस नव्हत. पण असला तर चालत असे.त्याच्या आग्रहामुळे मी कधी कधी फिरायला ही जात असे त्याच्या बरोबर, शेताच्या बांधोबांधाने. रस्यात तो माझा हात हलकेच हातात घेई, कुरवाळी. त्याच्या उबदार स्पर्शानं शब्दातील भावना व्यक्त केल्या जात. पण मी मात्र थंडच असे. खूपदा तो डिवचून पुन्हा पुन्हा विचारी आडमार्गाने लग्नासंबंधी ! त्यावेळी एकदम मी गंभीर बने. कांहीच उत्तर देत नसे त्याला. इतर वेळी बडबड करणारी माझी वाचा हा विषय निघताच एकदम मूक बने. कित्येकदा प्रयत्नाने दाबून ठेवलेले उसासेही अस्फूटपणे बाहेर पडत. आणि ते लपवता माझी धांदल उडून जाई त्याच्या हे सर्व लक्षात येई मग तो चटकन विषय बदले. पण माझा गेलेला मूड काही केल्या परत येत नसे.

सुनिल मला हवा आहे फक्त एक मित्र म्हणूनच. मी एका मर्यादे पर्यंतच त्याला जवळ येऊ देई. उगीच आगीतून उठने फुफाटयाच पडले असे झाले तर पुन्हा? मला भीती वाटे. म्हणूनच तो मला हवा आहे तो केवळ एक मित्र म्हणून. तो मात्र माझ्यात जास्त जास्त गुरफुटत चालला आहे. माझ्या मनाचा शोध घेऊ पाहात आहे. माझ्या अंतरंगात डोकावून त्याला माझ्या जीवनातलं स्वतःच स्थान शोधायच आहे. त्यासाठी तो हरप्रयत्न करतो आहे मीही त्याला पूर्णपणे झटकून टाकू शकत नाही. मनाचे नाजूक धागे गुंतले आहेत त्याच्या ठायीही थोडेफार. मला त्याच्या मैत्रिची नितांत गरज आहे. वाटत सांगून टाकाव त्याला सगळ एकदाच स्पष्टपणे पण त्यामुळेच तो दूर गेला तर ?

आठ दिवसांपूर्वीच तो ट्रेनिंगसाठी गेला आहे परगावी. तो आता महिन्यानी येणार आहे मला उगिचच चुकल्या चुकल्या सारख वाटत आहे. त्यातच त्याच ते अधिर पत्र आलेल. त्याला मी जोडीदारीण म्हणन हवी आहे. उगिचच त्याच मन माझ्यात गुंतून पडल आहे. पण मी मात्र पुरती विटले आहे त्या संबंधांना. वाटत त्याला स्पष्ट सांगाव "माझ्या पहिल्या प्रेमभंगाने कशातच् रसवाटत नाही मला आता. उमलण्या पुर्वीच खुडली गेली आहे ती कळी आता छोटया मुलांच जीवन तेच माझ जीवन बनत आहे. अशा निरस बनलेल्या व्यक्तित्वाला कशासाठी कवटाळू बघतोस ? आणि स्वतःचही जीवन निरस करू पाहतोस ? नाही देऊ शकणार मी प्रतिसाद. मला नको खेचूस आता पुन्हा त्या भाव विश्वात स्त्री फक्त एकदाच प्रेम करू शकते. नको घेऊस या विषाची परिक्षा. मला खरोखरच तुझ्याबद्दल अपुलकी वाटते म्हणून सावध करू पाहते आहे तुला."

पण एकदा वाटत त्याला खरच वाटत असेल माझ्याबद्दल तर स्विकारेल मला माझ्या या स्थितीतही! नाही तर खुशाल नाही म्हणेल. एकदा काय असेल ते स्पष्ट होऊन जाईल. पण मन धास्तावते आहे. तो माझ्यापासून दूर झाला तर नको, नको मला त्याची शुद्ध मैत्री हवीय. मला तिची नितांत गरज आहे पण मनही धजत नाही त्याचा नकार घ्यायलाही आणि त्याला असाच अंधारात झुलत ठेवायला ही. आणि वास्तवाला उघडया डोळयानं सामोर जायलाही गोंधळ उडालाय मनाचा काय करू ? काय करू ?

आईची आता पत्रावर पत्र येतात. रजा काढून इकडे ये. चांगली स्थळ सांगून आली आहेत तुला. एकुलत्या एक लेकीसाठी आईनं चांगल्यातला चांगल जावई शोधून काढल्याचा चंग बांधला आहे. आपल्या ऐपतीचा विचारही न करता. आईनं ५–६ मुलांचे फोटोही पाठविले आहेत. माझेही फोटो पाठण्याचा सपाटा चालवला आहे तिन. जोडीदाराबद्दलच्या माझ्या अपेक्षा पुन्हा पुन्हा विचारते आहे ती. काय सांगू तिला, दिवाकरच्या जाण्यान तो रंगच उडून गेला आहे माझ्या जीवनातून, खुलण्याच्या आधीच म्हणून.

माझ मन गरगरत आहे. वाटत, रहाव असच कुठल्याच पाशात न गुरफटता. पण अविवाहितेला समाज राहू देत नाही सुखानं. आताच माझ्या लग्नाकडे डोळे लागले आहेत साऱ्यांचे, अगदी माझ्या नोकर माणसांचे सुद्धा. घराण्याच्या प्रतिष्ठेसाठी घालावीच लागणार आहे माळ कुणाच्या तरी गळयात. इच्छा असो नसो. पण कल्पनाच सहन होत नाही दिवाकरच्या ऐवजी दुसऱ्या कुणाला पतीच्या ठिकाणी मानण्याची. का आलाय दिवाकर तू माझ्या जीवनात ? का ही दुःखांतिका बनवलीस माझी ? मी चिडते स्वतःवरच ! वाटत हो म्हणावं सुनिलला. तो नसेल दिवाकरच्या तोडीचा पण कुणा अनोळखी चेहऱ्यापेक्षा पुष्कळ बरा. निदान आम्ही जवळून तरी पाहिलय एकमेकांना. गोंधळ गोंधळ माजलाय डोक्यात.

मजूर कामाला लागले होते दुपार चढत होती. धगाटा वाढला होता. रखरख अधिक जाणवू लागली. अजून मैनेच्या पंखांची फडफड थांबलीच नव्हती. तिची तगमग वाढत होती आता तिच्या भोवती ५–६ राघू जमले होते. तिला काट्यातून सोडवायला की तिला टोचून मारायला ? ती तडफडतच होती असहाय्यपणे. पहिला उडून गेलेला राघू असेल का त्यात ? त्याच्यावर रुसून तर ती बसली होती त्या काटेरी वनात. आणि अडकून पडली होती अशी.

गरम वाऱ्याच, धुळीच आवर्त एकदम उठलं. सगळ्या वातावरणात भरून उरल. हवेतील गरमी वाढत गेली. इतक्या वेळी बाहेरची त्रयस्थासारखी जाणवणारी रखरख आता आत घुसली. माझ अंग अंग व्यापत चालली. मी ही त्या रखरखीचाच एक भाग बनत चालले. अंगाला चटके बसू लागले. गरम गरम धुळ उडत गेली अंतराळात आणि इतस्ततः पसरली. मला उठून खिडकी लावयचही भान उरल नव्हत. अवर्ताचा लोट घरात घुसला त्या बरोबर कॉट जवळच्या टेबलावर पडलेले सुनिलचे पत्र, त्याचा फोटो आणि दिवाकरची स्मृति म्हणून आतापर्यंत जपून ठेवलेला फोटो, आईने पाठवलेले ५–६ वरांचे फोटो सगळे एकदम त्यावर तरंगू लागले. माझ्या भोवती जणू फडफडू लागले. मी गच्च डोळे मिटून घेतले. हातातल पुस्तक कधीच गळून पडल होते काहीच बघण्याची शक्ती अंगात नव्हती आता. तरी ऊलटून पालटून मिटलेल्या डोळयांपुढे दिवाकर सुनिलची अनंत रूपं तरळत होती. मी एक दीर्घ उसासा टाकला.

पारवा अजून घुमतच होता. आपल्यातच दंग होऊन. त्याच घुमण स्पष्टपणे जाणवत होत. घुंड ! घुंऽऽ !! धुंऽऽऽ !!!

---

## ऋणनिर्देश

**'युगवाणी'**च्या जून–जुलै ७५ अंकाच्या मुख पृष्ठावरील कविवर दत्ताच्या छायाचित्राचे तसेच आगस्ट–सप्टेंबर ७५ अंकाच्या मुख पृष्ठावरील कै. बा. सं. गडकरी यांच्या छायाचित्राचे ब्लाक्स दैनिक **'तरुण भारता'**च्या सौजन्याने प्राप्त झाले. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

**कार्यकारी संपादक**

# पहारा

शकुंतला खोत

तिला शांत झोप लागली होती. दुरून तिच्याकडे पाहून तिच्या सासुनं निश्वास टाकला आणि ती पाव-लांचा आवाज न करता हळूच दरवाजाजवळ येऊन उभी राहिली.

झोपेतही ती फार थकल्यासारखी दिसत होती. गेला महिनाभर ती पोटदुखीनं आजारीच होती. जीव-घेण्या कळा येत आणि पोट दुखत राही. जीव घावरा होई. मुळातच नाजूक असलेली तिची काया या दुखण्यानं पार कोमेजून गेली होती.

महिनाभर खेडेगावातच घरगुती उपचार करण्यात वेळ काढला. पण पोटदुखी काही थांबली नाही – तिचा गोरा रंग फिकट पांढुरका दिसायला लागला. अन्न अगदीच जाईना.

चांगली गोरी गुलाबी, धडधाकट सून बघतावघता वाळत चाललेली पाहून म्हातारी सासु काळजीत पडली. एकुलत्या एक सुनेवर तिची लेकीसारखी माया होती. मुलगा शेतीच्या कामावरून येऊ शकत नव्हता. शवटी हिंमतीनं सासुनं तिला दोन माणसांच्या मदतीनं छक-ड्यात वसवलं आणि शहराच्या दवाखान्यात भरती केलं.

दोनच दिवस झाले होते दवाखान्यात भरती होऊन. सासुला खात्री होती. मोठ्या डॉक्टरांचा इलाज दुखणं बरं केल्याशिवाय रहाणार नाही. पण दोन दिवस होऊनही म्हणावा तसा आराम पडला नव्हता. रुपयात दोन आणे दुखणं हटलं होतं...

ती पलंगावर निपचीत पडली होती. सुकून गेलेला चेहरा मलूल दिसत होता. नर्सने तिच्या अंगावर चादर सरकावली. हातपाय ताणून ती सुस्त पडली होती. तिची छाती वरखाली होत होती. गालावर आलेली केसाची बट वाऱ्यानं आणि श्वासावरोवर हालत होती.

दुरून सासु तिच्याकडे पाहात राहिली. तिच्या लग्नाला दोन महिनेही झाले नव्हते आणि ही पोटदुखी उमटली.... सासु पाहता पाहता विचारं करीत राहिली...

नवऱ्यामागं आपण एकुलत्या एक पोराला वाढ-वलं. किती खस्ता खाल्या, हिंमत बांधली आणि एकुलत्या एका पोराला लहानाचं मोठं केलं त्याचीही आजारपणं काढली. वीस वर्षाच्या पोराकरीता कधी दवाखाना पाहिला नाही. घरगुती उपायांवर हिंमतीनं सारं पार पडलं. आपला केशव वीस वर्षाचा झाला आणि आपण त्याचं लग्न लावून दिलं. गोऱ्या गालांची, गोऱ्या रंगाची, शालीन वागणुकीची आपली सून लक्ष्मीच्या रुपानं घरात वावरू लागली. आणि आता वंशाचा दिवा पाहून आपण डोळे मिटायला मोकळ्या झालो म्हणत नाही तोच सुनेनं हे जीवघेणं दुखणं काढलं

पुन्हा आपली धावपळ, खस्ता काढणं, घरगुती उपाय आणि हिंमत बांधणं चालुच राहिलं पण या खेपेला आपण हरलो. शहराच्या मोठ्या दवाखान्यात यावं लागलं. हिंमतीनं आपण तेही पार पाडलं. पण अजून दुखणं हटत नाही. पोर तर सुस्त पडलीय...

म्हाताऱ्या सासुच्या मनात आलं. सारा जीवनपट तिच्या नजरेसमोर येत राहिला....

इतक्यात सुनेनं हालचाल केली. ती कण्हली. पोटावर हात ठेवून कण्हायला लागली, चेहरा वेडा-वाकडा करायला लागली, सासु तत्परतेनं तिच्याजवळ आली तिनं तांब्यातलं पाणी सुनेला पोटभर पाजलं. तिच्या डोळ्यांना लावलं. सुनेन जड डोळ्यांनी तिच्या-कडे पाहिलं, तिच्या डोळ्यातून पाणी वाहू लागलं. सासुचा जीव चुटपुला 'जड-जीवाची माझी पोर. .देवा, ती पुटपुटली सुनेजवळच पलंगावर टेकीत तिनं विचारलं 'पुन्हा दुखायला लागलं होय ? उगा पोरी. वरं वाटल. डॉक्टरना सांगतो दुसरी दवा द्याया...' सुनेला थोपटीत ती जवळच बसली. तिच्या डोळ्यानही पाणी आलं होतं. चेहरा फिरवून ती उसनं हसली आणि सुनेच्या हातातल्या बांगड्या सारख्या करू लागली. तिचे गाला-वरले केस तिनं सारखे केले. कपाळावर हात टेकवला आणि ती दचकली...

'बाप्पा चटका बसतोय – पोरी, ताप कशानं काढला ?' आणि ती अधीकच काळजीत पडली–

दुरून नर्स येत होती तिला तिनं घाईघाईनं बोलावलं आणि केवीलवाणा चेहरा करून ती म्हणाली 'नर्सबाई, ताप भरलाय हो पोरीला बघा.' नर्सनं निर्विकारपणे पेशंटकडे पाहिलं आणि थर्मामिटर लावलं–

ताप चांगलाच चढला होता. 'देवा नारायणा. माझ्या वंशाचा दिवा हाय तिच्याजवळ माझ्या घराण्याची लक्ष्मी हाय ती. दिवा तेवत राहू दे ' सासु पुटपुटली. तिनं समोर अंतराळाच्या दिशेनं हात जोडले. ती पुटपुटत राहिली. सुनेकडे बघुन तिनं कानशीलावर आपली बोटं कडाकड मोडली.

'नर्सबाई डाक्टर केव्हासा येतील ?' काकुळतीनं सासुनं विचारलं.

नर्सच्या जणु ते कानावरच गेलं नसल्याप्रमाणं ती निर्विकारपणे पेशंटकडे पहात होती. काहीच उत्तर न देता पेशंटचं पांघरूण नीट करीत नर्सनं मनाशी काही ठरवलं असं दिसलं. ती दूर निघून गेली.

नर्सच्या मागोमाग थकल्या पायांनी, अवघडलेल्या शरीरानं लाचार सासू निघाली नर्सला गाठून ती पुन्हा म्हणाली 'नर्सबाई मोठं डाक्टर केव्हा येतील ? त्यांना लौकर बोलवा–माझी एकुलती एक सुन–पोटुशी हाय–आन त्यात हे पोटदुखी–ताप–काहीतरी करा वं...' म्हणत नर्सचा हात तिनं घट्ट धरून ठेवला. नर्सला तिची दया आली.

म्हाताऱ्या सासुच्या डोळयातलं पाणी नर्सच्या अंतःकरणापर्यंत पोचलं तिला समजावीत नर्स म्हणाली 'बोलावणं पाठवते–आत्ता येतील डॉक्टर....' आणि नर्स सुन्न मनाने निघून गेली..

सासु धापा टाकीत पुन्हा वॉर्डात आली. सुनेकडे पहात, डोळयांनी टिपं गाळत बसून राहिली तिच्या मनात वेडवाकडं येऊ लागलं अभद्र विचार गर्दी करू लागले.

'नाही नाही... तसं होणार नाही – मी चारी बाजुंनी उभी राहीन–रात्र रात्र उभी राहीन–डोळयात तेल घालून जागत राहीन – पर त्या काळया सावलीला इकडं फिरकू देणार नाही. मी रात्रभर पहारा ठेवीन, हिंमत हारणार नाही.' निश्चयी मनानं सासुनं स्वतःचे डोळे कोरडे केले. अवसान आणून ती सुनेजवळ बसून राहिली.

नर्स अधूनमधून येत राहिली, मधेच ती घड्याळाकडे पाही. मधेच पेशंटकडे पाही. अधून मधून सासुची आणि तिची नजरभेट होई सासुची केविलवाणी नजर ती टाळत राहिली..

नर्सन मोठ्या डॉक्टरांना चिठ्ठी पाठवली. पेशंट इज सिरिअस डॉक्टरांनी उलट लिहून कळवलं 'नोटेड – स्टार्ट ग्लुकोज सलाईन'

नर्सनं चिठ्ठी वाचून ओठ मुडपले. निश्वास टाकला. पेशंट सिरिअस आहे असं कळवूनही डॉक्टर स्वतः आलेच नव्हते. नर्सला या अशा वागणुकीची आणि या अशा स्वभावाच्या डॉक्टरांची नेहमीच सवय झाली होती. दुखणं, धावपळ, काळजी आता नेहमीचच झालं होतं....

सासु टक लावून नर्सच्या हालचाली टिपत होती... 'डाक्टरसाव कवासं येतील !' सासुनं पुन्हा लाचार होऊन लोचटपणानं विचारलं. नर्सनं तिला डोळयानंच दटावलं. चार रात्री सतत रात्रभर ड्यूटी करावी लागल्यानं डॉक्टर स्वतःच झोपले होते. त्यांना झोप आवश्यक होती. ती मिळावी म्हणून त्यांनी फिनोबार्ब घेतलं होतं. खूप गाढं झोप.. त्यांना अत्यंत आवश्यक होती. झोपेच्या या अशा गोळीनं ते सकाळी पुन्हा कामावर उभे राहू शकत हे नेहमीचंच झालं होतं. फिनोबार्ब ही देखील एक गरज, एक सवय झाली होती. त्या अशा झोपेचं सुख मिळवून देणाऱ्या गुंगीतून कुणी उठवलेलं डॉक्टरांना आवडत नसे. पण हे सारं या म्हातारीला कुठं आणि कसं सांगायचं डॉक्टर येणार नव्हते, निदान या वेळी तरी येण्याच्या अवस्थेत नव्हते हे नर्सला ठाऊक होतं. ती विचारात पडली – स्तब्ध राहिली.

'डाक्टर कवासा येतील ?' पुन्हा लोचट पण केवीलवाणा स्वर आला – त्या स्वरात काळजी आणि अधिरता शिगोशिग भरली होती.

पेशंट त्याच्या दुखण्याची आत्यंतिक अवस्था ती धावपळ – ती काळजी आणि ती जागरण. त्या झोपेच्या गोळया खाऊन सक्तीची झोप आणि विश्रांती

. हे असं दुष्ट चक्र सतत फिरत होतं. दिवसे दिवस त्याला वेग येत होता, डॉक्टरही शेवटी माणुसच होता त्याला झोप मिळणं आवश्यक होतं पण मग पेशंटच पुढं काय करावं नाडी नाडी वेगानं उडते आहे. मधेच लागतही नाही... आणि म्हातारी तर मागेच लागली आहे. पुन्हा डॉक्टरांना चिठ्ठी पाठवावी–प्रयत्न करून पहावा नर्सचं विचारचक्र फिरत राहिलं. पेशंट इज गास्पींग. .' नर्सनं चिठ्ठी लिहीली

नोटेड, स्टार्ट ऑक्सिजन डॉक्टरनं उत्तर पाठवलं – त्यांच्या डोळ्यावरची झापड – झोपेची गुंगी अनावर झाली होती

नर्सनं पेशंटला ऑक्सिजन देण्यास सुरुवात केली– नाकावाटे नळ्या घातल्या. म्हातारी सासु जवळच अंग आकसून उभी होती. श्वास रोखून सारं पहात होती.

'नाही आलं डाक्टर अजून .नर्सबाई नका हो पोरीचं असं हाल करूं....' म्हातारी सासु पुटपुटत राहिली.... नर्सनं तिला शांत राहण्याची गप्प राहण्याची खूण केली...

पलंगावर ती आता असहायपणे पडली होती. डोळे अर्धवट उघडे ठेवून एकाच दिशेनं सासुकडे केविलवाणं पाहात होती.

'नको भिऊं पोरी–मी हाये नं तुज्यापाशी आत्ता डाक्टर येतील – झोप स्वस्थ जराशीक. तुले लौकर आराम पडावा म्हून हृये नळी लावलीया. .' सुनेला समजावीत म्हातारी सासु तिच्याजवळ बसली. जन्मात कधी असला भयंकर आजार पाहिला नसल्यानं मनातून सासुही घाबरून गेली होती – पण वरकरणी हिंमत दाखवीत राहिली सुनेला धीर देत राहिली.

'मॅलिग्नन्सी.. उद्या ऑपरेशन व्हायचं आणि आजच पेशंटची ही कंडिशन. .. नर्सचं विचारचक्र सुरुच होतं. तिचे हातपाय सवयीनं पेशंटचं सगळं करीत होते – धावपळीनं, विचारानं तीही थकली होती. सलाईनची ड्रीप चालुच होती. एकएक थेंबाचा बुडबुडा खाली येत होता. सासु मधूनमधून त्याकडे पाहात होती. अशा अवस्थेत निपचीत पडलेल्या सुनेकडं पाहून तिला पुन्हा पुन्हा गहिवर येत होता – ती हिंमतीनं तो परतून लावत होती–

रात्र वाढत होती. उगाचच मनाची उदासीही वाढत राहिली सगळीकडे शांत झालं होतं. चोरल्या पावलांनी शूजचा आवाज होऊ न देता नर्स जा ये करीत होती. किंचित काळ दूरच्या टेबलावर टेकत होती... सासु मात्र डोळ्यात तेल घालून पहारा करीत होती– त्या उदास विचारांशी अभद्र कल्पनांशी मनोमन झगडत होती.

'झोप जराशीक पोरी... मीट डोळं... त्या बाटलिकडं बघत ऱ्हाऊ नको अशी. झोप माझी बाये...' सासुनं सुनेला थोपटल्याप्रमाणं करीत म्हटलं. सुनेन आज्ञाधारकपणे डोळे मिटले.... इतका वेळ प्रयत्न करूनही तिला झोप आली नव्हती आता ती झोपल्याचं पाहून सासुला समाधान वाटलं.

वेडं मनं समजावणी करीत राहिलं.. जराशीक झोप मिळाली म्हंजी दुखणं कमी हुईल–आराम पडल– तवर डाक्टर येईलच

रात्र वाढली. . आणि सून शांत झोपली... सलाईन ड्रीप थांबली. थेंब येईनासा झाला... सासुला वाटलं झोप चांगली गाढ लागल्यामुळं असावं, मनातून ती निर्धास्त झाली. पहाऱ्याची जागा सोडून नर्सला ही शुभवार्ता सांगायला ती हळूच उठली...

'आत्ता चांगली झोप लागलीया पोरीला बघा. आता कसली दवाई घ्याया उठवू नका तिला. कित्येक दिसामंदी अशी झोप नाई मिळाली तिला सुकानं झोपू द्या – आता ते बाटलीतली दवाई पन बंद झालीया – न्हाईतर सारखी त्या बाटलीकडे पाहात जागी ऱ्हाये – सुकानं '

म्हातारीची बडबड ऐकून नर्सची झोप पार उडाली. टेबलाबर टेकलेली नर्स ताडकन उठली. पेशंटजवळ आली – ड्रीप थांबलेली पाहून धसकली तिनं धावपळ सुरु केली – पण व्यर्थ–सारं शांत झालं होतं– कायमचं शांत झालं होतं.

म्हाताऱ्या सासुचा कडक पहारा चुकवून मृत्यू चोरपावलांनी केव्हा येऊन गेला कळलंच नाही. आणि शांत झोपलेल्या सुनेकडे आणि धास्तावलेल्या नर्सकडे भावडी सासु आळीपाळीनं पाहात राहिली...



अनुक्रमणिका

# कल्पितांमधील मानवप्रतिमा

सुभाष सावरकर

**कल्पिते व मानवप्रतिमा :**

मानवी स्थितीचा वेध घेण्याचा मानवाने आजवर जो काही प्रयत्न केला आहे त्यापैकी कल्पितांची निर्मिती हा एक महत्त्वाचा प्रयत्न होय. कल्पितांचे तीन घाट संभवतात. कादंबरी, नाटक व कथा. . . तत्त्वज्ञान, इतिहास, विज्ञान, नीतिशास्त्र, समाजशास्त्र-मानसशास्त्र-अर्थशास्त्र—राज्यशास्त्र हे सारे एकेका जीवनांगाशी संबंधित असले तरी जीवनाच्या साक्षात स्पर्शापासून दुरावलेलेच राहातात. ते मानवी कर्तृत्वाचे विश्लेपण—वर्गीकरण करतात, तसे अवोधमनाच्या गूढतेचा किंवा विश्वकेन्द्राचाही वेध घेण्याचा प्रयत्न करतात. पण जे काही ते करतात त्यात साक्षात्कारप्राय प्रतीतीचा जोर येऊ शकत नाही. भाषेच्या विनिमयशक्तीच्या मर्यादा त्यांना पडतात. कला व वाङ्मयातील प्रतिमा या मात्र ह्या मर्यादा उल्लंघून जातात व मानवी अवस्थेची साक्षात प्रतीती घडवू पाहातात. जीवनाच्या गतिमानतेचा शोध घेण्याची मूल प्रवृत्ती ही जीवंत जाणिवांना क्वचित कधी सबोध प्रतिमांमध्ये ढाळते; आणि या संबोध प्रतिमा विविध संदर्भकोषांसह मानवी जीवनाबद्दल अनिर्वचनीय असे काही सांगण्याचा चमत्कार करून जातात.

मानवाची प्रतिमा निरनिराळ्या ताणांमधून त्याच्या जीवनाच्या संदर्भात देणे हे कल्पितांचे कार्य होय. कल्पितांचा इतिहास म्हणजे या प्रतिमेत सामाजिक, राजकीय, धार्मिक, तात्त्विक व वैज्ञानिक संदर्भांमुळे होत गेलेल्या बदलांचा इतिहास होय. माणसाची ही प्रतिमा त्याच्या मूल्यतृष्णेशी संलग्न असल्यामुळे प्रत्येक कल्पित कृतीला काहीएक नैतिक संदर्भ असतोच. माणसाच्या प्रतिमेतील स्थित्यंतरे ही मूल्यव्यवस्था व मूल्यान्तर घडविणारी क्रांतिकारी घटिते यांच्या पार्श्वभूमिवर इथे प्रकट केली जातात. माणसाच्या प्रतिमेतील या स्थित्यंतरांचा मागोवा आपल्याला या ठिकाणी घ्यायचा आहे. . .

**कल्पितांची पार्श्वभूमी**

कल्पितांचा काळ सुरू होण्यापूर्वी ईश्वर हा एखाद्या हृदयशून्य एकतंत्री शासकासारखा मानल्या गेला होता. ईश्वर हा कायदे देणारा व त्यांविरूद्ध आचरण करणारास शासन करणारा सत्ताधीश ; आणि मानव हा या सत्ताधीशाच्या अस्तित्वाच्या दडपणाखाली गुदमरणारा क्षुद्र जीव—अशा या सापेक्ष प्रतिमा होत्या.

**महाकाव्यांचा काळ**

संस्कृतीशी निगडित असलेल्या 'प्रगती'च्या कल्पनेतून जेव्हा सामाजिक मूल्ये पहिल्यांदाच जन्माला आली तेव्हा या प्रतिमांमध्ये डोळयात भरण्याइतका बदल झाला. माणूस माणसाची प्रसंशा करण्यास शिकला, औदार्य, प्रामाणिकपणा यांसारखे मानवी गुण 'शिव' ठरत गेले. महाकाव्यांमध्ये याच गुणांची पूजा बांधलेली दिसून येते. कल्पितनिर्मितीच्या या काळात ईश्वर हा हृदयशून्य प्रशासकाच्या सिंहासनावरून उतरून निःसंदिग्धपणे शिवा'चा समर्थक व संरक्षक ठरून गेला. मूल्यांनी भारून चुकलेल्या जयिष्णु मानवाचा तो पाठीराखा ठरला व मूल्यांचे अंतिम निधान बनला. इथली मानवप्रतिमा ईश्वराशी सुसंवाद साधणारी 'एकसंध मानव' अशी होती

**नियतीसंघर्ष**

परंतु हा सुसंवाद फार काळ टिकला नाही. ग्रीकांना असा शोध लागला की ईश्वर हा मूल्ये व मानव यांचे नेहमीच संरक्षण करील असे नाही. याच जागृतीतून माणसाला दर पावलागणित आव्हाण देणारी 'नशीव' ही संकल्पना पुढे आली. या 'नशिवा'चे आव्हान स्वीकारण्यातून मग माणसाची जयिष्णुता व महात्मता फुलू लागली. नशिबाशी दिलेल्या संघर्षात माणूस नष्ट झाला तरी या महात्मतेमुळे तो अमर होऊ लागला. हा झुंजार 'जयिष्णु मानव. . .!

### भवितव्याचा शिल्पकार मानव

ग्रीक नाटककारांनी मानवाच्या या प्रतिमेत आणखी एका परिमाणाची भर टाकली. ईश्वराची संरक्षकाची भूमिका त्यांनी नाकारली असली तरी विश्वाच्या नियमबद्धतेबद्दल त्यांची समजूत अधिक दृढ झाली होती. त्यांनी चित्रित केलेला माणूस स्वतःच्या भवितव्यतेचा स्वतःच शिल्पकार होता. स्वतःच्या स्वभावातच स्वतःच्या अंतीम आकाराची बीजे धारण करून तो नियतीच्या पार्श्वभूमीवर उभा होता. ईश्वराची जागा स्वतः घेण्याचे त्याचे स्वप्न होते. ग्रीक कल्पितांनी दिलेली ही 'राजपुरुषाची' (Royal Mau) भव्योदात्त प्रतिमा होय. स्वतःच स्वतःचा कायदा झालेला, समाजाच्या ताणांमधून बाहेर पडलेला हा मानव संस्कृत अभिजात नाटकांमधून देखील वावरताना दिसतो. स्वतःच्या सामर्थ्यातून व मर्यादांतून इथेही प्रारब्ध घडवू पाहताना तो आढळतो. पण पौर्वात्य संस्कृतीतील सहनशीलता व स्वीकाराची प्रवृत्ती यांच्यामुळे भारतीय कल्पितांतील हा 'राजपुरुष' अंतीम हताशपणा वा अंतीम विजिगीषुत्व या टोकाच्या अवस्थांना जात नाही.

या पायरीपर्यंत सत्य व असत्य यांची अंतिम परिणती अबाधित होती. ईश्वर व मानव या दोन पदांपैकी माणसाचे कर्तृत्व अधिक महत्त्वाचे होते. ख्रिस्त व मार्कोइन यांच्या काळापर्यंत हे संबंध अंतर्गत सामंजस्यासह असेच प्रस्थापित होत आलेले दिसतात.

### 'सत्या'चे वर्चस्व

त्यानंतर मात्र 'ईश्वराचा न्यायनिवाडा' करण्याची भूमिका मानवाने स्वतःकडे घेतली. व्यक्तीने परिस्थितीवर मात करण्याचे हे युग होते. समाज हा या कल्पितात ताठर दिसत नाही; तो स्थितिस्थापक दिसतो आणि 'राजपुरुषा'च्या अपेक्षा पूर्ण करण्यात व्यस्त असलेला सहिष्णु वृत्तीचा दिसतो. इथली प्रतिमा 'न्यायप्रिय मानवाची

### मध्ययुगीन समाजनिष्ठा

मात्र, पुढे मध्ययुगीन काळात समाजाचे नीतिनियम अधिक दृढ झाले. सांस्कृतिक प्रगतीतून अपरिहार्यपणे साकळलेली ही स्थितीशील जडता होती. यामुळे समाजमूल्ये जणू त्रिकालाबाधित ठरून गेली; व व्यक्तीने त्यांच्यावर घेतलेला आक्षेप, आणि त्यांचा केलेला अनादर अक्षम्य ठरू लागला. या कालखंडातील कल्पिते ही सामाजिक आशयांनी जडावलेली आहेत. (फील्डिंग–टॉल्स्टॉय–बंकीमचंद्र यांसारखे कल्पितकारदेखील समाजाविरुद्ध उभ्या ठाकलेल्या व्यक्तींकडे सहानुभूतीने पाहात नाहीत.) तरीसुद्धा समाजाच्या बहुविध शक्तींनी उद्ध्वस्त होऊन चुकलेला नायक आपले हृदय काबीज करतोच; व कल्पिताका राच्या समाजनिष्ठेला त्याने दिलेला चकवा जाणवून देतोच! ...

याच काळात समाजमूल्यांच्या विपरीत, व्यक्तींची बाजू घेणारे व त्यामुळे समाजाच्या रोषास पात्र ठरणारे कल्पिताकार दिसतात, तसेच त्या व्यक्तिवादी कल्पिताकारांपैकी काहींना समाजाने मानवंदना दिल्याचे विलोभनीय दृश्यदेखील दिसते. उदा. डिकन्स, वोल्तेर, इब्सेन, शॉ हे क्रांतिकारक कल्पनांमधून समाजमूल्ये अधिक उन्नत करताना दिसतात. शरच्चंद्र, टागोर हे देखील समाजसुधारणांना उपकारकच ठरतात. सामाजिक संघर्षांना कवळू पाहणारी ही कल्पिते ईश्वराला एकंदरीत पार्श्वभूमीवर स्थानापन्न करताना दिसतात. भव्योदात्त 'राजपुरुष' हा ईश्वराची जागा स्वतः घेऊ पाहात होता. आणि पुढच्या या कल्पितकारांनी शोधून काढलेले ईश्वराचे स्वरूप 'समाजसंघर्षात एकाकी उभा असलेला मानव'–हेच होते! ही 'महामानवाची प्रतिमा' होय. .

### मानवतावाद

यापुढची आकांक्षा ,माणुसकीवर प्रेम करणे म्हणजेच ईश्वरत्वाकडे जाणे'–या सूत्रातून व्यक्त होते. इथे मानवतावाद हा नवा धर्म बनला व माणसाची प्रतिमा 'दैवी मानव' अशा स्वरूपात कल्पितांमधून अवतरू लागली........

### उत्क्रांतिवादाचा प्रभाव :

ईश्वराची प्रतिमा काळवंडून टाकणारा पहिला फटकारा डार्विनच्या उत्क्रांतिवादाने दिला. ईश्वर हा एक क्षीण संयोजनक्षमतेचा अजागळ निर्माता ठरला. निर्मितीचे अनेक घाट शोधून व ते कार्यान्वित करून थकल्यावर 'अस्तित्वासाठी संघर्ष'– यासारख्या अर्धयांत्रिक पद्धतीवर प्राणिसृष्टीचा कार्यभाग सोपविणाऱ्या या ईश्वराच्या जागी 'निसर्ग' या नवीन संकल्पनेची स्थापना करण्यात उत्क्रांतीवादाचा सर्वात मोठा वाटा होता. या 'निसर्गात' वैयक्तिक आकांक्षेला जागा नव्हती; तशी सामाजिक उत्कर्षाची त्याला पत्रास नव्हती. 'शक्ती'

व 'गतिशीलता' हीच इथे सार्वभौम होती. साहजिकच 'शक्तिपूत प्रेरणा व चेतना यांना व्यक्त करू पाहणाऱ्या चैतन्या'सारखी मानवाची प्रतिमा या काळातील कल्पिताकारांनी दिली. यातून पुढे आला तो 'नैसर्गिक मानव.'!

आता मनुष्य जीवनशास्त्रीय प्रक्रिया व सामाजिक यंत्रणा यांच्या दुहेरी खोड्यात अडकून पडला. प्रगतीची शक्यता होती ती केवळ निसर्गपातळीवर, आणि ही प्रगतीदेखील सर्वसाधारण वैश्विक पातळीवरील प्रगतीवरच अवलंबून असलेली !

**नवमानसशास्त्राचा प्रभाव :**

.अशाप्रकारे धर्म व मानवतावाद यांनी निर्मिलेली मानवप्रतिमा कल्पितांमधून क्रमशः अंतर्धान पावत गेली. निसर्गाने ईश्वराला व्यवस्थित खो दिलाच होता. तरी समाज ही एक प्रभावी अशी वर्तमानकालीन वस्तुस्थिती अजूनही होती. म्हणून काही कल्पिताकारांनी मानवाला 'निसर्गस्थिती–ते–समाजनिष्ठ स्थिती' ह्या विकासप्रक्रियेत ओतण्याचा प्रयत्न केला; पण समाजनिष्ठाच 'अनैसर्गिक' ठरवून सर्व समाजवलांचा निषेध करणाऱ्या वहुसंख्य कल्पितकारांनी तो हाणून पाडला. मग या सर्वांनी 'आदिमानवाची' प्रतिमा साकार करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. भाव-भावनांच्या आवेगाने गतिमान झालेल्या व निसर्गाच्या आदिप्रेरणांनी भारलेल्या मानवाची प्रतिमा ! इथे निसर्गसत्ता ही माणसाच्या असतेपणाची गमक ठरली. समाज ही त्याच्या सुंदरशा स्वातंत्र्याचा विध्वंस करणारी आसुरी शक्ती ठरली. डी. एच्. लॉरेन्सची निसर्गमानवाची प्रतिमा ही अशीच एक. झोलासारख्या समाजमूल्यांसमोर मान तुकविणाऱ्या लेखकांनी मात्र आदीमानवाच्या जंगलीपणातून देखील समाजमूल्यांचा उद्घोष केलेला दिसतो. . .

**अबोधपूर्व संघर्ष**

'निसर्ग–मानवा'नंतरची प्रतिमा 'दुभंग मानवा'ची होय. या मानवात निसर्गावरोवरच सामाजिक प्रेरणादेखील तेवढ्याच अंतःपूत व तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. पण या दोहोंपैकी कुणाही एकीचा विजय हा व्यक्तीच्या नैतिक योग्यतेच्या संदर्भात महत्त्वाचा नाहीच! कारण ही नैतिक योग्यता व्यक्तीच्या आवाक्यावाहेर असलेल्या अवोधमनाच्या प्रेरणांनीच ठरणार होती. अवोधपूर्व संघर्षाला चालना देणाऱ्या असामान्य व मनस्वी व्यक्तींच्या दुभंग प्रतिमा डॉस्टोव्हस्की देताना दिसतो.

**आधुनिक कल्पिते**

परंतु आधुनिक कल्पिते या दुभंगलेल्या कळसूत्री माणसाच्या विपरित पुन्हा 'एकसंध मानव' निर्मू पाहतात. सार्त्रचा नायक मानवी 'निरर्थकता–ते–मानवी स्वातंत्र्याची महत्ता'–असा प्रवास संपवून मोठ्या कष्टाने ही एकसंधता मिळवतो. काम्यूचा नायक 'मृत्यूच्या सक्रिय स्वीकारातून ' एकसंध बनून जातो. काफ्काचा नायक दुराव्याचे एक दुसरेच टोक दाखवित 'एकाकी मानवाची' प्रतिमा सार्थ करतो. या प्रतिमाइतकीच व्यक्तिवादी असलेली 'प्रति–नायकाची' मानवप्रतिमा आहे. कशाविरुद्ध संघर्ष द्यायचा याची निश्चिती नसलेला व म्हणून लढण्यालाच अक्षम ठरलेला हा प्रतिनायक वेन, किंग्स्ले अमीस, भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, किरण नगरकर यांच्या कृतीमधून आढळतो. गोल्डिंगची किंवा कमल देसाईची 'पापपूर्ण मानव' प्रतिमा ही या किंकर्तव्यमूढतेला दिलेले अशिव स्वरूपाचे हताश उत्तर आहे. ऑखेलचा नायक तर इतका 'पशुतुल्य मानव' बनला आहे की मानवावद्दलची जुन्या कल्पिताकारांची कल्पना त्याने पार धुळीस मिळवली आहे. ग्रॅहॅम ग्रीनचा 'पशुतुल्य मानव' देखील मानवाच्या आत्मप्रतिष्ठेच्या कल्पनेवर भुतासारखा नाचताना दिसतो. इथे मानव हा असा 'एक' आहे ज्याला स्वतःच्या उज्ज्वलतेचा, जयिष्णुतेचा व भव्योदात्ततेचा भ्रम राहिला नाही; पण तरीही जो त्याच्या स्वतःच्या कृतीमधून मोजल्या जाऊ शकेल .ही प्रतिमा पुरुष व स्त्री दोघांनाही सारखीच लागू आहे. पुरुष व स्त्री यामधले संबंध आधुनिक कल्पितानुसार सत्ताप्रस्थापन किंवा शरणागती असे आहेत.

तंत्रविज्ञानाच्या अप्रतिहत प्रगतीमुळे मूल्यकल्पनांमध्ये क्रांतिकारक वदल झाले आहेत. एकेकाळचे कर्ता व कृती यांनी वांधलेले विश्व संपूर्णपणे वदलून गेले आहे. या पार्श्वभूमीवर सृजनशील कल्पिताकारांनी मूल्यांचे पुनर्मूल्यीकरण करू पाहाणाऱ्या मानवाच्या प्रतिमा गारठलेपण, क्रौर्य, शून्यवाद, निरर्थकपणा या प्रवृत्तींसह नव्या विश्वदर्शनी दृष्टीतून दिल्या आहेत. जीवनाची अर्थशून्यता व विश्वाची मौनधारी उदासीनता व्यक्त करणाऱ्या या मानव–प्रतिमा मानवी प्रेम व विव्हलता–व्याकुळता पोटात दडवून उभ्या राहातात...!

आधुनिक कल्पितांमधील प्रतिमा अशा एका हताश व व्यथित प्राण्याची आहे, जो एका क्रूर असहिष्णु व ईश्वरविहीन जगात केवळ यासाठी राहात आहे, की त्याला सुटकेचा मार्ग उपलब्ध नाही !! ● ●

# पाप

रमेश श्रीवर्धनकर

"नाही राजन, तेवढी हत्या माझ्या हातून होणार नाही. ते माझं आहे. त्याचा मी संभाळ करीन. मला मिळालेलं वरदान समजेन मी. पण त्याची हत्या करण्याचा मला आग्रह करू नका. कृपाकरून मी तुमच्या पाया पडते."

"अग पण हे सारं घेऊन तू जाणार आहेस कुठं? ह्या समाजात तुला एकटीला जगता येणार नाही. ही माणसं तुला सुखानं जगू देणार नाहीत. ऐक माझं. मी तुझ्याशी लग्न करतो. हे आयुष्य असं फुकट घालवू नकोस. माझी काळजी तू करू नकोस, मी समर्थ आहे. सारं ठिक होईल."

"तेही शक्य होणार नाही आता राजन्."

"का ?"

"चूक माझी आहे. मी इथं आले हीच फार मोठी चूक झालीय. माझ्यामुळेच तुम्हाला–"

"नाही उलट मीच—"

माझं ऐका राजन ! झालं गेलं विसरून जा. माझा विचारच सोडून द्या. ह्या घराच्या मानमरातबाला, प्रतिष्ठेला, अब्रूला संभाळा. माझं कांहीही वाईट होणार नाही. शिवाय राजन, आईंना ह्या वयात क्लेश होतील. आक्काचं लग्न व्हायचय अजून आणि हे सारं तुम्हालाच पहायचय. राजन, माझा मोह सोडा. माझी शपथ आहे तुम्हाला."

केवढा वादविवाद घातला होता मी तिच्याशी. केवढा मनस्ताप होता तोही. पण त्याही परिस्थीतित ती शांत होती. स्थिर होती. अचल होती. सारं संपत होतं ते माझं. माझ्या वेदना ! माझं पाप ! सारीकडून माझा विलक्षण कोंडमारा होत होता. ती मुक्त नव्हती तरी झाली होती. आपणहून, आणि मी ! मी अधिका–अधिक खोलात बुडत होतो. खचत होतो. केवळ तिच्या आठवणीनं. पाप मी केलं होतं. त्या पापातून तिनं माझी मुक्तता केली होती. पण माझं मन मला स्वस्थ बसू देत नव्हतं. ते सारखं मला खात होतं. कुठल्या तरी अज्ञात शक्तिनं शापावं तसं माझं सामर्थ्य, माझ्या आकांक्षा. सारं सारं विरून जात होतं. जगण्यासारखं होतं तेव्हा जगत होतो. नव्हतं तेव्हांही जगत होतो माझा मार्ग तिने मोकळा केला होता. पण माझ्या यातना तशाच वाढत होत्या. असह्य होत होत्या. जीवनावर मोठा भीषण अंधार पसरला होता त्यावेळी माझ्या. त्या अंधारातून सुटण्याचा मी आटोकाट प्रयत्न करित होतो. पण तरीही नव्या–नव्या संकटांना सामोरं जात होतो. कारण माझच पाप होतं ते. ते, मला स्वस्थ बसू देत नव्हतं. आजही देत नाही. कदाचित उद्या–

ते उद्याही तेच होणार आहे. जे आज होतय. आयुष्याच्या अंतापर्यन्त हे असच चालणार आहे माझ्या जीवनात. हा झगडा असा संपणार नाही कधी. ह्या झगड्यात ह्या संघर्षात माझं मी पण. ही धडपड, हे प्रयत्न सारं सारं संपून जाणार आहे. माझा मुक्त आत्मा जेव्हा ह्या नश्वर देहाला सोडून जाईल तेव्हाच आणि तेव्हाच माझी मुक्तता होणार आहे.पण तो पर्यन्त–

आज जवळ जवळ पाच वर्षे होत आली. पण तिची आठवण विसरता येत नाही. ती गेल्यापासून एक दिवसही असा गेला नाही की मी सुखानं जेवलो आहे ? एक रात्र अशी गेली नाही की मी सुखानं झोपलो आहे.

विमलच्या वागतही आज मला कांटे बोचल्या-सारखं होतय. तिच्या वागण्यातही मला तिला विसरता येत नाही. बिचारी विमल ! तिचा तरि काय दोष आहे. ? झोप येत नाही कां. ? डोकं दुखतय कां ? केवढ्या मायेनं ती माझी विचारपूस करते. केवढं प्रेम आहे माझ्यावर तिचं ? तशीच माझी ही दोन्ही मुलं. दीपा आणि पींकी ! पण ह्या साऱ्यान्पैकी एकालाही मी समजावू शकत नाही. आणि सांगू तरी कसं ?

विमल तेवढा धीर मला होईल का गं ? कसं समजावू तुला तरी ? माझा भूतकाळ ! त्या अनंत यातना ! ती बधीर करणारी आठवण !

आज प्रतिष्ठीत म्हणून समाजात वावरतोय. विमल सारखी सद्गुणी पत्नी, दीपा, पींकी! देवासारखी मुलं. हा पैसा, ही दौलत, हा बंगला, ही कार ! काय कमी आहे मला ? पण मी ह्या वैभवाताही सुखी नाही. तिचा बळी मी आजही विसरु शकत नाही. त्या निष्पाप, निरागस देहाचा बळी देऊनच ना मी हे सारं भोगतोय !

कुठं आहे ती ह्या पसाऱ्यात ? ह्या विशाल जगात. काहीच कळत नाही. एका बिन्दूनं 'विशाल महासागरात मिसळून जावं तसं तीही ह्या अफाट पसाऱ्यात कुठतरि--?

ती गेल्याला पाच वर्षे होत आली. त्या पांच वर्षापासून मी तिची वाट पहातो आहे. पण एकदाही ती आली नाही की कुठं दिसलीं नाही. आई गेल्यालासुद्धा चार वर्षे होत आली. अक्काच्या लग्नालाही पाच वर्षे होत आली, ती आता कॅनडाला स्थाईक झाली. पण पत्रात नेहमीच तिचा उल्लेख." दिसली होती कां भेटली होती कां ?"

बिचारी अक्का ! तिलासुद्धा--?

गेल्या पाच वर्षा पासून मी असाच दुःखी आहे. मी समाधानी नाही. ती गेल्यापासून असाच तडफडतोय. असाच जळतोय आतल्या आत. पण ती येत नाही. माझे डोळे अजूनही तिला शोधाताहेत. कुठं आहे ती. सुखी तरी असेल कां ? की .कांहीच कळत नाही. की ह्या अफाट जगातून--

त्यावेळी मी तिला केवढा समजावित होतो. तिनं ऐकलं असतं तर हेही पाप मी पचविलं असतं. तिला आपली म्हटली असती. ही दौलत तिच्यावरून ओवाळून टाकलीं असती पण--

पण तीनं कांहीच ऐकलं नाही. उलट भरल्या गळ्यानच मला म्हणाली."भरल्या संसारात असं विष घेऊ. नका, आक्काचं लग्न व्हायचच अजून. आईंना ह्या वयात क्लेश होतील. त्याना कोण आहे तुमच्या शिवाय ? राजन् माझा मोह सोडा. माझं कांहीही वाईट होणांर नाही. :विसरा सगळं. माझी शपथ आहे तुम्हाला "

आणि त्याच रात्री ती--

तिच्या शपथेतच मी आजवर बांधला गेलोय. डोळे 'मी पुसले.' पण तिचा बळी ! ते मी विसरु शकत नाही. मोठ्या मनानं तिनं मला माफ केलं. तरीही माझं पाप मला विसरता येत नाही. ती निरपराधी असतानाही मी तिचा बळी दिला मी पापी होतो. तरिसुद्धा मी समाजात प्रतिष्ठेनं जगावं म्हणूनच तिनं तो त्याग केला होता स्वतःची आहूति दिली होती. त्या त्यागाची परतफेड करण्याची संधी दिली असती, तर कृतकृत्य झालो असतो. जीवनातल्या एका उदात्त अंगाला स्पर्श केला असता. नवे जीवन उभं केलं असतं. तिच्या सोबत दुःखानं भरलेले काटेसुद्धा मी तुडवित गेलो असतो. आनंदानं. पण तिनं मला तेही करू दिलं नाही आणि अशी मला वाऱ्यावर टाकून--

समाजावर प्रेम केलं.प्रेम मिळविलं तेही साऱ्यान् कडून आणि अशी विदिर्ण अंतःकरण घेऊन काळाच्या ओघात दिसेनाशी झाली. केवढं मोठं वादळ कवटाळून गेली उरात. केवळ राजन देवधरसाठी. त्याच्या अब्रुसाठी, त्या ऋणातून तिनं मला मुक्त केल असतं तर! पण नाही.

आजही तेच ऋणाचं ओझं घेऊनच वावरतोय. आजही मी त्याच जुन्या वेदनांच्या भोवऱ्यात भटकटतोय. शीड नसलेल्या पडावासारखा. फक्त एकच इच्छा आहे. एकदा तरी तिनं यावं. फक्त एकटाच. आणि राजनला आपल्या बाहूत घेऊन माफ करावं. नाहीतर--

जीवन आजही त्याच जुन्या आवर्तनात गती घेतय तिथही तिच वेगळी जाणिव. भंगलेल्या मनाची. जुन्या ऋणानुबंधित संबंधाची. सारं संपल्यासारखं वाटतं. पुन्हा उभं रहातं. छळ चाललाय नुसता. हा प्रवासच वेगळा आहे. वेगळया जाणिवेचा. वेगळया आवर्तनाचा. त्याच आवर्तनात फिरायचं सीमाबद्ध होऊनच. शेवटी मर्यादाच सारीकडे. ही कोंडी फुटतच नाही. तेच चालणं. प्रकृतिला धरून. तिच जुनी आंठवण, त्याच जुन्या आवर्तनात जागी ठेऊन चालणं. आणि शेवटी सन्माननिय तडजोड नाहीच. सारं गुंतागुंतीचं आहे ते. संपेल तेव्हाच जेव्हा ती पुन्हा माझ्याकडे येईल तेव्हाच. नाहीतर--

ती अशी होती तरी कोण ? की मला तिची सारखी आठवण यावी. तिच्या व्यक्तिमत्वात असं काय होतं की गेल्या पांच वर्षांपासून मी तिला क्षणभरही विसरु नये?हे आहे तरी काय ? कांहीच कळत नाही.

पण कुठंतरी एक जाणिव आहे. ओढ आहे अतःकरणात. एक वेगळीच संवेदना आहे जी सर्वस्वी तिच्या मागोव्यात आहे. तिच्या भेटीसाठी आतुरली आहे.

नक्की आठवतय मला. त्या संध्याकाळी ती आमच्या घरी आली होती. नऊवारी लुगडं नेसलेली आणि डोक्यावर हा भला मोठा अंबाडा घातलेली तशीच पाहिली ती शेवटपर्यंत.

दूर कोकणात तिचं घर होतं. एका काकाशिवाय तिचं कुणीसुद्धा नव्हतं. आई गेली तेव्हा येताना तिला घेऊन आली ती. माझं घर संभाळेल. मी तिला संभाळीन ह्या बोलीवर आईनं तिला आणली होती.

त्यावेळी ती जेमतेम अठरा–एकोणीस वर्षाची होती.

तसं पाहिलं तर घरी आम्ही इन्‌मिन्‌ तीन माणसं. आई, आक्का, आणि मी. आई नेहमीचीच आजारी, माझं कॉलेज, अक्काचं कॉलेज. घर संभाळायला कुणीतरि हवच होतं. ह्यात ती आली.

घरातली सारी कामं तिच करायची. कपडे धुण्यापासून ते भाजी आणण्या पर्यंत सारं तीच करायची. रात्री आमची अंथुरणं ती घालायची, त्यावरच्या स्वच्छ चादरी, टेबल लँम्पची व्यवस्था, इतस्ततः विखुरलेलीं पुस्तकं पुन्हा सेल्फवर ठेवणं,अंघोळीला पाणी काढणं, जेवायला वाढणं. सगळं ती करायची, ह्यात जीव ओतून करायची. पण हे करताना कधी कमी जास्त बोलली नाही. एखादा शब्द, एखादी तक्रार काही नाही. त्यात आमची रुसणी-फुगणी. माझे मित्र. अक्काच्या मैत्रिणी, आईचं आजारपण. साऱ्यासाऱ्यांना संभाळून घेत होती. कर्त्या बाईच्या सरावानं सारं आवरत होती.

तिच्या सहवासात आम्ही आणि आमच्या सहवासात ती. आमची यात्रा चालली होती मी कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होतो. ते वर्ष संपत आलं. जवळ जवळ एक वर्ष संपत होतं. मी आल्यानंतर त्या वर्षभरात झालेलं ते तिचे दर्शन—

आयुष्यात एखादा चकार शब्द तिनं कधी कुणाला वापरला असेल, एखादी तक्रार केली असेल असं वाटतच नाही कधी वाटल्यासारखं नव्हतच कांही. साधं, सोज्वळ आयुष्य होतं ते. तचंस मायेनं ओतप्रोत भरलेलं. दुसऱ्यासाठी धडपडणारं ते जीवन, तिथं कधी वेडीवाकडी आंदोलनं उभी राहिली नाहीत, एखादं वादळ कांही नाही. सारं कसं संयमशील काटेकोर. उमगून येणाऱ्या मर्यादे बाहेर ती कधी गेली नाही. जाण्याचा प्रयत्न केला नाही. आईला असं वाटलच नाही.

त्या सहवासात आनंद होता, प्रीति होती, भक्ति होती, वादविवाद तिथं अपेक्षित नव्हते. स्वतःवर कधी कसली दडपणं येवू दिली नाहीत पण अनाहूतपणे आलेल्या दडपणांना शांतपणे, संयमशीलपणे सामोरी गेली तिनं व्यक्तविलेल्या भावना नेहमीच जबाबदार व्यक्तिच्या जीवनातलं भाष्य सांगून गेल्या. दीड दमडिच्या व्यवहारात सहसा पडली नाही पडण्याचा प्रयत्न केला नाही तसा प्रयत्न करील असं वाटलच नाही कधी.

तोल जाईल असा शब्द कधी तिनं वापरला नाही. प्रसंगाची पर्वा केली नाही. पण प्रसंगांना सामोरं जाताना संयमशील जीवन ती जगली दृष्ट लागावी असं दुबळ्या आशांना आणि खोट्या श्रध्देला सहसा वळी पडली नाही. तसा प्रयत्न केला नाही. करिल असं वाटलं नाही.

कलह तीला फारसे अभिप्रेत नव्हते. त्याचा सहसा पुरस्कार तिनं कधी केला नाही आणि केला असता तर त्या कलहातच माझं मी पण हरवले ह्या जाणिवेनं व्यथित राहिली खोटचा अभिमानाला सहसा वळी पडली नाही. तसा चुकुनही प्रयत्न केला नाही आपलं शांत निर्विकार आयुष्य जगावं. काळाबरोबर प्रामाणिक आकांक्षा घेऊन वाटचाल करावी. ह्यांतच समाधान मानलं.

प्रेम करणं, माया करणं हेच तिच्या दृष्टीनं महान्‌ श्रेय होतं जीवनातलं. पण तेवढच अनुभवाला येणारं. त्या श्रेयाशी समरस होताना, बुद्धीपेक्षा भावनेचं आधिष्ठान मानलं तिच तिच्या आयुष्यातली सर्वात व्यापक कल्पना होती निस्वार्थी प्रेमाची. तिच्या सहवासातच प्रेमाचा पहिला-वहिला साक्षात्कार मला झाला. प्रेम ह्या शब्दाचं खरं सामर्थ्य जाणवलं ते सुद्धा तिथच तिच्याच सहवासात.

आजच्या धकाधकीच्या जीवनक्रमापासून संपूर्ण पणे अलिप्त राहिली. प्रामाणिक आशा-आकांक्षांची

सोबत करावी, एक संयमशील तेवढच जबाबदार आयुष्य जगावं आणि ते जीवन जगताना आदर्शांना जपावं, डोळस संस्कृतिनं सांगितलेली पथ्ये पाळावी. आणि हे एवढं सारं करताना आपल्या सहवासातल्या कुणाला मी दुखवित नाहीना ह्याची काळजी घ्यावी. असं आदर्श-वत् आयुष्य होतं तिचं. जीवनातल्या महान् उदात्ततेला स्पर्श करण्याचा पहिला-वहिला अनुभव तिच्याच सहवासात मी अनुभवला.

तीच्या आयुष्याचं मी केलेलं ते अवलोकन होतं. केवढं सुंदर आदर्शवत आयुष्य माझ्यासमोर अष्टौप्रहर उभं होतं. पण मी ते जोपासण्याच्या लायकीचा नव्हतो. त्या वर्षांनंतर मी जवळ–जवळ बदललो. मी पूर्वीचा राजन देवधर राहिलेला नव्हतो. तिच्या जीवनाचं सुंदर मुल्यमापन करणारं माझं मन तीच्याकडे ओढ घेत होतं. पण ती ओढ अनुभूतिला जागृत करणारी नव्हती. तर जीवनात अंधार पसरविणारी होती. माझ्या वृत्ती बदलत होत्या. माझ्या जीवनात अंधार पसरवित होत्या त्या बदलणाऱ्या वृत्तीच्या फेऱ्यातून सुटण्याचा मी आटोकाट प्रत्यन करित होतो पण ते शक्य होत नव्हतं.

आणि तशात सहामहिने काळाच्या ओघात गडप झाले. मी कॉलेजला जात होतो. आक्काही कॉलेजला जात होती. आई आजारी पडत होती पण आता मी बदलत होतो. ह्या दिवसात एक गोष्ट माझ्या लक्षात आली होती. जीवनातल्या नीतिमत्ततेच्या दृष्टीनं एका धीक्कारलेल्या मार्गानं माझी वाटचाल होत होती. पण तरीही मी ते करीत होतो, ते असं काय होतं की मी सर्वस्व तिच्या आहारी जावं मला माहित होतं एकच होतं ते आणि ते म्हणजे तिचा तो गोरापान पुष्ट देह.

आपल्या प्रेमळ हातानं वाढणारी. मला आवडत होती म्हणून दर रविवारी सकाळी नियमानं थालीपीठं करुन देणारी, मला आंघोळीचं पाणी काढून देणारी. माझं अंथरुण टाकल्या शिवाय न जेवणारी ती ! ती मला हवी होती.

दिवसा-मागून दिवस येत राहिले पण माझी ओढ वाढतच राहिली. मी तिच्यासाठी वेडा होत होतो. स्वतःला समजावूनही मी स्वतःला सावरु शकत नव्हतो, मला फक्त तिचा देह हवा होता. फक्त तिचा देह जीवनातल्या पवित्र भावनांना जोपासणारी ती हवी होती.

विलक्षण गुंतागुंत होती ती. तिचा देह, ते निळसर पण स्वप्नाळू डोळे. मला आव्हान करताहेत असं वाटत होतं. मी तिच्याकडे ओढला जात होतो. जीवनातल्या एका विलक्षण पण गुंतागुंतीच्या मार्गानं माझी वाटचाल होत होती कॉलेज मध्ये मी जात होतो. पण बरं वाटत नाही म्हणून घरी येत होतो. पलंगावर आडवा पडत होतो. आणि आपल्या मायेनं भरलेल्या हातानं ती कपाळावर हात चोळायची निरागसपणे. तेव्हां मनात यायचं अशीच जवळ ओढावी नी–

मनाला सावरण्याचा माझा प्रयत्न असफल होत होता. पाप माझ्या मनात होतं. त्याही परिस्थि-तीत ती शांत होती. स्थीर होती. जेवायला आग्रह करकरून वाढीत होती.

तिला पाहिल्यावर कधी कधी वाटायचं लग्नच करावं तीच्याशी. विचारावं तिला तसं. पण मग डोळ्यासमोर आई उभी रहायची. आक्का दिसायची शिवाय माझी भूक फक्त शारिरिकच होती. तिच्यासाठी मी वेडा झालो होतो. तो काळच मला आव्हानात्मक होता. तिला पहाताच क्षणी मी पेटून जायचा. वाटायचं जावं टी घट्ट–घट्ट मिठीत घ्यावी तिला. नी–

घोंघावणाऱ्या वाऱ्यासारखें ते दिवस येत होते. मी त्यात गुरफुटत होतो माझं तरुण रक्त मला स्वस्थ बसू देत नव्हतं. तिचा स्पर्श पुन्हा पुन्हा अनुभवावा असं वाटत होतं मनात वादळ उठत होतं वासना बळावत होती. कधी–कधी वाटायचं तिनं. कुठं जाऊच नये. असच रात्रंदिवस माझ्या जवळ बसलेल असावं रात्रंदिवस तेच विचार माझा पिच्छा पुरवित होते. माझं कॉलेज, आई, आक्का, अभ्यास साऱ्या साऱ्यांना मी विसरत होतो. रात्री अंथुरणावर पडल्यावर वाटायचं. पलीकडच्याच खोलीतच तर ती झोपली आहे. अस्सं उठावं नी–

पण मग आई–ही आक्का—:

मी तिच्या आहारी जात होतो. तिचा उभा देह मला हवा होता. माझा पुरुषार्थ मला स्वस्थ बसू देत नव्हता. केवळ वासनेचच एक भोगमय साम्राज्य माझ्या मनावर अधिराज्य गाजवित होतं. मी तिच्याकडे ओढला

जात होतो. अगतिकपण, कदाचित ही गोष्ट त्या दिवसात तिच्याही लक्षात आली असेल, त्याची तिला जाणिव असावी असं वाटत होते. पण तिने तसं बोलून दाखविलं न हीं अगदी शांतपणे ती सारं करीत होती. नी शेवटी––

शेवटी ती रात्र–जी आज मला दुर्दैवी वाटते आहे–ती आली. त्या रात्री अक्काचं कॉलेजमध्ये नाटक होतं. आई–आणि आक्का दोघीही गेल्या होत्या. घरी फक्त मी आणि तिच होतो. फक्त दोघेच. त्या रात्री तिनं मला आग्रह करकरून वाढलं. खुपशी बोलली ती माझ्यापाशी. पण माझं कश्याकश्यातही लक्ष लव्हतं. मी पागल झालो होतो.

त्या रात्री मी खोलीत झोपण्यासाठी पाऊल टाकलं नी पाहिलं. ती माझा बिछाना घालीत होती. दारातूनच मी तिचा पाठमोरा देह पाहिला आणि मी बेभान झालो. मी तिच्या पाठमोरा देहाकडे पाहिलं. एक विलक्षण चमक चमकून गेली माझ्या रोमारोमात. तिचा उभा देह मला हवा होता. पूर्ण पणे. अगदी संपूर्ण पणे. आणि––

आणि काही कळायच्या आतच मी तिला घट्टघट्ट मिठी मारली. पण लगेच माझ्या मिठीतून आपली सुटका करुन घेतच ती म्हणाली. 'नको राजन, असला अविचार करू नका. हे पाप आहे. राजन' आणि माझ्याकडे पहातच ती पुढे म्हणाली, 'नको, राजन, कृपा करुन माझ्या मोहाला वळी पडू नका. चांगलं नाही हे. शिवाय–'

दाराला घट्ट धरूनच ती प्रामाणिकपणे माझी समजूत घालीत होती. पण ते मला मान्य नव्हतं. मी आंधळा झालो होतो. मला कांहीसुद्धा दिसत नव्हतं तिच्या देहाशिवाय. माझ्या मनात वासनेचा राक्षस थैमान घालीत होता. त्या रात्री मी नाही नाही त्या शपथा खाल्या. तिला प्रवृत्त केलं. आयुष्यातला पदिलावहिला अनुभव होता तो त्या आवेगात मी तिची नुसतं चुंबनावर चुंबन घेत होतो. माझे ओठ तिच्या ओठावर, गालावर, मानेवर, उरोजावर मुक्तपणे फिरत होते. पण तरीही कितीतरी वेळ माझी तृप्ती होत नव्हती. मी बेभान झालो होतो. नंतर ती पण मला साथ देऊ लागली. विलक्षण धुंदी होती ती. त्या रात्री आम्ही एकमेकाच्या मिठीतच.

माझा देह शांत झाला. तृप्त झाला.

त्या रात्रीनंतर अश्यात्र रात्री येत राहिल्या. तिन पूर्वीमारखा मला कधींही नकार दिला नाही. मीही बेफिकिर होतो. तीही शांत होती. मी जे जे मागित होतो ते ते ती देत राहिली.

ते दिवस असेच येत राहिले. माझी वासना भडकतच होती. ती आग आहे ते मला कळत होतं. पण त्याही परिस्थितीत मी तिला जवळ करीत होतो. क्षणिक सुखासाठी, हव्यासासाठी, देह शांत झाला की मनाला बजावीत होतो. त्याला सावरण्याचा प्रयत्न करीत होतो. पण तो तारुण्याचा उन्माद होता. ओसरता–ओसरत नव्हता. तिचा देह मला सारखी आव्हानं करतो आहे असं वाटायचं आणि मी ती आव्हानं स्विकारीत होतो. माझं मी पण त्यात विरुन चाललं होतं. त्याला बांध घालण्याचा मी प्रयत्न करित होतो. पण सारं व्यर्थ होत होत. मन म्हणत होतं जियं विश्वामित्र फसला तिथं––

त्या दिवसात तिनं मला पूर्वीमारखा प्रतिकार केला नाही. कां केला नाही ते मला माहित नव्हतं पण तो केला असता तर कदाचित पण–नाही तेही व्हायचच होतं. ते विधिलिखित होतं. नियतिला त्यांतून वेगळच साधायचं होतं. आणि त्यातूनच आमचे मार्ग भिन्न झाले. आमच्या दिशा वदलल्या. जीवनप्रवाह वदलले.

त्या दिवसात ती शांत होती. भविष्याचा विचार मी केला नव्हता. पण तिनं तो केला होता. ते मला कळायला फार वेळ लागला नाही तर–आणि––

आणि त्या रात्री ती हळूच माझ्याजवळआली नी म्हणाली, "मी आई होणार आहे आता."

तेवढेच शब्द होते ते पण घणाचे घाव घालावे तसे ते शब्द माझ्या कानावर आदळले. माझ्या कानाचे पडदे चिरुन आरपार गेले होते ते शब्द. माझा नुसताच थरकाप उडाला होता. केवढं कौर्य मी केलं होतं. त्याची जाणिव तेव्हाच झाली मला. ते निष्पाप, प्रेमळ जीवन मी जवळ जवळ उधळून लावलं होतं. काय करू नी काय नको असं झालं होतं. माझ्या डोळ्यासमोर, आई, आक्का; कॉलेज, माझे मित्र सारे सारे उभे राहले. मग वाटलं उद्या त्यांना हे कळलं तर ? विलक्षण मनःस्थितित होतो तेव्हा मी. ती जाणिवच मला कुठतरी संपवून टाकीत होती.

पण नाही. त्याच जाणिवेतूनच मी स्वतःला सावरलं होते. त्या शौर्यामागच्या जाणिवेतूनच एक आशा-

वाद जन्म घेत होता. मी मनाशी निश्चय केला. केवढीही मोठी किंमत मोजावी लागली तरी चालेल. पण तिला मी अंतर देणार नाही. ती माझी आहे. मी तिच्या चेहऱ्याकडे पाहिलं. तिथं निराळच विश्व साकार झालं होतं मोठं अर्थपूर्ण वाटलं ते मला. ते मी पाहिलं. माझी प्रिती वासनेतून मुक्त होत होती. जीवनातलं एक उदात्त विश्व ती व्यापु पहात होती. क्षणिक सुखसालसे-तून मी मुक्त होत होतो ती प्रितीजी मला तिच्यासाठी जगायला शिकविणार होती आणि मरायलाही. ती प्रीति-जिथं मला तिचा देह क्षणिक सुखासाठी नको होता. माझं मन तिच्या मनाकडे धाव घेत होतं. तिच्या आत्म्याशी माझा आत्मा समरस होऊ पहात होता ती प्रीति आता साकार होत होती आणि माझ्याच मनात गुणगुणत होती. ती माझी आहे तिच्या भावना, वासना, इच्छा–आकांक्षा, सुख दुःख माझी आहेत. माझ्यावर फक्त तिचाच अधिकार आहे. फक्त तिचाच.

त्याही परिस्थितित तिला मी आपली म्हटली. तिच्यासाठी मी वाटेल तो त्याग करायची तयारी दर्श-विली. पण शेवटी तेही––

तिनं माझं कांहीही ऐकलं नाही. उलट मलाच म्हणाली 'तुम्ही माझा मोह सोडा, चुक माझी आहे. मी इथं आले हिच––'

मी तिला समजावीत होतो. नाही तुझा काहीच दोप नाही. चुक माझीच आहे. तू अजूनही पवित्र आहे. खरच सांगतो तू माझ्याशी लग्न कर. मी कॉलेज सोडतो. तू माझ्याशी लग्न कर. मी नोकरी धरतो पण तू––'

तरिही तिनं काहीच ऐकलं नाही. तिच्या मनात एकच विचार होता. 'राजनशी माझं लग्न झालं तर आई–आक्का, आमचे नातेवाईक ह्यांचा विरोध होईल. आणि तेच तिला, जिवंतपणी येणारे मरण वाटलं. नेमकं तेच तिला नको होतं. तिची ती प्रवृत्तीच-होती. दुसऱ्याला म्हणून दुखवायचं नाही. त्या प्रवृत्ती पायीच तिनं माझा त्याग केला. त्या प्रवृत्तीबाहेर ती जाऊच शकत नाही. आणि तिला माहित होतं. राजनचा विरोध परवडेल. पण आई–आक्का, आमचे नातेवाईक ह्यांचा विरोध तो ती सहन करू शकली नसती.

शेवटी नाईलाजानं मीच तिला 'म्हणालो झालं गेलं विसरून जाऊ. अजूनही वेळ गेली नाही. उद्या हे कुणालाही कळण्याअगोदर आपण डॉक्टरकडे जाऊ. सारं ठीक होईल. मी आहे. घाबरु नकोस–पण तू मात्र––

माझे ते शब्द तिच्या कानावर पडले मात्र. लगेच दाराला धरून ती म्हणाली, 'नाही, राजन, तेवढं मी करणार नाही. कोणत्याही परिस्थितीत ती हत्या करा-यला मला सांगू नका. मला आई व्हायचय्. तेच ते माझं एकुलत एक स्वप्न होते. त्याला मी पाप समजत नाही. मला मिळालेलं वरदान 'समजेन मी ते.' क्षणभर ती थांबली नी म्हणाली. एका वेगळ्या मनःस्थितीत हे घडून आलय ते आता टाळताही येणार नाही. पण ते विसरता येणार आहे तेवढाच एक मार्ग आहे आता. आणि तुम्ही माझ्याशी लग्न करण्याचा हट्ट ही सोडून द्या.'

हे सारं सांगताना ती केवढं कठोर सत्य पचवीत होती. त्याची जाणीव होती मला. पण तिनं मला पुढं बोलूच दिलं नाही. तिच पुढं म्हणाली, 'राजन आयुष्यात काहीच मागितलं नाही. कुणाकडून कसली अपेक्षा केली नाही. तीव्र दारिद्र्यातही दिवस काढले. पण संपवलं नाही स्वतःला कधी. एकाच आशेवर जगत होते. एकच वेडा हट्ट उराशी धरून होते. जास्त श्रीमंत नसला, जास्त बुद्धीमान नसला, तरी आपल्या भावनांची कदर करणारा कुणीतरि आपला पती असेल. आपली मुलं असतील. श्रद्धा, प्रेम, रागलोभ वात्सल्य यांचा समन्वय साधणारा आपला संसार असेल. पण–'

आणि तिला भावनावेगानं भरून आलं. पण तरिही स्वतःला सावरित ती म्हणाली पण आता तेही शक्य होणार नाही राजन. तुमच्या माझ्या संबधातूनच हे घडून आलय. आता मी आई होणार आहे आणि मला आई होऊ द्या फक्त दुर्दैवाची गोष्ट एवढीच आहे की ज्याच्यामुळे मी आई होते आहे. त्याला मी आपला पती मानू शकत नाही. कदाचित तेही शक्य झालं असतं. पण मग आईचं काय ? आक्काचं काय ? तुमच्या नातेवाईकांचं काय ? या साऱ्यांचा विरोध मला सहन होणार नाही. ते माझ्या आवाक्याबाहेरचं आहे, सामर्थ्यापलीकडचं ठरणार आहे. शिवाय या दिवसात आईंना क्लेश होतील. आक्काचं लग्न व्हायचय. माझं ऐका, घराची अब्रु अशी चव्हाटयावर आणू नका. हे सारं तुम्हालाच पहायचं आहे. घरचा कर्ता पुरुष म्हणून

(पुढील मजकूर पान २३६ वर)

# हरणुलाची पावन वीट

ना. रा. शेंडे

मला एका गोष्टीची वाईट खोड आहे. कोणत्याही खेडेगावी जाणं झालं तर मी आधी चौकशी करतो, स्मशानघाट कुठं आहे ? आणि मग न विसरता त्या स्मशानघाटाला भेट दिल्याशिवाय मी परत येत नाही. रात्रीची वेळ असली तर फारच छान ! त्यावेळी स्मशानघाटावरून फेरफटका मारताना मला मोठा आल्हाद वाटतो. मन उल्हसित होतं. मोठा हुरुप वाटतो. कोणाला वाटेल, मी कोणी तांत्रिक–मांत्रिक असेन. पण नाही, भूतपिशाच्च योनीवर तर माझा रतिमात्र विश्वास नाही. पण कुणास ठाऊक, एखाद्या रम्य उद्यानापेक्षा स्मशानघाट मला फार आवडतो. मला वाटतं, नाहीतरी आज ना उद्या कायमची विश्रांती घ्यायला मला इथंच यावं लागणार आहे ना ! मग जीवनाच्या इतश्रीशी ज्याचा निसर्गसंबंध आहे ते नातं उपेक्षून कसं चालेल ? मोठे चित्रविचित्र अनुभव येतात इथं. कधी मोठेच विस्मयकारी, चमत्कारिक तर कधी मोठे रोचक, सूचक अन् बोधक. छे, छे. घाबरण्यासारखं, भीतिप्रद असं काही नाही. त्या अनुभवांनी उलट प्रबोधनच होतं, जीवनात एका वेगळ्या अन् आगळ्या ज्ञानाची भरच पडते. काही वेळेला गोष्टीतून गोष्ट जन्माला येते. आणि काही वेळेला तर गोष्टीच्या उदरातील मूळ उमगेनासं झालं म्हणजे कल्पनाशक्तीच्या तीव्र पात्यानं शस्त्रक्रिया करून जीवंत कथार्थक बाहेर काढावं लागतं. त्यावेळेचा आनंद काही औरच !

एकदा वनविभागातील एका खेडेगावी जाण्याचा मला योग आला. चाळीस पन्नास पर्णकुटयांची छोटी वस्ती. आदिवासी बांधवांचं ते टुमदार खेडं. वनराजीत दडलेलं. डोंगराच्या कुशीत विसावलेलं. शेजारून एक नदी झुळझुळ वाहात गेलेली. तिच्या पलीकडे एक अन् अलीकडे एक निळा डोंगर. पलीकडच्या डोंगराच्या पायथ्याशी एक उंचच्या उंच भलं मोठं दगडी चट्टाण. चट्टाणावर एक गोलाकार पण काहीसा लांबोळा दगड. शेंदरानं पूर्ण माखलेला. अनेक प्राण्यांच्या रक्तीसंचनानं लकाकत असलेला. महादेवाची ती चकचकीत पिंड. आदिवासींचा तो पावन देव, बडा देव. गावात प्रवेश झाली की नजर सहजच त्या डोंगराकडे जायची. एक वेगळा भावस्पर्श व्हायचा अन् तो भव्य महादेव लक्ष वेधून घ्यायचा, आणि दोन्ही कर प्रणामासाठी आपोआप जुळायचे. नदीच्या अलीकडील डोंगराच्या काहीशा उतरणीवर होती आमची आवडती स्मशानभूमी. आजूबाजूला सागाची गगनचुंबी झाडे अन् मधोमध पाचच भव्य पिंपळ वृक्ष. मधल्या पिंपळ वृक्षाच्या बुंध्याशी थोरल्या दगडांचा एक प्रशस्त चवुतरा आणि त्यावर गाडलेलं एक उंच त्रिशूळ. हे त्रिशूळही गावातून लक्ष वेधून घेत होतं. मोठंच रम्य वातावरण, मोठंच विलोभनीय दृश्य ! पण तेवढंच भयानक, तेवढंच हृदयात धडकी भरणारं ग्रामवलय. गावात जिथं नजर टाकावी तिथं प्राण्यांचे विविध सापळे. काही छोटे, काही मोठे, काही गोल, काही लांबोळे. अनेक शिंगं. बहुरंगी पिसं, बहुरंगी कातडी. अन् झाडांच्या फांदी फांदीवर लोंबकळत होते काही जिवंत तर काही मृत पशु आणि पक्षी. सारंच काही विचित्र ! आपण कोणत्या जगात आलो हेच काही कळेना.

सायंकाळची वेळ होती. सूर्य अजून डोंगराआड व्हायचा होता. वातावरण प्रसन्न होतं. उल्हसित चित्तानं मी एकटाच सहलीला निघालो. झाडाझाडातून एक चिचोळी वाट स्मशानघाटाकडे अळणं वळणं घेत गेली होती. त्या वाटेनं डुलतडावलतच मी स्मशानघाटावर पोचलो. पाचही पिंपळ वृक्ष मी न्याहाळून पाहिले. पानं सळसळत होती. मधूनच मोरांचा, सशांचा, हरणांचा कळप इकडे तिकडे बागडत होता. मावळत्या सूर्यकिरणांचे कवडसे वायुलहरीबरोबर थयथयत होते. मन कसं आनंदून गेलं !

माझी पावलं दगडी चवुतऱ्यावरील त्रिशूळाकडे वळली. तोच हलकीशी ठेच लागली. खाली पाहिलं तो एक अगदी छोटी वीट आढळली. दोन अडीच इंच रुंदीची अन् चार इंच लांबीची. दोन–एक इंच जाडीची. मोठी गुळगुळीत. चकाकी असलेली. मोहकच. ती

उतरायला मी खाली वाकलो. तोच वारा घोंगावला. पिंपळपानं जोरात सळसळली. कोणी आर्त किंकाळी फोडावी तसा भेदक ध्वनी वायूवर तरंगला. माझं अंग शहारलं, थरथरलं. ती वीट माझ्या तळहातावर होती. सूक्ष्म नजरेनं ती मी पाहिली. जणु एका छोटयाशा आरशातच मी न्याहाळत होतो. होय ना, मी पाहिलं, नीट पाहिलं. त्या विटेत, एक सौंदर्यशालिनी तरूणी आपले विशाल नेत्र विस्फारून हसत मुद्रेनं माझ्याकडे टवकारून पाहात आहे. परत एक किंकाळी कानावर आदळली. हात थरकापू लागले, जळजळू लागले. तळहातावर विस्तव पडून जसा चटका बसावा तसा आता त्या विटेचा माझ्या तळहाताला तीव्र चटका बसला अन् ती वीट मी चवुतऱ्यावरील त्रिशुळाकडे भिरकावून दिली. आणि मग गांगरून जाऊन मी नदीत उतरलो. पैल तीर गाठला. नकळत माझी पावलं त्या दुसऱ्या निळया डोंगराकडे वळली. महादेवाच्या पिंडीजवळ पोचलो. तिन्ही सांजेची ती वेळ होती. अंधार एकवटू लागला होता. पण यावेळी मन शांत झालं होतं. महादेवाला मी मनोभावे प्रमाण केला अन् परतण्यासाठी पाठ फिरविली तोच सोसाटयाचा वारा सुटला. चारी दिशांनी पक्ष्यांचा भीतिप्रद कलकलाट झाला. इतक्यात एक अत्यंत चमत्कारिक प्रकार नजरेस पडला. स्मशानघाटाच्या चवुतऱ्यावरील त्रिशुळाच्या टोकावर ती मायावी वीट तरंगत असून पेट घेत आहे असं आढळून आलं अन् मला कंप भरला. दरदरून घाम सुटला. हातपाय लटलटू लागले. ती वीट पेट घेतच हवेत तरंगू लागली. ज्वाळा उंचच्या उंच जाऊ लागली अन् महादेवाच्या पिंडीकडे सरकू लागली. ती जळती वीट माझ्याकडे येणार आणि मला भस्मसात करणार या भीतिनं तर मी भलताच कंपित होऊन पळू लागलो. वर प्रकाशवलय अन् खाली गडद अंधार. वाट काही आढळेना. हवेत तरंगणाऱ्या त्या जळत्या विटेकडे एकदा नजर टाकून पुन्हा जो पळत सुटलो तो गावात कसा पोचलो हे मला काहीच कळलं नाही.

मी थोडा शुद्धीवर आलो तेव्हा एका मोठ्या शेकोटीजवळ मी आहे; कोणी मला मालिश करून देत आहेत आणि माझ्या कपाळावर कसला तरी लेप लावला गेला आहे अन् सर्व गावकरी घोळका करून माझ्या भोवती बसले आहेत; असं आढळून आलं. एकानं मला कसला तरी काढा प्यायला दिला. थोडया वेळानं मला वाटलं घडलेली चमत्कारिक घटना मी कंपित शब्दांतच निवेदिली. तेव्हा एक म्हातारा दीर्घ उसासा टाकून उद्गारला,

'लई नशिबवान आहात महाराज. वडचा देवाची किरपा. तुमचा जीव वाचला. नाय त् कोनी वापस येत नाई. वडचा देवाले बळी देल्ला जाते आन् मुरदा मरघटावर येऊन पडते. पोटामंधी तिर्सूल खुपसला राह्यते.' म्हातारा थोडा खांकरला. माझं अंग भीतीनं पुन्हा शहारलं. माझा हात आपल्या हातात घेऊन तो म्हातारा म्हणाला,

'आज अमावसची रात. हामाले सांगतलं नाई नं तुमी मरघटाकडे गेला. नाय त् जावू देल्लं नसतं जी तुमाले. सतवाचे हाय तुम्ही म्हूनशानच जगले.' मग त्यानं ललकारी ठोकून आपल्या बोलीत वडचा महादेवाचा जयजयकार केला. सर्व गावकरी स्त्री–पुरुषांनी जयजयकाराला साथ दिली. सारं आसमंत दुमदुमलं. नंतर एक जोराचा नागफुत्कार करून तो म्हातारा म्हणाला,

'लई सत्वाची हरणुला. दरसन् देल्लं तुमाले. ह्या वी देल्ली असन् महाराज.' तो माझ्या पाया पडला मग प्रत्येकानं त्याचं अनुकरण केलं. काय होत आहे ते मला काही कळेना. मी म्हाताऱ्याला विचारलं,

'कोण हरणुला ? अन् कसली विद्या ?'

'का सांगावं महाराज, गोस्टच हाय तश्शी !'

'सांगा ना बावाजी. तुम्ही सर्वांनी माझी एवढी सेवा केली. मोठे उपकार आहेत तुमचे. फेडता येणार नाहीत. कोण हरणुला ते मला सांगा.' मी कळवळून विनंती केली. म्हातारा कथा सांगू लागला.

कोण्या एका काळची गोष्ट. एका निळया डोंगराच्या पायथ्याशी एक नगर होतं. रतन नावाचा राजा राज्य करीत होता. तर नदी पलीकडच्या निळया दुसऱ्या डोंगऱ्याच्या पायथ्याशी दुसरं नगर होतं. जसवन्ता नावाची राणी तेथे राज्य करीत होती. पहिल्या नगरीचं नाव रतनपूर तर दुसऱ्या नगरीचं नाव जसवन्तपूर. रतन राजानं राणी जसवन्ताची मागणी केली. राणीनं नकार दिला. तेव्हा राजा रतननं जसवन्त नगरीवर हल्ला केला. राणी जसवन्ता मोठी गुणी आणि शूर होती. नगरीचे लोक देवता मानून तिची पूजा करीत.

राजा रतन मोठा अहंकारी अन् मोठा दुष्ट होता त्याची पापी नजर राणी जसवन्तावर खिळली होती. जसवन्ता-जवळ पूजेची एक पावन वीट होती, पूजा करून त्या विटेजवळ आपली इच्छा व्यक्त केली तर ती तावडतोब पूर्ण होत असे. मागाल ते लाभत असे. राजा रतनला रूपवान राणी हवी होती आणि ती पावन वीटही हवी होती. त्याचा हा दुहेरी डाव राणी ओळखून होती. तिला सावध न करता राजानं चढाई केली तेव्हा तिनं विटेला शक्ती मागितली. राणीच्या अंगात वळ संचारलं. ती हाती धनुष्यबाण घेऊन राजावर तुटून पडली. नदीच्या पात्रात तुंबळ युद्ध झालं. राणीनं अचूक नेम धरला अन् राजाला घायाळ करून खाली कोलमडून पाडला. मग ती वेगानं धावली आणि तिनं परशूनं राजाचा शिरच्छेद केला. शीर, महादेवाच्या पिंडीला वाहिलं अन् धड रतनपूरच्या शीवेवर भिरकावून दिलं ! विजय प्राप्त करून राणीनं पाठ फिरविली अन् महादेवाच्या पिंडी-जवळ ती पूजेसाठी गेली तेव्हा राजा रतनच्या पुत्रांनी गनिमी कावा करून, जसवन्ता राणीवर बाणांचा वर्षाव केला. राणी कोलमडून पडली. मरता मरता तिनं शाप दिला.

'हे राजपुत्रांनो, लक्षात ठेवा, राजानं दुष्टपणानं माझ्या पावित्र्याला कलंक लावण्याचा प्रयत्न केला त्याचं शीर मी महादेवाला वाहिलं. त्याच दुष्ट राजाचे पुत्र तुम्ही. दुष्टाव्यानं तुम्ही माझा घात केला; अन् पुरुषार्थ गमावला. तुमचाही असाच घात होईल. माझी सत्वशील कन्या हरणुला बदला घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. राजा रतनचा वंश नावालासुद्धा राहाणार नाही !'

राजा रतनला तीन पुत्र होते. धनपाल, रणपाल आणि जगपाल. ते तिघेही राणी जसवन्ताची देखणी कन्या हरणुलाला प्राप्त करण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागले. त्या तिघाही भावात हरणुलाला वश करण्याची चढाओढ सुरू झाली. प्रत्येकाला हरणुला हवी होती, ती पावन वीट हवी होती. हरणुलाला या गोष्टीचा सुगावा लागताच तिनं विटेची आराधना केली विटेनं नागाचं रूप धारण केलं. धनपाल आणि रणपाल त्या रात्री हरणुला देवीवर अचानक हमला करण्याच्या तयारीत होते. पण चवताळून आलेल्या नागानं त्या दोघाही भावांचा कडकडून चावा घेतला. ते तडफडत तडफडत मरण पावले ! रतनपुर नगरीत हाहा:कार उडाला.

जगपाल त्यावेळी नगरीत नव्हता. भावांच्या मृत्यूची वार्ता ऐकून तो परत आला. त्याला आनंदच झाला आपला मार्ग मोकळा झाला, आता हर उपायानं हरणुलाचं हरण करणं आणि पावन वीट प्राप्त करणं सोपं झालं असं त्याला वाटू लागलं. तो अधिक मदांध झाला, हरणुलाच्या सौंदर्यानं तो बेकाम बनला. तिला हरण करण्याचा त्यानं एक डाव रचला. वेश पालटून तो रात्रीच्या वेळी जसवन्त नगरीत शिरला. आमिष दाखवून त्यानं राजवाड्यातील पहारेकऱ्यांना ताब्यात घेतलं. एका दासीच्या मार्फत पवित्र हरणुलाला पेया-बरोबर गुंगीचं औषध द्यायला लावलं. आणि मग राजपुत्र जगपालनं पूजास्थानी जाऊन प्रथम पावन वीट हस्तगत केली आणि नंतर हरणुलाला तिच्या शय्येवरून अलगत उचलून रतनपूर नगरीची त्यानं वाट धरली. तो नदीच्या मध्यावर येतो न येतो तोच सोसाट्याचा वारा सुटला. आभाळ भरून आलं. मेघांचा गडगडाट झाला. मुसळधार पाऊस पडू लागला. वीज कडाडली अन् हरणुला शुद्धीवर आली. तिनं जगपालाशी झुंज घेतली. त्या झुंजीत वीट खाली पडली. हरणुला विजे-सारखी कडाडली आणि जगपालावर वेगानं तुटून पडली. पावन वीट तिच्या चरणावर आली. चवताळलेल्या त्या हरणुलानं ती पावन वीट उचलून राजपुत्र जगपालाच्या अंगावर भिरकावली. विटेनं पेट घेतला. भयंकर ज्वाळा उफाळू लागल्या. जगपाल काही वेळेला रतनपूरकडे तर काही वेळेला जसवन्तपुरकडे सैरावैरा पळू लागला. पण जळत्या विटेनं उग्र रूप धारण केलं आणि रतनपूरच्या हद्दीत त्याला गाठून आगीत त्याला भस्मसात केलं ! राजा रतनचा वंश नामशेष झाला !' एक दीर्घ नि:श्वास टाकून म्हातारा थांबला. मी उत्सुकतेनं विचारलं,

'पण बाबाजी, हरणुलाचं काय झालं ?'

रात्रीच्या त्या काळोखातही म्हाताऱ्यानं महा-देवाच्या पिंडीच्या दिशेकडे आपली नजर रोखून प्रणाम केला आणि मग तो अगदीच गंभीरपणे म्हणाला,

'हरणुला मोठी सत्वाची होती. एका पर पुरुषाचा नकळत का होईना झालेला स्पर्श तिला सहन झाला नाही. तिनं पावन विटेची पूजा केली अन् म्हणाली, 'हे विद्यामाते, आजपर्यंत जसा तू दुष्टांचा संहार केलास

आणि स्त्रियांच्या सत्वाचं रक्षण केलंस तसं यापुढंही करीत राहा. दीन दुबळ्यांना अभय दे अन् पावित्र्याचं जतन कर. एवढीच माझी इच्छा पूर्ण कर.' आणि मग हरणुला महादेवाच्या पिंडीवर गेली अन् तिथं तिनं आपला माथा ठेवला तो कायमचाच ! ...दोन्ही नगरं नंतर उध्वस्त झाली. पण रतनपूर होतं तेथे आता स्मशानघाट आहे अन् जसवन्तपूर जेथे होतं तेथे महादेवाची पिंडी आहे. एक पापदर्शक तर दुसरं पुण्यदर्शक. ती पावन वीट अजूनही अव्यक्त रुपानं वास करते. हरणुलाची इच्छा पूर्ण करते. मात्र अमावस्या अथवा पौर्णिमा असली की त्या दिवशी ती आपला प्रताप दर्शावते !'

या घटनेनं मला काही वेगळंच बुद्धिखाद्य दिलं, सत्वशीलतेची एक वेगळीच प्रेरणा दिली. दुसऱ्या दिवशी मी शहराकडे परतलो खरा, पण माझ्या नजरेपुढं ती पावन वीट सारखी तरंगत होती !

---

( पान २३२ वरून )

तरी ते तुम्हालाच पाहायचं आहे. राजन मला जाऊ द्या. माझी काळजी करू नका. मी कुठही राहीन. माझं काहीही वाईट होणार नाही. मी कुठही असले तरी तुमचीच राहीन. फक्त तुमचीच. एवढा विश्वास बाळगा. जाऊ द्या मला, मला आई होण्यापासून परावृत्त करू नका. फक्त एवढच सांगते. यापेक्षा जास्त काही नको राजन. तुमची शपथ काहीही नको.'

अशी वेडी होती ती. दुसऱ्याला दुखवायचा विचारही कधी मनात आला नाही तिच्या. एवढं सोसलं तरी शांत होती. निर्विकार होती. केवढं समजावलं होतं. 'तु माझी हो. मी नोकरी करतो. कॉलेज सोडतो.' पण तिनं काहीही ऐकलं नाही. आणि—

आणि त्याच रात्री कुणालाही न सांगता ती घरातून बाहेर पडली. कुठं गेली ते कळल नाही.जंग—जंग पछाडलं. पण अजूनही ती मला भेटली नाही. आज पाच वर्षे होत आली. मी तिची वाट पहात आहे. शापिता सारखी. पण ती अजूनही, मला भेटायला आली नाही. एकदाही कुठं दिसली नाही. ती कुठं आहे, ते मला माहित नाही. पण कदाचित उद्या—

हो कदाचित उद्या—

माझा विश्वास आहे. आज ना उद्या ती माझ्याकडे येईल. आपलं हृदगत ती माझ्यापाशी व्यक्त करील. कदाचित त्यावेळी ती अनवाणी असेल. कदाचित तिच्या नऊवारी लुगड्याबर एखादं ठिगळ ही लागलेल असेल. आणि कदाचित तिच्या त्या गोऱ्यापान लांबसडक बोटांना धरून माझंच पाप माझ्या दारात चालत येईल. त्यावेळी फक्त त्याचवेळी विमल समोर, दिपा, पींकी समोर तिचं स्वागत करण्याचं सामर्थ्य मला मिळो.—

# प्रभात फेरी

दिनकर नीलकंठ देशपांडे

मनाजी मास्तरला जिल्हा परिषदेच्या शिक्षण सभापतीच्या सहीनं फतवा आला होता. त्यात लिहिलं होतं, "दर शनिवारी शाळेतील मुलांची अेक प्रभात फेरी काढून साऱ्या गावातून फिरवावी. लोकांना स्वच्छता, शिस्त, आरोग्य याची माहिती कळेल अशी गाणी आणि घोषणा त्या फेरीतून व्यक्त करण्यात याव्या."

आता शिक्षण सभापतीचाच फतवा असल्याने त्याची तुरंत अंमलबजावणी करणे आवश्यक होते. मनाजी मास्तरसारख्या हरहुन्नरी माणसाला हा फतवा म्हणजे वरदान होते. 'आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास' अशा तऱ्हेची मनाजी मास्तरची अवस्था होती. शिकविण्याचा मनाजींना आधीच खूप उल्हास होता त्यात हा नवीन फतवा आल्यावर काय विचारता. साऱ्या सांस्कृतिक उत्साहाचे वातावरण मनाजीच्या चेहऱ्यावर झळकून उठले.

वर्ग चालू असतानाच पहिल्या डाकेत फतवा आला होता. आणि तो वाचता वाचता मनाजी मास्तर गालातल्या गालात हसत होते. त्यामुळे वर्गातील थोराड मुले एकमेकाला ढुशा काढून मास्तरचे हसणे दाखवित होते ही संधी साधून चार दोन पोरांनी पाटी दप्तर घेऊन वर्गातून सुंबाल्या केला होता. डावडुवाल्या खेळण्यासाठी त्यांनी जवळचा पिंपळवृक्ष जवळ केला.

मनाजी मास्तरांना उत्साहमूर्ती म्हणून परसोडी गावाने मान्यता दिली होती. मजल दरमजल करीत आणि छक्के पंजे खेळत मनाजी मास्तरने मुख्याध्यापक-पद गाठले होते. तसे मनाजी मास्तर हे नाटककार, गीतकार, नट, गायक, दिग्दर्शक, व्याख्याता म्हणून ओळखले जात. तथापि एक साधे पत्रही लिहावयाचे झाल्यास त्यासाठी ते घेत असलेली मेहनत वाखाणण्या-सारखी होती. सप्तरंगी पेन्सिलींचा जुडगा मास्तर सदोदित आपल्याजवळ बाळगत. लिहावयाचा मगदूर लक्षात घेऊन ते पत्राची वा अर्जाची वेलबुट्टी काढून सजावट करीत असत. जि. प. कडे सुट्टीचा अर्ज असला की दाणेदार अक्षरावर ते लाल पेन्सिलने महत्वाच्या भागावर अशी काही आरास करीत की त्यांचे दाणेदार अक्षर अन् वेलबुट्टी पाहूनच त्यांची सुट्टी एकदम मंजूर होत होती.

गावातील वा बाहेरील कर्तबगार लोकांना मानपत्र द्यायची वेळ आली की मनाजी मास्तरांना जि. प. वा पं. स. कडून बोलावणे येई. मग असे मानपत्र तयार करताना शाळेच्या तासांची अैशी तैशी करून आठ दिवसात छानदार मानपत्र तयार करून टाकीत. पाटील पटवाऱ्याच्या दिवंगत पत्नी, आजा, आजी यांच्या फोटोखाली 'कै. फलाणे बिस्ताने ढिकाने: जन्म १ जुलै १९०१, मृत्यू १५ ऑगस्ट १९७५' अशी अक्षरे लिहिण्याचे काम मनाजी मास्तरकडे कुठून कुठून येत असे.

मनाजी मास्तरच्या नात्यागोत्यातला कोणी माणूस वा बाई मेली की दूरदूरच्या नातेवाईकांना ही दुःखद घटना कळविण्याची जबाबदारी मनाजी स्वतःचे दुःख विसरून आपल्या खांद्यावर घेत. काळी अक्षरे त्याला काळीच बॉर्डर घालून अनेक पोस्टकार्ड प्रधान गुरुजी मनाजी मास्तर यांचे सहीने रवाना होत. हीच कथा तेरवीच्या जेवणाचे आमंत्रण देताना होई. तेरवीचा '१३' हा आकडा प्रत्येक कार्डावर हिरव्या शाईने लिहायला ते विसरत नसत. लग्न, बारसे वा सत्य-नारायणाची ग्रामीण स्तरावरील आमंत्रणे मनाजी मास्तरच्या अक्षरानेच कृतकृत्य होत.

* * *

अशा मनाजी मास्तरांना कालांतराने नाटक लिहिण्याचा छंद जडला. पहिले ते मुलांसाठी संवाद लिहू लागले. मग पद्धतशीर उमेदगिरी करून दोन चार नाटकेही त्यांनी लिहून काढली. स्नेहसंमेलनाची स्वागतगीत रचना आणि मंगलाष्टके तयार करणे हा तर मनाजीच्या हातचा मळ होता. गावात आलेल्या नाटक कंपनीत ऐनवेळी एखादी भूमिका शिरावर घेणे

हा मनाजीच्या कलामनाचा स्थाईभाव होता. अशावेळी आपल्या मनाची चार दोन वाक्ये फेकून 'हम भी कुछ कम नहीं' हे दाखवून देत.

अशा मल्टिपर्पज, बहूउद्देशीय, हरहुन्नरी मनाजी मास्तरांच्या हाती दर शनिवारी प्रभातफेरी काढण्याची नैतिक जबाबदारी जि. प. शिक्षण समितीने डोळे मिटून सोपवावी यात मनाजीच्या कर्तृत्वाचा पर्यायाने परसोडी गावचा गौरव होता. शिक्षण समिती सभापतीचे पत्र कुठे ठेऊ नि कुठे नाही अशी मनाजीच्या मनाची अवस्था झाली होती. अनेक सरकारी फतवे, हिंदी प्रारंभिक परिक्षेचे प्रमाणपत्र, खेळकुद प्रशस्तीपत्र, सातवा वर्ग पासचे सर्टीफिकेट वा तत्सम अनेक प्रमाण-पत्रीय कागदांना फ्रेम करून ठेवल्याने मनाजीच्या घरच्या भितीवर खिळा ठोकावयालाही आता जागा उरली नव्हती. म्हणूनच हा शि. स. स. चा फतवा त्यांनी जिवाच्या ममतेने आपल्या वडिलोपार्जित काळ्या कोटाच्या आतल्या खिशात जपून ठेवला. त्या लिफाफ्या बरोबर खिशात डांबराची अेक गोळीही ठेवण्यास ते विसरले नाही. अशा तऱ्हेच्या अनेक कागदांनी त्यांच्या वडिलोपार्जीत कोटाचे खिसे पावन झाले होते. जुनकट कागदात झुरळांनीही वस्ती केली होती अधून मधून एखादे घिटुकले झुरळ हवा खावयास खिशाबाहेर येई. पण त्याची दखल घेण्याची मनाजींनी कधीच चिंता केली नाही.

फतवा खिशात ठेवल्यावर मनाजी मास्तरांनी आपल्या दोन सहाय्यक शिक्षकांना मदतीला बोलावून त्यांना फतव्याचा आशय कथन केला. दोन्ही सहाय्यक गंभीर बनले. त्यांच्या कुळी लवकर उठणे नसल्यानेच ही गंभीरता पसरली होती. "तुम्ही चिंता करू नका तुम्हाला जागे करणे माझे काम!" असा दिलासा प्रधान गुरूजी मनाजी मास्तरांनी दिल्याने दोन्ही सहाय्यक खूप झाले त्या खुषीत त्यांनी आपले वर्ग सोडून दिले. मुले टणाटण उड्या मारीत पळून गेली.

प्रभात फेरीचा पहिला शनिवार चार दिवसावर आला होता. चार दिवसापासून मुलांच्या अभ्यासाने 'राम' म्हटला होता त्यामुळे मुले निहायत खूष होती. मनाजींनी आरोग्य, शिस्त, स्वच्छता यावर तीन सुन्दर गीते गुंफली होती. प्रारंभीची चाल दोन सहाय्यकांना शिकवून मनाजी मास्तर तनमनधनाने त्या तीन 'टला ट' गीताचे नक्षीदार कागद करण्यात रंगून गेले होते. दिवसा उजेडीच त्यांना प्रभातफेरीचे स्वप्न पडत होते. सहाय्यक शिक्षकांनी केलेल्या अनेक घोषणा मनाला भिडून जात होत्या मुले त्या घोषणा आकाशाला भेदून जाणाऱ्या आवाजात ओरडत होती एकूण परसोडी गावाचा छप्पा नि छप्पा प्रभात फेरीच्या वातावरणाने उत्साहजनक बनला होता. अतिउत्साही गावकरी आणि कुचाळखोर मनाजीच्या कार्याची अकारण तारीफ करून त्याच्याकडून चहा बिडीचा खर्च काढीत होते.

शुक्रवारची रात्र म्हणजे मनाजी मास्तरांच्या जीवनातील कतल की रात होती. कसेही करून प्रभात फेरी पहाटे पाच वाजता निघालीच पाहिजे यासाठी मनाजी जिवाचा आटापीटा करीत होते. परसोडी ग्रामस्थ साखर झोपेत असतानाच त्यांना मुलांच्या आवाजाने जाग आली पाहिजे अशी व्यूहरचना मनाजींनी केली होती. सहाय्यक शिक्षकांनीही दोनचार दिवस झोपतेवेळी भरपेट पाणी पिऊन सकाळी उठण्याची सवय करण्याचा सपाटा लावला होता.

✦ ✦ ✦

पहिल्या प्रभातफेरीचे उद्घाटन व्हावे अशी कल्पना मनाजीच्या कल्पक डोक्यात चमकून गेली. पं. स. चे सभापती सीतारामजी गिरमीटे यांना उद्घाटक म्हणून नियुक्तही करण्यात आले. शाळेतील मुलांना पुन्हा पुन्हा बजावून सांगण्यात आले. त्यांचे छोटे छोटे गट करून एकमेकांना पहाटे तीन वाजता पासूनच जागे करण्याची साखळी योजनाही समजावून सांगण्यात आली.

सर्व जय्यत तयारी झाली आहे याची खात्री होताच मनाजी मास्तरांचा जीव भांड्यात पडला. आता फक्त रात्रीतून त्यांना पं. स. सभापती यांना अर्पण करावयाचे उद्घाटन पर निवेदन तयार करणे बाकी राहिले होते. आपल्या सप्तरंगी पेन्सिलीचा जुडगा काढून मास्तरांनी आपले कोरीव कातीव काम सुरू केले.

रात्र सरत होती. गाववेशीवरची मोकाट कुत्री गळा काढून भुंकत होती. गावावर शांततेचा सन्नाटा विसावत होता. मनाजी मास्तर मात्र रंगीत पेन्सिलींना घेऊन कागदाशी कुस्ती खेळत होते.

✦ ✦ ✦

आणि होऊ नये तेच झाले मनाजी मास्तर त्यांच्या घरासमोर जोरजोराने होणाऱ्या घोषणांनी जागे झाले. डोळे चोळून त्यांनी घराच्या खिडकीतून बाहेर पाहिले. दोन सहाय्यक शिक्षकांच्या मागून मुलांचे लेंढार घोषणा देत, गाणी गात चालले होते पं स. अध्यक्ष सर्वासमोर होते बाहेर फटफटले होते. मनाजींना कळेना आपण स्वप्नात आहो की जागेपणात. त्यांच्या डोळ्यासमोर काजवे चमकू लागले. रात्रभर चितारलेले रंगीत कागदाचे कपटे इकडे तिकडे पसरले होते. वेलबुटी करता करता मनाजीला नटखट झोपेने दगा दिला होता. पण आता त्याला इलाज नव्हता. सहाय्यक शिक्षकानी त्याच्यावर मात केली होती चूळ न भरताच मनाजी मास्तर दूर गेलेल्या प्रभातफेरी मागे सुसाट धावत सुटले. धावता धावता ते आपलीच पदे मोठ मोठ्याने म्हणत होते. त्यांच्या घरातील वेलबुट्टया केलेले कागद अवखळ वारा दूर उडवून नेत होता.

\+ \+ \+

मनाजी मास्तरला जि. प. शिक्षण विभागाकडून दुसरा फतवा आला होता. त्यात सहाय्यक शिक्षकाला बढती होती अन् मनाजी मास्तरची मेळघाटच्या जंगलातील शाळेत बदली करण्यात आली होती. तो फतवा वाचून मान्या रंगीत पेन्सिली त्यांच्या भोवती गरगर फिरू लागल्याचा भास त्यांना होत होता. प्रभातफेरीने मनाजीचा घात केला होता.

---

(पान २४१ वरून )

खूप रागावून बाप थकला होता...कोपऱ्यात निपचित पडला होता...मी गाव सोडलं...ह्याच रस्त्यानी पुढे गेलो.. आंब्याच्या झाडामागे ग्रामपंचायतीची कौल लपली तसा गाव संपला घर दुरावलं... आज त्याच रस्त्यानी घराकडे परतत होतो पण हा रस्ता बदलला आहे. डांबरानी तुकतुकीत झाला आहे...जीर्ण रस्त्याचे सारे अवशेष ह्याने बुजवून टाकले आहेत...धुळीत उठलेले माझ्या पावलांचे ठसे इथे लोपले असतील...

मी नवीन झालो होतो ..माझा गाव नवीन झाला होता...पण कान्हाईचं जागृत मंदीर जीर्ण खिपल्या धरून वेणा नदीच्या काठी अजूनही उभं होतं आणि वामनवाडीच्या शेवटच्या टोकाला चार भिंती आणि कौलारू छप्पर धरून माझ्या वडिलांचं घर–

ओळखीच्या माणसाचा ओलसर श्वास ऐकण्यास अजूनही गुंग होतं...

# एक हरवलेला !

संजीव कोलते

तो रस्ता मला नवीन नाही. खूप जुनाही नाही! पूर्वी त्याच्यातले खळगे धुळीने माखले होते आता त्याच्यावर तुकतुकीत काळया डांबराचा लेप लावला आहे. पूर्वीचीच घरे रस्त्याच्या कडेला उभी आहेत. नावांच्या पाटया बदलल्या ! रंगाचे पट्टे बदलले. कुणाच्या घरापुढे प्राजक्त उगवला...कुणाच्या घरापुढे जास्वंदी फुलली. . .कुणाच्या परसदारी ताठ उभे असलेले शेवग्याचे झाड भरगच्च शेंगांनी लदबदून जाते! एकमजली इमारतीच्या कपाळावर नगरपालिकेची पाटी चिकटली आहे. बाजूच्याच कोंडवाड्यात भरपूर मोकाट जनावरे कोंबली आहेत. सारं गाव बदललं ! जुनी वस्ती सांडू लागली व नवीन वस्ती उभारू लागली ! जुनी माणसं जीर्ण झाली व नवीन माणसं अनोळखी बनली तरीही हा माझाच गाव होता .कारण कान्हाईचं जागृत मंदीर जीर्ण खिपल्या धरून वेंणा नदीच्या काठी अजूनही उभं होतं ! वामनवाडीच्या शेवटच्या टोकाला चार भिंती व कौलारू छप्पर धरून माझ्या वडिलांचं घर ओळखीच्या माणसाचा श्वास ऐकण्यास अजूनही आतुर होतं !

•कुलुपावर करडा रंग चढला होता ! एका दगडात त्याचा निकाल लावला ! कुरकुरणारा दरवाजा उघडला तो स्मृतींचे अवशेष हृदयात साठविलेली केविलवाणी हवा नैराश्याचा दर्प साठवत नाकात शिरली. त्या हवेच्या गंधावर तरळत बाबांची हाक ऐकू आली .."आलास, बैस ! कित्येक दिवसांनी आला आहेस ! हृदयाच्या कप्यात ठेवू दे"–आभासाच्या छायाविश्वात ध्वनीसंकेताची आकृती विरल झाली ! कोपऱ्यात कचऱ्याचा ढीग होता व बाजूलाच बाबांची आजारी खाट ! खाटेची वीण उसवली होती मी सामान आत टेवलं !

कोळयांनी जाळं जागोजागी विणलं होतं ! केविलवाणी हवा अधाशीपणे जाळचात शिरली. जाळं थरथरलं व त्यामागे भिंतीवर टेकलेला आईचा फोटो डोळ्यात शिरला ! फोटोतल्या स्मृती हृदयापर्यंत शिरल्या ! मायेचा आभास पाच–सहा वर्षांचा काळ ओलांडून मनाला जाणवला! आईचे ओठ हलले–किती वाट पाहावी ? आईचं हृदय फार हळवं असतं ! आमच्यावर रागावून तू गेलास ! ते ही न सांगता ! अरे ह्यांच्या शब्दात तुझा आकस नव्हता ..द्वेष नव्हता ! पाठीला चिकटलेली व छातीच्या पिंजऱ्यात चरफडणारी ह्यांची भूक व दारिद्रय जेव्हा हृदयात मावेनासं व्हायचं तेव्हा ते ओठावर यायचं ! समोरचं माणूस त्यावेळी अंधुक व्हायचं आणि लहानशा गोष्टीने ओठातून स्फुल्लिंग उठायचे ! पण लाडक्या...त्या स्फुल्लिंगात आग नसायची. कसलाही फुत्कार नसायचा. तो अगतिकतेचा अनावर आवेग असायचा ! तू ऐन पंचविशीतला होतास ! शब्दानं आग पेटण्याचं तुझं वय होतं ! तू हरवलास ! शब्दांना भुलला ! पण बापाचे हृदय तुला कळलं नाही ! अरे, दारिद्रयाची आग आंलसर हाडांना जेव्हा चटका देते तेव्हा शब्दातून धूर निघतो. हृदयाच्या आचेमुळे शब्द कधी भाजतात पण भाजलेले–पोळलेले शब्द कधी पेट घेत नाहीत. सावकाराचे शब्द हृदयाला भोक पाडायचे . . कपाशी-वर अळी चढली असायची आणि पोटातली आग वणवा बनली असायची. सुखानं हुरळून जाणारे आणि दुःखानं होरपळून जाणारे हृदय तुझ्या बाबांच्या शरीरातही नांदत होतं ! भाकरीच्या तुकड्याबरोबर गडवाभर पाणी रिचविणाऱ्या तुझ्या बाबांच्या जीभेला कसलीच चव उरली नव्हती ! आजारातून उठलेल्या माणसाच्या जीभेलाही काहीच चव नसते म्हणतात ! तू मॅट्रीक झालास ! गुळाची लापशी तुझ्या ओठांनी चाखली ! खुरटया झाडांच्या काटयामधून हिरव्या रंगाचं बोंड उगवलं ! पण पण न.मू. . तू हरलास ! रागारागात तू घर सोडलेस ! तू हरवलास ! त्या दिवशी हे जेवले नाहीत पोटच्या तरुण पोराचं जाणं माझ्या डोळ्यातल्या आसवांना अधिक जाणवलं ! पण ह्यांचे डोळे कोरडे होते ! हृदयातल्या वणव्याने डोळ्यातल्या अश्रूंची वाफ झाली होती ! चूल थंडच

होती ! बाजरीचं पीठ चुलीवर ठेवलं पण भूक कुणालाच नव्हती. शरीराचं गाठोडं बांधून कोपऱ्यात बसले होते . इळीमिळी गूपचिळी ! तू गेलास त्या दिशेकडे अंधारल्या नेत्रांनी तासन्तास पहात राहायचे अनेक दिवस असेच विरले.

पश्चिमेकडे दिवा विझला तसा ह्यांच्या डोळ्यात आसवांचा थेंब उमटला ! पोरगा आता विसरला हरवला. मुक्या शब्दांची संवेदना क्षणाक्षणाला वाढत होती ! डोकं बधीर झालं सळसळणारं रक्त कुठसं थांबलं. . .आणि हृदयावरच्या आघाताने हृदय कायमचे बंद पडले ! कपाशीवरची अळी कपाशी फस्त करत होती . . .

निरोप घेताना. ओठांची हालचाल झाली ! पण शब्द खोल गेले होते. .हुंदका ओठावर तरंगला आसवे डोळ्यांच्या कडेला धावली ! खूपशा तुझ्या-माझ्या आठवणी नजतेसमोर वीजेसारख्या तरळून गेल्या. डोळ्यात भयानक चमक दिसली तेव्हा गंगा आणायला मी धावले...तो देवघरातील दिवा विझला होता !

वैधव्याचा अंधार कपाळावर लावून मी जगत होती. ते चावी भरलेल्या खेळण्यासारखी ! किल्ली संपेपर्यंत हालचाल करायची ! हळूहळू मी पण थकले. . शरीरापेक्षा मनानीच ! उधई लागलेल्या पुस्तकासारखी घरात वावरत होती! संध्याकाळी दिवा लावल्यावर कसल्याशा छाया दिसायच्या ! दिव्याच्या रेघेत भरभणारी माझी सावली मलाच भेसूर वाटायची ! नजरेतील शक्ति क्षीण झाली ! घराकडे येणारी माणसं मला अनोळखी झाली आशेचं बोट धरत नजर तुझ्या वाटेवर सरकायची. . .हळूहळू नजर अंधुक झाली ! आईचे शब्द विरल झाले. फोटोतून डोकावणारी आईची आकृती अंधुक झाली. थरथरणारं जाळं परत शांत झालं !

स्मृतींच्या अवशेषांचा केविलवाणा दर्प मिरवणारी हवा माझ्या निश्वासांशी कूजबूज करू लागली. श्वासांचा विश्वास हरखून गेला. . मी लहान झालो. माझ्यातला मी खुजा झालो. . .हवेचं बोट धरून चालू लागलो. . . रस्ता ओळखीचाच होता. . पाच सहा वर्षापूर्वी त्याच्यावरून उडणाऱ्या धूलीकणांनी माझा श्वास गजबजला होता. तोच तो रस्ता बैलगाडीवरून जाणाऱ्या माणमासारखं विचारांना हेलकावे बसत होते.. एस. टी. स्टॅन्ड ! गर्दीनं गजबजणारी दोन ठिकाणं-गावचा बाजार व एस टी. स्टॅन्ड ! गर्दीतून भिरभिरणाऱ्या नजरा कुणाच्या चेहऱ्यावर स्थिर व्हायच्या ! भावनेला कसलीशी गुदगुदी व्हायची पण नजरेतल्या पाखराला कधीच ओलावा गवसला नाही तारुण्याच्या संदर्भाला कधीच अर्थ लागला नाही . .वेळ संपला असायचा संध्याकाळ झाली की घरी परतणाऱ्या गुराढोरासारखं मन घराकडे परतायचं ! एस. टी. ते घर या रस्त्यावर अंधुक प्रकाश पहुडला असायचा ! मुद्दामून 'चिमीच्या' घराला वळसा घालायचा ! दिसलीच चिमी तर ओठावर स्मित खेळवत तिला डोळ्यात कोंबायचं—चार आणे किलोची भाजी फाटक्या पिशवीत भरल्यागत !

घरी आलो तर चिमणीच्या घगधगल्या धुरावर भिंतीच्या आडोशानी आईची काळी सावळी सावली हलत रहायची ! बाबा शेजारच्या नारोआप्पाकडे तमाखूची गोळी चघळायला गेला असणार ! डब्बे गंजवून काढलेले भाकरीचे पीठ पाण्याने भिजविले असणार ! माझ्या पावलांचा आवाज आईने ऐकला असणार "कुठं व्हता आंदादरी ? रातच्या पारी येतस ! आरे तूह्या बापाची काही खबर घे ! २२ वर्षांचा रोंडा झालास पण अक्कल कवडीची नाय !" संतापाची चमक आईच्या शब्दातून बाहेर पडायची तेव्हा तिच्या हाताला अधिक गती यायची ! भिजलेलं पीठ अधिक मऊ होतं ! मी मात्र शांत असे—अंधार पचविलेल्या आभाळासारखाच ! आईचे शब्द कानात शिरायचे पण मनाला एवढंच जाणवायचं की. .आपलं वय बावीस वर्षाचं आहे आपण तरुण आहोत ! तारुण्याची ही जाणीव डोळ्यांना फकाट बनवायची ! डोळ्यात एस.टी. स्टॅन्ड उगवायचं! खिडकीशी बसलेली शशी ! नाकापासून एक इंचावर हलणाऱ्या तिच्या ओठातून अलगद सुटलेलं स्मित ! रत्न्या काकाची सिंधू ! आणि सारं संपल्यावर परतताना दिसलेली आखूड नाकाची 'चिमी'! प्रत्येकाच्या नजरेत 'वेगळंच पार्गी' असे सारं आठवायचं तेव्हा तारुण्याने बहरलेल्या डोळ्यांच्या कडेला खाऱ्या पाण्याची एक रेघ उमटायची !

(पुढील मजकूर पान २३९ वर)

# न सांगितलेलं

प्रकाश जोशी

झटकन् जाग येते. पण अर्धवटच. डोळयावरची पेंग गेलेली नाहीय. मांड्यातली कळ सणकन् डोक्याला जाऊन भिनते. हं. नेहमीचच. थोडा बधीर होतोय. अर्धमुर्धी ग्लानीच. टेंशनं वाढत आहे. मोकळ व्हाव— खट्,... तड् थड् थड् थड् थर् थर् टर् टर

ट्र्... ट्र्...

हं. आई मशिनवर बसलीय. कळ दाबुन धरली. ग्लानी उतरली. पांघरूण तसच ठेऊन उठून बसलो. आईची पाठ. सावकाश उठतो. सरळ बाथरूम जरा हलक घार मारतो. गार पाण्याने हात पाय तोंड धुतो. जरा बरं.

आईचं शिवणकाम चालू. संपलेलं दिसतय. आता काज बटण. तोंड पुसून भांग पाडतो.

'उठलास ?'

'हं.'

'हं काय ? किती वेळ झोपायचं. जेवला की झोप.'

मख्ख्च. आई फक्त चष्म्याआडून पाहते. बोलत काहीच नाही.

'दादा कुठे गेलेत ?'

'गेलेत पत्ते कुटायला. काही उद्योग आहे का त्यांना. नोकरी गेली ते फावलय. बायको आपली मर मर मरतेय. केव्हापासून मागे लागलेय कुठतरी बघा. पार्टटाईम सुद्धा चालेल. तेवढाच हात भार.'

'हो ना. म्हणजे जरा बरं.'

'बरं काय ? आणि तू अर्ज टाकलास का आज ?'

'हो ऽऽ य. दुपारीच टाकला.'

'म ओरडायला काय झालं. अर्ज केला ते काय माझ्यावर उपकार नाही केलेत तुम्हीही सारखेच.'

'तस नाही ग. किती दिवस अर्ज करतोय. काही उपयोग होतोय का ?'

'नुसता अर्ज करून काय होतय. धडपड करायला पाहिजे. चार ठिकाणी जायला पाहिजे. तुम्हाला नुसतं घरात बसायला सांगा.'

ते खरय पण जी चार चौघ ओळखीची आहेत त्यांचा काहितरी उपयोग जाऊ दे कशाला विचारीला दुखवा.

'आई, चहा कर ना.'

'इतक्या लौकर.'

'लवकर कुठे. तीन वाजलेत ना'

'दूध—केंद्राच काम आटोपून येते. तोपर्यंत हेही येतील.'

'म्हणजे पाच. मी करू.'

'राहू दे. एवढी गुंडी लावून मीच करते.'

फर् ऽऽ फर् ऽ र् ऽ र् र् र् र् र्...

स्टोव्ह पेटतो.

'काय बाई हा उकाडा. कित्ती घाम आलाय.' आई

'काय ? हं.'

घाम ? आईचा चेहरा घामेजला आहे. अं पण घाम ? घाम.... घाम घामेजला आत्ता एवढ्यात... कोठे बरं घाम घाम घाम घाम घाम.

हं बरोबर. आता कळ लागून उठण्यापूर्वी. असाच एक घामेजला चेहरा. आठवलं. बरोबर आहे. स्वप्नदोष आहे ना पडतात साली. बात येतो. कधी कळ दाबतो. कधी कळतच नाही.

उठण्यापूर्वी एक स्वच्छ स्वप्न पाहिलं. अगदी सरळ रेघे सारख. सगळे बिंदु मोजून घ्या ओळीन. कॅमेरा फिरवावा तस एका स्पॅन मध्ये. स्टार्ट... राईट... कट् ताण दिला तर तपशीलवार आठवतय. सुरू कस झालं आठवत नाही. अनेक पिसेस्. पण घामेजलेला, कळ, ती कशी दाबली, उठलो, इथपर्यंत थेट स्वच्छ खोल डोहाचा तळ दिसावा तसा.

'हं     घे,' आईने घाम पुसलेला.

'फुर्र्     र्. वा छान जमलाय.'

'न ठमायला झालय काय. भरपूर दुध घातलय.'

'हं' चहामग्न.

रटःर्ट

\+ + +

स्वच्छ दुपार. रणरणत उन. पांढरट माती बाभूळ काटे आकाश काही गाहिती नाही. ढगाळलेल नसावं. गावात परततोय कोपऱ्यावर उभा भाग नवा वाटतोय. सगळं नव वाटतय. कमाल झाली.

थोडया उंचावर असलेल्या तटवंदीकडे वघतोय. आत जाव का ? द्विधा मन. थोडावेळ उभा. लक्ष जात. तटातून डोकावणाऱ्या प्रचंड पुतळयाकडे निम्म आकाश व्यापलय.

विवेकानंद. तोच फेटा. झब्बा. हसताहेत. डोलताहेत. वघता वघता चेहरा पुसत जातो. वदलत जातो. शांत धीर गंभीर चेहरा. गौतम बुद्धासारखा. मातकट होतो. भुरकट होत जातोय. आणि एक काळातांवडा आकाश व्यापी निराश चेहरा. सारा पुतळाच डोलतोय.

शेजारुन म्हशी जातात ठुशा न मारता.

आत शिरतो. तटात वाभूळ कमी. आत इमारत. एक इसम. काळी टोपी. सदरा. धोतर. हाडकुळे हात. वोट लांव फुगल्या निळया शिरांचा. नुसता टकमक टकमक वघतो दार उघडून दोघ आत शिरतो. वर जायला एक भुयारागत भगदाड अरुंद. कोरून काढलेले. खवल्या खवल्यांचे. तो आत शिरून वर जातो. त्याच्या मागोमाग डोकं घालतो: ते अडकत गुदमरतो. हिसका मारून कसवस वाहेर काढतो. वळसा घालून चढतो. थोड मोकळं पटांगण. गलिच्छच. खुरट गवत वाढलेलं. मध्ये रिकाम कुंड. त्याच्या कडावर वाळलं शेवाळ.

आता खूप वर चढलेलो.

मागल्या आवाराच दार उघडून वाहेर पडतो खाली उतरायला वीस तीस पायऱ्या. डाव्या हाताला मंदीर. दवल्या आवाजात आरती. कोपऱ्यात मंदिराच्या पायथ्याशी पण खाली उतरण्याच्या पायऱ्यावर ती वसलेली. नजर स्थिरावते, ती खाली मान घालून वसलीय. नजर सरावते. ती वर वघते. थांवतो. आत घंटानाद. चेहरा घामेजलेला. उवरलेला केस मोकळे. भांग भरलेला. चेहरा घामेजलेला. उवरलेला. ओठ किंचीत जाडसर. वघतोय. ती वघतेय. तिने दोन्ही हात मांडयान धरुन आवळलेले. वघतोय. ती वघतेय. आंगठा जमिनीत रोवते. तिचे ओठ किंचीत थरथरतात. शेजारी वसतो. तिच्या दोन्ही हातावर हात ठेवतो. ती मांडयाची मिठी घट्ट करते, घंटानाद. कळ दावून धरतो.

\+ + +

वट्.

'अरे निम्म च  चहा घेतलास. थंड झाला असेल ना.'

'हं'

'त्यांना हे पोलक द्यायच. आणि हे येण्यापूर्वी वाहेर जाणार असशील तर किल्ली शेजारच्या काकूंकडे द्यायची.'

'हं'

'जाऊ'

'हं'

'हं काय ?'

'हो ऽऽ य.'

आई न वघता वगला घालून निघून जाते.

किती कष्ट करते. नाही तर साली ही जिंदगी. भिकारचोट. नुसते वसून माशा मारत खातो. लाज लज्जा शरम सालं काही नाही काय करणार तरी काय. काही कामच मिळत नाही. साले दिवस हराम आहेत. नाही तर आई. खूपवेळ मख्खासे वसून राहतो.

दारातून टपकन् पाकीट टपकत. चित्यासारखा झेपावतो. अपॉइंटमेंट लेटर. कमीत कमी एखाद्या इंटरव्हयूवच वोलावणं. पाकिट फोडतो. वाहेर पडते मित्राची लग्नपत्रिका. शुभ–विवाह. सगळेच विवाह शुभ असतात. गजानन प्रसन्न. एकदा इकडेही वघा. विचारा खिन्नपणे हसतो. सोंड हलवितो.

हं. . . आं ? सोंड हलते ? हलते, हलते,. हलते गौतमवुद्धही हलत होते. असेच विरघळून वदलणारे चेहरे पाहिलेत. केव्हा ? काही आठवत नाही. काही आठवलं नाही.

'मी कुणाला कुण्णाला सांगणार नाही' अस वावीला सांगितलं होतं. होतो पाच सहा वर्षांचा.

आजोळी. शेजारची बाबी रोज यायची खेळायला. एक दिवस शेजारच्या वाळूत खेळत बसलेलो. बाबी म्हणाली मला किनी एक छान स्वप्न पडलं. 'चरकन् दचकलो. लक्कन् रात्रीचं स्वप्न डोळयापुढ उभ राहीलं. 'मलाही एक स्वप्न पडलं. पण मी ते कुण्णाला कुण्णाला सांगणार नाहीए ' 'ए मला सांगना' बाबी 'नाही सांगणार ' पण कां सांगणार नाहीए.' ती विचारत गेली. वाळूत रेघोटया मारत गेलो. स्वतःच स्वप्न विसरत गेलो.

विरघळून बदलणारे चेहरे. हळूहळू आठव जागी होती आहे. अंधुक. पारदर्शक. एकमेकात मिसळलेली दूरवरची धुकट. गुदमरून टाकणारी. ताण दिला तर दिसतय. आठवतय. भिंग पुढे मागे केल्यावर स्पष्ट-अस्पष्ट होणाऱ्या चित्रासारखं. कुठून तरी घोंगावत वाहात सुरू होतय.

✤ ✤ ✤

एक बंदिस्त हॉल. सजविलेला. वेळ संध्याकाळची उजेड बेताचा. दोन झोपाळे. मोठे समोरा समोर. मंदपणे हलताहेत. समोरच्या झोपाळयावर मामा आहेत टोपी काळी असावी. असेलही. शेजारी मावशी, आजो, अण्णा वगैरे. या झोपाळयावर कडेला अंग चोरून दांडी धरून बसलेलो. पाय पुरत नाहीत जमिनीला शेजारी काकांचे पाय हलके हलके रेटा देत झोपाळयाला गती देतात. त्यांच्या शेजारी मोठे काका, आजोबा मागे आत्या वगैरे. समोरच्या झोपाळयावर आईची माणसं या झोपाळयावर दादांची माणसं झोपाळे हलताहेत.

समोरच्या झोपाळयामागे स्टेज सारखा बारका उंचवटा. लख्ख् उजेड भव्य मारोती. तांबडा तांबडा. गाल हुप्प. केसाळ मान. भरलेली छाती. डोक्यावर शिरटोप हसतोय. मान या टोकापासून त्या टोकापर्यंत फिरवतोय. उभी शेपटी खांद्यांच्या मागून डोकावणारी. बघताबघता चेहरा वितळतो. पाझरतो. अस्पष्ट होत होत स्पष्ट होत जाते एक सोंड. लांब कान काळाक-भिन्न डांबरी गणपती. मागे शेपटी उभीच आहे. सोंड उभारलेली ताठ. तक् तक् तक् तक् हालतेय फणा डोलतोय हळूहळू डांबरी चेहराही वितळतोय–

समोर आई, सजलेली, किनारी साडी, फुलांची वेणी, नाकात मुरली. चमकतेय अगदी समीर बसलोय. टक लाऊन बघतेय. सोंड उभारलेली. तक् तक् फणा डोलतोय. आई दिसतेय. बघतोय. आईही बघतेय.

एकदम् उठतो नी हात पसरून धावत

✤ ✤ ✤

ओ––नो.

"मी कुण्णा कुण्णाला सांगणार नाही" "मला सांग ना" "नाही" "पण का नाही सांगणार" "नाही नाही नाही नाही." "सांग"–"नाही"–"सांग" "नाही नाही नाही." "कुणाला नाही."

डोक सुन्न होतं. कुण्णाला नाही सांगणार करत स्वत: देखील विसरलेलो असतो. कां सांगायच नाही ते आजवर माहिती नव्हतं नी आज स्वतःलाच हलके हलके लुट करत करत सांगत आलोय. अर्थासकट बघतोय. धक्का बसून अख्खा बधीर होतोय.

दार वाजत. धोतराचा सोगा धरत दादा आत येतात. न बघता माजघरात जातात.

सुन्न होऊन स्वतःलाच सांगत बसतो. कुण्णा कुण्णाला कां सांगायचे नाही म्हणून.

---

## मागील अंकातील मुद्रणदोष

पृष्ठांक १२६ वर प्रसिद्ध झालेल्या श्री. शिरीष गोपाळ देशपांडे यांच्या 'फळ' या कवितेतील १५ व्या ओळीतील 'रान' या शब्दाऐवजी 'राम' प्रमाणे दुरूस्ती करावी.

मुखपृष्ठावरील 'कै. बाळकृष्ण सन्तुराम गडकरी' या संपादकीय लेखातील दुसऱ्या ओळीतील 'कै. बा. सं. गडकरी, १० डिसेंबर १९७४ च्या ऐवजी १० डिसेंबर ७३' असे वाचावे.

# चौकटीतून आरपार

कुंदा पारसनीस

ते पाचसातजण रामटेकची टेकडी उतरून खाली आले. रामसागराच्या काठावरची ती लहान लहान देवळे पाण्यामध्ये पाय टाकून उभी होती. पाण्यावर लहानमोठे तरंग उमटत होते आणि पायऱ्यांपाशी येऊन फुटत होते स्वतःचे आणि देवळांचे प्रतिबिंब पाहायला वाकलेल्या झाडाला चंचल चित्र दिसत होते—टी. व्ही. बरोबर लावला नाही की जसे दिसावे तसे. तलावाच्या मध्यात पांढरा ढग पडला होता, आणि जरा पलीकडे लाल जांभळे आकाश. वरती बगळ्यांचा त्रिकोण उडत गेला. किरमिजी संध्याकाळ नाहीशी होऊन एकदम काळोख झाला. त्या काळोखात कुठलासा सावलीसारखा दिसणारा पक्षी चिर्रक चिर्रक आवाज करीत अचानक उडाला आणि काळ्या झाडांच्या डोहात दिसेनासा झाला. संध्याकाळाने आपले रंग आवरून घेतले तेव्हा रंगांचा अभाव-एकदम काळोख जाणवला होता तसाच एकदम आकाशभर निळा रंग पसरला. श्यामल पाण्याभोवतालची देवळे ध्यानस्थ झाली, झाडे आकाशात घुसू लागली.

अजय उद्गारला, "किती चित्रातल्यासारखा दिसतो नाही हा देखावा ! शांत, सुंदर. म्हणजे काळ इथं थबकला आहे, चौकटीनं ह्या दृश्याला बंदिस्त करुन ठेवलं आहे, आता ह्या दृश्यात बदलता क्षण येणार नाही, असं वाटतं. आपण हे केव्हातरी पाहिलय् असंही वाटतंय्."

निखिल म्हणाला, "मला तर हे स्वप्नातल्यासारखं वाटतं. खोटं आणि तरीही खरं. हे सुंदर दृश्य आपण भारावून पाहतोय् पण ते निसटून जाणार आहे—कोणत्याही क्षणी. आता, ह्या क्षणाला हे सत्य वास्तव आहे. पण वृत्ती बदलली की त्यात रस वाटणार नाही, त्यात हा अर्थ असणार नाही."

"तो पक्षी कोणता होता ?"

उमा गुणगुणू लागली, "काळोखाचा पक्षी, झपाट्यानं निघाला, काळोखाच्या ढोलीकडे, जिथे होती त्याची पिले, इवलाल्या चोची वासून, वाट पहात, इवलाले काळोखाचे गोळे,—"

"पुरे कर उमा ! ह्या वातावरणाचा तुझ्यावरही परिणाम झालाय् वाटतं." प्रकाशने तिला हटकले.

उमा म्हणाली, "हा निखिल म्हणाला ना. हे दृश्य स्वप्नासारखं आहे—? सगळं जग म्हणजेच एक स्वप्न आहे. केव्हा स्वप्न संपेल किंवा ते बदलेल अन् मी विरून जाईन कुणास ठाऊक! म्हणून या स्वप्नात आहे तोपर्यंत गाऊ दे मला."

"ए, फालतूपणा बास्स करा बरं. चला मुकाट्यानं बंगल्याकडे, अन् काय जी स्वप्न पाहयची असतील ती झोपेत पाहा. ती दिवास्वप्नं नकोत अन् ती आगळीवेगळी भव्य—" प्रकाशने टोकरले अन् मग तो नाटकीपणाने म्हणाला, "ओफ् ! उराशी बाळगलेलं माझं स्वप्न भंग पावलं." एक सुस्कारा. "त्या भव्य नि दिव्य स्वप्नांचा चक्काचूर झाला. हाय, हाय !" निखिलने झाडून तुकडे गोळा करून फेकून देण्याचा अभिनय केला अन् मग सगळे खिदळत, मोकळ्या श्वासाने गीतेच्या मामाच्या घराकडे निघाले.

स्वप्नांवरून गोष्टी निघून साहजिकच त्यांनी गीतावर हल्ला चढविला. वास्तव जगातल्या घटनांचे स्वप्नातल्या घटनांवर होणारे परिणाम यावर ती संशोधन करीत होती.

"वास्तव आणि कल्पना, अनुभव आणि आठवण या सगळ्यांचं मिश्रण स्वप्नामध्ये होतं नाही का ?"

.व्यक्तिगणित स्वप्नं बदलत असली तरीसुद्धा स्वप्नांचे काही ठराविक साचे असलेले दिसतात."

."म्हणजे मग सामाजिक मन, संज्ञेचा एकरूप तळ या भानगडींवर विश्वास ठेवायला हवा."

."काय ग, स्वप्नांचे अर्थ लावतात, किंवा प्रतीकात्मक स्वप्न पडतात असं मानतात त्यात काही तथ्य आहे कां ?"

. ."मला तर ही लैंगिक दृष्टी वाटते. लैंगिक प्रेरणांशी सगळे येऊन ठेपतात."

..."मी 'सायकॉलॉजी ऑफ हेअर' हे पुस्तक वाचलं त्यातही आपलं हेच--सिग्मंड फ्रॉईड हा जर बाई असता तर त्याचे सिद्धांत नक्कीच खूप निराळे झाले असते. त्यालाही आपण मूलभूत सिद्धान्तच म्हणालो असतो. मग कसं ?" (ही उमाची शंका.)

."स्वप्नं भूतकाळातली म्हणजे होऊन गेलेल्या क्षणांची, प्रसंगाची पडतात. पण मग कोणी कोणी म्हणतं, पुढचं घडणारं स्वप्नात दिसलं मग स्वप्नं भविष्यसूचक असतात कां ?"

..."तुझ्या प्रयोगात काही दिसलं का ? काय आढळलं ?"

"मग प्रीस्टली किंवा उन यांची स्वप्नांची नि काळाची थिअरी हीच आहे की–"

गीताला घेऊन सगळ्या विधानांचे भुस्कुट पाडले गेले. शेवटी अशास्त्रीय शास्त्र म्हणून मानसशास्त्रावर शिक्का बसल्यावर मात्र गीता चिडली.

"अजून आपण कोपरनिकस आणि गॅलिलिओच्या काळातच आहोत. तुम्ही नका विश्वास ठेऊ. खरं कारण तुम्हा लोकांना त्या मनाबद्दलचं सत्य पचत नाही मनावर प्रकाश टाकला की तुम्ही घाबरता. तो प्रकाश तुम्हाला सहन होत नाही. आहे कबूल कुणी संशोधन करण्यासाठी गिनिपिग् व्हायला ?"

सगळेजण गप्प बसले. खरेच होते तिचे म्हणणे. मानसशास्त्रीय संशोधनाची ती एक खरी अडचण होती. गीता त्यांची मैत्रिण. शिवाय तिच्या मामांकडे सगळे उतरलेले. गीताने आणि तिच्या इतिहास संशोधक मामांनी त्यांची केवढी सरबराई ठेविली होती. दुखावल्याची भरपाई म्हणून जेवण झाल्यावर प्रत्येकजण तिच्या कामाबद्दल विचारू लागला. आपल्याला खुलविण्याचा प्रकार हे गीताने केव्हाच ओळखले, नव्हे अपेक्षिलेही होते. पण तीही नकळत आपल्या प्रयोगाबद्दल सांगण्यात रंगून गेली.

स्वप्न किती सेकंद–मिनिटे, किती वेळ पडते; तुटलेले स्वप्न पुन्हा तसेच पडते का; ते बदलते का, बदलता येते कां इत्यादीविषयी बोलून झाल्यावर गीता म्हणाली, "सध्या मी प्रयोग करतीय तो असा की स्वप्न पडायला सुरुवात झाली असताना वास्तव जगात ज्या काही घटना त्या क्षणी समीप घडत असतात त्यांचा स्वप्नातल्या घटनांवर काही परिणाम होतो का हे पाह्यचं."

निखिलने विचारले, "म्हणजे मला स्वप्न पडत असताना वरून विमान गेलं तर मी स्वप्नात विमानातून प्रवास करतोय असं येईल–"

"किंवा तस्करांचं विमान मी अडवतोय्, त्यांना पकडतोय असं मला स्वप्न पडेल." प्रकाश म्हणाला.

"होयं. तेच मला दाखवायचं आहे की विमानाशीसंबंधित असं काहीतरी स्वप्नात येतं, मी प्रयोग करते तेव्हा घटना मुद्दाम तयार करते–अनुभवायला देते. एकादा वास, एकादा स्पर्श, चव. आणि मग काय परिणाम होतो ?–तर अमुक अमुक होतं हे सिद्ध करायचं. प्रयोग मात्र पुष्कळ करायला हवेत."

उमाने शंका काढली, "तू वास, स्पर्श, आवाज, चव म्हणाली. पण डोळे मिटलेले असतात तेव्हा ती संवेदना बाद झाली, फक्त या चार, असंच ना ?"

"एकेक एकेक योजनाबद्ध घटना निर्माण करणं चालू आहे. जेवढे तयार असतील तेवढ्यांवर मी प्रयोग सुरू केलेले आहेत." गीता उत्साहाने म्हणाली, "अन् मला आढळून आलंय् की परिणाम नक्की होतो. शॉवरचा आवाज केल्यावर पाऊस पडायला लागला आहे असं वाटणं; गाण्याच्या आवाजानं त्या गाण्याशी निगडित असे मनातले विचार स्वप्नात काही रूप घेऊन येणं–एका बाईला मी गोंगाट,अत्तराचा नि घामेजलेल्या रूमालाचा वास, सिगरेटचा वास, गाण्याची लकेर असं प्रयोगात अनुभवायला दिलं. तर तिला पडणाऱ्या स्वप्नात ती एका लग्नघरात तिच्या वहिणीशी बोलत असताना त्या उठून सिनेमाला गेल्या असं आलं."

सर्वांना भयंकर उत्सुकता वाटत होती. अजय म्हणाला, "ए, मग आज कर ना प्रयोग. माझ्यावर कर. अन् उमा असू दे जवळ. नाहीतर असं कर. आम्हा दोघांवर एकदम प्रयोग कर. म्हणजे स्वप्नात तरी ती माझ्या मनासारखं वागते का–"

उमा शहारली. "नको नको ! मी नाही तयार प्रयोग करून घ्यायला. माझं मन म्हणजे खाजगी बाब."

प्रकाश म्हणाला, "शिवाय सगळं जग हिला



अनुक्रमणिका

स्वप्न वाटतं. म्हणजे स्वप्नातल्या स्वप्नावर परिणाम असा तुझा प्रयोग व्हायचा, गीता !"

"अरे, पण असा एकदम कसा प्रयोग करता येईल ? त्याला यंत्र हवं. श्वास मोजायला, ठोके मोजायला, अजय पूर्ण झोपी गेला हे पाहायला, त्याला स्वप्न पडायला लागलय् ते थांबलंय हे कळायला हवं. स्वप्न संपल्याबरोबर लगेच उठवून विचारावं लागतं–"

"पण मला ह्या इथंच प्रयोग करून घ्यायचाय्. घरापासून दूर आहे शिवाय सुंदर, स्वप्नवत् ठिकाण आहे हे." अजयने तिला भर घातली अन् सगळ्यांनी त्याचे म्हणणे उचलून धरले.

दुसऱ्या रात्री रामटेकच्या पायथ्याशी प्रकाश आणि निखिल अजयच्या सोबत निजले. उमा, गीता आणि गीताचे मामा जरा दूर बसले होते. अजयला झोप लागता लागेना. मध्यरात्रीनंतर केव्हातरी त्याला झोप लागली. प्रयोग सुरू झाला. त्याला स्वप्न पडू लागले :–

"रामटेकची टेकडी उतरून अजय खाली आला. समोर रामसागराचा विस्तीर्ण तलाव पसरलेला होता. काठावर लहान लहान देवळे होती. त्यातून घंटानाद ऐकू येत होता. पाण्याच्या लाटा पायरीवर आपटून फुटत होत्या. हळूहळू काळोख पसरत चालला. एक काळा पक्षी चिर्रक चिर्रक आवाज करीत उडाला आणि झाडीत दिसेनासा झाला. एका देवळातून एक सुंदर तरुणी बाहेर आली आणि त्याच्याकडे पाहून हसली. "बाबा तुमची वाटच पाहताहेत चला." ती त्याला एका प्रासादात घेऊन गेली. फुलांच्या ताटव्यातून त्यांची वाट होती वाटेवर अभ्रकांची चमचम होती. अजय तिला काही सांगणार होता एवढ्यात तिचे वडील सामोरे आले. "तुम्ही नंदिवर्धनहून आलात ना? प्रवास कसा झाला ? शिणला असाल-भोजन, विश्रांति घ्या. मग कामाचं बोलू." नंतर आपण खूप दिवस लोटल्यावर त्या तरूणीचा निरोप घेऊन निघतो आहोत असे अजयला एकदम दिसले. गार वारा सुटला होता. फुलांचा सुगंध उधळत होता. दूरवरून संगीताचे सूर ऐकू येत होते. तिने त्याचा हात घट्ट धरला होता. ती कापत कापत म्हणाली, "तुम्ही महाराज दामोदर सेनांकडे शब्द टाका." "मी काय करणार ? तू समजतेस तो मी नाही." "नाही हो नाही ! प्रभावती राज्ञींचा माझ्यावर उगाच रोष आहे. तुम्ही दामोदरसेनांचा निरोप घेऊन या नि मग मला घेऊन जा. मी वाट पाहीन इथेच रामगिरीवर ही आठवण ठेवा." असे म्हणून तिने एक पत्र आणि एक अंगठी अजयच्या हातात सरकविली. आणलेल्या घोड्यावर बसून अजय निघाला.

स्वप्न संपले–अजय जागा झाला. अन् त्याने सांगितले ते गीताने उतरवून घेतले. सगळेजण मग अजयला चिडवायला लागले. "हे तुझ्या मनात अं ? भलताच रोमँटिक आहेस. आम्ही म्हणत होतो बिचारा साधा, नाकासमोर चालणारा इंजिनियर !" ही प्रकाशची कॉमेंट. निखिल म्हणाला, "अन् ती सुंदर तरुणी कशी होती ? बघ हं ! उमा चिडेल नाहीतर!"

अजय म्हणाला, "तिचे केस लांब होते, डोळे मोठे, उमासारखेच निळे–पण, पण ती उमा नव्हती, दुसरी कुणी, पण ओळखीची." मग गीताकडे वळून तो म्हणाला, "काय, काय झालं सांग मला. तू कोणत्या घटना इंट्रोड्यूस केल्यास, सांग न गीता."

गीता म्हणाली, "ह्या वातावरणाचा परिणाम म्हणून तुला कालचंच रामसागराचं दृश्य दिसायला लागलं. मी हा बघ फुलांचा गुच्छ आणला होता. तो तुला हुंगायला दिला म्हणून तुझ्या स्वप्नात ताटवे आले. ह्या टॉर्चपंख्याचा वारा, टेपवरचं गाणं, प्रकाशनं बोटांनी घोड्यांच्या टापांसारखा टोक टोक आवाज काढला होता. बघ, झाला की परिणाम ? ही पत्राची कल्पना उमाची. काय लिहिलं होतंस ग त्यात ?"

निखिल म्हणाला, "अन् रामटेक म्हणजेच रामगिरी. इथले वाकाटक राजे, प्रभावतीगुप्ता, प्रवरसेन, त्यांची राजधानी नंदिवर्धन, त्यांचे ताम्रपट हे सगळं परवाच नाही का गीताच्या मामांनी सांगितलं अन् दाखवलं. आठवून तुझ्या मेंदूनं एक सुंदर रोमँटिक स्वप्न तयार केलं. असंच ना गीता ?"

प्रकाश म्हणाला, "अरे पण, निखिल, अजय कुठे होता त्यावेळी ? तो अन् उमा बाहेर गेले होते. अजयला तर काहीच–'

हरवलेल्या डोळ्यांनी सभोवार पाहात अजय म्हणाला, " ते स्वप्न होतं ? नाही नाही गीता, निखिल. ते स्वप्न नव्हतं. फार फार खरं वाटत होतं. अजूनही वाटतंय्. त्या तरुणीला पाहिल्याबरोबर तिची माझी

जन्मान्तरीची ओळख आहे, असं वाटलं. निरोप घेताना अवघड वाटलं." भानावर येऊन मृदु स्वरात तो म्हणाला, "रागावू नकोस. प्लीज."

उमा तंद्रीत होती. गीताकडे वळून ती म्हणाली, "मी अजयचा हात धरला, त्याच्या हातात कागद, अंगठी दिली, स्पर्शसंवेदना झाली, ठीक ! पण त्याला चिट्ठीतलं दिसलं कसं ? गीता. मी लिहिलं होतं त्यातलीच काही वाक्यं अजयच्या सांगण्यात आली–"

"काय लिहिलं होतस ?"

"मी लिहिलं होतं, तुझा माझ्यावर उगीच रोग आहे. तो विसरून जा. निरोप घेऊन या, मला घेऊन जा." उत्तेजित होऊन उमा म्हणाली, "मी थोडा वेळ त्याच्या तोंडासमोर कागद धरला होता. तेव्हा मिटल्या डोळ्यांनीही त्याला दिसलं का ? त्यानं तेच कसं सांगितले ? तुला काय वाटतं ? काय घडलं ?"

'बघू, बघू" गीताने अजयच्या घट्ट हातातून ते पत्र घेतले. उमाने लिहिलेले त्यावर होतेच पण त्याखाली काहीतरी आणखी लिहिलेले होते, अस्पष्ट, न समजणारे. "छे, हे नाही मी लिहिलं !" उमाने कागद उलटसुलट बघून मामांच्या हाती दिला. ते अवाक् होऊन कागदावरची अक्षरे वाचीत बसले.

अजय ओरडला, "नाही गीता, ते स्वप्न नव्हतं. प्रत्यक्ष घडलं होतं. हा कागद उमाचा नाही. तिनं तिनं दिलेला आहे. ते पत्र नि अंगठी–"

समजावणीच्या सुरात गीता म्हणाली, "अजय ती अंगठी मी आणली होती, तुझ्यावर प्रयोग करायला."

मामा अतिशय अस्वस्थ झाले होते. 'थांबा, सगळेजण इकडे लक्ष द्या. मी काय सांगतो ते ऐका. पेटिकाशीर्षक या लिपीतली ही अक्षरं आहेत. ताम्रपटांवरती असते ती चौकोनी लिपी. लिहिलं आहे– मी इथेच वाट पाहीन. पुढच्या पौर्णिमेपर्यंत. नव्हे कल्पान्तापर्यंत. तुझीच प्रिया. पण प्रश्न आहे हे कुणी लिहिलं असावं. मी नाही–अशी चेष्टा मी करणार नाही. उमा, तू ? कुणाला माहिती आहे ही पुरातन लिपी ? माझ्यासारख्या फार थोड्यांना माहीती असते–मग–''

सगळ्यांच्या माना हलल्या. श्वास रोखले गेले.

अजय पुन्हा म्हणाला, "नाही गीता, निखिल– उमा, प्रकाश, नाही नाही, नाही ! ते स्वप्न नव्हतं. प्रत्यक्ष घडलं होत. ती कल्पान्तापर्यंत माझी वाट पाहणार होती. इथं ! ह्या इथं ते स्वप्न नव्हतं. पाहा, पाहा ! निरोप देताना गवतावर बसलो होतो तेव्हाचा हा पाहा माझ्या हाताला अजून चुरगाळलेल्या पानांचा वास येतो आहे. उमा, उमा, तू–तू"

उमाचा चेहरा पांढरा फटक पडला होता. अजय हे तिचे एक स्वप्न होते.

वास्तव घटनांचा स्वप्नांवर परिणाम होतो आणि स्वप्ने ही नेहमी संपत असतात. अजयने उत्खननाच्या कार्याला वाहून घेतले आहे. उमा स्वप्नातल्या सारखी विरून गेली आहे.

